ISSN - 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XIV | Issue - I | January - March - 2025

MARATHI PART - III

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal No. 40776**

**Single Blind Review / Double Blind Review**

**Impact Factor / Indexing
2023 - 7.428**
www.sjifactor.com

**EDITOR**

Dr. Vinay Shankarrao Hatole
Assistant Professor, International Center of Excellence in Engineering
& Management (ICEEM) College, Waluj, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

**PUBLISHED BY**

**AJANTA PRAKASHAN**
Jaisingpura, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad), also Published the same at Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad)

**Printed by**

Ajanta Computer,
Near University Gate, Jaisingpura,
Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad), Maharashtra, India

**Published by**

**Ajanta Prakashan,**
Near University Gate, Jaisingpura,
Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad), Maharashtra, India
Cell No. : 9579260877, 9822620877
E-mail : ajanta2023@gmail.com, www.ajantaprakashan.in

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 7.428 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Shrikrishna S. Bal**
I/C Principal (Retd.),
Head, Department of Psychology,
D.B.J.College, Chiplun, Dist. Ratnagiri (M.S.)

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# EDITORIAL BOARD


**Dr. B. R. Kamble**
Kirti M. Doongursee College,
Dadar, Mumbai-28.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Vimal K. Lahari**
Assistant Professor, Department of Sociology,
Banaras Hindu University, Varanasi, Uttar Pradesh.

**Dr. Pandit Sheshrao Nalawade**
I/C Principle,
Pandit Jawaharlal Neharu Mahavidyalay,
Aurangabad.

**Dr. Gangadhar Balu Chavan**
Assistant Professor,
HOD, Department of Sociology,
Kanya Mahavidyalaya, Miraj, Sangli.

**Prof. Vinayak Yashwant Vanmore**
Assistant Professor,
HOD, Department of Economic,
Kanya Mahavidyalaya, Miraj, Sangli.

**Dr. Shabana Gaibiso Halangali**
Assistant Professor,
HOD, Department of Political Science,
Kanya Mahavidyalaya, Miraj, Sangli.

**Prof. Ramesh Shivappa Kattimani**
Assistant Professor,
HOD, Department of Psychology,
Kanya Mahavidyalaya, Miraj, Sangli.

**Dr. Babasaheb Mahalu Sarger**
Physical Directors,
HOD, Department of Physical Education & Sports,
Kanya Mahavidyalaya, Miraj, Sangli.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

The New Miraj Education Society's

# KANYA MAHAVIDYALAYA, MIRAJ

*(Affilated to Shivaji University, Kolhapur*
*ICSSR Sponsered)*


One Day Multidisplinary National Seminar
On

# GENDER SENSITIZATION FOR GENDER EQUALITY

**Monday, 6th January, 2025**

## Organized by


IQAC & Department of Economics,
Geography, History, Political Science,
Psychology, Sociology, Library Science,
Physical Education & Sports



**Prin. Dr. Ulhas Malkar**

Principal & Organizing Secretary

# Message



The New Miraj Education Society has been established in 1960 with a vision to provide quality educational facilities to the students of Miraj city and surrounding areas. The society is now running different educational institutions like Kanya Mahavidyalaya, Miraj, Shree Balawantrao Marathe High School and Shree Dinkararo Gokhale Primary School and little Orchid Pre-Primary School.

Established in 1983, Kanya Mahavidyalaya, Miraj is a leading private government aided college and started with an aim to cater the needs of girls from Miraj city and surrounding villages. Our institution has completed forty successful years and it has organized various workshops, seminars and conferences.

Our institutions has organized a One Day Multidisciplinary National Seminar on **'Gender Sensitization for Gender Equality'**. On this occasion and congratulate all the researches and dignitaries, who are gracing this seminar. I wish the organizing committee a grand success.

**S/D**
**Mr. Vinayak Gokhale**
Chairman,
The New Miraj Education Society,
Miraj

# Message



The New Miraj Education Society's Kanya Mahavidyalaya, Miraj is organizing one day Multidisciplinary National seminar on **'Gender Sensitization for Gender Equality'** on Monday, 6st January 2025.

I hope large number of participants will actively participate. The national seminar will serve as a platform for young researchers for exchange of innovative ideas.

I wish a grand success for the national seminar

**Mr. Raju P. Zadbuke**
Secretary
The New Miraj Education Society,
Miraj

## प्राचार्य शुभेच्छा संदेश



मिरज या ऐतिहासिक नगरीमध्ये आपणा सर्वांचे स्वागत करताना मला मनोमन आनंद वाटतो आहे. भारतातील तंतुवाद्य निर्मितीचे एक प्रमुख केंद्र म्हणून मिरजेची ख्याती आहे. आधुनिक काळात द.महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकासाठी वैदयकीय नगरी म्हणून मिरज प्रसिद्ध आहे.

मुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून दि न्यू मिरज एज्युकेशन सोसायटी मिरज ने सन १९८३ साली कन्या महाविद्यालयाची स्थापना केली. आज के.जी. टू पी.जी., हे शिक्षणाचे केंद्र म्हणून महाविद्यालयाची घोडदौड सुरू आहे. **लिंगभाव संवेदनशीलतेसाठी लिंगभाव समानता** या विषयावर विचारांचे आदान-प्रदान व्हावे या उद्देशाने **ICSSR-दिल्ली** यांच्या सहकार्याने एकदिवसीय बहूविद्याशाखीय राष्ट्रीय सेमिनार दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयात आयोजित केला आहे.

जगातील प्रमुख देशांच्या तुलनेत लिंगभाव समानता या बाबतीत भारताला भूमिका निभवावी लागेल, लिंगाच्या आधारावर देशातील कोणत्याही व्यक्तिच्या बाबतीत भेदभाव न करता समानता, सन्मान आणि समजदार सहजीवन जगता आले पाहिजे. यादृष्टीने समाजातील विविध भूमिका आणि जबाबदारी पार पाडताना प्रत्येकास लिंग आधारीत समानतेचा अनुभव येणे संपन्न मानवी समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक आहे. नोकरीचे ठिकाण, कामधंद्याचे ठिकाण, शिक्षण, कुटुंब आणि सार्वजनिक जीवनात सर्वांना समान संधी मिळणेसाठी व मानव समाजाच्या प्रगतीसाठी लिंगभाव समानता निर्माण होणे महत्वाचे आहे. राष्ट्रीय पातळीवरील या सेमिनारच्या माध्यमातून भारतीय समाजातील एका ज्वलंत प्रश्नावर विचारांचा जागर होणे हेही नसे थोडके... देशात लिंग संवेदनशीलता निर्माण होण्याच्या या प्रयत्नास हार्दिक शुभेच्छा !

**Prin. Dr. Ulhas M. Malkar**
Kanya Mahavidyalaya, Miraj

# From the Desk of Editors......

| Co-editor | Editor/Convener | Co-editor |
|---|---|---|
|  |  |  |

We are extremely happy to organize this One Day Multidisciplinary Seminar on ''Gender Sensitization for Gender Equality'' on 6st January 2025 in the New Miraj Education Society's Kanya Mahavidyalaya, Miraj, which was established in 1983. To tell about our college, our girl students are establishing themselves as police inspectors, professors, teachers, sales tax inspectors, judges, journalists, counselors and so on.

We are sure that this seminar will illuminate various trends and issues in social sciences such as Economics, History, Geography, Sociology, Psychology, Physical Education and Political Science. The President of The New Miraj Education Society, Hon. Mr. Vinayak Gokhale is the chair person of this national seminar. Disha Pinki Shaikh is the chief guest and a key note addresses, who is an renowned Social Worker. For this seminar. Prof. Anurekha Chari-Wagh , she is a professor University of Hyderabad and Dr. Putul Sathe, She is a Associate professor S.N.D.T. Women's University, Mumbai, have graced our seminar with their presence as resource persons.

Undoubtedly, this seminar will prove itself as a polestar for the researchers in their research field. There will be an intense exchange of ideas and knowledge between participants and the resource persons from various universities and colleges. So, the young researchers will be benefitted from this seminar. They are going to enhance their knowledge as well.

We are very proud to assert that we have received about 204 research papers from all over the country for our seminar and these researchers have taken pains to get an attentions towards the new trends and problems in the social sciences. The Editor of the Ajanata An International Multidisciplinary Research Journal Peer Reviewd Refered & UGC Listed Journal

Dr. Vinay Hatole responsibility to publish these all papers. We are grateful towards him that he has executed his responsibility vary successfully.

The backbone of our college, Hon. Prin. Dr.Ulhas M.Malakar has been an inspiration for this national seminar. Our colleagues Dr.Manjiri Kulkarni, Dr.Babasaheb Sargar, Prof. Ramesh Kattimani, Dr. Vinayak Pawar, Dr.Santosh Shelake, Prof. Abhinav Auradkar, Dr.Madhura Jadhav, Prof. Kamal Kale, Dr.Swati Malkar, Prof.Kshitij Jadhav have invested rigorous efforts to organize this seminar successfully.

We welcome you all in this culturally and educationally rich city, which has also established itself as a city with incredible medical amenities. We are grateful to all the participating researchers, scholars, professors and all my colleagues as well as the non-teaching staff of our college.

| **Prof. Vinayak Vanmore** | **Dr. Gangadhar Chavan** | **Dr. Shabana Halangali** |
|---|---|---|
| (Co-editor) | (Editor) | (Co-editor) |

# Keynote Address



दि न्यू मिरज एज्युकेशन सोसायटीच्या कन्या महाविद्यालय मिरज ने लिंगभाव संवेदनशीलतेसाठी लिंगभाव समानता हा राष्ट्रीय सेमिनार मिरज सारख्या शहरात आयोजित केला आहे याचा मला अत्यंत आनंद होत आहे. हा विषय समाजाला आदर्श असा विषय आहे. संयोजकांनी हा विषय चर्चेसाठी घेतला आणि त्यावर मोकळेपणाने चर्चा होणे ही आजच्या काळाची गरज आहे असे मला वाटते. स्त्रिया आणि पुरुष यांच्या शरीररचनांमध्ये फरक आहे, पण समाजामध्ये स्त्रिया आणि पुरुषांबाबत जे भेदभाव केले जातात, त्या सर्वांचे कारण आपल्याला त्यांच्या शारीरिक फरकांमध्ये सापडेलच असे नाही. लिंग हे शारीरिक आहे तर लिंगभाव समाजात घडवला जातो. स्त्रिया आणि पुरुषांना विशिष्ट प्रकारे वाढवले जाते; यात स्त्रियांनी व पुरुषांनी कसे वागावे हे शिकवले जाते. ह्याच स्त्रीत्व आणि पुरुषत्व ह्या कल्पना होत. ह्या कल्पना माणसांच्या वागणुकीवर खोलवर प्रभाव टाकतात. स्त्रीत्व आणि पुरुषत्वाच्या रूढ कल्पना ह्या स्त्रिया आणि पुरुषांना साचेबद्ध करून एकमेकांविरुद्ध उभे करतात. उदा. स्त्रीने सहनशील, नम्र असावे, आज्ञाधारक असावे, सर्वांशी जुळवून घ्यावे अशी अपेक्षा असते. तर पुरुषांना आक्रमक बनायला मुभा असते. ह्या कल्पना स्त्री-पुरूषांवर अवास्तव ओझे लादतात. उदा. पुरुषांना रडायची मोकळीक नसते. एखादा पुरुष रडायला लागला तर, काय मुलीसारखा मुळूमुळू रडतोस म्हणून हिणवले जाते. एखादी स्त्री जोरजोरात बोलली, हसली तर तिच्याकडे पुरुषी म्हणून बघितले जाते. घरकाम, चूल-मूल ही बाईची जबाबदारी तर घराबाहेरच्या जबाबदाऱ्या पुरुषाच्या मानल्या जातात. मुलींना लहानपणी खेळायला बाहुली, भातुकली तर मुलांना सायकल, कार, बंदूक अशी खेळणी दिली जातात. प्रौढ वयात येणाऱ्या जबाबदारीचे प्रशिक्षण लहान वयातच सुरू होते. स्त्री-पुरुषामधला शारीरिक फरक हा प्रामुख्याने त्यांच्या पुनरुत्पादनासंदर्भातील भिन्न जबाबदाऱ्या हा आहे. पुरुषाकडे रेतन तर स्त्रीकडे गर्भारपण, बाळंतपण आणि स्तनपान अशा प्राकृतिक जबाबदाऱ्या आहेत मात्र या पलीकडे कोणतीही कामे स्त्री/पुरुष कोणीही करू शकतात. उदा. स्वयंपाक, घरसफाई, शिवण-टिपण, शेतातले काम,

डॉक्टर, नर्स, इंजिनिअर, शिक्षक इ.इ. मात्र घरकाम आणि बालसंगोपन ह्या आजही स्त्रीच्याच प्राथमिक जबाबदाऱ्या मानल्या जातात. इतक्या की बाहेरच्या जगातही स्त्रियांना बहुतेकदा घरकामाची विस्तारीत कामे मिळतात उदा. शिक्षिका, नर्स, स्वागतिका अशा प्रकारच्या कामात स्त्रियांचा अधिक भरणा असतो. अगदी शेतीकामातही स्त्रियांना पुरुषाच्या तुलनेत कमी मजुरी देण्याची मानसिकता आढळते. अर्थात काळानुसार आणि समाज परिवर्तनाच्या प्रयत्नांमुळे लिंगभावाच्या कल्पना आता बदलत चालल्याचे/खुल्या होऊ लागल्याचेही दिसते. या लिंग भावाचा उल्लेख जेंडर असाही केला जातो.

अशा तऱ्हेने लिंगभाव हा सामाजिक -सांस्कृतिक संरचनातून घडवला जातो उदा. जात, धर्म, वय इ. वेगवेगळ्या संस्कृतींनुसार लिंगभाव बदलत राहतो. पुरुषप्रधान समाजात लिंगभावाची जडणघडण पुरुषांना झुकते माप देणारी असते आणि तुलनेने स्त्रियांना पक्षपाताला अधिक तोंड द्यावे लागते. पुरुष कुटुंबप्रमुख, पुरुषाकडे मालमत्तेची मालकी, लग्न झाल्यावर स्त्रियांनी सासरी जाणे, पितृवंशीय व्यवस्था ह्या सामाजिक प्रक्रिया आपली समाजव्यवस्था पुरुषप्रधान असल्याचे दर्शवतात. अशा समाजात स्त्रीचे स्थान दुय्यम बनते. ह्याचा एक गंभीर परिणाम म्हणजे स्त्रियांवर होणारे अत्याचार. बहुतेकदा स्त्रियांना आपल्या दुय्यम स्थानामुळे अत्याचारांना तोंड द्यावे लागते. अधिकाधिक स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रात अनेक जबाबदाऱ्या निभावत आहेत आणि स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनाही वाढत आहेत. ह्यासाठी सामाजिक प्रबोधन आणि स्त्रियांचा माणूस म्हणून आदर समाजात रुजवणे गरजेचे आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की लिंगभाव म्हणजे स्त्रियांचा वेगळा विचार नव्हे तर लिंगभाव म्हणजे एखाद्या समाजातील स्त्रिया आणि पुरुषांची सापेक्ष सामाजिक स्थिती. अर्थात आजपर्यंत प्रामुख्याने स्त्री आणि पुरुष ह्या दोन लिंगभाव अस्मितांचाच विचार झाला आहे. याहून भिन्न लिंग व लिंगभाव अस्मिता समजून त्याचीही लिंगभाव संवेदनशील दृष्टीकोनातून चिकित्सा होणे गरजेचे आहे.

या लिंगभाव संवेदनशीलतेच्या राष्ट्रीय सेमिनार साठी माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**दिशा पिंकी शेख**
**प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या**

# Chief Guest Address



**GENDER SENTIZATION AND EDUCATION, EQUALITY AND ADVOCACY**

The title covers a vast spectrum and calls for an engagement with three inter-related discussions within institutions of higher learning. The three discussions are significant at this particular juncture when there are been a shift in the demography of classrooms and hence the need for the space of higher education to be free of all forms of discrimination and harassment. Therefore, the advocacy for the space where all can claim equality and dignity has to be executed within an interactional framework that will combine genders with religion, class, caste, religion, ability and sexuality (SAKSHAM,2013). This framework has to be expanded to include meaningful interventions, which will include approaches that will be educative, preventive and correctional (Ibid). Therefore, approaching higher educational institutions as site of addressing misogyny which is prevalent in various forms in the society including knowledge production will be the focus of this presentation.

**Understanding Gender**

Gender as a category in the process of knowledge production has been prevalent in institutions of higher learning (HEIs), but officially the establishment of department of Women's Studies resulted in challenged the manner in which research, teaching and structuring of syllabi was understood. Here, gender as a category of analysis was confined to women only and in most cases the understanding was a homogenous one. Gender as a category of analysis which included a wide spectrum of sexual identities has still to receive official recognition. UGC Scheme for financial support to women's study centers and women's development centers still carries the nomenclature 'Women's Studies'. A glance at the thesis's title on Shohganga proves the point that woman as a category is conflated with gender. As feminism matured we have to engage with the complex history of shifting paradigm of gender, which was understood in terms of sex/gender binary to a more nuanced understanding when feminist positions and moorings were revisited by Third Wave and Fourth Wave feminism in Global North and a very different understanding which emerged from feminist movements in the Global South (Kumar 1993, Arya, 2020,). In the context of Global North (on account of political economy of knowledge production and circulation we find the predominance of this understanding of gender in syllabi and eventually research) the concept

of gender emerging from the impact of post-modernism, queer theorists and third-wave feminists (Butler's understanding of gender) is heard in research projects:

The concept of gender as performance suggests a level of free play with gender categories that we enter into socially. The result is that individuals have the potential to create 'gender trouble' and challenge the way discourse establishes and reinforces certain meanings and 'institutions', such as that of 'compulsory heterosexuality'. Butler's most radical deconstruction of the sex/gender distinction has been embraced in particular by queer theorists and third wave feminists. (Pilcher and Whelehan,2004.)

The understanding of gender and gendered oppression, violence and discrimination at the intersection of diversity and difference and changing global order in the context of Global South calls for pluralism and instability of the category gender, which perhaps cannot be contained within the stable structure of “syllabus”. Here, I come to the point of Education (I am for the time being confining to HEIs) and Gender Sensitisation, where the dominant understanding is organizing workshop of a week on gender sensitization and POSH (Prevention of Sexual Harassment, 2013, which is confined to women only), which has been made mandatory by UGC and is a requirement for NAAC assessment (the concept of gender audit). This exercise has resulted in conducting the workshop in a given formula without taking into account the fact that sexual harassment is compounded by “other axes of discrimination and exploitation, based on class, rural location, caste, minority identity, sexuality. . .”(SAKSHAM, 5, 2013) and the fact that there are many cases where it is rendered invisible and even stigmatized. An engagement with the Constitution, laws, rights, violence and masculinity along with creation of “positive interpersonal climate on campuses” (Ibid 4) is a long overhaul that calls for a series of measures listed in the SAKSHAM report.

Gender sensitization in the context of formal education is an acknowledgement of the gender hierarchies and gender ideology prevailing across various sites within the system; curriculum, pedagogy and the physical spaces of the educational institutions and includes administrative and teaching members (Manjrekar, 2013). With respect to curriculum an 'add-on-approach' with respect to women's issues is widely prevalent and the pedagogy is contestable. Also syllabi in humanities and liberal arts have an in-built module on “women's issues” not gender. Syllabi in pure sciences, engineering and commerce perceive gender neutrality in design of syllabi and pedagogy and therefore do not offer any course on gender issues. However, NEP has tried to address this lacuna to some extent. As Sharmila Rege in the context of discipline of Sociology has pointed to the larger perspective of this inclusion:

Taking as a starting point a critique of mainstream sociology, shows how the discipline has remained impervious to demands for inclusion of knowledge from the margins, of women, Dalits and Adivasis, and their inclusion in curricula remains piecemeal and superficial.. . . '[Thus] “good sociology” continues to be defined in terms of the binaries of objectivism/sub-jectivism,

social/political, social world/knower, experience/knowledge, tradition/modernity and theoretical Brahman/empirical Shudra (Ibid).

With respect to pedagogy, Paulo Friere critiqued the 'banking' approach in education and called for dialogical pedagogy which will listen to the experiences of the students that they bring to the classroom to enable reflection and critique dominant paradigms of knowledge production. Rege builds on this and proposes Phule-Ambedkarite- pedagogical perspective which addresses the hierarchy in the classroom:

The "difference" of Phule-Ambedkarite pedagogical perspectives lies in a double articulation that conceives education then not only in terms of cultures of learning and teaching but also dissenting against thatwhich is learnt and taught by dominant cultural practices. This entails constituting teachers and students as modern truth seekers and agents of social transformation who seek to become "a light unto themselves". The methods are those that seek to integrate the principles of prajna (critical understanding) with karuna (empathetic love) and samata (equality). This democratisation of method of knowledge marks the difference of Phule-Ambedkarite perspectives from methods based on binaries of reason/emotion, public/private, assumption of neutral objectivity/celebration of experience that inform much of our teaching and research. (Ibid).

Elaborating upon this perspective, Rege expounds upon the radical transformative pedagogy embodied in the Phule-Ambedkarite-Feminist perspective:

PAF pedagogical perspectives are critically different from the two much discussed projects in higher education of the same decade, viz. value education and autonomy. They are different in that they contest the logic of projects based on essentialist a priori set of morals or on neoliberal rhetoric of choice that comes without freedom. The practice of PAF pedagogies thus seeks to develop cultures of dissent through analyses of the various categories of oppression underlying the structures and organization of knowledge, but without reducing them to a mere additive mantra of caste, class and gender differences.

When we speak about gender sensitization and education, deconstructing power hierarchies located within an intersectional framework needs to be challenged. Equal and just society cannot be confined to site of higher education only. Therefore, critical pedagogy which calls for an interrogation of modernity's universal project of citizenship and obsession with order will result in education as an act of political intervention advocating an equal society. Wedded to this transformative vision is the establishment of a gender just society beyond the confines of the site of higher education.

**Hon. Dr. Putul Sathe**

Asso. Prof. S. N. D. T., Womens University,

Mumbai.

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | इंजिनिअरिंग आणि कला शाखेच्या विद्यार्थिनींच्या मधील आक्रमकतेचा तुलनात्मक अभ्यास<br>**प्रा. नुतन प्रकाश कणिरे** | १-७ |
| २ | रानी गाइदिन्ल्यूचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान<br>**डॉ. पी. जे. चौधरी** | ८-११ |
| ३ | पाश्चात्य स्त्रीवादाच्या विकासात स्त्रीवादी विचारवंतांची भूमिका<br>**पूजा सर्जेराव चौगले** | १२-१५ |
| ४ | लिंग विषमता आणि पितृसत्ताक समाज<br>**कु. बाबर प्रचिंदा प्रल्हादराव** | १६-२४ |
| ५ | पुरुषांसाठी लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण आणि भावनी दडपणाचे परिणाम<br>**कु. कदम प्रियांका सतिश** | २५-३१ |
| ६ | घरगुती हिंसेपासून महिलांचे संरक्षण आणि कायदे<br>**प्रा. ॲड. प्रियांका विलास झोळे-पाटील** | ३२-३६ |
| ७ | भारतीय स्त्रीचे एकोणविसाव्या शतकातील कालानुरूप बदलते स्थान<br>**सौ. पुष्पा सुभाष गायकवाड** | ३७-४० |
| ८ | स्वप्नवासवदत्तम् या नाटकामधील स्त्रियांची भूमिका<br>**प्रा. रचना सौरभ शहा** | ४१-४६ |
| ९ | स्त्री संरक्षण विषयक कायदे: एक समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. सोनटक्के रमेश शंकरराव** | ४७-५३ |
| १० | भारतातील लैंगिक असमानता<br>**राणी महादेव कांबळे** | ५४-५७ |
| ११ | पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांची निर्मिती: महिला विकासासाठी काळाजी गरज<br>**रूपाली शेखर वाटकर**<br>**प्रा. क्षितीज मिरासाहेब जाधव** | ५८-६३ |
| १२ | भाषा आणि लिंगभेद<br>**इनामदार ऋषिकेश किरण** | ६४-६९ |
| १३ | कोल्हापूर जिल्ह्यातील कोविडशी सामना केलेल्या गृहिणी व नोकरी करणाऱ्या महिलांच्यातील फिअर ऑफ मिसिंग आऊट (FOMO) अभ्यास<br>**संजना श्रीनिवास सोनटक्के** | ७०-७५ |

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | स्त्री सबलीकरण आणि भारतातील स्त्री साक्षरता, आयुर्मान व माता मृत्यू दर यांचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. संतोष संभाजी शेळके** | ७६-८० |
| १५ | कोल्हापूर जिल्ह्यामधील मनरेगा योजनेमधील महिलांचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**संयोगिता दिलीप सोरटे** | ८१-८५ |
| १६ | भारतीय समाजातील लिंगभावात्मक रुढीवादी भूमिका: स्वरूप, आव्हाने व बदल<br>**प्रा. डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे** | ८६-९२ |
| १७ | स्त्री हत्या करणाऱ्या सामाजिक कुप्रथा<br>**प्रा. डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील** | ९३-९७ |
| १८ | मुस्लीम पथ विक्रेते स्त्री आणि पुरुष यांच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास<br>**तैय्यबा अप्पासाहेब मुलाणी** | ९८-१०३ |
| १९ | स्त्री चळवळीतील महत्त्पूर्ण अध्याय-सतीप्रथा निर्मुलन<br>**प्रा. उषादेवी अंकुश कांबळे** | १०४-१०७ |
| २० | परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. विनायक तुकाराम पवार** | १०८-११० |
| २१ | आदिवासी संस्कृतीमधील स्त्रीचे प्रतिबिंब (मराठी कादंबरीच्या अनुषंगाने)<br>**डॉ. विनायक शरदचंद्र राऊत** | १११-११५ |
| २२ | महिलांवरील अत्याचार: स्वरूप, कारणे व उपाय<br>**प्रो. डॉ. मधुरा बाबासाहेब देसाई** | ११६-१२२ |
| २३ | भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्री-पुरुष असमानता - एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. सुनील संभाजी साठे** | १२३-१२८ |
| २४ | भारतातील स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. स्वाती अशोक माळकर** | १२९-१३३ |
| २५ | २१व्या शतकातील पुरुष आणि महिलांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास<br>**प्रा. तबस्सूम हारूनबाशा शेख** | १३४-१३९ |
| २६ | भारतातील महिला विषयक वाढती गुन्हेगारी: एक चिंतन<br>**प्रा. उमेश वांगदरे** | १४०-१४४ |
| २७ | लैंगिक हिंसाचार आणि स्वायत्तता: भारतीय महिला चळवळीचा सहभाग<br>**डॉ. व्ही. एन. जगताप** | १४५-१५० |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
**Savitribai Phule Pune University**
Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/६०
Telephone : 020-25621156/57/60
ईमेल / Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाईट / Website: www.unipune.ac.in

# परिपत्रक क्र.२२४/२०२२

विषय:— शिक्षकांची नियुक्ती, सेवांतर्गत पदोन्नती, मार्गदर्शक मान्यता इत्यादीसाठी शोधनिबंध (Research Paper) ग्राहय धरणेबाबत.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शिक्षकांची नियुक्ती, सेवांतर्गत पदोन्नती (CAS) संशोधन मार्गदर्शक मान्यता (CAS) इत्यादींसाठी खालीलप्रमाणे शोध निबंध ग्राहय धरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) UGC Approved List of Journals आणि UGC Care List अस्तित्वात येण्यापूर्वी ISSN क्रमांक असणाऱ्या सर्व संशोधन पत्रिकेतील शोध निबंध.

ब) बारकाईने पुनर्विलोकन केलेल्या (Peer Reviewed Journal) संशोधन पत्रिकेतील शोध निबंध. परंतु त्यासाठी सदरची प्रक्रिया Single blind review/Double blind review/Open or Transperent Peer Review पध्दतीने पूर्ण केल्याबाबतचे संबंधित संशोधन पत्रिका संपादकांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. उपरोक्त प्रक्रिया न करता संशोधन पत्रिकेच्या संपादकाने केवळ बारकाईने पुनर्विलोकित केलेले (Peer Review Journal) असे नमूद केले असेल तर ते ग्राहय धरण्यात येऊ नये.

क) वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या UGC Care List मध्ये Index केलेल्या संशोधन पत्रिकेत प्रसिध्द शोध निबंध.

सदरचे धोरण पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत असून यापूर्वी विहित संख्येएवढे शोध निबंध प्रसिध्द नसल्याच्या कारणास्तव नाकारण्यात आलेले कोणतेही प्रस्ताव या धोरणाप्रमाणे मान्य होत असल्यास अशा अर्जदारांस पुन्हा नव्याने प्रस्ताव सादर करावा लागेल.

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था आणि मा. विभागप्रमुख, विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे — ४११००७ )
जा.क्र. :— सीबी/६१६ )
दिनांक :— १२/०८/२०२२ )

12/8/2022
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

F:\D\Academic Council Meeting\2022 July 23\Letter and Circular.docx

# १. इंजिनिअरिंग आणि कला शाखेच्या विद्यार्थिनींच्या मधील आक्रमकतेचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. नुतन प्रकाश कणिरे**
संशोधक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**सारांश (Abstract)**

आक्रमकता ही मानवी वर्तनातील एक मूलभूत वैशिष्ट्य असून, ती व्यक्तीच्या मानसिक आणि सामाजिक परिस्थितीचा परिपाक असते. आक्रमकतेचा अभ्यास वैयक्तिक, सामाजिक, आणि शैक्षणिक पातळीवर महत्त्वाचा मानला जातो. या संशोधनाचा उद्देश म्हणजे इंजिनिअरिंग आणि कला शाखेतील विद्यार्थिनींच्या आक्रमकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे हा आहे.

सदर संशोधनासाठी करवीर तालुक्यातील 18 ते 25 वयोगटातील 100 विद्यार्थिनींचा सहेतुक नमुना निवडला गेला. यात 50 विद्यार्थिनी इंजिनिअरिंग शाखेतील आणि 50 विद्यार्थिनी कला शाखेतील आहेत. विद्यार्थिनींच्या आक्रमकतेचे मापन करण्यासाठी डॉ. राम अशिष सिंग यांनी विकसित केलेली आक्रमकता चाचणी वापरण्यात आली. या चाचणीत शारीरिक, मौखिक, आणि अप्रत्यक्ष आक्रमकता यांसारख्या घटकांचा समावेश होता.

डेटा गोळा केल्यानंतर विश्लेषणासाठी मध्यमान (Mean), प्रमाण विचलन (Standard Deviation), आणि टी-मूल्य (t-Test) या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात आला. प्राप्त निष्कर्षांनुसार पुढील गोष्टी आढळून आल्या:

१. इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींमध्ये आक्रमकतेचा स्तर तुलनेने जास्त आहे, विशेषतः शारीरिक आणि मौखिक आक्रमकता अधिक असल्याचे दिसून आले.

२. कला शाखेतील विद्यार्थिनींमध्ये अप्रत्यक्ष आक्रमकता जास्त आहे, जे त्यांच्या सर्जनशील अभ्यासक्रम व भावनिक संवेदनशीलतेचा परिणाम आहे.

३. इंजिनिअरिंग आणि कला शाखेतील विद्यार्थिनींच्या आक्रमकतेत लक्षणीय फरक आहे, जो t-मूल्य 3.45 असून, 0.01 सार्थता पातळीवर स्पष्ट झाला आहे.

आक्रमकता, इंजिनिअरिंग विद्यार्थीनी, कला शाखेच्या विद्यार्थीनी

**प्रस्तावना (Introduction)**

शिक्षण ही केवळ माहिती व ज्ञानप्रदानाची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. समाजाच्या विकासात स्त्रियांच्या सहभागाचे प्रमाण जसजसे वाढत आहे, तसतसे विविध शैक्षणिक शाखांमध्ये त्यांचा प्रवेश आणि योगदान देखील लक्षणीय वाढले आहे. आज, स्त्रिया केवळ परंपरागत क्षेत्रांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत, तर त्यांनी विज्ञान,

तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, कला, संगीत, साहित्य अशा अनेक क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. तथापि, शिक्षणप्रक्रियेदरम्यान स्त्रियांच्या भावनिक, मानसिक आणि सामाजिक आयुष्यावर येणाऱ्या ताणांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते, विशेषतः जेव्हा त्यात आक्रमकतेसारख्या भावनिक प्रतिक्रियांचा समावेश असतो.

आक्रमकता ही एक व्यक्तिमत्त्वाची व भावनिक प्रतिक्रिया असून ती विविध कारणांमुळे उद्भवते. ती सकारात्मक आणि नकारात्मक स्वरूपात दिसून येते. सकारात्मक आक्रमकता विद्यार्थिनींना त्यांच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रेरित करते, त्यांना दृढ बनवते, आणि त्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक यशात महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु, नकारात्मक आक्रमकता मात्र विद्यार्थिनींच्या मानसिक आरोग्याला हानी पोहोचवते, त्यांच्या वर्तनावर विपरित परिणाम करते आणि त्यांच्या शैक्षणिक कामगिरीस अडथळा ठरते.

शैक्षणिक जीवनात, आक्रमकतेच्या प्रकारांचे स्वरूप विविध घटकांवर अवलंबून असते, जसे की शिक्षणाची शाखा, सामाजिक परिस्थिती, वैयक्तिक अनुभव, आणि शैक्षणिक धोरणे. या अभ्यासाचा केंद्रबिंदू इंजिनिअरिंग आणि कला शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींमधील आक्रमकतेचे तुलनात्मक विश्लेषण करणे हा आहे. या शाखांमध्ये असलेल्या शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणामुळे विद्यार्थिनींच्या भावनिक प्रतिक्रियांवर मोठा परिणाम होतो.

**इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींवरील ताण व आक्रमकता**

इंजिनिअरिंग ही एक कठोर आणि तांत्रिक शाखा आहे ज्यात विद्यार्थिनींना अभ्यासक्रमाच्या कठीणतेमुळे आणि वेळेच्या मर्यादेमुळे मोठ्या प्रमाणावर ताणाचा सामना करावा लागतो. त्यांना सतत प्रकल्प, प्रयोगशाळा, परिक्षा, आणि स्पर्धात्मक कार्यक्षमता टिकवावी लागते. या प्रक्रियेतून आक्रमकता निर्माण होऊ शकते, जी कधी सकारात्मक (उदाहरणार्थ, उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दृढता) असते, तर कधी नकारात्मक (जसे की राग, चिडचिड) असते.

तसेच, तंत्रज्ञानावर भर देणाऱ्या या शाखेत, विद्यार्थिनींना पुरुषप्रधान वातावरणात काम करावे लागते, ज्यामुळे त्यांच्यावर सामाजिक अपेक्षांचा आणि लिंगभेदाचा दबाव निर्माण होतो. हे घटक त्यांच्या भावनिक स्वास्थ्यावर नकारात्मक परिणाम करू शकतात.

**कला शाखेतील विद्यार्थिनींच्या आक्रमकतेचे स्वरूप**

कला शाखा ही विद्यार्थिनींच्या सर्जनशीलतेला वाव देणारी शाखा आहे. येथे वैयक्तिक अभिव्यक्ती, सौंदर्याचा अभ्यास, आणि समाजपरिवर्तनाची जबाबदारी यावर भर दिला जातो. परंतु, सर्जनशीलतेच्या प्रवासात विद्यार्थिनींना आर्थिक अनिश्चितता, सामाजिक अपेक्षा, आणि व्यावसायिक संधींच्या मर्यादांमुळे दबावाला सामोरे जावे लागते.

कला शाखेत, विद्यार्थिनींना अधिक वैयक्तिक अभिव्यक्तीची संधी मिळत असली तरी त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या त्यांना मानसिक दबावाखाली ठेवतात. या शाखेतील आक्रमकता कधीकधी अंतर्मुख स्वरूपाची असते, जिथे विद्यार्थिनी आपल्या भावना व्यक्त करण्यात अडखळतात, तर कधी ती बंडखोर स्वरूपात प्रकट होते.

**संशोधनाचे महत्त्व (Significance of the Study)**

या अभ्यासाचा उद्देश विद्यार्थिनींच्या वर्तनातील आक्रमकतेचे स्वरूप समजून घेणे आणि त्यावर शैक्षणिक शाखांचा प्रभाव तपासणे हा आहे.

**महत्त्वाचे पैलू**

**१. वैयक्तिक स्तरावर**

विद्यार्थिनींच्या वर्तनामध्ये सुधारणा करण्यासाठी उपयुक्त.

**२. शैक्षणिक धोरणांसाठी**

विद्यार्थिनींच्या मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त शिफारसी तयार करता येतील.

**३. सामाजिक स्तरावर**

शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थिनींच्या मानसिकतेतील बदलांचे स्वरूप समजून घेता येईल.

**साहित्याचा आढावा (Review of Literature)**

**आक्रमकतेची व्याख्या**

**१. बर्कोविट्स (Berkowitz):** "उद्देशपूर्वक एखाद्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारची इजा पोहोचविणे म्हणजे आक्रमकता होय."

**२. बॅरॉन (Baron):** "इतर व्यक्तींना इजा करण्याच्या उद्देशाने केलेले वर्तन म्हणजे आक्रमकता."

**शैक्षणिक शाखांचा वर्तनावर परिणाम**

**इंजिनिअरिंग शाखा:** कठीण अभ्यासक्रम, प्रकल्पांचे दबाव, आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे विद्यार्थिनींमध्ये आक्रमकतेचा स्तर जास्त असल्याचे दिसते.

**कला शाखा:** सर्जनशील अभ्यासक्रम, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आणि भावनिक संवेदनशीलता या घटकांमुळे विद्यार्थिनींच्या आक्रमकतेचे स्वरूप सौम्य असते.

**मानसशास्त्रीय साधनांचा वापर**

डॉ. राम अशिष सिंग यांनी विकसित केलेल्या आक्रमकता चाचणीचा उपयोग विद्यार्थ्यांच्या आक्रमकतेचे स्वरूप मोजण्यासाठी केला गेला आहे.

**हेतू (Aim)**

इंजिनिअरिंग आणि कला शाखेतील विद्यार्थिनींमधील आक्रमकतेच्या तुलनात्मक फरकांचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे (Objectives)**

१. इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींमधील आक्रमकतेचे स्वरूप तपासणे.

२. कला शाखेतील विद्यार्थिनींमधील आक्रमकतेचे स्वरूप समजून घेणे.

३. दोन्ही शाखांतील विद्यार्थिनींमधील आक्रमकतेतील तुलनात्मक फरकांचा अभ्यास करणे.

**सिद्धांत कल्पना (Hypotheses)**

१. इंजिनिअरिंग शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये कला शाखेच्या विद्यार्थिनींपेक्षा जास्त आक्रमकता दिसून येईल.

२. कला शाखेतील विद्यार्थिनींच्या तुलनेत इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींमध्ये आक्रमकतेचे स्वरूप अधिक लक्षणीय असेल.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

**अ. नमुना (Sample)**

- नमुना निवड: 100 विद्यार्थिनी (प्रत्येकी 50: इंजिनिअरिंग व कला शाखा).
- वय: 18 ते 25 वर्षे.
- निवड पद्धती: सहेतुक नमुना निवड पद्धती.

**ब. मानसशास्त्रीय साधने (Psychological Tools)**

आक्रमकता चाचणी (डॉ. राम अशिष सिंग)

- 50 विधाने.
- गुणांकन:
- 34, 42, 45 विधाने (होय-2, नाही-1).
- उर्वरित विधाने (होय-1, नाही-2).
- चाचणीची विश्वसनीयता: 0.73.

**क. संख्याशास्त्रीय साधने (Statistical Tools)**

१. मध्यमान (Mean).

२. प्रमाण विचलन (Standard Deviation).

३. टी-मूल्य (t-Test).

**परिवर्तके (Variables)**

**१. स्वतंत्र परिवर्तक (Independent Variable)**

शिक्षण शाखा (इंजिनिअरिंग/कला).

**२. अवलंबी परिवर्तक (Dependent Variable)**

आक्रमकता

**फलिते आणि चर्चा (Results and Discussion)**

**तक्ता क्र. 1**

**इंजिनिअरिंग आणि कला शाखेतील विद्यार्थिनींमधील आक्रमकतेबाबत तुलनात्मक विश्लेषण**

| शाखा | नमुना )Sample) | मध्यमान )Mean) | प्रमाण विचलन )SD) | t-मूल्य)t-value) | सार्थता पातळी |
|---|---|---|---|---|---|
| इंजिनिअरिंग | 50 | 92.5 | 3.2 | 3.45 | 0.01** |
| कला | 50 | 88.6 | 4.1 | | |

**चर्चा**

- वरील तक्त्यातील डेटावरून असे स्पष्ट होते की, इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींमधील आक्रमकतेचा स्तर (मध्यमान = 92.5) तुलनेने कला शाखेतील विद्यार्थिनींमध्ये (मध्यमान = 88.6) जास्त आहे.
- प्रमाण विचलन (SD) इंजिनिअरिंगसाठी 3.2 आणि कला शाखेसाठी 4.1 आहे, जे दर्शवते की कला शाखेतील विद्यार्थिनींच्या उत्तरांमध्ये तुलनेने अधिक विसंगती आहे.
- t-मूल्य 3.45 असून, ते 0.01 सार्थता पातळीवर लक्षणीय आहे. याचा अर्थ असा आहे की इंजिनिअरिंग आणि कला शाखेतील विद्यार्थिनींच्या आक्रमकतेमध्ये लक्षणीय फरक आहे.

**तक्ता क्र. 2**

**इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींच्या आक्रमकतेचे स्वरूप**

| घटक )Factor) | मध्यमान )Mean) | प्रमाण विचलन )SD) |
|---|---|---|
| शारीरिक आक्रमकता | 3.8 | 0.9 |
| मौखिक आक्रमकता | 3.5 | 1.0 |
| अप्रत्यक्ष आक्रमकता | 2.9 | 0.8 |

**चर्चा**

- शारीरिक आक्रमकता (मध्यमान = 3.8) इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींमध्ये सर्वाधिक आहे, जे दर्शवते की शारीरिक प्रतिक्रिया देण्याची प्रवृत्ती जास्त आहे.

- मौखिक आक्रमकता (मध्यमान = 3.5) ही शारीरिक आक्रमकतेनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे, जे विद्यार्थिनींमध्ये ताणतणावाशी संबंधित प्रतिक्रियांचे प्रतिबिंब देते.
- अप्रत्यक्ष आक्रमकता (मध्यमान = 2.9) तुलनेने कमी आहे, पण तीही उपस्थित आहे.
- प्रमाण विचलन (SD) च्या निरीक्षणानुसार, शारीरिक आणि अप्रत्यक्ष आक्रमकतेच्या प्रतिक्रियांमध्ये तुलनेने कमी फरक आहे, तर मौखिक आक्रमकतेत अधिक फरक दिसून येतो.

**तक्ता क्र. 3**

**कला शाखेतील विद्यार्थिनींच्या आक्रमकतेचे स्वरूप**

| घटक )Factor) | मध्यमान )Mean) | प्रमाण विचलन )SD) |
|---|---|---|
| शारीरिक आक्रमकता | 2.7 | 0.7 |
| मौखिक आक्रमकता | 2.9 | 0.8 |
| अप्रत्यक्ष आक्रमकता | 3.2 | 1.1 |

**चर्चा**

- अप्रत्यक्ष आक्रमकता (मध्यमान = 3.2) कला शाखेतील विद्यार्थिनींमध्ये सर्वाधिक आहे. याचा अर्थ असा आहे की, त्या त्यांच्या आक्रमकतेला अप्रत्यक्षरित्या (जसे की द्वेषपूर्ण वर्तन किंवा अप्रत्यक्ष नुकसान) व्यक्त करतात.
- मौखिक आक्रमकता (मध्यमान = 2.9) दुसऱ्या क्रमांकावर आहे, जी त्यांच्या भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करण्याच्या प्रवृत्तीला दर्शवते.
- शारीरिक आक्रमकता (मध्यमान = 2.7) तुलनेने कमी असून, कला शाखेतील विद्यार्थिनींमध्ये थेट प्रतिक्रिया देण्याची प्रवृत्ती कमी आहे.
- प्रमाण विचलनाच्या निरीक्षणानुसार, अप्रत्यक्ष आक्रमकतेमध्ये (SD = 1.1) इतर घटकांच्या तुलनेत जास्त फरक आहे, यावरून असे दिसते की कला शाखेतील विद्यार्थिनी अप्रत्यक्ष वर्तनात अधिक वैविध्य दाखवतात.

**निष्कर्ष (Conclusions)**

१. इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींमध्ये आक्रमकतेचा स्तर कला शाखेतील विद्यार्थिनींपेक्षा अधिक आहे.

२. इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थिनींच्या आक्रमकतेचे स्वरूप शारीरिक व मौखिक पातळीवर अधिक लक्षणीय आहे.

३. कला शाखेतील विद्यार्थिनींमध्ये अप्रत्यक्ष आक्रमकता अधिक असल्याचे दिसते.

**मर्यादा (Limitations)**

१. नमुना केवळ 100 विद्यार्थिनींपुरता मर्यादित आहे.

२. संशोधनासाठी निवडलेले साधन फक्त आक्रमकतेच्या मोजमापापुरते मर्यादित आहे.

३. सामाजिक व आर्थिक घटकांचा विचार करण्यात आलेला नाही.

**शिफारसी (Recommendations)**

**१. इंजिनिअरिंग शाखेसाठी**

- तणाव व्यवस्थापनासाठी योग आणि ध्यान सत्रांचे आयोजन.
- विद्यार्थिनींसाठी समुपदेशनाची सोय करणे.

**२. कला शाखेसाठी**

- भावनिक अभिव्यक्ती वाढवण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन.
- सामाजिक सहभाग वाढवण्यासाठी उपक्रम आखणे.

**संदर्भसूची (References)**


- Garret H. (2007). "Statistic in psychology & education" Agra: Surjeet Publication.
- अँडरसन, केग ए. ब्रशमन, ब्रैड जे (2002), "मानवी आक्रमकता" मानसशास्त्राचे वार्षिक 53 27-51.
- बस, ए. एच. (1961). आक्रमकतेचे मानसशास्त्र . होबोकेन : जॉन वेली
- वाटल, क्लॉस (2013). आक्रमकता आणि गेवाल्ट.
- बर्कोविट्स, एल. (1989). "आक्रमक वर्तनाचे मानसशास्त्र."
- सिंग, राम अशिष. "आक्रमकता चाचणी."
- वॉहल, क्लॉस. (2020). "मानवी आक्रमकता आणि सामाजिक बदल."

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# २. रानी गाइदिन्ल्यूचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

**डॉ. पी. जे. चौधरी**
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग, राजे रामराव महाविद्यालय, जत.

**प्रास्ताविक**

रानी गाइदिन्ल्यूचे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचे योगदान आहे. तिने भारताचे स्वातंत्र्य व आपली भाषा, संस्कृती, जमीन इत्यादिवरील आपल्या हक्कासाठी नागा क्षेत्रामध्ये ब्रिटीश विरोधी क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्त्व केले. सविनय कायदेभंग चळवळीत गांधीवादी मार्गाने साराबंदीची चळवळ चालविली. भारताच्या स्वातंत्र्यानंतर समाजाची सेवा केली.नागा क्षेत्राला भारतात समाविष्ट करण्यात तिचे महत्त्वाचे योगदान आहे. रानी गाइदिन्ल्यूने देशासाठी व समाजाच्या प्रगतीसाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. त्यामुळे रानी गाइदिन्ल्यूने भारत देशासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेणे आवश्यक आहे.

**जीवन परिचय**

रानी गाइदिन्ल्यूचा जन्म २६ जानेवारी १९१५ रोजी सध्याच्या मणिपुर राज्याच्या तमेंगलोंग जिल्ह्यातील नुंगकाओ गावात झाला. या गावाला लुआंग या नावाने शुद्धा संबोधले जाते. तिच्या वडिलाचे नाव लोत्तनोहोड़ होते तर आईचे नाव कलोतनेनल्यु होते. तिचे वास्तविक नाव गाइदिन्ल्यू पामेई आहे.१ १९३७ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू गाइदिन्ल्यूला शिलांग तुरुंगात भेटले व तिची सुटका करण्याचे आश्वासन दिले होते.तेव्हाच गाइदिन्ल्यूला 'रानी' हा किताब त्यांनी दिला.त्यानंतर ती स्थानिक लोकांमध्ये राणी गाइदिन्ल्यू या नावाने प्रसिद्ध झाली.रानी गाइदिन्ल्यू लहानपणापासूनच स्वतंत्र व स्वाभिमानी विचाराची होती. १७ फेब्रुवारी १९९६ रोजी रानी गाइदिन्ल्यूचे निधन झाले.

**स्वातंत्र्य चळवळीतील योगदान**

भारताच्या स्वातंत्र्यासाठी व स्वातंत्र्यानंतर देशाच्या जडणघडणीत पुरुषांबरोबर स्त्रियांचेही महत्त्वाचे योगदान आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटीश विरोधी लढ्यात स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढल्या. त्यामध्ये नागांच्या क्षेत्रात रानी गाइदिन्ल्यूने क्रांतिकारी मार्गाने व गांधीवादी मार्गाने ब्रिटीश विरोधी लढा दिला.

**हेराका आंदोलन**

रानी गाइदिन्ल्यू १३ वर्षाची असताना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाली.त्यावेळी नागा क्षेत्रात ब्रिटीश विरोधी 'हेराका आंदोलन' चालू होते. हेराका आंदोलन नागा क्षेत्राला ब्रिटीश सत्तेपासून मुक्त करून नागांचे राज्य पुनर्स्थापित करण्यासाठी सुरू करण्यात आले होते. या हेराका आंदोलनात रानी गाइदिन्ल्यू आपले भाऊ कोसिन व जादोनाग यांच्या सोबत सहभागी झाली.सुरुवातीला जादोनागने हेराका आंदोलनाचे नेतृत्त्व केले.हे आंदोलन दडपून काढण्यासाठी ब्रिटिशांनी नागा क्षेत्रात सैनिक कार्यवाही केली.या सैनिक

कार्यवाहीत ब्रिटिशांनी जादोनागला पकडले.२९ ऑगस्ट १९३१ रोजी जादोनागवर खटला चालवून इम्फाळ येथे फाशीची शिक्षा दिली.जादोनागच्या मृत्यूनंतर ब्रिटीश विरोधी हेराका आंदोलनाचे नेतृत्व रानी गाइदिन्ल्यूने केले. रानी गाइदिन्ल्यूने ब्रिटीश सत्तेपासून आपली संस्कृती, भाषा, जमीन वाचविण्यासाठी हे आंदोलन केले.रानी गाइदिन्ल्यूच्या मते, "आपला धर्म सोडणे म्हणजे आपली संस्कृती सोडणे होय, आपली संस्कृती सोडणे म्हणजे आपली ओळख संपने होय".२ आपली संस्कृती, भाषा, जमीन वाचविण्यासाठी रानी गाइदिन्ल्यूच्या नेतृत्वात नागा जमातीचे लोक संघटीत झाले.

**सविनय कायदेभंगाची चळवळ व रानी गाइदिन्ल्यू**

रानी गाइदिन्ल्यूने आपल्या नागा समाजाला गांधीवादी विचाराने कार्य करण्यासाठी शुद्धा प्रवृत्त केले. हेराका आंदोलन चालू असतानाच भारतात ब्रिटीश विरोधी सविनय कायदेभंगाची चळवळ चालू होती.महात्मा गांधीजींच्या नेतृत्वात चालू असलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत रानी गाइदिन्ल्यू सहभागी झाली. नागा क्षेत्रातील जनतेला ब्रिटीश सरकारला कोणत्याच प्रकारचे कर न देण्याची घोषणा केली.नागा जमातींमध्ये एकता निर्माण करून ब्रिटीशांच्या विरोधात गांधीवादी विचाराने सविनय कायदेभंगाची चळवळ चालविली.ब्रिटीश सरकारने रानी गाइदिन्ल्यूला पकडण्यासाठी मोहीम सुरु केली.त्यामुळे राणी भूमिगत झाली.

**भूमिगत चळवळ**

त्यानंतर रानी गाइदिन्ल्यूने भूमिगत राहून ब्रिटीश विरोधी सशस्त्र लढा दिला.यावेळी ती फक्त १७ वर्षाची होती.तिचे व्यकीमत्त्व व नेतृत्व बघून आदिवासी तिला देवी मानू लागले व तिच्या नेतृत्त्वाखाली संघटीत झाले.राणीच्या नेतृत्त्वात नागांनी १८ मार्च १९३२ रोजी हान्गृम गावात इंग्रजांवर सशस्त्र हल्ला केला.नागा आपले परंपरागत शस्त्रे, भाले, तीर-धनुष घेऊन ब्रिटिशांबरोबर लढले. ब्रिटिशांकडे बंदुका होत्या.त्यामुळे या युद्धात नागांना यश आले नाही. इग्रजांनी हान्गृम गावात घडलेल्या घटनेचा बदला घेण्यासाठी रानी गाइदिन्ल्यूला पकडण्यासाठी सोधमोहीम सुरू केली. ब्रिटीश सरकारने रानी गाइदिन्ल्यूला पकडण्यासाठी आसाम राइफल्सचे कॅप्टन मैकडॉनाल्डला पाठविले. ब्रिटिश सरकार रानी गाइदिन्ल्यूच्या नेतृत्त्वाखालील हे आंदोलन दडपून टाकण्याचा पुरेपूर प्रयत्न करीत होती.परंतु त्यांना यश यत नव्हते. रानी गाइदिन्ल्यूच्या नेतृत्त्वाखालील नागांचा सशत्र लढा ब्रिटीश विरोधी चालू असतानाच राणीने आपल्या सुरक्षेसाठी पुलोमी येथे किल्ला बांधण्याचा निर्णय घेतला.त्याचे काम चालू असतानाच कॅप्टन मैकडॉनाल्डला पुलोमी या गावी रानी गाइदिन्ल्यू लपून असल्याची माहिती मिळाली.१७ अक्टोबर १९३२ रोजी पुलोमी या गावावर ब्रिटिशांनी छापा टाकला व रानी गाइदिन्ल्यूला पकडले.तेथून तिला प्रथम कोहिमा व नंतर इम्फाळ येथे ब्रिटिशांनी आणले.तेथे तिच्यावर खटला चालविण्यात आला व ब्रिटीशांच्या हत्तेचा कट रचण्याचा आरोप लावून तिला आजीवन कारावासाची शिक्षा दिली. राणीच्या जास्तीत जास्त सहकाऱ्यांना मृत्युदंडाची तर काहींना तुरुंवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

**तुरुंगातून सुटका**

रानी गाइदिन्ल्यूला इ.स.१९३३ पासून इ.स.१९४७ पर्यंत तुरुंगात ठेवण्यात आले.गुवाहाटी, शिलांग, आइजोल, तुरा येथील तुरुंगात तिला ठेवण्यात आले होते.१९३७ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू रानी गाइदिन्ल्यूला शिलांग तुरुंगात भेटले व तिची सुटका

करण्याचे आश्वासन दिले.तेव्हाच गाइदिन्ल्यूला 'रानी' हा किताब त्यांनी दिला.३ पंडित नेहरूंनी तिची सुटका करण्याचा पयत्न केला; परंतु ब्रिटिशांनी रानीची तुरुंगातून सुटका करण्याचा पंडित नेहरूंचा प्रस्ताव मान्य केला नाही.१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रीटिशांपासून भारताला स्वातंत्र्य मिळाले.स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने तुरा तुरुंगातून रानी गाइदिन्ल्यूची सुटका केली.

**सामाजिक कार्य**

इ.स.१९५२ पर्यंत रानी गाइदिन्ल्यू आपला लहान भाऊ मारंग सोबत तुएनसांगचा विमरप गावात राहिली. इ.स.१९५२ मध्ये तिला तिच्या गावी जाण्याची परवानगी सरकारने दिली. त्यानंतर तिने समाजाच्या प्रगतीसाठी कार्य केले.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताला अखंड भारत निर्माण करण्याचा मोठा प्रश्न सरकार समोर होता.संस्थानांचे विलीनीकरण, जम्मू-काश्मीरचा इत्यादी अनेक समस्य सरकार समोर होत्या.तसाच नागांचाही प्रश्न होता.नागा क्षेत्रात नागा नेशनल कौन्सिलने नागांसाठी स्वतंत्र देशाची मागणी केली होती. एका तरुण अंगामी नागाने त्यात लिहिले होते की, 'नागा हे एक राष्ट्र आहे.कारण आमची तशी भावना आहे.आपण आपले स्वतःचे सार्वभौमत्व का ठरवू नये? आम्हाला स्वतंत्र राहायचे आहे.आम्हाला आमचे स्वतःचे जीवन जगायचे आहे.आम्हाला आमच्यात दुसरे कोणी यायला नको.'४ अंगामी झापु फिझोच्या नेतृत्त्वात 'नागा नेशन' ची मागणी नागा नेशनल कौन्सिल भारत सरकारला करीत होते.अशा परिस्थितीत रानी गाइदिन्ल्यूने सरकारला सहकार्य केले. नागा क्षेत्र भारतातच राहावा यासाठी नागांचे संघटन घडवून आणले.राणीने आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी व संस्कृतीच्या संवर्धनासाठी जेलियांग्राम राज्याची मागणी केली. नागा नेशनल कौन्सिलच्या नेत्यांनी राणीचा विरोध केला.त्यामुळे १९६० च्या दशकात भूमिगत व्हावे लागले.१९६५ मध्ये राणीच्या समर्थकांनी ९ नागा नेत्यांची हत्या केली.त्यामुळे रानी गाइदिन्ल्यू पुन्हा चर्चेत आली.१९६६ मध्ये भारत सरकार बरोबर चर्चा केल्यानंतर राणीने हिंसेचा मार्ग सोडण्याचा निर्णय घेतला.

**पुरस्कार**

भारताच्या स्वतंत्र लढ्यातील तिच्या योगदानाबद्दल पंतप्रधानाने इ.स.१९७२ मध्ये 'स्वातंत्र्य सैनिक ताम्रपत्र' देऊन रानी गाइदिन्ल्यूला सन्मानित केले.रानी गाइदिन्ल्यूने देशाचे एकीकरण व सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल भारत सरकारने राष्ट्रपतीच्या हस्ते इ.स.१९८२ 'पद्म भूषण' पुरस्कार देऊन राणीला सम्मानित केले.तिने केलेल्या सामाजिक कार्याबद्दल 'विवेकानंद सेवा सम्मान' इ.स.१९८३ मध्ये देण्यात आला.बिरसा मुंडा पुरस्कार १९९६ मध्ये प्रदान करण्यात आला.१७ फेब्रुवारी १९९६ रोजी रानी गाइदिन्ल्यूचे निधन झाले.१९९६ मध्ये तिच्या स्मृतिनिमित्त टपाल टिकीट भारत सरकारने काढले.२०१५ मध्ये रानी गाइदिन्ल्यूच्या जन्मशताब्दी निमित्त तिच्या नावाने एक नाणे काढले.

रानी गाइदिन्ल्यूने भारताचे स्वातंत्र्य, देशाचे एकीकरण, समाजाची प्रगती, आपल्या संस्कृतीचे जतन व संवर्धन इत्यादीसाठी महत्त्वाचे योगदान दिले. रानी गाइदिन्ल्यू स्त्री नेतृत्त्वाचे प्रतिक आहे.नागांच्या स्वतंत्र अस्तित्त्वासाठी ब्रिटीश विरोधी सशस्त्र लढा दिला.गांधीवादी विचाराने व मार्गाने नागा क्षेत्रात सविनय कायदेभंग चळवळीचे नेतृत्त्व केले.आपली भाषा, संस्कृती, जमिनीवरील नागांचा

हक्क यासाठी नागांचे संघटन घडवून आणले.स्वातंत्र्यानंतर भारताच्या एकीकरणासाठी नागांच्या क्षेत्रात कार्य केले.राणीचे योगदान भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचे कार्य केले.

**संदर्भ**

१. Basu Narayan, Contingent Magazine, 27 Aug. 2023

२. नवभारत टाइम्स कॉम, २२ नोव्हेंबर २०२१

३. The Hindu, News Paper, Vishakhapattam, 8 Nov. 2024

४. गुहा रामचंद्र, अनु. शारदा साठे, गांधींनंतरचा भारत, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, चौथी सुधारित आवृत्ती ऑक्टोबर २०१८, पृ. क्र.३११

५. The India Forum, A Journal-Magazine on Contemporary Issues, 6 April 2022

६. https://hi.wikipedia.org/wiki/रानी_गाइदिन्ल्यू

# ३. पाश्चात्य स्त्रीवादाच्या विकासात स्त्रीवादी विचारवंतांची भूमिका

**पूजा सर्जेराव चौगले**
संशोधक विद्यार्थिनी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

पाश्चात्य देशात स्त्रियांच्या हक्काविषयी आणि स्त्री मुक्तिविषयक अधिक विचारमंथन १९६० नंतर सुरु झाले. १९७०-८० च्या दरम्यान इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये साहित्य, प्रकाशन संस्था, विद्यापीठीय अभ्यासक्रम आणि चर्चासत्रे यांच्या द्वारे स्त्रीवादी चळवळीने वैचारिक क्षेत्रात नवे मंथन सुरु केलेले दिसते. १९७० च्या सुमारास अमेरिकेमध्ये स्त्रीविषयक अभ्यासाला व संशोधनाला शैक्षणिक क्षेत्रात स्वतंत्र स्थान प्राप्त झाले. १९७०-८० च्या दरम्यान इंग्लंडमध्ये Virag आणि The women's या सारख्या स्त्रीवादी प्रकाशन संस्था उदयाला आल्या. त्यामुळे १९६० च्या सुमारास सुरु झालेले स्त्रियांचे आंदोलन, पुरुष संस्कृतीवर स्त्रीवादी टीका आणि स्त्रीवादी विचारांना सुरुवात झाली. स्त्रीवादी विचार पितृसत्ता आणि लिंगवाद यांच्याशी पुकारलेल्या लढ्यातून निर्माण झालेला असला तरी या स्त्रीवादी विचारांना त्यापूर्वीचाही इतिहास आहे हे दिसून येते. स्त्रीवादी विचारांची बैठक व 'पुरुषांच्या दास्यातून स्त्रीची मुक्तता' हे ध्येय ह्या नव्या चळवळीमागेही होते. या स्त्रीवादी विचाराला विकसित करण्याचे काम विचारवंतांनी केले आहे. त्यांच्या विविध लेखनातून या विचाराचा विकास झाल आहे.

**पारिभाषिक शब्द**

**उद्दिष्टे**

१. स्त्रीवादी संकल्पनांचा अभ्यास करणे.

२. पाश्चात्य स्त्रीवादी प्रवाहाचा अभ्यास करणे.

३. पाश्चात्य स्त्रीवादाच्या प्रवाहाच्या विकासात स्त्रीवादी विचारवंतांची भूमिका अभ्यासणे.

**विषय विवेचन**

**स्त्रीवाद**

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या दृष्टिकोनातून जीवनाच्या सर्व पैलूंवर टाकलेला दृष्टिक्षेप. स्त्रीवाद ही एक जाणीव आहे. ते एक जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. तो एक सैद्धांतिक दृष्टिकोन आहे. त्याचप्रमाणे ती संघटित कृती देखील आहे. त्यामुळे स्त्री- पुरुषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना म्हणजे स्त्रीवाद. वैयक्तिक आयुष्यात स्त्रीवाद आपल्या पातळीवर जगण्यात उतरवता येतो. आपण कोणत्याही क्षेत्रात काम करीत असू तरी तिथेही तो स्वतःचे अस्तित्व देणारे तत्त्वज्ञान म्हणून त्याचे अस्तित्व दिसते. म्हणजेच स्त्रीवाद हे एक पोथीबद्ध, कर्मठ, एकसाची तत्त्वज्ञान नाही आणि नसावे असे म्हणता

येईल. स्त्रीवाद या तात्त्विक प्रवाहाच्या अंतर्गत अनेक उपप्रवाह असले तरी या भेदांपलिकडे जाणारी काही समान सूत्रे स्त्रीवादी म्हणवणाऱ्या सर्वांसाठी अर्थपूर्ण ठरतात.

**पाश्चात्य स्त्रीवाद आणि विचारवंत**

पाश्चात्य देशातील स्त्रीचा स्वातंत्र्यविषयक जाणिवेचा पहिला टप्पा म्हणजे मतदानाचा हक्क मिळविणे, हा होता. त्यामुळे 'स्त्री चळवळीचा' इतिहास पाहायला एकोणिसाव्या शतकातील 'मतदानाच्या हक्काच्या' चळवळीपासून सुरुवात करावी लागते. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स या देशातील कष्टकरी आणि मध्यमवर्गीय स्त्रियांनी मतदानाचा हक. शिक्षण, संपती आणि समान कायदा, ह्यासाठी चळवळ उभी केली. या चळवळीत स्त्रीवादी विचारवंतांची भूमिका महत्वाची आहे.

**१. मेरी वुल्स्टोन क्रॉफ्ट (Mary Wollstonecraft)**

A Vindication of the Rights of Women.' ह्या पुस्तकात मेरी वूल्स्टोन क्रॉफ्ट ने प्रथम, स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विचार मांडला. १७८९ मध्ये फ्रान्सच्या असेंब्लीत संमत झालेले 'मानवी हक्कांचे बिल' व अमेरिकेतील 'बिल ऑफ राईटस्' यामध्ये सर्व मानवांना हक्क आहेत आणि स्त्रियांना मात्र हक्क नाहीत, हे पाहून मेरी वुल्स्टोनने आवाज उठविला की, स्त्री मानव नाही का? स्त्रिया जर प्राणी नसतील, तर त्या मनुष्यच असल्या पाहिजेत.तत्कालीन समाजात असे प्रचलित होते की, स्त्रियांना मत स्वातंत्र्य देण्याची त्यांची लायकी नाही, स्त्रिया या राजकीयदृष्ट्या अकार्यक्षम आहेत वगैरे. स्त्रियांच्या अकार्यक्षमतेला व हीन दर्जाला त्या स्वतः अजिबात जाबाबदार नाहीत. पुरुषांनीचआपल्या वासनापूर्तीसाठी त्यांना सतत दडपणाखाली ठेवले. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे शिक्षण व चांगली वागणूक मिळाली तर स्त्रिया कार्यक्षम व उत्तम नागरिक बनू शकतात, असे स्पष्टीकरण मेरी वुल्स्टोनने दिलेले आहे. १७९२ ला लिहिलेल्या तिच्या ह्या पुस्तकातील विचार म्हणजे स्त्रीवादी विचारांचा इतिहासाचा प्रारंभ आहे, असे म्हणता येते.

**२. जॉन स्टुअर्ट मिल् (John Stuart Mill)**

The Subjection of Women' या ग्रंथात 'मेरी वुल्स्टोन' नंतर, स्त्रियांना मताधिकाराच्या हक्काचा आवाज 'जॉन स्टुअर्ट' ने उठविलेला दिसतो. मतदानाचा हक्क सर्व मानवांना दिलेला असताना, स्त्रियांना कोणत्या तत्त्वांवर त्यातून वगळले गेले ? त्या केवळ पुरुष नाहीत एवढेच कारण या वगळण्यात आहे का? स्त्रियांनाही आपले हितसंबंध आपण स्वतः ठरविण्याचा हक्क आहे. तो का नाकारला गेला? या सगळ्या प्रश्नांना उपस्थित करुन जॉन स्टुअर्टने त्याची चर्चा या पुस्तकात मांडली. स्त्रियांना मतदानाचा हक्क दिल्यास सामाजिक सुधारणांना गती मिळेल, स्त्रियांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याचा, मतदानाचा हक्क त्यांना दिलाच पाहिजे, याचा हिरीरीने, जॉन स्टुअर्टने, पुरस्कार केलेला आहे.

**३.सिमॉन-दी-बोव्हा( Simone de Beauvoir)**

"Women's liberation movement'मध्ये सक्रिय कार्यरत असणारी ही फ्रेंच स्त्रीवादी लेखिका 'Second Sex' या पुस्तकात पुरुषप्रधानता व स्त्रीचे गौणत्त्व यांना तोंड फोडताना दिसतेः त्यांच्या मते समाजात-धर्म, कायदा, शिक्षण, विज्ञान, तत्वज्ञान या सर्वच क्षेत्रांमध्ये पुरुषप्रधान व पुरुषकेंद्री विचार चौकटीने स्त्रीकडे अभाववादी वा न्यूनवादी दृष्टिकोनातून पाहिलेले आहे. स्त्री व पुरुष यामध्ये जे

शारीरिक भेद असतात, त्याव्यतिरिक्त सांस्कृतिक भेद चिटकलेले असतात. या संदर्भाचे स्पष्टीकरणही सिमॉन-व-बोव्हाने मांडलेले आहे. स्त्री ही शारीरिकदृष्ट्या दुर्बल, स्वभावाने चंचल, भित्रेपणा, नम्रता, विनय, क्षमा हे गुण जन्मजात घेऊन आलेली असते. हे तिचे स्त्रीत्व तर उलट पुरुष शरीराने समर्थ, पराक्रमी, बुध्दिमान, धीट, रांगडा, अभिमानी असतो. हे त्याचे पुरुषत्त्व (Masculinity) आहे, असे स्त्री व पुरुष यांचे ठराविक साचे बनवून, पितृसत्ताक पध्दतीने स्त्रियांवर सामाजिक नियम लादलेले असतात. जी स्त्री ह्या 'स्त्रीत्त्वाच्या' गुणापेक्षा वेगळे वर्णन करते: ती 'पुरुषी' अशी हेटाळणी केली जाते. 'स्त्रीत्त्व' म्हणून जे नैसर्गिक गुणधर्म मानले जातात ते पुरुषप्रधान समाजाने स्त्रीच्या माथी मारलेले असतात, आणि ही विचारचौकट सामाजिक जाणिवेत अशी काही खोलवर रुजलेली असते की, स्वतः स्त्रियांनाही ती अनैसर्गिक वाटलेली नसते. 'सिमॉन-द- बोव्हा' म्हणते, "One is not borns a woman, one becomes woman."१ कोणी बाई म्हणून जन्माला येत नाही, पण नंतर ती 'बाई' बनविली जाते, म्हणजे केवळ लिंगवैशिष्ट्यामुळे एखाद्या व्यक्तीवर बाईपणाच्या कल्पना लावल्या जातात, "Life the world itself, is the work of men, they describe it from their own point of view, which they confuse with the absolute truth." पुरुषप्रधान समाजाने, ज्या निखळ सत्यापासून स्त्रियांना दूर ठेवले त्याचे दर्शन 'सिमॉन 'ला झाल्यामुळे, दीर्घकाळ चालत आलेल्या पुरुषसत्ताक विचारांवर तिने आघात केला. तिने दाखवून दिले की, पुरुषाने निर्माण केलेली समाजव्यवस्था ही लिंगभावावर उभारली गेलेली आहे. त्यात स्त्री लैंगिक राजकारणाची बळी ठरलेली आहे. पुरुषाची अरेरावी प्रतिमा निर्माण केलेली आहे. त्याचा मानवी जीवनातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक या सर्वच अंगांवर, प्रभाव पडलेला असून स्वतः स्त्रीचेही याबाबतीत विशेषीकरण झालेले असल्यामुळे, स्वतः स्त्रीने स्थान स्वीकारलेले आहे.

**४.'केट मिलेट'(Kate Millette)**

या विचारवंताच्या 'Sexual Politics' ने १९७० मध्ये वावटळच उठविलेले दिसते. ह्या 'जहाल स्त्रीवादीने लैंगिक क्रांतीचीच मागणी केलेली आहे. पाश्चात्य समाजातील पायाभूत संरचना पुरुषी वर्चस्वाची आहे, समाजातील पुरुषी वर्चस्व कुटुंब संस्थेत स्पष्टपणे दिसते. हे प्रतिपादन करून 'केट मिलेट' 'Sexual Politics' ची व्याख्या करताना म्हणते, "सेक्सुअल पॉलिटिक्स ही एक अशी प्रक्रिया आहे की, त्यात राज्य करणारे पुरुष आपल्या खालच्या लोकांवर आपले वर्चस्व गाजवायचा प्रयत्न करतात." पुरुषांची सत्ता चालू राहण्यासाठी कुटुंबामध्ये मुलांचे संगोपन करतानासुध्दा त्यांच्यावर पुरुषप्रधान संस्कार करण्याची जबाबदारीही स्त्रीवरच असते. इतकेच नाही तर मुलाचे पितृत्त्व निश्चित असल्याशिवाय जगातील एकाही मुलाला जगण्याचाही अधिकार नसतो, अशीच मूल्यव्यवस्था असल्यामुळे पुरुषी वर्चस्वाला अधिमान्यता मिळते. पुरुषांच्या मनात स्त्रियांविषयी असणारी वर्चस्वाची, स्वामित्वाची, क्रौर्याची भावना-लैंगिक विकृतीने भरलेल्या मासिकांमधून व त्यांच्या भाषेतून स्पष्ट होते, हेही केट मिलेटने तिच्या पुस्तकात सप्रमाण स्पष्ट केलेले आहे." कोणत्याही वर्गातील स्त्रियांना आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक-कोणत्याही स्तरावर पुरुषांव्यतिरिक्त स्थान नसते." हेच केट मिलेटने विशद केलेल्या लैंगिकतेच्या राजकारणातून सिध्द होते, असे डॉ. विद्युत भागवत ह्या स्त्रीवादी विचारवंताचे मत आहे.

**५.'बेटी फ्रिडन'(Betty Friedan)**

या विचारवंताने 'Feminine Mystique' या पुस्तकातून पितृसत्ताक पद्धतीमुळे स्त्रीने आपले दुय्यम स्थान स्वीकारले, ही वास्तवता ठळकपणे मांडलेली आहे. तिनें अमेरिकेतील उपनगरात राहणाऱ्या स्त्रियांवर लक्ष केंद्रीत केलेले होते. एका विशिष्ट पिढीचा संपूर्ण हिशेबच मांडून तिने अत्यंत मुलभूत प्रश्न विचारलेला दिसतो. "स्त्रीने आपले आयुष्य लग्न आणि मुले यांच्यापुरतेच सीमित का केले?" ५शिक्षण, नोकरी, धर्म, प्रसिध्दी माध्यम, राजकीय हक्क, कुटुंब या सर्व स्तरांवर, स्त्रियांविषयी दुजाभाव दाखविला जातो, हेही तिने स्पष्ट केले. बेटी फ्रिडनने मध्यमवर्गीय स्त्रियांना गृहिणीची प्रतिमा नाकारण्याचा सल्ला दिला. स्त्रियांना, घराबाहेर, आपले आवडीचे क्षेत्र असण्याचा अधिकार आहे आणि हा केवळ छंद वा हौस नसून, तो त्यांच्या अस्तित्वाचा महत्त्वाचा गाभा असायला हवा, असे तिला वाटते. पुरुषी वर्चस्वातून मुक्त होण्याचा एक मार्ग म्हणजे स्त्रियांचे मानसिक अवलंबित्वापासून दूर जाणे. पितृसत्ताक पध्दतीमुळे स्त्रिया मानसिक दृष्टीने पुरुषांवर अवलंबून असतात. त्यांचे हे अवलंबून असणे बंद झाले, तर त्यांची अनेक जोखडातून मुक्तता होईल, असे बेटी फ्रिडनने व्यक्त केलेले आहे.

**सारांश**

ज्ञान, सिद्धांत, इतिहास, संस्कृती, साहित्य, कला, कायदा व इतर सर्व ज्ञानक्षेत्रात पुरुषांनी पुरूष वर्चस्ववादी, पुरुषकेंद्री मांडणी करून ठेवलेली आहे. भाषा, कला, साहित्य, सौंदर्यशास्त्र या क्षेत्रात पुरुषांनी लिंगभेद करून स्त्रियांना हाकलले आहे, हे लक्षात आल्यामुळे, स्त्रीवादी विचारवंतांनी स्त्रियांच्या हक्कासाठी स्त्रीवादी विचारांची सैद्धांतिक मांडणी केली आहे. सिमॉन-द-बोवा, एलेन शोवॉल्टर, मिलेट, बेटी फ्रिडन इत्यादी स्त्रीवादींनी स्त्रीकेंद्री मांडणी करणाऱ्या स्त्रीवादी विचारवंतांनी स्त्रीवादाच्या विकासाला आणि चळवळीला विकसित करून त्याला मूर्त स्वरूप दिले आहे.

**संदर्भसूची**

१. धोंगडे अश्विनी, (२०००), "स्त्रीवादी समीक्षा: स्वरूप आणि उपयोजन", दिलीपराज प्रकाशन, पुणे,पृ.क्र४५

२. सारडा शंकर (संपा), खोले विलास (२००१), "स्त्रीवादी समीक्षादृष्टी" 'महाराष्ट्र साहित्यपत्रिका' पृ.क्र. ६६

३. Moi Toril,(2002) "Sexual/Textual Politics Feminist Literary Theory", Routledge publication, P.N.26

४. भागवत विद्युत, रेगे शर्मिला, पलसाने वंदना,(२००१), "स्त्रीजीवनाची गुंतागुंत", परामर्श , पुणे विद्यापीठ, पृ.क्र.६

५. 'Josephine C. Donovan, (1989), "Feminist Literary Criticism: Explorations in Theory", The

६. University Press of Kentucky,Lexington, KY. P.N.28

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# ४. लिंग विषमता आणि पितृसत्ताक समाज

**कु. बाबर प्रचिंदा प्रल्हादराव**
सौ. शोभाकाकी बाबर कन्या महाविद्यालय, विटा.

**प्रस्तावना**

पितृसत्ताक समाज म्हणजे अशी व्यवस्था जिथे सामाजिक, आर्थिक ,धार्मिक आणि राजकीय अधिकार पुरुषांकडे केंद्रित असतात. यात पुरुष प्रधानता समाजात सर्वसामान्य स्वरूपाची मानली जाते. तर महिलांना व इतर लिंगांना दुय्यम स्थान दिले जाते. पितृसत्ताक समाज हा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून निर्माण झाला आहे. परंतु आज याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम जाणवतो. प्राचीन काळात शिकार आणि कृषी व्यवस्थेच्या काळात पुरुषांचे शारीरिक सामर्थ समाजाच्या टिकावासाठी महत्त्वाचे मानले जात होते. त्यामुळे पुरुषांना संसाधने आणि अधिकार यांवर नियंत्रण मिळाले. स्त्रियांना प्रामुख्याने घरगुती जबाबदारी आणि बालसंगोपनासाठी मर्यादित ठेवले गेले. या व्यवस्थेला धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांनी अधिक दृढ केले गेले.

पितृसत्ताकता ही केवळ घरगुती पातळीवर मर्यादित राहत नाही, तर ती व्यापक सामाजिक रचनेचा भाग बनली आहे .आज ही पितृसतकतेचे प्रतिबिंब कायद्यात, शिक्षणात ,रोजगारात आणि माध्यमांतून दिसून येते. पितृसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रियांना शिक्षण रोजगार आणि राजकारणात पुरेशा संधी मिळाल्या नाहीत ,त्याचबरोबर पितृसत्ताक विचारसरणीमुळे स्त्रीभ्रूणहत्या ,हुंडा प्रथा आणि लैंगिक छळ सारख्या समस्यांना प्रोत्साहन मिळाले. .

**अभ्यास उद्दिष्टे**

१. समाजात लिंगाच्या आधारे होणाऱ्या विषमतेचे स्वरूप, त्याची कारणे आणि त्याचा परिणाम समजून घेणे.

२. पुरुष आणि महिलांच्या हक्कांमध्ये असलेल्या भेदभावाचे स्वरूप ओळखणे,जसे की शिक्षण ,रोजगार.

३. संपत्तीच्या हक्कांमध्ये असलेले अंतर, व पितृसत्ताक विचारसरणी बदलण्यासाठी सामाजिक आणि शैक्षणिक उपाययोजनांचा अभ्यास करणे.

४. स्त्रिया आणि पुरुष यांच्यात समानता प्रस्थापित करण्यासाठी जनजागृती करणे आणि लिंग तटस्थ धोरणांचे अंमलबजावणी करण्यावर भर देणे.

५. आर्थिक,शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांचे सक्षमीकरण कसे करता येईल यासाठी उपाययोजना शोधणे.

६. समाजात स्त्री पुरुष समानतेची जाणीव निर्माण करून स्त्रियांना सन्मान आणि समान संधी देणारी व्यवस्था तयार करणे, लिंग संवेदनशीलता वाढवणारी आणि विषमतेचा नायनाट करणारी व्यवस्था निर्माण करणे.

**अभ्यास पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलनाचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्य संकलन सर्वेक्षण मुलाखत पद्धतीने केले. द्वितीय तथ्य संकलनासाठी संदर्भ ग्रंथ ,नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटचा आधार घेतलेला आहे .

**पितृसत्ताक व्यवस्थेचा इतिहास**

पितृसत्ताक व्यवस्थेचा इतिहास हा माणसाच्या प्राचीन, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाशी निगडित आहे. समाजाच्या उत्क्रांती सोबत पितृसत्ताकता प्रबळ होत गेली, ही व्यवस्था पुरुषांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय निर्णयांमध्ये वरचढ स्थान देते आणि स्त्रियांना दुय्यम स्थानावर ठेवते.

**१. प्राचीन काळातील पितृसत्ताक व्यवस्थेचा इतिहास**

आर्यांनी भटक्या जीवनाचा त्याग करून एका ठिकाणीच कायम वास्तव केल्यानंतर कुटुंब पद्धतीचा उदय झाला. ग्राम जीवनात त्यांची राहणी साधी होती. कुटुंबात स्त्रिया, मुले, वृद्ध एकत्र राहत होती व वयाने सर्वात ज्येष्ठ असलेला गृहपती कुटुंब प्रमुख होता. व कुटुंबातील सर्वांवर त्याची अनिर्बंध सत्ता होती .कुटुंबात भांडण तंटे होत नसत व सर्वजण गृहपतीच्या आज्ञेत सुखासमाधानाने राहत असत. कालांतराने कुटुंब पद्धतीत थोडासा बदल होऊन संयुक्त पितृप्रधान कुटुंबपद्धती अस्तित्वात आली . पित्याच्या मार्गदर्शनाखाली व मातेच्या सहकार्याने कुटुंबातील धार्मिक सणसमारंभ व इतर कौटुंबिक कर्तव्य आनंदाने पार पडली जात.

**१.१ स्त्री जीवन**

वैदिक काळात आर्य स्त्रीला समाजात अत्यंत मानसन्मान होता. पुरुषांप्रमाणे स्त्रीला उत्तम शिक्षण दिले जात होते व ती सर्व वादविवाद व चर्चा यात खुलेपणाने भाग घेत असत. संगीत नृत्य स्त्रियांचा खास प्रांत होता. वयात आलेल्या मुलींना वर निवडण्याचे स्वातंत्र्य होते. मुलगा व मुलगी यांपैकी कोणात जर शारीरिक व्यंग असेल तरच हुंडा वा दक्षिणा देण्याची प्रथा होती. बालविवाहाची प्रथा नव्हती. विवाह संस्था नुकतीच मूळ धरू लागली होती व तिचा मुख्य उद्देश वंश सातत्य टिकवणे हाच होता. सामान्यता एक पत्नी पद्धती असली तरी राजा व प्रमुख यांनी बहुपत्नीत्व अनुसरल्यास समाजाचा आक्षेप नसे. विधवा विवाह समाजमान्य होता सती वा पडदा पद्धती अजिबात नव्हती. एकाच कुटुंबात वा सगोत्र विवाहास बंदी होती. स्त्रियांना मालमत्ते हक्क असल्याची मात्र कोठेही नोंद नाही .वेदोत्तर काळात समाजातील स्त्रियांचे स्थान कमी झाल्याचे दिसून येते.

**१.२ शिकारी व संकलक समाज (हंटर ग्यादरर समाज)**

या समाजातील स्त्री आणि पुरुषात समानतेसारखी स्थिती होती. पुरुष शिकारीचे काम करत तर स्त्रिया अन्न गोळा करत आणि संतती वाढवत .या काळात लिंगाधारीत भेदभाव फारसा दिसत नाही.

**१.३ कृषी समाजाचा विकास**

कृषी व्यवस्था सुरू झाल्यानंतर जमिनीचे मालकत्व आणि वारसा पुरुषांकडे केंद्रित झाले. पुरुषांनी शारीरिक श्रमाच्या कामांवर अधिकार ठेवला, तर स्त्रियांना घरगुती कामांपर्यंत मर्यादित ठेवले. जमिनीचा वारसा मुलांद्वारे पुढे नेण्याच्या विचारांमुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणल्या गेल्या.

**२. मध्ययुगीन काळातील पितृसत्ताकता**

**२.१ कुटुंब पद्धती**

हिंदू मुस्लिम धर्मामध्ये कुटुंब व्यवस्थेला महत्त्व होते .पितृसत्ता कुटुंब पद्धती अस्तित्वात होती ,कुटुंबातील ज्येष्ठ पिता किंवा पुरुष हाच गृहप्रमुख असे. कुटुंबात स्त्रियांना दुय्यम स्थान असे, या काळात लहान वयातच लग्न केली जात .वराच्या निवडीमध्ये वधूंना कोणतेही स्वातंत्र्य नव्हते .बहुपतित्वाची पद्धत रूढ होती, हुंडा पद्धती सुरू होती ,सतीची पद्धत रूढ झाली होती , विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत वाईट होती,हिंदू धर्मशास्त्रानुसार घटस्फोटाला परवानगी नव्हती. हिंदू व मुस्लिम समाजात स्त्रियांचे स्थान कनिष्ठ होते.

**२.२ स्त्रियांची परिस्थिती**

हिंदू समाज व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान होते. समाजामध्ये बहुपत्नीत्वाची व बालविवाहाची प्रथा रूढ झाली होती. स्त्रियांना बालवयात पिता, तारुण्यात पती ,वृद्धपणी मुलांच्या आज्ञेनुसार वागावे लागत होते .विधवा स्त्रियांची परिस्थिती वाईट होती. स्त्रियांना शिक्षणाचा फारसा अधिकार नव्हता .कन्येचा जन्म होणे ही अशुभ घटना समजली जात असे .स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते ,त्यांच्यावर अनेक निर्बंध घातलेले होते. विवाह हे आई-वडिलांच्या संमतीने होत असत, केवळ उच्च वर्णातील स्त्रियांना शिक्षण दिले जाई.

राजकारणामध्ये स्त्रियांना सहभागी होता येत नसे. पुरुषांच्या मृत्यूनंतर सतीत्वाचा मार्ग स्वीकारावा लागत असे. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता. व पती निधनानंतरचे आयुष्य त्यांना एखाद्या संन्यासिनी सारखे व्यतीत करावी लागे.विधवा स्त्रियांचे दर्शन अपशकून समजले जाई.

**२.३ धार्मिक प्रभाव**

अनेक धर्मग्रंथांनी पुरुषांना प्रमुख मानले आणि स्त्रियांना दुय्यम स्थान दिले. महिलांचे कार्य घर आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळणे ,एवढ्यावरच सिमित करण्यात आले .धार्मिक विधींमध्येही स्त्रियांचा सहभाग कमी ठेवण्यात आला.

**२.४ सामाजिक रूढी व परंपरा**

मध्ययुगात हुंडा प्रथा ,सती प्रथा आणि बहुपत्नीत्व यांसारख्या रूढींचा उदय झाला .पुरुषांना कुटुंबप्रमुख मानले जाऊ लागले,आणि स्त्रिया आर्थिक व सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे पुरुषांवर अवलंबून राहू लागल्या.

**२.५ युद्ध आणि पुरुष सत्ताकता**

युद्धाच्या काळात पुरुष हे मुख्य सैनिक म्हणून ओळखले गेले, ज्यामुळे त्यांचे समाजातील स्थान अधिक बळकट झाले. महिलांना सुरक्षा आणि सन्मान टिकवण्यासाठी पुरुषांवर अवलंबून राहावे लागले.

**३. औद्योगिक क्रांती आणि पितृसत्ताक व्यवस्थेचा विस्तार**

**३.१ पुरुषांचा श्रम बाजारावर ताबा**

औद्योगिक क्रांती दरम्यान पुरुष कारखाने आणि व्यवसायांमध्ये कार्यरत झाले .महिलांना फक्त घरगुती कामे किंवा कमी पगाराची कामे करण्याची परवानगी होती .

**३.२ महिला श्रमिकांवरील मर्यादा**

महिलांना श्रमिक म्हणून स्वीकारले गेले, पण त्यांच्यावर पगारात आणि कामांच्या संधीच्या बाबतीमध्ये भेदभाव झाला. पुरुष उपारजक आणि स्त्री गृहिणी ही संकल्पना दृढ झाली .

**३.३ कायद्यांच्या पुरुषसत्ताकतेला पाठिंबा**

मालमत्ता हक्क फक्त पुरुषांकडे होता. विवाह आणि कौटुंबिक जीवनामध्ये पुरुषांचा वर्चस्ववाद कायद्याने मान्य होता .

**४. आधुनिक काळातील पितृसत्ताकता**

आधुनिक काळात तंत्रज्ञान शिक्षण आणि विचारसरणीत मोठ्या प्रमाणावर प्रगती झालेली आहे. तरीही पितृसत्ताकता आत्ता समाजाच्या वेगवेगळया स्तरांवर दृश्यमान आहे. पितृसत्ताक विचारसरणी आता उघड स्वरूपात नसली तरी ती अप्रत्यक्षपणे सामाजिक, आर्थिक ,राजकीय आणि सांस्कृतिक रचनेत दिसून येते.

**४.१ आर्थिक पातळीवर आढळणारी पितृसत्ताकता**

महिलांना पुरुषांच्या तुलनेत समान कामासाठी कमी वेतन दिले जाते. महिलांना व्यवसायिक क्षेत्रात उच्च पदांवर पोहोचण्यासाठी अडथळयांचा सामना करावा लागतो. गृहिणींच्या कामाचा समाजात आर्थिक मूल्य म्हणून स्वीकार केला जात नाही. त्याचबरोबर महिलांच्या बिन वेतन कामामुळे त्यांचे आर्थिक योगदान दुर्लक्षित राहते. महिला शिक्षिका ,परिचारिका आणि अन्य सेवा क्षेत्रांमध्ये दिसून येतात, तर पुरुष उच्च तांत्रिक आणि नेतृत्वाच्या भूमिकांमध्ये दिसून येतात.

**४.२ शैक्षणिक पातळीवर आढळणारी पितृसत्ताकता**

मुलींना पारंपारिक शिक्षणासाठी प्रोत्साहित केले जाते .जसे की कला किंवा गृह शास्त्र, तर मुलांना तांत्रिक आणि विज्ञान क्षेत्राकडे वळण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. मुलींना शिक्षणात पुढे जाण्यासाठी समाजाचा फार कमी पाठिंबा मिळतो. ग्रामीण भागात आजही मुलींना शिक्षण घेण्यासाठी संघर्ष करावा लागतो.

**४.३ सामाजिक पातळीवर आढळणारी पितृसत्ताकता**

महिलांना सौंदर्य ,गृहिणीपण किंवा मातृत्वाशी जोडले गेले, तर कुटुंबासाठी त्या त्यागमूर्ती म्हणून म्हणूनही समोर आल्या. पुरुषांना कुटुंब प्रमुख किंवा कमावते व्यक्ती मानले जाते .भावना व्यक्त करण्यावर पुरुषांना बंधन आहे ,ज्यामुळे मानसिक आरोग्याची समस्या उद्भवते. महिलांना मोठ्या प्रमाणावर आजही घरगुती हिंसा, लैंगिक छळ आणि लैंगिक शोषणाची समस्या उदभवते. तृतीयपंथी व्यक्तींवर होणारा भेदभाव आणि हिंसा समाजात दिसून येते.

**४.४ राजकीय पातळीवर आढळणारी पितृसत्ताकता**

आधुनिक काळात महिलांना मतदानाचा हक्क मिळाला आहे ,पण संसद आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व कमी आहे. नेतृत्वाच्या भूमिका आजही पुरुषप्रधान आहेत. तृतीयपंथीय व्यक्तींचे अधिकार अनेक ठिकाणी मान्य केले जात नाहीत. त्यांच्यासाठी विशेष कायदे आणि धोरणे तयार करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो.

**४.५ माध्यमांमधील पितृसत्ताकता**

महिलांना फक्त सौंदर्यवर्धक उत्पादनांच्या माध्यमातून आकर्षक म्हणून दाखवले जाते. स्त्रीचे मूल्य फक्त तिच्या शारीरिक सौंदर्यावर आधारित दाखवले जाते. चित्रपट मालिका आणि जाहिरातींमध्ये पुरुषांचे वरचढ स्थान दिसून येते. महिलापात्रांना सहाय्यक किंवा दुय्यम भूमिकांमध्ये मर्यादित ठेवले जाते.

**४.६ धार्मिक आणि सांस्कृतिक पातळीवर पितृसत्ताकता**

धार्मिक विधी आणि परंपरांमध्ये महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. काही धर्मांमध्ये महिलांना मंदिरामध्ये किंवा धार्मिक स्थळी प्रवेश नाकारला जातो. कुटुंबामध्ये पुरुषांचा निर्णय हा अंतिम मानला जातो. तर मालमत्तेवर हक्क असला तरीही मुलींना समान हक्क मिळत नाही.

**५. पितृसत्ताक व्यवस्थेचे परिणाम**

पितृसत्ताक व्यवस्था ही लिंग ,वर्ण आणि समाजातील विविध घटकांवर परिणाम करणारी सामाजिक रचना आहे .या व्यवस्थेमुळे महिलांना व तृतीयपंथीय समुदायाला आणि कधीकधी पुरुषांनाही नकारात्मक परिणामांना सामोरे जावे लागते. पितृसत्ताकतेमुळे वैयक्तिक ,कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांवर दूरगामी परिणाम झाले आहेत.

**५.१ वैयक्तिक पातळीवरील परिणाम**

महिलांना स्वतःच्या आयुष्याचे निर्णय घेण्याची स्वतंत्रता दिली जात नाही, जसे की विवाह ,शिक्षण ,करियर इ. त्यांना सतत दुय्य मानले जात असल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची कमी निर्माण होते .लैंगिक अत्याचार घरगुती हिंसा आणि असमान वागणूक यामुळे महिलांचे मानसिक आरोग्य बिघडते .मर्दानीपणा टिकवण्यासाठी पुरुषांवर भावनांना लपवण्याचा दबाव असतो ,तर घर चालवणारा या भूमिकेमुळे पुरुषांवर आर्थिक ताण मोठ्या प्रमाणावर असतो. त्याचबरोबर तृतीयपंथी समुदायावर त्यांच्या लैंगिक ओळखीमुळे भेदभाव आणि हिंसेला सामोरे जावे लागते .तर पितृसत्ताक विचारसरणी ही तृतीयपंथीय समुदायाला अयोग्य मानते

**५.२ कौटुंबिक पातळीवरील परिणाम**

कुटुंबातील सर्व महत्त्वाचे निर्णय पुरुष घेतात. ज्यामुळे महिलांचे आणि मुलांचे मत दुर्लक्षित राहते. महिलांना फक्त घरगुती जबाबदाऱ्या सांभाळणारी व्यक्ती म्हणूनच मर्यादित केले जाते, त्याचबरोबर मुलगा आणि मुलगी यांच्यामध्ये शिक्षण, आहार ,उपचार ,नोकरी ,लग्न यांमध्ये भेदभाव केला जातो .

**५.३ सामाजिक पातळीवरील परिणाम**

स्त्रिया आणि तृतीयपंथी व्यक्तींना दुय्यम मानून त्यांच्या अधिकारांवर मर्यादा घालण्यात येतात .घरगुती हिंसा, बलात्कार आणि लैंगिक अत्याचार यांसारख्या घटनांना चालना मिळते,तसेच पुरुषांचे समाजात वर्चस्व असल्यामुळे महिलांना सार्वजनिक जीवनामध्ये कमी संधी मिळतात. कुटुंबाच्या वतीने कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्याचा अधिकार हा सर्वस्वी पुरुषांकडे असल्यामुळे स्त्रियांना निर्णय प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेतले जात नाही .

**५.४ आर्थिक पातळीवरील परिणाम**

महिलांना समान कामासाठी पुरुषांपेक्षा कमी वेतन मिळते. महिलांना आर्थिक निर्णय घेण्यापासून रोखले जाते, त्यामुळे त्यांचे पुरुषांवर अवलंबित्व वाढते. पितृसत्ताक व्यवस्थेमुळे महिला उद्योजकांना पुरुषा इतकी संधी व संसाधने नाहीत, त्याचबरोबर कोणताही नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी पुरुषांच्या तुलनेत महिलांना कमी भांडवल उपलब्ध करून दिले जाते.

**५.५ राजकीय पातळीवरील परिणाम**

महिलांना राजकीय क्षेत्रामध्ये कमी संधी दिल्या जातात .आजही काही देशांमध्ये पितृसत्ताक कायदे महिलांना आणि तृतीयपंथीयांना समान अधिकार देत नाहीत.

**५.६ सांस्कृतिक आणि धार्मिक पातळीवरील परिणाम**

पितृसत्ताक व्यवस्थेमुळे महिलांना सतत दुय्यम मानले जाते ,त्यामुळे धार्मिक विधीमध्ये त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. काही ठिकाणी स्त्रियांना प्रवेशही नाकारला जातो. समाजामध्ये वावरत असताना महिलांच्या वागणुकी वरती कठोर नियम लादले जातात, तर पुरुषांसाठी अधिक स्वातंत्र्य असते.

**५.७ मानसिक आरोग्यावर परिणाम**

सतत दुय्यम दर्जाची वागणूक देण्यात येत असल्यामुळे महिलांच्या मध्ये मोठ्या प्रमाणामध्ये नैराश्य वाढते. पुरुषांना कठोर राहण्याचा दबाव असल्यामुळे ते मानसिक समस्या व्यक्त करू शकत नाहीत, तर सामाजिक भेदभावामुळ तृतीयपंथीय व्यक्तींच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होतो.त्यांच्यामध्ये आत्महत्येची प्रवृत्ती वाढीस लागते.

**५.८ सामाजिक प्रगतीस अडथळा**

महिलांना शिक्षण व रोजगारात समान संधी नसल्यामुळे समाजातील प्रतिभेचा अपव्यय होतो. पितृसत्ताक विचारसरणी न्याय प्रक्रियेवर परिणाम करते जसे की ,लैंगिक गुन्ह्यांबाबत न्याय मिळण्यात होणारा विलंब. पितृसत्ताक व्यवस्थेला विरोध करून समानतेचा स्वीकार करणे हीच समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी गरज आहे.

**६. पितृसत्ताक व्यवस्थेवरील उपाय योजना**

पितृसत्ताक व्यवस्थेचे निर्मूलन करणे हे मोठे सामाजिक आवाहन आहे, यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची आवश्यकता आहे. शैक्षणिक सुधारणांपासून मानसिकता बदलण्यापर्यंत आणि कायदे सुधारण्यापासून महिलांच्या सक्षमीकरणापर्यंत विविध पातळ्यांवर उपाययोजना लागू करणे आवश्यक आहे.

**६.१ शैक्षणिक उपाय योजना**

लिंग समानतेवर आधारित शिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे ,त्याचबरोबर महिलांना विशेष शिष्यवृत्ती आणि प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. मुलींच्या आणि तृतीयपंथीयांच्या शिक्षणासाठी विशेष योजना व शिष्यवृत्ती प्रदान करणे. ग्रामीण व आर्थिक दृष्ट्या दुर्बल वर्गासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देणे. शाळांमध्ये लिंगभेदा विषयी जागरूकता निर्माण करणारे अभ्यासक्रम समाविष्ट करणे .विद्यार्थ्यांमध्ये पितृसत्ताक विचारसरणी विरोधात जागृती निर्माण करणे. महिलांना आणि तृतीयपंथीय व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे .उद्योग तंत्रज्ञान आणि विज्ञान क्षेत्रांमध्ये समान संधी प्रदान करणे.

**६.२ कायदेशीर उपाय योजना**

लैंगिक हिंसा थांबवण्यासाठी कठोर कायदे करणे, त्याचबरोबर महिलांना व तृतीयपंथी समुदायाला संरक्षण देणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांवर कठोर शिक्षेसाठी प्रभावी कायद्यांची अंमलबजावणी करणे. तृतीयपंथीय व्यक्तींना समान अधिकार मिळवून देण्यासाठी विशेष कायदे करणे, त्याचबरोबर हुंडा प्रथा आणि लैंगिक भेदभाव संपवण्यासाठी कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे. महिलांना त्यांच्या कुटुंबीयातील संपत्तीवर समान संधी मिळवून देण्यासाठी कायदे करणे.

**६.३ सामाजिक जागरूकता**

स्त्री पुरुष समानता आणि तृतीयपंथीय व्यक्तींच्या हक्काविषयी व्यापक जनजागृती मोहिमा राबविणे. माध्यमांच्या माध्यमातून सकारात्मक संदेश प्रसारित करणे. जुन्या पितृसत्ताक परंपरांचे पुनरावलोकन करून आधुनिक काळाशी सुसंगत बदल करणे. धार्मिक विधींमध्ये महिलांना आणि तृतीयपंथीय व्यक्तींना समान स्थान देणे, स्वयंसेवी संस्था सामाजिक कार्यकर्ते आणि सार्वजनिक नेतृत्वाला सहभागी करून समाजात समानता प्रस्थापित करणे .

**६.४ आर्थिक उपाययोजना**

समान कामासाठी समान वेतन देण्यासाठी कठोर कायद्यांची अंमलबजावणी करणे .महिलांसाठी स्वतंत्र आर्थिक योजनांचा विकास करणे. महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी सवलतीचे कर्ज आणि सबसिडी प्रदान करणे. महिला उद्योजकांसाठी विशेष तांत्रिक व आर्थिक सल्ला कक्ष उपलब्ध करून देणे. महिलांना संपत्ती व्यवस्थापन आणि गुंतवणूक याबाबत प्रशिक्षण देणे. महिलांसाठी रोजगार निर्मितीचे कार्यक्रम राबविणे.

**६.५ राजकीय उपायोजना**

स्थानिक स्वराज्य संस्थांपासून संसद पर्यंत महिलांसाठी आरक्षण लागू करणे. महिलांना राजकीय नेतृत्वासाठी प्रशिक्षण देणे. तृतीयपंथी समुदायाला राजकीय प्रक्रियेत समाविष्ट करून त्यांचे मुद्दे मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

**६.६ मानसिकता बदलण्यासाठी उपाय**

चित्रपट मालिका आणि जाहिरातींमधून महिलांना आणि तृतीयपंथीय व्यक्तींना सकारात्मक व शक्तिशाली स्वरूपामध्ये सादर करणे .पुरुषप्रधान मानसिकते विरुद्ध मोहीम राबवणे ,त्याचबरोबर सार्वजनिक ठिकाणी पितृसत्ताक व्यवस्थेच्या दुष्परिणामांवर चर्चा आयोजित करणे. पुरुषांमध्ये समता विचार रुजवण्यासाठी कार्यशाळा राबविणे, त्याचबरोबर पुरुषांना पितृसत्ताक व्यवस्थेच्या दुष्परिणामांची जाणीव करून देणे. समानतेच्या चळवळीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे .

**६.७ मानसिक आरोग्याला प्रोत्साहन**

महिलांसाठी आणि तृतीयपंथीय व्यक्तींसाठी सल्लागार व मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करणे. पुरुषांमध्ये भावनिक स्वस्था विषयी जागरूकता निर्माण करणे ,त्याचबरोबर पितृसत्ताक व्यवस्थेने ग्रस्त व्यक्तींना आधार मिळावा यासाठी गटचर्चांचे आयोजन करणे.

**६.८ महिलांसाठी आणि तृतीयपंथी समुदायासाठी विशेष धोरणे**

शिक्षण नोकरी आणि राजकीय क्षेत्रांमध्ये महिलांसाठी विशेष आरक्षण लागू करणे. तृतीयपंथीय व्यक्तींच्या समुदायाच्या लग्न ,शिक्षण, रोजगार आणि मालमत्तेच्या हक्कांसाठी विशेष धोरण आखणे.

**६.९ आंतरराष्ट्रीय सहकार्य**

पितृसत्ताक व्यवस्थेविरोधातील आंतरराष्ट्रीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे. संयुक्त राष्ट्र संघ आणि जागतिक संघटनांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करणे.

**७. निष्कर्ष**

१. पितृसत्ताक व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी सामाजिक, आर्थिक ,शैक्षणिक आणि राजकीय पातळीवर समन्वय साधने गरजेचे आहे.

२. पितृसत्ताक विचारसरणीला बदलून समानता स्वतंत्रता आणि परस्पर आदराच्या मूल्यांना समाजात रुजवली गेली तर समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस चालना मिळेल.

३. पितृसत्ताक समाज ही केवळ सामाजिक व्यवस्था नाही तर ती मानसिकतेचे रूप आहे, यामुळे समाजात जेंडर विषमतेचे स्वरूप अधिक तीव्र झाले आहे.

४. समानतेच्या दिशेने पाऊल उचलण्यासाठी शिक्षण कायदा आणि सामाजिक जागरूकता यांचा समन्वय आवश्यक आहे.

५. लिंग विषमता ही फक्त महिलांसाठीच नाही तर संपूर्ण समाजासाठी हानिकारक आहे महिलांना समान अधिकार स्वातंत्र्य आणि संधी मिळाल्या तर संपूर्ण समाज अधिक समृद्ध होईल.

६. लिंग विषमता आणि पितृसत्ताक व्यवस्थेला नष्ट करण्यासाठी महिला सशक्तीकरण आवश्यक आहे. शिक्षण जागरूकता कायदेशीर सुधारणा आणि सामाजिक बदल हे यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. महिलांना समान संधी मिळवून देणे. पितृसत्ताक व्यवस्थेचा विरोध करणारा एक समतावादी समाज निर्माण करणे.

**सारांश**

लिंग विषमता आणि पितृसत्ताक समाज या दोन परस्पर संबंधित संकल्पना आहेत ,ज्या समाजातील महिलांच्या स्थानावर आणि विकासावर मोठा प्रभाव टाकतात. पुरुषप्रधान रचना असलेल्या समाजाला पितृसत्ताक समाज म्हणतात. येथे सत्ता ,निर्णय क्षमता, आणि मालकी पुरुषांच्या हाती असते तर महिलांना दुय्यम भूमिका दिली जाते. पुरुष आणि महिलांमध्ये होणारी असमान वागणूक, अधिकार आणि संधीची कमतरता म्हणजे लैंगिक विषमता होय .महिलांना रोजगार ,शिक्षण वेतन आणि सामाजिक हक्कांमध्ये कमी स्थान दिले जाते. या व्यवस्थेमुळे महिलांच्या विकासावर मर्यादा येतात आणि समाजाची प्रगती खुंटते. समानता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण ,कायदे आणि सामाजिक जागृती वर अधिक भर देणे आवश्यक आहे. लिंग विषमता आणि पितृसत्ताक समाजातून मुक्त होण्यासाठी समानतेवर आधारित सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्नशील राहणे आणि महिलांना समाजात समान स्थान देणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ यादी**

१. प्राचीन भारताचा इतिहास – प्रा. य. ना. कदम , फडके प्रकाशन

२. मध्ययुगीन भारताचा इतिहास – प्रा. डॉ. पी. एन. शिंदे – प्रा. ए. जी. थोरात, फडके प्रकाशन

३. मध्ययुगीन भारत (इ.स.१२०६ ते १७६१) – डॉ. आचार्य, कृ. अं

४. आधुनिक भारताचा इतिहास – डॉ. बी. एन. सरदेसाई, डॉ. व्ही. एन. नलावडे, फडके प्रकाशन

५. मराठ्यांचा इतिहास (१७०७ ते १८१८) – प्रा. एन. डी पाटील, प्रा. डी. एस. थोरात फडके प्रकाशन

# ५. पुरुषांसाठी लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण आणि भावनी दडपणाचे परिणाम

**कु. कदम प्रियांका सतिश**
सौ. शोभा काकी बाबर कन्या महाविद्यालय, विटा.

**प्रस्तावना**

पुरुषांच्या जीवनात लिंग संवेदनशीलता प्रशिक्षणाचे महत्त्व खूप आहे. समाजाने त्यांच्यावर लादलेल्या जबाबदाऱ्या, कधी कधी त्यांच्या भावनांना दडपून ठेवतात. त्यांच्यावर एक अशी भूमिका असते, जिथे त्यांना कधीही भावनांची मोकळेपणाने अभिव्यक्त होण्याची परवानगी नसते. पण, जर त्यांना त्यांची भावना व्यक्त करण्याची संधी मिळाली, तर त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर चांगला परिणाम होईल.परंतु त्यासाठी काही अडचणीही येतात. पुरुषांना त्यांच्या भावनांना व्यक्त करण्याचा अधिकार देणं, आणि लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण घेणं, ही एक मोठी अडचण आहे कारण समाजाने त्यांना ज्या कठोर भूमिका दिल्या आहेत, त्यामध्ये भावनांचे प्रदर्शन खूप अवघड ठरते. अनेक पुरुषांना त्यांचे अंतरंग खुलं करण्यामध्ये संकोच वाटतो, कारण त्यांना वाटतं की समाज त्यांना कमजोर समजेल.अशा अडचणींमध्ये, समाजात पुरुषांच्या 'मजबूती' आणि 'सामर्थ्य'च्या प्रतिमेचा दबाव असतो. ते आपल्या भावनांचा सामना करू इच्छित असतानाही, त्यांना बाह्य जगात एक दृढ आणि नियंत्रण ठेवणारं व्यक्तिमत्व जपण्याची अपेक्षा केली जाते. हे त्यांना भावनिक दडपणात आणते, ज्यामुळे त्यांची मानसिक आणि शारीरिक स्थिती प्रभावित होते. त्यामुळे, लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण घेणं, आणि भावनांना व्यक्त करणं, हे पुरुषांसाठी एक मोठं आव्हान असू शकतं. काही पुरुषांना त्यांचा त्रास आणि दडपण मान्य करण्यास देखील किचकटपणा वाटतो. त्यांनी नेहमीच स्वतःला इतरांच्या अपेक्षांनुसार ठेवले आहे, त्यामुळे अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचे स्वीकारणे त्यांच्यासाठी एक मोठं मानसिक आव्हान ठरते.त्याचबरोबर, समाजाने तयार केलेल्या या भूमिकांमुळे, पुरुषांना भावनात्मकदृष्ट्या सुरक्षित वातावरण मिळवण्यासाठीही संघर्ष करावा लागतो. लिंग संवेदनशीलता प्रशिक्षणामुळे हा संघर्ष कमी होऊ शकतो, परंतु त्यासाठी पुरुषांमध्ये तयार असलेली मानसिकता आणि समाजातील रूढीवादी विचारधारा बदलवणं अत्यंत आवश्यक आहे.

**उद्दिष्टे**

**१. लिंग संवेदनशीलता अभ्यास**

पुरुषांसाठी लिंग संवेदनशीलता प्रशिक्षणाचे सामाजिक आणि मानसिक फायदे समजून घेणे.

**२. दडपलेल्या भावनांचे परिणाम**

पुरुषांमध्ये दडपलेल्या भावनांचा शारीरिक आणि मानसिक परिणाम तपासणे.

**३. सांस्कृतिक बदल**

विविध संस्कृतींमध्ये पुरुषांच्या भूमिकांमधील बदल आणि लिंग संवेदनशीलता.

**४. भावनांची मुक्तता**

पुरुषांना भावनांचा अभिव्यक्ती कशी करावी आणि त्याचे मानसिक फायदे.

**५. प्रशिक्षणाचे परिणाम**

लिंग संवेदनशीलता प्रशिक्षणाचे दीर्घकालीन परिणाम.

**६. वैयक्तिक आणि सामूहिक बदल**

पुरुषांच्या भूमिकांतील बदल आणि सुधारणा.

**७. केस स्टडी**

प्रशिक्षणामुळे झालेल्या बदलांची उदाहरणे.

**८. जवाबदारींचे मानसिक परिणाम**

पारंपारिक सामाजिक भूमिकांमुळे पुरुषांवर लादलेल्या जबाबदाऱ्यांचे मानसिक, शारीरिक आणि भावनिक परिणाम विश्लेषित करणे.

**अभ्यास पद्धती (Methodology)**

या संशोधनासाठी ऑनलाइन उपलब्ध माहितीचे विश्लेषण केले, आजूबाजूच्या परिसरातील व्यक्तींचे निरीक्षण केले आणि थोडेफार प्रश्न विचारून त्यांची मते जाणून घेतली. याशिवाय, संबंधित विषयावर लोकांची वैयक्तिक मते गोळा केली आणि विविध केस स्टडींचा अभ्यास करून निष्कर्ष मांडले.

**विषय विश्लेषण**

पुरुषांना त्यांच्या सामाजिक भूमिकांमुळे अनेक मानसिक आणि शारीरिक त्रास भोगावे लागतात. एकीकडे, त्यांना ‘अल्फा पुरुष’ म्हणून प्रक्षिप्त केले जाते, तर दुसरीकडे, त्यांना भावना दडपून ठेवण्याचा दबाव टाकला जातो. या मानसिक आणि भावनिक ताणामुळे अनेक पुरुष दारु, ड्रग्स, किंवा आत्महत्येसारख्या गंभीर समस्या भोगतात.

या रिसर्च पेपरमध्ये 'समाजाच्या चौकटीत लपलेली पुरुषांची वेदना' या मुद्द्यावर सखोल विश्लेषण केले जाईल, ज्यामध्ये पुरुषांच्या विविध मानसिक, सामाजिक आणि भावनिक समस्यांचा विस्ताराने अभ्यास केला जाईल.

१. समाजाने पुरुषांवर लादलेल्या सामाजिक आणि मानसिक चौकटी ही एक गंभीर समस्या आहे, जी पुरुषांच्या भावनिक आणि मानसिक आरोग्यावर खोलवर प्रभाव टाकते. लहानपणीच मुलांना "तुम्ही मुलांसारखे वागा", "रडू नकोस", "तुम्ही मोठे पुरुष आहात" अशा वाक्यांनी शिकवले जाते, ज्यामुळे त्यांच्यातील भावनिक व्यक्तिमत्त्व दडपले जाते. समाजाने पुरुषांच्या वागण्या आणि भूमिका यावर असलेली कठोर अपेक्षा, त्यांना एक विशिष्ट चौकटीत सीमित करते. त्यांना कधीच भावनांची मुक्त अभिव्यक्ती करण्याचा

अधिकार दिला जात नाही. "पुश-अप्स करणारा, बॉडीबिल्डिंग करणारा, आणि कधीही निराश होणारा नाही" असा समाजाचा आदर्श पुरुष असावा अशी धारणा आहे. त्यामुळे, अनेक पुरुष त्यांच्या भावनांना दाबून ठेवतात, आणि त्याच्यामुळे मानसिक ताण आणि नैराश्य निर्माण होतो.

पुरुषांना त्यांच्या शारीरिक सामर्थ्य आणि कार्यक्षमता आधार म्हणून पाहिले जाते, आणि त्यांच्या यशाचे मापकाम हे केवळ आर्थिक यशावर आणि सामाजिक स्थितीवर आधारित असते. या यशाच्या दबावामुळे, त्यांना भावनिक आणि मानसिक भिन्नतेला स्वीकृत करण्याची मुभा मिळत नाही. हेच त्यांना मानसिक आजारांशी लढायला भाग पाडते. त्यांना घरकाम किंवा मुलांच्या पालनपोषणात सहभागी होण्यासारख्या मुलींच्या भूमिकांमध्ये सामील होण्याचा विचार देखील अजिबात करण्याची मुभा नाही. पुरुषांवर असलेल्या या पारंपरिक सामाजिक आणि मानसिक चौकटींचा एक मोठा दुष्परिणाम म्हणजे भावनिक दूरावा, ज्यामुळे ते स्वतःच्या भावना आणि इतरांच्या भावना समजून घेत नाहीत. या चौकटींचा परिणाम त्यांच्या वैवाहिक आणि कुटुंबीय संबंधांवर होतो. उदाहरणार्थ, मुलींबरोबर पुरुषांचे भावनिक आणि संवेदनशील संवाद अत्यंत कमी असतात, आणि हेच नातेसंबंधांत ताण निर्माण करतात. याशिवाय, पुरेशी भावनिक अभिव्यक्ती न केल्यामुळे पुरुषांमध्ये आत्मविश्वास कमी होतो, जो त्यांना सार्वजनिक जीवनात आणि करिअरमध्ये नकारात्मक परिणाम दर्शवतो. समाजाच्या या चौकटींचे परिणाम पुरुषांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर असतात.

२. पुरुषांच्या मानसिक आरोग्याकडे समाजाने केलेले दुर्लक्ष एक गंभीर समस्या बनली आहे. पारंपरिक लिंग भूमिका आणि सुसंगत सामाजिक अपेक्षांमुळे, पुरुषांचे मानसिक आरोग्य नेहमीच दुर्लक्षित केले जाते. "मर्द को दर्द नहीं होता" या सामान्य वाक्याच्या माध्यमातून, पुरुषांना त्यांचं दुःख आणि भावनिक समस्यांना बाहेर काढण्याची परवानगी दिली जात नाही. त्यांना केवळ शारीरिक सामर्थ्य, यश आणि आत्मविश्वास यांच्या संदर्भातच मोजले जाते, आणि त्यांच्या मानसिक आरोग्याचा विचार करणारा कोणताही वादविवाद तयार होत नाही. पुरुषांना भावनिकदृष्ट्या कमजोरी दाखवण्याची मुभा नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात, 'तुम्ही कधीही रडू नका' हे संस्कार रुंजीवले जातात. यामुळे, ते आपल्या भावना आणि मानसिक ताण सहन करण्याच्या पद्धतीत बदल करतात आणि त्यांना एकदमच एकटं पडण्याचा अनुभव होतो.

**३. आर्थिक जबाबदाऱ्या आणि त्यातून निर्माण होणारे ताण**

पुरुषांवर लादलेल्या आर्थिक जबाबदाऱ्या त्यांच्या मानसिक आरोग्यावर आणि आयुष्याच्या इतर पैलूंवर खोल परिणाम करतात. पारंपरिक समाजात, पुरुषांना कुटुंबाचे मुख्य कर्ता मानले जाते, आणि यामुळे त्यांच्या खांद्यावर आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवण्याची जबाबदारी असते. ही भूमिका त्यांना कधीच निवडायची संधी दिली जात नाही; ती जन्मतःच त्यांच्यावर लादली जाते. या अपेक्षांमुळे, त्यांना स्वतःच्या क्षमता ओलांडून काम करण्याचा दबाव येतो, जो त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी हानिकारक ठरतो.पुरुषांना लहानपणापासून "घर सांभाळायचं आहे," "कुटुंबासाठी कमवायचं आहे," अशा प्रकारच्या शिकवणी दिल्या जातात. त्यामुळेच, जर ते आर्थिकदृष्ट्या संघर्ष करत असतील, तर त्यांना सामाजिक प्रतिष्ठा गमावण्याचा किंवा स्वतःला अपयशी समजण्याचा धोका निर्माण होतो. यामुळे ते मानसिक ताणाखाली जगतात आणि स्वतःला कधीच मोकळं करू शकत नाहीत.

**४. पितृत्व आणि पुरुषांची भूमिका**

पितृत्व ही एक नाजूक आणि जबाबदारीची भूमिका आहे, जी पुरुषांसाठी खूप महत्त्वाची ठरते. एक पिता केवळ कुटुंबाचा आधारस्तंभ नसतो, तर तो आपल्या मुलांसाठी आदर्श व्यक्तिमत्त्व देखील असतो. पितृत्वाची भूमिका पुरुषांवर फक्त आर्थिक जबाबदाऱ्यांपुरती मर्यादित राहिली, तर त्यातून उद्भवणाऱ्या आव्हानांची व्याप्ती समजणे महत्त्वाचे ठरते.पिता मुलांच्या आयुष्यात एक मार्गदर्शक म्हणून कार्य करतो. त्याचे निर्णय, वर्तन, आणि विचार मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम करतात. तथापि, पितृत्वाची भूमिका पार पाडताना पुरुषांना अनेक वेगवेगळ्या अडचणींचा सामना करावा लागतो. समाजात त्यांना "कडक पिता" किंवा "शिस्तप्रिय" अशी प्रतिमा जपण्याचा दबाव असतो, ज्यामुळे त्यांना मुलांशी भावनिकदृष्ट्या जोडणे कठीण होऊ शकते.पितृत्वात पुरुषांना आपल्या मुलांच्या आयुष्यात भावनिक आणि शारीरिक उपस्थिती दाखवण्याची अपेक्षा असते. परंतु, आर्थिक जबाबदाऱ्यांचा भार आणि कामाचा ताण यामुळे अनेक वेळा ते पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. यामुळे मुलांमध्ये वडिलांविषयी दुरावा निर्माण होऊ शकतो.

**५. व्यसनाधीनता: तणावाचे परिणाम**

व्यसनाधीनता एक गंभीर मानसिक आणि शारीरिक समस्या आहे जी समाजात मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. पुरुषांमध्ये ही समस्या विशेषतः तणाव, दबाव आणि अनुत्पादक भावनांच्या परिणामी प्रकट होते. समाजातील पुरुषांवर लादलेली "मजबूत राहण्याची"किंवा "कडक"प्रतिमा आणि तणावाच्या पातळीवर असलेल्या निरंतर दबावामुळे ते भावनिकदृष्ट्या दडपले जातात. यामुळे त्यांना त्यांच्या समस्या उघडपणे व्यक्त करण्याचा मार्ग बंद पडतो आणि ते मदतीसाठी एकट्याने संघर्ष करत राहतात. तणावाच्या आक्रमकतेमुळे पुरुष त्यांची मानसिक असंतुलन दूर करण्यासाठी धूम्रपान, मद्यपान, ड्रग्स किंवा इतर व्यसनांचा मार्ग निवडू शकतात. यामुळे व्यसनाधीनता निर्माण होण्याची शक्यता अधिक वाढते. "मर्द को दर्द नहीं होता" या समाजाच्या मानसिकतेमुळे, पुरुष आपल्या भावनांचा दबाव जास्त प्रमाणात सहन करतात, ज्यामुळे त्यांचं मानसिक आरोग्य वाईट होऊ शकते आणि ते व्यसनांच्या जाळ्यात अडकू शकतात.

**केस स्टडी 1: "Mental Health Challenges Faced by Men in India"**

भारतात पुरुष मानसिक आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करत आहेत. २०१७ मध्ये करण्यात आलेल्या एका राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार, ७५% पुरुषांनी त्यांच्या मानसिक आरोग्याविषयी चर्चा करण्यास नकार दिला. त्यातील ६२% पुरुषांनुसार, "पुरुषांची भूमिका" आणि "पुरुषत्व" हेच त्यांना मानसिक आरोग्याच्या समस्यांबद्दल मदत घेण्यापासून रोखतात. यामुळे भारतात मानसिक ताण आणि नैराश्याचे प्रमाण वाढत आहे. भारतामध्ये पुरुषांचे मानसिक आरोग्य कमी चर्चिले जात आहे, म्हणून त्यांचे इतर लोकांसोबत संवाद साधणे आणि मदत घेणे कठीण होते. २०१५ मध्ये जाहीर झालेल्या एका रिपोर्टनुसार, ४०% पुरुषांना मानसिक आरोग्याच्या समस्यांबद्दल जागरूकता नाही, आणि २५% पुरुषांनी मानसिक ताणाबद्दल बोलण्यासाठी मदतीची मागणी केली. यावरून हे सिद्ध होते की मानसिक आरोग्यावरील लिंग आधारित नकारात्मक मानसिकता हे पुरुषांच्या मानसिक आरोग्याच्या मुद्द्यांना मांडताना एक मोठं आव्हान आहे

**लिंग समानतेकडे वाटचाल: पुरुषांच्या जीवनात बदल घडवणारे उपाय**

**उपाय 1: लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण**

समाजात पुरुषांवर रूढीवादी अपेक्षा लादल्या जातात, जसे की ते नेहमीच मजबूत, कठोर, आणि कमवणारे असले पाहिजे. या अपेक्षांमुळे पुरुषांना त्यांच्या भावनांना व्यक्त करण्यासाठी योग्य वातावरण मिळत नाही. लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण हे मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्वांसाठी उपयुक्त ठरते. यात समानतेचे मूल्य शिकवले जाते, तसेच प्रत्येक व्यक्तीचा स्वाभाविक विकास होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. शाळा, महाविद्यालये, आणि कार्यस्थळांवर असे प्रशिक्षण राबवले तर रूढीवादी विचारसरणी बदलून समाज अधिक संवेदनशील होईल.

**उपाय 2: मानसिक आरोग्य साक्षरता**

मानसिक आरोग्य हे फक्त एखाद्या व्यक्तीच्या ताण-तणावाशी संबंधित नसून, त्याच्या संपूर्ण जीवनशैलीशी जोडलेले आहे. पुरुषांमध्ये तणाव आणि नैराश्य याबाबत जागरूकता कमी असल्याने, त्यांना योग्य उपचार मिळत नाहीत. शाळांपासून मानसिक आरोग्य शिक्षण दिल्यास, मुलांना त्यांच्या भावनांचा योग्य प्रकारे स्वीकार आणि व्यवस्थापन करता येईल. यासाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, आणि आरोग्य शिबिरे आयोजित करून समाजात सकारात्मक विचारसरणी पसरवणे गरजेचे आहे.

**उपाय 3: सांस्कृतिक बदलासाठी प्रयत्न**

पुरुषांवर समाजाने लादलेल्या अपेक्षांमुळे ते एका विशिष्ट चौकटीत अडकतात. माध्यमांनी 'आदर्श पुरुष' ही संकल्पना बदलून पुरुषांच्या स्वाभाविक, विविध भूमिका दाखवण्यास सुरुवात केली पाहिजे. उदाहरणार्थ, पुरुषांनाही भावना असतात, ते घरातील कामातही सहभागी होऊ शकतात, हे दाखवणे आवश्यक आहे. यासाठी सिनेमे, टीव्ही कार्यक्रम, आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर होऊ शकतो.

**उपाय 4: पितृत्वाची जबाबदारी समजून घेणे**

पितृत्व ही केवळ आर्थिक जबाबदारी नव्हे, तर कुटुंबासाठी एक भावनिक आधार देणारी भूमिका आहे. मुलांच्या शारीरिक, बौद्धिक, आणि भावनिक विकासात वडिलांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. पितृत्वासाठी लागणाऱ्या कौशल्यांचे शिक्षण, जसे की मुलांशी संवाद साधणे, त्यांचे प्रश्न समजून घेणे, यावर आधारित कार्यक्रम राबवले जावेत. अशा प्रकारे, वडिलांची मुलांशी नाळ अधिक घट्ट होईल आणि कुटुंबाचे वातावरण सौहार्दपूर्ण बनेल.

**उपाय 5: व्यसनाधीनतेवर प्रतिबंध**

तणावामुळे पुरुष व्यसनांकडे वळतात, ज्यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. व्यसनाधीनतेवर प्रतिबंध घालण्यासाठी तणाव व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे, ध्यान, योग, आणि शारीरिक व्यायाम यांचा प्रचार करणे गरजेचे आहे. व्यसनमुक्ती केंद्रे अधिक कार्यक्षम बनवली पाहिजेत, तसेच व्यसनांवर उपाययोजनांसाठी सरकारी पातळीवर प्रयत्न वाढवले पाहिजेत.

**उपाय 6: मानसिक आरोग्य सेवांचा विस्तार**

आजही ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. पुरुषांसाठी खास क्लिनिक, ऑनलाइन समुपदेशन सेवा, आणि हेल्पलाइन तयार केल्याने ते आपली समस्या मोकळेपणाने व्यक्त करू शकतात. ग्रामीण आणि शहरी भागातील सर्वांना या सेवांचा लाभ घेता यावा यासाठी जागतिक स्तरावर असलेल्या आरोग्यसेवांचा अभ्यास करून त्यांचा स्वीकार करावा.

**उपाय 7: आर्थिक ताण कमी करणे**

पुरुषांवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी सवलतीच्या दराने कर्ज, छोट्या व्यवसायांसाठी आर्थिक सहाय्य योजना, आणि आर्थिक साक्षरता कार्यक्रम प्रभावी ठरू शकतात. यामुळे पुरुष आपले आर्थिक व्यवस्थापन अधिक चांगल्या प्रकारे करू शकतील आणि तणाव टाळता येईल.

**उपाय 8: भावना व्यक्त करण्यास प्रोत्साहन**

पुरुषांमध्ये भावना व्यक्त करण्याची सवय बालपणापासून रुजवणे गरजेचे आहे. त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी संवाद साधला गेला पाहिजे. अशा संवादामुळे त्यांच्या मनातील दबाव कमी होतो आणि ते मानसिकदृष्ट्या अधिक मजबूत बनतात.

**उपाय 9: समाजाचा पाठिंबा**

समाजाच्या पाठिंब्यामुळे पुरुष आपल्या समस्या सामायिक करू शकतात. आधार गटांच्या माध्यमातून पुरुषांना संवाद साधता येतो, ज्यामुळे त्यांना मानसिक आधार मिळतो. या गटांच्या माध्यमातून मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी सामूहिक उपाययोजना करता येतात.

**निष्कर्ष**

१. पुरुषांवरील सामाजिक अपेक्षांमुळे मानसिक आणि भावनिक ताण वाढत आहे.

२. लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण पुरुषांच्या भावनिक स्वास्थ्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे.

३. ताण व्यवस्थापनासाठी संवाद आणि सल्लामसलत आवश्यक आहे.

४. व्यसनमुक्ती आणि मानसिक स्वास्थ्यासाठी जाणीवजागृती उपक्रम प्रभावी ठरू शकतात.

५. पितृत्वाच्या जबाबदाऱ्या स्वीकारताना पुरुषांना भावनिक पाठबळाची गरज आहे.

६. मानसिक स्वास्थ्याला प्राधान्य देणे पुरुषांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवते.

७. समाजाने पुरुषांच्या भूमिकेबद्दल असलेल्या पारंपरिक धारणा बदलण्याची गरज आहे.

**सारांश**

या रिसर्च पेपरमध्ये पुरुषांच्या मानसिक स्वास्थ्यावर होणाऱ्या सामाजिक दबावांचा आणि लिंग आधारित असलेल्या अपेक्षांचा विश्लेषण करण्यात आले आहे. पुरुषांवर समाजाने लादलेल्या पारंपरिक भूमिकांमुळे त्यांच्यावर भावनिक आणि मानसिक ताण वाढतो. यासाठी लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण, ताण व्यवस्थापन, संवाद आणि सल्लामसलत यांसारख्या उपायांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

व्यसनाधीनता, पितृत्वाची भूमिका आणि पुरुषांची मानसिक स्थिती यांच्याशी संबंधित समस्यांवर लक्ष देणे आवश्यक आहे. मानसिक स्वास्थ्याला प्राधान्य देणे, पुरुषांच्या भावनिक चांगुलपणासाठी मदत करणारं ठरू शकते. समाजातील पारंपरिक विचारांमध्ये बदल करून पुरुषांना सुरक्षित आणि सशक्त भावनिक वातावरण प्रदान करणे महत्त्वाचे आहे. या उपायांनी पुरुषांच्या जीवनशैलीत सुधारणा घडवून आणू शकतात, ज्यामुळे त्यांचे मानसिक स्वास्थ्य सुदृढ होईल.

**संदर्भ ग्रंथ**

१. Patel, S. (2021). "Mental Health and Gender Sensitivity: A Guide." Journal of Mental Health, 5(2), 45-50.

२. Thompson, G. & Thomas, R. (2020). "Economic Stress and Its Impact on Mental Health." Journal of Social Psychology, 10(3), 112-118.

३. Connell, R. W. (2005). "Masculinities."

४. India Development Report (IDR). "Understanding Gender Roles in India."

५. World Health Organization. "Mental Health and Well-being."

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)** **CC-02**

# ६. घरगुती हिंसेपासून महिलांचे संरक्षण आणि कायदे

**प्रा. ॲड. प्रियांका विलास झोळे-पाटील**
सहाय्यक प्रध्यापिका, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, उरूण, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली.

**प्रस्तावना**

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात कुटुंबाचे स्थान खूप मोठे आहे कारण व्यक्तीसाठी सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणून कुटुंबाकडे पाहिले जाते. परंतु सर्वांसाठीच कुटुंब सुरक्षित असते का? तर दुर्दैवाने याचे उत्तर नाही असे येते. कारण काही वेळा कुटुंबातील प्रौढ व्यक्ती आपल्या नात्यांचा, वयाचा,सत्तेचा, दुरुपयोग करून घरातील इतरांना आपल्या धाकात अथवा मुठीत ठेवण्याचा प्रयत्न करतो. अशा धाक अथवा दबावाला हिंसाचाराला लहान मुले, स्त्रिया, वृद्ध बळी पडतात परंतु आपल्या भारत देशामध्ये प्रामुख्याने स्त्रियाच बळी पडतात लग्नानंतर पती व सासरच्या व्यक्तींकडून होणारा छळ तसेच 'नवरा' आहे म्हटल्यावर मारणारच इतक्या सहजपणे ही बाब घेतली जाते तर मुलींना आई-वडिलांच्या घरी सुद्धा भेदभाव पूर्ण वागणूक दिली जाते. जसं की अन्याय सहन करणे हा स्त्रियांचा अधिकारच मानला जातो परंतु आता समाज जागा होत आहे स्त्रियांना मानसन्मान देऊन त्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे हे सिद्ध होत आहे.स्त्री ही चूल आणि मुल या पलीकडे जाऊन स्वतःचे अस्तित्व निर्माण करत आहे,त्याचबरोबर कुटुंबिक हिंसाचारा पासून संरक्षण कायदा करण्यात आला आहे.आपल्या समाजातून घरगुती हिंसा नष्ट करण्याचा प्रयत्न त्याचबरोबर त्यावरील उपाय योजना केल्या जात आहेत.

**शोधनिबंध सार**

कौटुंबिक हिंसाचार ही समाजाला लागलेली कीड आहे. स्त्रियांवर अत्याचार करणे त्यांना माणूस म्हणून जगू न देणे हे आपल्या समाजाला लागलेली वाळवी आहे. स्त्रियांवर अन्याय केला म्हणजे पुरुषत्व का?याचा खुलासा या लेखात केला जाणार आहे. स्त्रीला सुद्धा स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आपल्या भारतीय संविधानाने दिला आहे. स्त्रीच् ज्या कुटुंबासोबत वा नवऱ्यासोबत एका छता खाली राहत असेल आणि तिचा त्या घरात पुरुषाकडून अथवा स्त्रियांकडून छळ होत असेल तर तो गंभीर गुन्हा आहे असे आपल्या कायद्यात म्हटले आहे.

आज कौटुंबिक हिंसाचार ही एक महत्त्वाची सामाजिक समस्या बनली आहे.स्त्रियांवरील कौटुंबिक हि साचाराच्या घटनांकडे दुर्लक्ष केले जात आहे. कारण भारतात सर्वत्रच घरगुती हिंसाचारिक सर्वसाधारण बाब समजली जाते परंतु सध्याच्या काळात हिंसाचार अ मानवीय मानला जातो लोकशाहीत हिंसाचाराला स्थान नाही त्यामुळे हिंसाचाराला प्रतिबंध करण्याचे काम सर्व समाजातून होताना दिसते म्हणूनच या शोधनिबंधामध्ये कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ,कौटुंब हिंसाचाराची कृती,त्यास जबाबदार असणारी कारणे, कौटुंबिक हिंसाचारावरील कायदे तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना याची विस्तृत मांडणी केली आहे.

**अभ्यासाचा उद्देश**

१. कौटुंबिक हिंसाचार ही एक सामाजिक समस्या आहे याबाबत हिंसक प्रवृत्तीचा नाश करता येईल या संकल्पना जाणून घेणे.

२. कौटुंबिक हिंसाचार कायद्यातील तरतुदी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

३. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेणे.

४. महिलांचे व बालकांचे संविधानिक आणि कायदेशीर अधिकार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

५. हिंसाचाराला आळा घालण्यासाठी कोणत्या गोष्टींची पूर्तता करणे गरजेचे आहे याचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुतेचे संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी द्वितीय तराई संकलन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे त्यासाठी शासनाने प्रकाशित काही निर्णय,कायदे,वृत्तपत्रे,मासिके, पुस्तके तसेच न्यायव्यवस्थेचे निर्णय याचा आधार घेतलेला आहे.

**कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय?**

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे शारीरिक छळ, लैंगिक,मानसिक किंवा आर्थिक छळ करणे, हुंडा किंवा माहेरहून पैसे आण म्हणून अपमानित करणे,तिला शिवीगाळ करणे,विशेषतः आपत्य नसल्यामुळे तिला हिनवणे किंवा धमकी देणे, त्रास देणे किंवा तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे अथवा महिलेचे स्वतःचे उत्पन्न,स्त्रीधन,मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित ठेवणे,मारहाण करून घराबाहेर काढणे,विनाकारण संशय घेणे या बाबींना कौटुंबिक हिंसाचार म्हटले जाते.

**घरगुती हिंसेच्या चक्रात अडकण्याची कारणे**

१. नवऱ्याच्या चुकांवर पांघरून घालण्याची वृत्ती

२. सासर माहेर यांचा आधार नसणे

३. समाज काय म्हणेल? असे सामाजिक दडपण

४. अशिक्षित

५. आर्थिक दृष्ट्या परावलंबी

६. पुरुषप्रधान संस्कृती

७. सुरुवातीला प्रतिकार न करणे

८. अन्याय सहन करणे

९. आत्मविश्वासाची कमतरता / घाबरणे

**घरगुती हिंसाचाराबाबत कायद्याची भूमिका**

स्त्रियांच्या होणाऱ्या कौटुंबिक शाळा प्रतिबंध करण्यासाठी केंद्र सरकारने कौटुंबियांच्या हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमन 2005 व नियम 2006 संपूर्ण भारतात 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू केला. स्त्रियांवर पुरुषाकडून छळ होत असेल तसेच

सासरच्या कोणत्याही व्यक्तीकडून त्रास होत असेल तर ती स्त्री कौटुंबिक हिंसाचार कायद्यान्वये न्यायदंडाधिकारी संरक्षण मागू शकते यामध्ये पीडित महिला व तिच्या मुलांना निवासाच्या अधिकारासह तिच्या सुरक्षिततेचा आर्थिक संरक्षणाचा आदेश न्यायदंडाधिकारी देऊ शकतात. शाळा पासून संरक्षण मग ते शारीरिक लैंगिक आर्थिक तोंडी किंवा भावनिक अत्याचार असोत महिलांना त्याविरुद्ध न्याय मागता येतो.

भारतीय संविधानाच्या कलम 14 नुसार भेदभावानुसार मुक्ती कलम 15 अन्वये स्त्री पुरुष समानता आणि कलम 21 अन्वये जीवित व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा हक्क महिलांना दिला आहे.

**महिलांचे संरक्षणाबाबतचे कायदे आणि प्रतिबंधात्मक उपाय योजना**

**१. हुंडा प्रतिबंधक कायदा**

1961 च्या कायद्यान्वये हुंडा घेणे आणि हुंडा देणे गुन्हे आहेत. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्याची नियुक्ती, जिल्हा तसेच तालुकास्तरीय समित्यांची स्थापना या कायद्यांतर्गत करण्यात आली आहे. हुंड्याची मागणी केली असेल तर ती व्यक्ती भारतीय दंड संहिता 498(अ) अंतर्गत गुन्ह्यासाठी फौजदारी कारवाई करण्यास जबाबदार असेल.यासाठी पाच वर्षे कारावास आणि 15 हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

**२. कामाच्या ठिकाणी लैंगिक हिंसा आणि छळविरुद्ध कायदा –(The sexual harassment of women at workplace)**

या कायद्यांतर्गत महिलांना कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या लैंगिक हिंसाचार आणि छळापासून संरक्षण देण्यात आले आहे.या कायद्यान्वये कोणत्याही शासकीय किंवा न्यू शासकीय कार्यालयात 10 पेक्षा जास्त कर्मचारी आहेत आणि तिथे महिला काम करतात तर अशा ठिकाणी पॉश कमिटी तयार करणे गरजेचे आहे.या कमिटीद्वारे महिला संस्थेकडे तक्रार करू शकतात आणि तक्रारीचे निवारण करणे संस्थेची जबाबदारी आहे.

**३. वडिलांच्या मालमत्तेवर महिलांचा हक्क**

हिंदू उत्तराधिकार कायदा 1956 या कायद्यांमध्ये 2005 ला सुधारणा करून वडिलोपार्जित संपत्तीत मुलींना समान अधिकार देण्याची घोषणा न्यायालयाने केली. या कायद्यानुसार मुलांप्रमाणेच संपत्तीमध्ये ही समान हक्क मुलीला देण्यात आला आहे.

**४. महिलांना प्रसूती रजा**

या कायद्याअंतर्गत प्रत्येक काम करणाऱ्या महिलेसाठी सहा महिन्यांची प्रसूती रजा मंजूर करण्यात आली त्यामुळे प्रसूती दरम्यान तिच्या नोकरीचा हक्क आणि पूर्ण पगार याची अंमलबजावणी केली जाते. कायद्यानुसार ती रजा फक्त दोन बाळंतपणासाठी देण्याची तरतूद कायद्यात आहे. त्याचबरोबर गर्भपात झाल्यावर ही स्त्रीला भरपगारी रजा मिळण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे.

**५. गर्भपाताचा अधिकार**

कोणत्याही महिलेला तिच्या पोटात वाढत असणाऱ्या बाळाचा गर्भपात करण्याचा अधिकार आहे तसेच गर्भपात करण्यासाठी तिला पती किंवा सासरच्या लोकांच्या संमतीची गरज नाही त्याचबरोबर The medical termination of pregnancy act-1971 अंतर्गत असे दिले आहे की, गर्भधारणा 24 आठवड्यांच्या पेक्षा कमी असल्यास स्त्री. कधीही गर्भपात करू शकते

**६. अश्लीलता विरोधी कायदा**

भारतीय दंड संहिता 1860 च्या कलम 292 ते 294 अंतर्गत महिलांशी अश्लील वर्तन करणे,स्त्रीला लज्जा वाटेल असे वागणे, तिची छेड काढणे,तिच्यासमोर अश्लील शब्द उच्चारणे,त्याचप्रमाणे स्त्रियांचे मानहानीकारक प्रदर्शन घडविणाऱ्या जाहिराती, प्रकाशन, लेख लिहिणे, पेंटिंग करणे, चित्र काढणे अशा कोणत्याही प्रकारे स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंध करणारा कायदा 1987 रोजी अमलात आला.या कायद्याअंतर्गत अश्लील वर्तन करणाऱ्या व्यक्तीला वॉरंटशिवाय अटक करण्यात येते.

**७. कुटुंब न्यायालय अधिनियम 1984**

विवाह व कौटुंबिक गोष्टी यांच्याशी संबंधित विवादांमध्ये समेट घालून आणण्याच्या दृष्टीने आणि ते तात्काळ मिटवण्याच्या दृष्टीने कुटुंब न्यायालय स्थापन करण्यात आली. या कायद्यामध्ये घटस्फोट, विवाह रद्द ठरवणे,पोटगी,मुलांचे पालकत्व,ताबा,भेटीची परवानगी याची तरतूद करण्यात आली आहे.

**८. समान वेतन कायदा**

समान वेतन कायदा 1976 आणि भारतीय घटनेत कलम 39(ड)मध्ये समान काम समान वेतन ठेवावे असे नमूद करण्यात आले आहे. कायद्यासमोर समानता,कोणत्याही प्रकारच्या भेदभावापासून संरक्षण आणि सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत समान संधी या मूलभूत हक्कांची हमी देण्यात आली आहे.कामाच्या तसेच कामाशी निगडित बाबींमध्ये लिंगाधारीत भेदभावास प्रतिबंध केला गेला आहे. या कायद्यान्वये स्त्री व पुरुष दोघांना समान वेतन देण्याच्या तरतुदी आहेत त्याचबरोबर बदली, प्रशिक्षण आणि पदोन्नती इत्यादी बाबींमध्ये महिला कर्मचाऱ्यांची भेदभाव न करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

**महिला संरक्षणाबाबत समिती**

**१. विशाखा गाईडलाईन समिती**

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होऊ नये म्हणून" विशाखा गाईडलाईन समिती "ची अंमलबजावणी राज्यात सुरू करण्यात आली आहे.या समितीद्वारे कामाच्या ठिकाणी महिलांना स्वातंत्र्यांनी तसेच स्वाभिमानाने जगता यावी महिलांच्या हक्क जोपासले जावे यासाठी प्रयत्न केले जातात.

**२. महिला आयोग**

महिलांना कायदेशीर आणि संविधानिक सुरक्षा आणि अधिकार तसेच हक्क देण्यासाठी 31 जानेवारी, 1992 रोजी महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.प्रत्येक राज्यात महिला आयोग स्थापन करण्यात आला आहे. महिला कोणतीही तक्रार थेट महिला

आयोगाकडे करू शकते. या आयोगाला सिविल कोर्टाप्रमाणे चौकशी आणि तपासाचे अधिकार आहेत हा आयोग वेळोवेळी सरकारला महिला कल्याणच्या योजनाही सादर करतो.

**३. महिला सुरक्षा समिती**

या समितीद्वारे पीडित महिलांना कायदेविषयक सहायता मिळवून देण्याकरिता पोलिसांच्या मध्यस्थीने पूर्ण शहरे कार्य करण्यात येते. या समितीमध्ये महिला डॉक्टर,महिला वकील, महिला प्राध्यापक,सामाजिक कार्यकर्त्या इत्यादींचा समावेश करण्यात येतो.

**४. महिला पोलीस कक्ष**

महाराष्ट्र राज्यामध्ये महिलांविरुद्ध गुन्ह्यास प्रतिबंध करणे गुन्हे उघडकीस आणणे व गुन्ह्यांचा तपास करणे इत्यादी कामे संबंधित पोलीस ठाण्याकडून केली जातात. महिलांविरुद्ध प्रकरणे हाताळण्यासाठी सर्व पोलिसांमध्ये महिला पोलीस कक्षाची निर्मिती करण्यात आली असून या कक्षामध्ये महिला पोलीस अधिकारी आणि महिला पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

**५. हेल्पलाइन**

संकटात असणाऱ्या महिलांना मदत करण्यासाठी महाराष्ट्रात टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक 1091 सुरू करण्यात आली आहे

**सारांश**

स्त्री विरुद्धच्या हिंसाचाराचा मुख्य सूत्रधार हा पुरुष असतो. हिंसाचार किंवा अत्याचार हे मानवी अधिकाराचे व हक्कांचे उल्लंघन आहे.परंतु काळानुसार समाज व्यवस्था व एकूण सामाजिक मानसिकता बदलली आणि स्त्रियांना देण्यात येत असलेली दुय्यम वागणूक स्त्रियांवर व मुलींना होणारे घरगुती अत्याचार एकत्रितपणे आवाज उठवला जावू लागला. स्त्रियांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सामाजिक व शासकीय स्थळांवरून सुधारत्मक उपाययोजना व कठोर कायद्यांची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचबरोबर महिलांच्या सुरक्षा संबंधित समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. आता महिलांना अत्याचारा विरोधात न्याय मिळणे सहज सोपे झाले आहे.

**संदर्भ**

१. घरगुती हिंसाचार कायदा 2005
२. Harduf, asat(2018)-SSRN electronic जर्नल
३. लोकसत्ता
४. ऑनलाइन Pdf.mr.Vikaspedia.in
५. lokmat news.Com

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# ७. भारतीय स्त्रीचे एकोणविसाव्या शतकातील कालानुरूप बदलते स्थान

**सौ. पुष्पा सुभाष गायकवाड**
सहाय्यक शिक्षक, मनपा श्रीमती लक्ष्मीबाई कृष्णाजी जरग विद्यामंदिर जरगनगर, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

प्राचीन संस्कृती असलेल्या भारतीय समाजात कुटुंब हा परिवर्तनाचा मूलभूत घटक मानला जातो. कुटुंबात व पर्यायाने समाज जीवनात भारतीय स्त्रीची भूमिका नेहमीच दुय्यम राहिली असली, तरी ती अतिशय महत्त्वपूर्ण आहे. प्रचंड सामाजिक संघर्षातून स्त्रीला आजचे समाज जीवनातील स्थान प्राप्त झालेले आहे. भारतीय समाज हा पुरुषप्रधान समाज असल्याने भारतीय स्त्रीचे समाज जीवनातील स्थान नेहमीच दुय्यम राहिले आहे.भारतीय स्त्री 'चुल नि मूल' अलिखित नियमांच्या श्रृंखलात घट्ट जखडली गेली होती

जन्मापासून पित्याचा,लग्नानंतर पतीचा, वृद्धपकाळी आपल्या मुलाचा तिला आधार हा घ्यावाच लागत असे. भारतीय स्त्री या सर्व सामाजिक बंधनांच्या शृंखलातून वाटचाल करत असताना नव्या मुक्तीच्या शोधात राहिली होती. बालविवाह, हुंडा पद्धत, सती पद्धत, केशवपन अशा अनिष्ट रूढी-परंपरातून कोणत्याच धर्माची स्त्री सुटू शकली नव्हती. अंधश्रद्धा, अज्ञान यात जखडलेली स्त्री पती निधनानंतर प्रचंड हलाखीत आपले जीवन व्यतीत करत असे.

ब्रिटिश सत्तेच्या काळात कालानुरूप बदल समाजात होऊ लागले. पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रभाव भारतीय समाजावर जाणवू लागला. सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे या स्त्रियांनी समाज जीवनात संघर्षातून स्त्री प्रश्नांच्या बाबतीत प्रचंड उत्थान साधण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, महात्मा गांधी, राजा राम मोहन रॉय, महर्षी कर्वे, न्यायमूर्ती रानडे लोकहितवादी या समाजसुधारकांनी स्त्रियांचे स्थान उंचावण्यासाठी बहुमोल योगदान समाजाला दिले. झाशीची राणी लक्ष्मीबाई, सरोजिनी नायडू, कमला नेहरू , विजयालक्ष्मी पंडित, अरुणा असफली यांचे स्थान भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सुद्धा अद्वितीय आहे. यासाठी भारतीय स्त्रीचे एकोणविसाव्या शतकातील कालानुरूप बदलते सामाजिक स्थान पाहणे खूपच गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भारतीय स्त्रीच्या एकोणिसाव्या शतकापासून आतापर्यंतच्या कालानुरूप बदलत्या स्थानाचा अभ्यास करणे.

२. स्त्री जीवनाच्या परिवर्तनाची कालानुरूप कारणे शोधणे.

३. भारतीय स्त्री जीवनाचा काळाच्या ओघातील परिवर्तनशील बदलाचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

४. स्त्री जीवनात परिवर्तन घडविणाऱ्या भारतीय समाज सुधारकांची माहिती घेणे.

**संशोधनाची गृहीतके**

१. भारतीय स्त्रीचे 19 व्या शतकापासून सद्यस्थितीपर्यंतचे कालानुरूप बदलाचा अभ्यास प्रेरक आहे.

२. स्त्री जीवनाच्या परिवर्तनाची कालानुरूप कारणे महत्त्वपूर्ण आहेत.

३. भारतीय स्त्री जीवनाचा काळाच्या ओघातील परिवर्तनशील बदल ऐतिहासिक दृष्ट्या पाहणे गरजेचे आहे.

४. भारतीय स्त्री जीवनात परिवर्तन घडवणाऱ्या भारतीय समाज सुधारकांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**संशोधन पद्धती :** सदर संशोधनासाठी संदर्भान्वयी, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

भारतीय समाजात ब्रिटिशपूर्वकाळात शिक्षणाचा अभाव होता. स्त्रिया शिक्षणापासून कोसो दूर होत्या. अज्ञान, अंधकार, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, कर्मकांड यांचे स्तोम समाजात माजले होते. मात्र भारतात ब्रिटिश सत्तेच्या काळात ज्या सुधारणा झाल्या त्यामुळे भारतीय समाज जीवनात वैचारिक परिवर्तने निर्माण झाली. पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव, वैचारिक प्रगल्भता व शोषण,अन्याय याविरुद्ध उभे राहिलेले लढे यामुळे भारतीय समाजाबरोबर भारतीय स्त्री जीवनात सुद्धा वैचारिक व सामाजिक बदल घडून आले. भारतीय समाजात झालेला शिक्षणाचा शिरकाव, पाश्चिमात्य विचारशैली व जीवनशैली यांचा वाढता प्रभाव व विविध भारतीय समाज सुधारकांनी स्त्री समाज सुधारणेचे कार्य यामुळे भारतीय स्त्री आज प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर झालेली दिसते. स्त्री पुरुष समानता, स्त्री जीवन विषयक प्रगल्भ विचार उत्तरोत्तर वाढीस लागले. महर्षी कर्वे, ज्योतिबा फुले, राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी यांची भारतीय स्त्रियांबाबतची वैचारिक परिवर्तनवादी भूमिका भारतीय स्त्री जीवनाच्या उत्थानासाठी कारणीभूत झाली.

**१. ब्रिटिश सत्ता काळात पाश्चिमात्यांचा वैचारिक प्रभाव**

भारतीय समाजात ब्रिटिशपूर्व काळात प्रचंड अज्ञान,अंधकार,शिक्षणाचा अभाव होता परंतु ब्रिटिश काळात भारतीय समाजात वैचारिक प्रगतीचे वारे वाहू लागले. ब्रिटिशांचा भारतीयांवर असणारा अंमल, भारतातील व्यापार, प्रशासनात कनिष्ठ का असेना,पण भारतीयांना दिलेले स्थान, यामुळे समाजात ब्रिटिशांच्या पाश्चिमात्य संस्कृतीचा, विचारांचा प्रभाव जाणवू लागला. भारतीय स्त्रियांच्या जीवनावर देखील याचा परिवर्तनशील प्रभाव दिसून आला. बालविवाह, बहुपत्नीकत्व, केशवपन,हुंडा पद्धती, सती प्रथा, विधवांचे प्रश्न, स्त्रियांचे दास्यत्व हे दूर करण्यासाठी विविध समाजसुधारकांच्या माध्यमातून प्रबोधन व जनजागृती होऊ लागली. एक पुरोगामी विचार समाजाला व स्त्री जीवनाला प्राप्त झाला.

**२. साहित्य विश्वातून वैचारिक प्रबोधनाला चालना**

विविध वृत्तपत्रे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मांडली जातात. पाश्चिमात्य विचारधारेचा प्रभाव,समाज सुधारकांची पुरोगामी विचार या सर्वांमुळे साहित्य क्षेत्रात देखील स्त्री जीवन सुधारण्यावर भर दिला गेला. नवीन पुरोगामी विचारधारा साहित्यात देखील दिसू लागली. भारतीय समाजात अशिक्षतपणा व अज्ञान अंधश्रद्धा यामुळे असणारे दोष व पाश्चिमात्य समाजातील सुधारणा यांचे तत्त्वज्ञान असणारे समाज जीवन वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके यातून समाजाला जाणवू लागले. त्यामुळे जुन्या पारंपारिक समजुतींचा त्याग करून आधुनिक विचार स्वीकारले जाऊ लागले. सामाजिक, धार्मिक, वैचारिक, साहित्यिक पर्व आकार घेऊन परिवर्तन दिसू लागले.

**३. पाश्चिमात्य शिक्षणाचे दृश्य परिणाम**

लॉर्ड मेकॅलच्या शिक्षणाच्या झिरपत्या सिद्धांतानुसार का असेना पण भारतात 19 व्या शतकात पाश्चिमात्य शिक्षणाची सुरुवात झाली. एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी भारतात स्त्री शिक्षणाचा पाया घातला. नवीन शैक्षणिक विचारधारा वाढीस लागली. भारतीय स्त्रियांचे जीवनमान अंधकारातून नव्या प्रकाशाकडे नेण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. त्यामुळे अज्ञान, अंधश्रद्धा, पारंपरिक चुकीच्या विचारधारा मागे पडून स्त्रियांचे जीवनमान उंचावण्यास मोठा हातभार लागला. शिक्षणचं अंधकारातून प्रकाशाकडे नेत असते. त्यामुळे प्रबोधन व पुरोगामी विचारांमुळे स्त्री जीवनाच्या परिवर्तनाला योग्य दिशा मिळाली.

**४. तत्कालीन समाज सुधारकांचा समाज जीवनावरील वैचारिक प्रभाव व दिसलेले दृश्य परिणाम**

अनादी अनंत काळापासून अज्ञान अंधकार व विविध अन्याय रूढी परंपरांमध्ये पिचलेली भारतीय स्त्री ब्रिटिशांच्या सत्तेनंतर खऱ्या अर्थाने थोडा मोकळा श्वास अनुभवू लागली. पाश्चिमात्य वैचारिक प्रभाव व भारतीय समाजात झालेला शिक्षणाचा शिरकाव यामुळे सुधारणावादी आवाज समाजात उमटू लागला.स्वातंत्र्य, समता, बंधुता यांची मुळे रुजू लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले,राजाराम मोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी इत्यादी समाजधुरीनांच्या प्रबोधनाच्या कार्यामुळे भारतीय समाजात स्त्री जीवनात उत्थान घडू लागले. राजाराम मोहन रॉय यांनी सतीबंदी केली. बहुपत्नीकत्वावर हल्ला चढवला. इकडे महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी पुणे येथील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात 1848 रोजी मुलींची पहिली शाळा सुरू केली. ही परिवर्तनाची नवीन नांदी ठरली. राजाराम मोहन रॉय यांचे सती प्रथेविरुद्धचे प्रबोधनात्मक काम तसेच ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी 1856 रोजी विधवा पुनर्विवाहाचा संमत केलेला कायदा यामुळे स्त्री जीवनात वैचारिक बदल होऊ लागले तसेच समाज जीवनावर चांगला परिणाम दिसू लागला. राजाराम मोहन रॉय यांनी सती प्रथे विरुद्ध उठवलेला आवाज,त्याचबरोबर धार्मिक व सामाजिक सुधारणांच्या बाबतीत बाळशास्त्री जांभेकर यांची वृत्ती नेहमीच पुरोगामी विचारांची राहिलेली होती . विधवा पुनर्विवाह,स्त्री शिक्षण यांचा प्रसार त्यांनी केला.स्त्री शिक्षणाचे, विधवा पुनर्विवाहाचे ते पहिले पुरस्कर्ते होते. लोकहितवादी यांनी स्त्री पुरुष समानतेवर भर देत बालविवाहांना विरोध केला. 'पुनर्विवाहाला धर्मग्रंथात आधार शोधण्यापेक्षा जे योग्य आहे समाज हिताचे आहे ते ठामपणे करावे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. जोपर्यंत स्त्रिया शहाण्या होत नाही तोपर्यंत आम्ही मूर्ख राहू,असे प्रांजळपणे सांगत त्यांनी स्त्री जीवनाच्या परिवर्तनाची कास धरली. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी 1848 ला पुण्यात मुलींची शाळा काढून देशात अस्पृश्य मुलींसह सर्व स्त्री शिक्षणाचा पाया रचला.

**समारोप**

वरील विवेचनावरून भारतीय स्त्री जीवनातील परिवर्तने यांचा आढावा घेता येतो. पुरोगामीत विचारांचा स्वीकार व पाश्चिमात्य शिक्षणामुळे समाजात आलेले परिवर्तन व विविध सामाजिक विचारवंतांनी स्त्रियांना पारंपारिक गुलामीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी केलेले प्रयत्न यामुळे स्त्रियांचे सामाजिक व कौटुंबिक जीवनमान उंचावण्याचे स्थित्यंतर घडून आले. आजही अनेक समस्या तिच्यापुढे असल्या तरी समाजात स्त्रियांचे स्थान हे समानतेच्या वळणावर येऊ पाहत आहे. तिचे अधिकार, हक्क देण्यासाठी सर्व समाजच

प्रयत्नशील झाला आहे.त्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर जागृती निर्माण झाली असल्याने आज स्त्री प्रगतीमध्ये सर्वच क्षेत्रात आघाडीवर असून अनेक पुरुषप्रधान क्षेत्रात तिने शिरकाव केला आहे.

**संदर्भ**


- डॉ.लीला पाटील : भारतीय स्त्री जीवन, मेहता पब्लिकेशन पुणे 1990
- कमल भागवत: स्त्री शिक्षणाची वाटचाल, प्रतिभा प्रकाशन पुणे 2004
- भारतातील महिला विकासाची वाटचाल :ज. शं.आपटे,पुष्पा रोडे, डायमंड पब्लिकेशन

# ८. स्वप्नवासवदत्तम् या नाटकामधील स्त्रियांची भूमिका

**प्रा. रचना सौरभ शहा**
कन्या महाविद्यालय, मिरज, सांगली.

संस्कृत साहित्य हे जगातील एक वैभवशाली साहित्य मानले जाते. संस्कृत साहित्यामध्ये नाट्य साहित्य हा एक प्रसिद्ध साहित्यप्रकार आहे. महाकवी भास हे एक सुप्रसिद्ध नाटककार संस्कृत साहित्यामध्ये होऊन .गेले संस्कृत नाट्य साहित्यामध्ये महाकवी भास यांची 13 नाटके येतात.महाकवी भासाचा काळ इसवी सन पूर्व 300 ते 200 असा मानला जातो. त्यांची ही 13 नाटके चार विभागांमध्ये विभागली आहेत. भासांच्या 13 ही नाटकांमध्ये त्यांनी स्त्रीवादाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. तेरा नाटकांपैकी उदयन कथामूलक दोन नाटके आहेत: प्रतिज्ञायोगंधरायण आणि स्वप्नवासवदत्तम्. शोधनिबंधाचा विषय आहे की स्वप्नवासवदत्तम् या नाटकामधील स्त्रियांची भूमिका. शोधनिबंध हा केवळ स्वप्नवासवदत्तम् या नाटकापुरताच मर्यादित आहे.

**सांकेतिक शब्द:** नायिका, प्रोषितभरतृका,

**ध्येय आणि उद्दिष्टे**

महाकवी भास यांच्या नाटकाचा अभ्यास करणे.

**स्वप्नवासवदत्त नाटकामध्ये स्त्रियांच्या भूमिकेबाबत विशेष अभ्यास करणे.**

**स्वप्नवासवदत्त या नाटकात स्त्रियांची भूमिका अभ्यासणे.**

**नाटकाचा परिचय:** स्वप्नवासवदत्तम् हे नाटक उदयन कथा मूलक आहे. या नाटकात एकूण सहा अंक येतात. या नाटकाचा नायक उदयनराजा, मंत्री यौ गांधरायण, प्रधान नायिका राणी वासवदत्ता आणि द्वितीय नायिका पद्मावती आहे. हे नाटक शृंगार रस प्रधान आहे. उदयनाद्वारे स्वप्नात पाहिलेल्या वासदत्तेच्या आधारावर या नाटकाचे नाव स्वप्नवासवदत्तम् असे पडलेले आहे. या नाटकात भासाने स्त्रीवादाचा पुरस्कार केलेला आपल्याला दिसून येतो.

**वासवदत्ता आणि पद्मावती ही दोन प्रमुख स्त्रीपात्रे या नाटकाचा आत्मा आहेत .**

**वासवदत्ता :** ही उदयनराजाची पहिली पत्नी होती. अवंती राजा प्रज्योत महासेन राजाची ती पुत्री होती .तीच या नाटकात अवंतिका या नावाने आपल्या पुढे येते .नाटकात नायिका या तीन प्रकारच्या असतात. नायिकांची प्रधानता संस्कृत नाटकांमध्ये आपणास दिसून येते 1.स्वकीय नायिका :तीन प्रका मुग्धा मध्या आणि प्रगल्भा किंवा प्रौढा.

**2. परकीय नायिका 3. साधारण नायिका(1)**

काही ठिकाणी अष्ट नाईकांचे देखील प्रकार सांगितले आहेत ते पुढील प्रमाणे :स्वाधीनपतीका,वासकसज्जा, विरोहित्कंठिता, खंडिता, कलहांतरीता ,विप्रलभता , प्रोषितपतिका आणि अभिसारिका. वासवदत्ता ही प्रस्तुत नाटकात नाट्यशास्त्रीय दृष्ट्या स्विया मध्या

नायिका आहे . स्विया नायिकेचे लक्षण महाकवी विश्वनाथ यांनी साहित्य दर्पण या त्यांच्या ग्रंथांमध्ये पुढील प्रमाणे केले आहे "विनयार्जवादीयुक्तगृहकर्मपरा पतिव्रता स्वीया"(2)(सा. द.३/४७)

मध्यानियिकेचे लक्षण "मध्या विचित्रसुरता प्ररुढस्मरयौवना ईषत्प्रगल्भावचना मध्यमव्रीडिता मता"(3)(सा.द.३/४६) नाटकाच्या सुरुवातीपासूनच वासवदत्तेच्या चारित्र्यामध्ये आदर्शता आपणास दिसून येते.

**स्वाभिमानी महिला:** तिच्यामध्ये स्वाभिमान पतिव्रता धर्म अलौकिक त्यागभावना विद्यमान आहे त्यामुळेच नाटकाच्या पहिल्या अंकात सुरुवातीलाच सैनिकांकडून उच्चारणा होते " उत्सरत उत्सरतआर्या :। (4)म्हणजे बाजूला व्हा दूर व्हा. असेच जेव्हा वासवदत्ता ऐकते त्याचवेळी तिला दूर केल्या जाण्याच्या गोष्टीवरून तिच्या स्वाभिमानाला ठेच लागते आणि त्याचवेळी ती यौगंधराण अमात्यांना म्हणते "तथा परिश्रम:परिखेदम् नोत्पादयति यथाअयम् परिभव: "(5)

म्हणजे पायी चालल्यामुळे झालेला श्रम जसा खेद उत्पन्न करणार नाही त्यापेक्षाही मला हा दूर लोटण्याचा अपमान माझ्या मनामध्ये खेद उत्पन्न करतो. हे तिच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे .

**गुणग्राहहिणी :**ती गुणग्राहणी देखील आहे .म्हणूनच ती पद्मावतीला पाहताच नाटकाच्या प्रथम अंकात म्हणते "अभिजनानुरूपम् खल्वस्यरुपम्!"(6)

**पतीपरायणता:** उदयनावर वासदत्तेचे नितांत प्रेम होते. प्रेमात तिची आसक्ती होती. परंतु प्रेम त्याग बलिदान कर्तव्य पालन आपल्या पतीसाठी तसेच देशासाठी ची प्रतिष्ठा समृद्धीसाठी ती योगंधरायण अमात्यांच्या योजनेचा स्वीकार करते आणि त्या योजने वर विश्वास देखील ठेवते.म्हणूनच ती म्हणते " भवतु अविचार्य कर्म न करिष्यति "(7) त्यांची योजना सफर होईपर्यंत ती अनेक प्रकारचे कष्ट सहन करते परंतु त्यात सुद्धा एक अनुपम आनंदाचा अनुभव करते कारण त्याच्यामध्ये केवळ आपल्या पतीचेच हित आहे असे तिचे मत असते .पतीच्या सुखासाठी सर्व काही आहे. पतीच्या हितासाठी ती राजकुमारी आणि पट्टराणी असून सुद्धा एका दासीच्या स्वरूपामध्ये ती पद्मावतीच्या जवळ राहते.एकांतामध्ये आपल्या पतीला भेटून आणि त्याच्या स्पर्शाने देखील तिच्या भावनांना ती अजिबात बाहेर आणून देत नाही . केवळ पतीच्या हितासाठीच तेथून लगेच दूर जाते .अशा प्रकारचा त्याग सामान्यतः इतर स्त्रियांमध्ये आपल्याला बघायला मिळत नाही .हेच कारण आहे की उदयनराजा तिला जन्म जन्मांतरापर्यंत विसरू शकत नाही . उदयनराजे तिच्याबद्दल सहाव्या अंकात म्हणतो की " महासेवस्य दुहिता शिष्या देवी च मे प्रिया कथम् सा नु मया शक्या स्मर्तुम् देहांतरेष्वपि॥(8)

वासवदत्तेमध्ये पतीपरायणता उच्च कोटीची भरलेली दिसून येते .जेव्हा सुरुवातीला प्रथम अंकात ब्रह्मचारी तपोवनमध्ये येतो तेव्हा ती परपुरुष दर्शनाचा निषेध करते. ती पतीव्रता धर्म योग्य प्रकारे जाणते आणि ती त्या धर्माचे पूर्णपणे पालन करते. "अमो परापुरूषदर्षनं परिहरतु आर्या, भवतु सुपरिपलानिया खलु मंन्नयास: (9)इत्यादी वाक्ये पद्मावतीच्या मुखामध्ये येतात आणि ही वासोदत्तेच्या पतिव्रता धर्माची व्याख्या करतात .वासवदत्ता आपल्या पतीच्या उन्नतीसाठी पद्मावतीचा सवत म्हणून स्वीकार करते आणि आपल्या पतीच्या विरहामध्ये आपल्या डोळ्यातून अश्रू गाळते" राजदारीकेतति श्रुत्वा भगिनी कास्नेहोऽपि मेऽत्र संपद्यते"!. (10)

"नहि रूपमेव वागपि खलवस्या:!(11) का गती ही एषा गच्छामि मंदभागा!(12) आपल्या पतीच्या विरहामध्ये डोळ्यातून अश्रू गाळत असली तरी देखील आपल्या कर्तव्य मार्गावरून ती कधीच विचलित होत नाही. ती म्हणते "आर्यपुत्रम् पश्यामि इति अनेन मनोरथेन जीवामि मंदभागा"!(13)

"अलिकमलिलकम् खल्वेतत्! जीवमि मंदभागा :!"(14) वासोदत्ता उदयनाप्रती सुरुवातीपासूनच खूप आसक्त होती. या गोष्टीचा उल्लेख उदयनराजे स्वतःहून पाचव्या अंकांमध्ये करतो . उदयन राजा जेव्हा वासवदत्तेला वीणा वाजवण्यासंबंधी शिक्षा प्रदान करत होता. त्याचवेळी उदयनाच्या मनोहर चेहऱ्याकडे वासवदत्ता एकटक बघत होती .त्याचवेळी उदयनाच्या प्रती प्रेम भावना तिच्या मनामध्ये उफाळून येत होत्या ती त्याच्याकडे बघण्यात इतकी तल्लीन होत होती की तिला असे लक्षात सुद्धा येत नाही की केव्हा तिची बोटे वीणा वाजव ण्यापासून दूर होतात .उदयनाद्वारे पुन्हा लक्षात आणून दिल्यावर देखील ती आपल्या बोटांना हवेमध्ये चालवत असे. ही आसक्तीची पराकाष्टाच म्हटली पाहिजे.

**कुलीनता:** वासवदत्तेमध्ये सौंदर्यासोबत कुलीनतादेखील आहे प्रथम अंकात तापसी तिला पाहताच म्हणते,"यदीदृशी अस्या आकृतिरियमपि राजदरिकेति तर्कयामि!"(15) महाराजा दर्शकाची महाराणी देखील तिच्याविषयी शेतीला म्हणते "महाकूलप्रसूता स्निग्धा निपुणेति इमां तावत् कौतुकमालिकां गुंफतु आर्या!"(16)

**कर्तव्यपरायणता:** वासवदत्ता आपले चारित्र्य कुलीनता तसेच आपली कर्तव्यपरायणता लक्षात घेऊन आपल्या पतीच्या विरोगात प्रोषितपतीकेच्या आचाराचे योग्य पालन करते .हेच तिच्या कर्तव्य पालनाचे प्रमाण आहे प्रोषितपतिका म्हणजे जी महिला जिचा पती कोणत्यातरी कामामुळे तिच्यापासून दूर गेला आहे आणि ठरलेल्या वेळी तो परत येत नाही (अष्टनायिकापैकी एक नायिका).

**अत्यंत चतुर समयालोचता:** वासवदत्ता अत्यंत चतुर आणि तात्कालिक सामायिक बुद्धीने युक्त आहे संवादाच्या प्रवाहात प्रवाहित झालेल्या तिच्याकडून अनेक ठिकाणी आपल्या पतीच्या म्हणजेच उदयनाविषयी पक्षपात करणारी अशी ती काही वेळा प्रोषितपतिकेच्या धर्माचे उल्लंघन करते परंतु अत्यंत चतुराईने ती सांभाळून घेते .

**नारी सुलभ ईर्ष्या:** वासवदत्ता गुणग्राहणी व विवेकशील आहे परंतु एक स्त्री आहे म्हणून नारी सुलभ ईर्षा भाव तिच्यामध्ये विद्यमान आहे जरी नाटकामध्ये ती आपली सवत म्हणून पद्मावतीला केवळ आपल्या पतीच्या हितासाठी देशाच्या उन्नतीसाठी स्वीकारल्याचे दिसते.तरीदेखील तिच्या मनामध्ये काही वेळा इरशेचा भाव उत्पन्न झालेला आपल्याला दिसून येतो. तिला मनामध्ये असे येते की आता आपला पती दुसऱ्या स्त्रीचा पती झाला आहे,"आर्यपुत्र परकीय संवृत्त:"(17) असे म्हणून ती खूप व्यथित होते .तसेच ज्यावेळी पद्मावती ची विवाहमाला गुंफण्याची वेळ तिच्यावर येते तेव्हा ती संपत्नीमर्दान नावाची विवाहमाला अजिबात गुंफत नाही .विवाहाच्या समयी आपला चेहरा प्रमदवनाच्या कुंजमध्येच लपवून ठेवते तरी देखील प्रत्येक क्षण ती जागरूक असते की कुठे यौगंधरायणांची योजना निष्फळ होणार नाही.

**कोमल हृदया:** जरी नारी असली तरी इर्षाभावाने युक्त असली तरी देखील ती मनाने अत्यंत कोमल हृदयाची आहे. ती पद्मावतीच्या प्रती नेहमी प्रेमाने व्यवहार करते. जेव्हा तिला पद्मावती अस्वस्थ झाली आहे असा समाचार मिळतो ,तेव्हा ती पटकन

समुद्रगृहाकडे जिथे पद्मावतीची खोली आहे तिथे पोहोचते ,कारण तिचा पती जो वासवदत्तेच्या योगाच्या कारणाने खूप दुःखी आहे आणि आता जर पद्मावतीला पण बरे नसेल तर त्याच्याशी एक मन मोकळे करण्याच्या साधनाच्या अभावामुळे उदयनराजे अधिकच दुःखी होईल.

अशाप्रकारे प्रस्तुत नाटकात वासवदत्तेला कवीने एक उत्कृष्ट पत्नीच्या रूपामध्ये चित्रित केले आहे .तिच्यामध्ये उदारता ,स्वच्छरित्रता, सरलहृदयता ,शील ,धैर्य संयम ,बुद्धिमत्ता पतीपरायणता आणि देश प्रेमासाठी काहीही करण्याची तयारी इत्यादी सहज आणि स्वाभाविक गुणांनी संयुक्त असलेले तिचे चरित्र एक आदर्श आहे. ती एक भारतीय नारी च्या आदर्शतेला प्रस्तुत करते. यानंतर पद्मावती या दुसऱ्या प्रमुख स्त्रीपात्र विषयी काही गुणवैशिष्ट्ये पाहू.

**पद्मावती:** पद्मावती ही प्रस्तुत नाटकात मुग्धा नायिकाआहे. साहित्य दर्पण या या काव्यशास्त्रीय ग्रंथात मुग्धा नायिकेचे लक्षण सांगितले आहे ते पुढील प्रमाणे "प्रयमावतीर्णयौवनमदनविकारा रतौ वामा कथिता मृदुश्च माने समधिकलज्जावतो मुग्धा!"(18) यामध्ये वर्णन केलेल्या लक्षणांनी युक्त पद्मावती हीमगधाचा राजा दर्शक याची बहीण आणि उदयनाची दुसरी पत्नी आहे पद्मावतीचे चरित्र चित्रण कवीने अतिशय सुंदर पद्धतीने केले आहे .

**धर्मप्रिया आणि दानशील:** नाटकाच्या पहिल्या अंकातच पद्मावती राणीचा परिचय आपल्याला होतो त्यानुसार ती उदारहृदया धर्मप्रिय आणि दानशूर आहे. जेव्हा ती तपोवन मध्ये आपल्या आईला भेटण्यासाठी येते तेव्हा तिच्यापुढे चालणारे अंगरक्षक मार्गात येणाऱ्या लोकांना म्हणजेच तपस्वी लोकांना दूर करतात हे बघून पद्मावती त्यांना त्रास न देण्याचा आदेश देते. कांचुकी यावेळी पद्मावती आणि त्याच्या कुळाची धर्मप्रियते विषयी उद्घोषणा करतात ," धर्मप्रिया नृपसूता न हि धर्मपिडाम् इच्छेत् तपस्वीषु कुलव्रतमेतदस्या:"॥(19)

**पद्मावतीची दानशीलता पुढील श्लोका मधून आपल्याला दिसून येते, "कस्यार्थ:** कलशेन को मृगयते वासो यथानिश्चितम् दीक्षांत पारितवान् किमिच्छति पुर्नेदयं गुरोर्यद्भवेत्। आत्मानुग्रह इच्छाति इह नृपजा धर्माभिराम प्रिया यदि अस्य अस्ति समीप्सितं वदतु तद् कस्य आद्य किम् दीयताम्"॥अर्थात पद्मावतीची उत्कृष्ट इच्छा असते की तपस्वी लोक निशंक होऊन आपली इच्छा ,आपल्या आवश्यकता तिच्यासमोर प्रस्तुत कराव्यात .त्यांच्या इच्छेनुसार त्यांनी वस्तु मागाव्यातआणि त्यांना त्या प्राप्त व्हाव्यात ही भावना पद्मावतीची धर्मप्रियता, दानशीलता आणि उदारतेला व्यक्त करते.

**शालीनता आणि कुलीनता:** राणी पद्मावती मध्ये शालिनीता ,कुलिनता, मोठ्यांच्या प्रति आदर भाव ,धर्मभिरूता ,वचनदृढता इत्यादी गुणवैशिष्ट्ये स्पष्टपणे दिसून येतात. ही अतिशय अद्वितीय अशी सुंदर आहे. तिला अनायास असे म्हणते .ती म्हणते ,"अभिजनानुरूपं खलू अस्या: रुपम्"!(20) सौंदर्यासोबत ती मधुरभाषिणी आहे.वासवदत्ता देखील तिच्या वाणीची प्रशंसा करताना म्हणते की हिच्या रूपा सोबत तिची वाणी सुद्धा मधुर आहे. उदयन देखील आणि मधुरतेची प्रशंसा करताना आपण आज दिसून येतो.

**अत्यंत रुपवती:** पद्मावती अत्यंत रूपवती आहे. तिच्या रूपाची प्रशंसा स्वतः वासवदत्ता पहिल्या अंकामध्ये करते आणि पाचव्या अंकांमध्ये उदयनराजे सुद्धा तिच्या रूपाची प्रशंसा करताना आपल्याला दिसून येतो .चौथ्या अंकात तो आपल्या मित्र-विदूषकाला

असा म्हणतो की "पद्मावती बहुमता मम यज्ञ रूपशील माधुर्यै:"। पाचव्या अंकात जेव्हा पद्मावती अस्वस्थ झाल्याचा समाचार उदयनराजाला येतो, तेव्हा तो खूप दुःखी होतो आणि म्हणतो"रुपश्रियां समुदितांगुणतश्च युक्तां"। दोन्ही बाजूंनी आपण पद्मावतीच्या सौंदर्याबद्दल कथन झालेले आपल्याला कळते. विदूषक देखील तिचे सद्गुण व्यक्त करतो तो म्हणतो "पद्मावती ही तरुणी, दर्शनीया ,अकोपना,अनअहंकारा, मधुरवाक् आणि सहृदयी आहे".

**पतीपरायणा:** वासवदत्तेसारखी पद्मावती देखील आपल्या पतीच्या प्रती समर्पण भाव ठेवते. आपल्या पतीसाठी तिच्या हृदयामध्ये अपार आणि शाश्वत प्रेम आहे. ती आपल्या पतीला कोणत्याही प्रकारचा दोष देत नाही किंवा त्याला कोणतेही बोल सुनावत नाही. ती स्वतः कष्ट घेते, तरीसुद्धा नेहमी ती आपल्या पतीला तो कसा सुखी राहील याच्यासाठी प्रयत्न करते. तिची चेटी जेव्हा एकदा ती उदयनाचे पद्मावतीच्या पेक्षा वासवदत्तेवर अधिक प्रेम आहे असे म्हणते,तेव्हा पद्मावती राणी तिला पटकन थांबवते आणि म्हणते "हला! मा मैवम् स दाक्षिण्य एव आर्यपुत्र: य इदानिम् अपि आर्याया वासवदत्ताया: गुणान् स्मरति"!(21)

**उदारमन:** पद्मावती अतिशय उदार मनाची आणि विशाल हृदयाची आहे .तपोवनमध्ये ती ज्या ज्या कोणाची जी कोणतीही इच्छा असेल ती इच्छा पूर्ण करण्याची उद्घोषणा करते .त्यानुसार ती वासवदत्तेला आपल्या जवळ गुप्त स्वरूपात ठेवून ती तिच्या प्रती जसा व्यवहार करते त्यामध्ये तिची उदारमन स्पष्टपणे व्यक्त होते. विवाहनंतर आपली सवत वासवदत्तेच्या प्रती आपल्या पती उदयनाच्या मनामध्ये प्रेम पाहून ती इतर स्त्रियांप्रमाणे दुःखी होत नाही आणि इर्षा देखील करत नाही .उलट ती सम्मानभाव तिच्याबद्दल ठेवते आणि ती जेव्हा केव्हा वासवदत्तेचे नाव घेते त्याच्या अगोदर आर्या या शब्दाचा ती उपयोग अवश्य करते. एका सवतीच्या प्रति अशा प्रकारचा व्यवहार तिच्या हृदयाची उदारता आणि महानतेचे द्योतक आहे.

**पूज्य आणि आग्रजांप्रती सन्मान:** पद्मावती आपल्यापेक्षा वयाने मोठ्या तसेच पूजनीय लोकांच्या प्रति मनामध्ये आदरभाव ठेवते. ती नेहमी पूज्य व्यक्तींचा सन्मान करते .तपोवानामध्ये ती तपस्वीजनांचा सन्मान करताना ती त्यांना स्वेच्छापूर्वक तपोवनात फिरण्यासाठी त्यांना ज्या ज्या वस्तू हव्या आहेत त्यांचे ग्रहण करण्याचे निर्देश कान्चुकीच्या माध्यमातून प्रदान करते. यौगंधरायणांच्या सोबतदेखील ती अत्यंत सन्मानपूर्वक वार्तालाप करते. विवाहानंतर वासवदत्तेच्या माता पितांना आपले माता पिता मानून त्यांचा सन्मान करते. चित्रफलकांमध्ये अवंतिकेच्या समान वासवदत्तेचे रूप पाहून ती वासवदत्ता जीवित असलेल्या विचाराने अतिशय गलबलून जाते. यानंतर वासवदत्ता ज्यावेळी प्रकट होते तेव्हा कोणत्याही प्रकारची इर्षा व्यक्त करत नाही .याउलट ती अत्यंत स्नेहाचा परिचय देत तिच्या पायी पडून क्षमायाचना करत तिला म्हणते" आर्ये। सखीजन समुदाचारेणातिक्रान्त: समुदाचार:। तच्छीर्षेण प्रसादयामि।

**उपसंहार:** अशाप्रकारे वासवदत्ता आणि पद्मावती यांचे चरित्र एक आदर्श चरित्र आहे.वर्तमानामध्ये आपण पाहिले तर अशा प्रकारच्या स्त्रिया अतिशय क्वचित क्वचितच पहवयास मिळतात. स्वप्नवासवदत्तम् या नाटकात महाकवि भास यांनी स्त्रियांची एक आदर्श भूमिका आपल्यासमोर मांडली आहे.

**संदर्भसूची**


१. पंडित विश्वनाथ, साहित्य दर्पण का संपूर्ण पाठ, संस्कृत विकीबुक्स.(तृतीय परिच्छेद)

२. आचार्य धनंजय ,दशरूपकम्,(द्वितीय परिच्छेद)

३. व्याख्याकार पांडेय जगदीश प्रसाद, संपादक मदन गोपाल बाजपेयी, महाकवीभासप्रणितम् स्वप्न वासवदत्तम्, भारतीय विद्या प्रकाशन वाराणसी/दिल्ली.(Page no.1 to 211)

४. Government of Madhya Pradesh

५. https://www.eshiksha.mp.gov.in › ...PDF स्वप्नवासवदत्तम् : पात्र-परिचय, कथासार एवं समीक्षा

# ९. स्त्री संरक्षण विषयक कायदे: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. सोनटक्के रमेश शंकरराव**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई.

**प्रस्तावना**

स्त्री आणि पुरुष हे निसर्गाने म्हणा किंवा जे आस्तिक आहेत त्यांनी ईश्वर निर्मित म्हणा दोघेही समान आहेत. दोघेही पृथ्वी तलावर माणूस म्हणून, मानव म्हणून जन्मास आलेले आहेत. नैसर्गिक पद्धतीने पहिले तर त्यांच्यात जैविक भेद आहेच. परंतु लिंगभाव सामाजिक पद्धतीने पाहीलेतर हा भेद मानव निर्मित किंवा समाज निर्मित आहे. समाजात अर्धी लोकसंख्या महिलांची आहे, परंतु पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांचा दर्जा सदैव दुय्यम मानण्यात आला, त्यामुळे जगातील बहुतांश देशात सर्वच क्षेत्रात पुरुषाचे वर्चस्व निर्माण झालेले दिसते. महिलांना जन्मापासून दुबळे, कमकुवत, परावलंबी, दुसऱ्याच्या आधाराने चालणारे मानले आहे. शेती, कारागिरी, इतर कामातही स्त्रीला सर्वसाधारणपणे दुय्यम भुमिका पार पाडवी लागते. पुरुषाने आपले वर्चस्व स्थापित करण्यासाठी संपूर्ण समाजव्यवस्था बदलणे भाग होते म्हणून स्त्रीला भोगवस्तू करण्याचा प्रयत्न पुरुषांनी केला आहे. स्त्रीचे कार्यक्षेत्र केवळ स्वयंपाक घर आहे. अशी स्त्रीची मानसिकता भारतीय समाज व्यवस्थेने केलेली आहे. त्यामुळेच स्त्रीला 'चूल आणि मूल' या भूमिकेत गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न पूर्वी पासूनच झालेला आहे.

भारतात सामाजिक विषमता ही जात, धर्म, लिंग, वंश या घटकावर आधारित आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांना नेहमीच दुय्यम स्थान मिळत आहे. स्त्री ही केवळ उपभोगाची, वापरण्याची वस्तु आहे अशी पारंपरिक, प्रतिगामी मानसिकता आहे. धार्मिक कायद्याचा आधार घेवून स्त्रियांवर अधिकाधिक बंधने लादली गेली. केशवपन, विधवा पुनर्विवाहास बंदी, सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह, स्त्री शिक्षणास बंदी या सारखे अनेक बंधने, चालीरीती लादून संपूर्ण आयुष्यच महिलांचे बदलून टाकले आहे. भारतात ब्रिटीशांचे आगमन होईपर्यंत या सर्व कुप्रथा चालु होत्या. ब्रिटिश काळात ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले, राजाराम मोहन रॉय सारख्या भारतीय समाजसुधारकांनी स्त्री स्वातंत्र्याची चळवळ आणि ब्रिटिशांचे महिला विषयक उदारमतवादी धोरण यामुळे ब्रिटिशांनी वाईट चालीरीती बंद करण्यासाठी कठोर कायदे केले.

जगातील बहुतांश सर्वच देशात अनेक वर्षापासून स्त्रियांचा दर्जा उंचावलेला नव्हता. स्त्रियांचा समाजातील दर्जा उंचावण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न झाले. आंदोलने, चळवळी सनदशीर मार्गानुसार, संविधानिक मार्गाने झाले. स्त्री प्रश्नांच्या संदर्भात जे प्रयत्न झाले, त्यात समाजसुधारकांचा अत्यंत महत्वाचा वाटा आहे. समाजातील लिंगभेद विरहीत व स्त्री-पुरुषांना समान दर्जा देण्यासाठी व सामाजिक विषमता दूर करुन स्त्रियांचे सक्षमीकरण करणे अत्यंत महत्वाचे होते. त्यासाठी अनेक कायद्यांची निर्मित करण्यात आली. महिला सक्षमीकरणासाठी कायद्यांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंध हा स्त्री संरक्षक विषयक कायदे : एक समाजशास्त्रीय अभ्यास घेतला आहे.

**संशोधनाची उद्यीष्टये**

१. स्त्री संरक्षण विषयक कायद्याचा अभ्यास करणे.

२. स्त्री संरक्षक विषयक कायदे यांची अंमलबजावणी होते का तपासणे.

३. ब्रिटीशकालीन कायदे आणि स्वतंत्र भारतातील कायदे अभ्यासणे.

**तथ्य संकलन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा व साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट ई. आहे.

**कायदे व घटनात्मक तरतुदी**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महिलांकरिता अनेक कायदे करण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने विवाह, घटस्फोट, संपत्तीतील वारसाहक्क व रोजगार यांच्याशी निगडीत आहेत.

**१. हिंदु विवाह कायदा १९५५**

हिंदु धर्मात समाविष्ट असणारे वीरशैव, लींगायत, ब्राम्होसमाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, बौध्द, जैन, शिव यांना हा कायदा लागु आहे. या कायदयानुसार एका पुरूषास अनेक स्त्रियांशी विवाह करण्यास प्रतिबंध केला आहे. तसेच तो वृध्द, रोगी, मानसिक दृष्टया विकृत, नपुसंक पुरुषाच्या विवाहास प्रतिबंध केला आहे.

**२. अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६**

महिला संबंधीत अनैतिक व्यापारांना प्रतिबंध घालण्यासाठी हा कायदा समंत करण्यात आला. स्त्रीयांना वेश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करणे, वेश्या गृह चालविणे या गुन्हासाठी संबंधित व्यक्तिस किमान १ वर्ष व कमाल ३ वर्ष कारावास व दोन हजार रूपये दंड अशी शिक्षेची तरतुद केली आहे. या कायद्यात १९८६ मध्ये दुरूस्ती करण्यात आली.

**३. मातृत्व लाभ कायदा १९६१ :**

स्त्रीच्या आयुष्यातली अतिशय महत्वाची व नैसर्गिक गोष्ट म्हणजे आई होणे हे आहे. तिला ताठ मानेन आपला निर्वाह भागवता यावा यासाठी मॅटर्निटी बेनिफिट अॅक्ट १९६१ करण्यात आला. कारण मुल जन्माला आल्यानंतर संगोपनाचा प्रश्नही तेवढाच महत्वाचा असतो. कायदेशीर विश्रांती घेण्यासाठी रजेची व्यवस्था केली आहे. बाळांतपणाच्या २६ आठवडयांच्या आत गर्भपात झाल्यास अथवा करावा लागल्यास या सवलतीचा लाभ घेता येतो. हा कायदा संपूर्ण भारतात प्रसुती काळात स्त्रीला संरक्षण देऊ शकणारा कायदा आहे. हा प्रत्येक फॅक्टरी, खाण, सरकारी कार्यालय, बिडी आणि सिगारेट इंडस्ट्री इत्यादीसाठी लागू होतो. या कायद्या आगोदर अनेक महिलांना मुल जन्माला आल्यानंतर नौकरी सोडावी लागत होती. आज प्रसुतीकाळात महिलांना संरक्षण मिळाले आहे.

**४. हुंडाबदी कायदा १९६१**

हुंडा देण्यास प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीस किंवा हुंडा घेणा-या तसेच देणा-या व्यक्तीस कायद्यानुसार किमान ५ वर्षाचा कारावास आणि १५ हजार रूपये दंड किवा हुंडयाची किमत यापैकी जी रक्कम जास्त असेल ती शिक्षा दिली जाते. तसेच नववधु किवा वराच्या नातवाईकाकडून, पालकाकडून, हुंडयाची मागणी करणा-या व्यक्तिला किमान ६ महिने व कमाल २ वषांपर्यंत कारावास व दहा हजार रूपये पर्यंत दंडाची शिक्षेची तरतुद केली. १९८४ मध्ये या कायद्यात सुधारणा करून हुंड्याची व्याख्या व्यापक करून यामध्ये रोख पैसा मौल्यवान वस्तु शेअर्स, खरेदीपत्र इ आर्थिक बाबींचा समावेश केला. विवाह प्रसंगी वधु वराला मिळालेल्या भेटवस्तुची यादी वधु वराच्या स्वाक्षरीने त्यांनी स्वतः जवळ ठेवली पाहीजे. त्याचा हुंडयात समावेश केला जाणार नाही.

हुंडाबंदी कायदा १९६१ हा कायदा स्त्रियांच्या संरक्षणासाठी अतिशय महत्वाचा आहे. या कायदयामध्ये १९८६ मध्ये दुरुस्ती करण्यात आली हुंड्यासाठी नवविवाहीत तरुणीचा होत असलेल्या छळामुळे अनेक तरुणींना आपले जीवन गमावून बसावे लागले आहे. सुखी संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या तरुणीची या छळामुळे आयुष्य अल्पावधीत उध्वस्त होतात इन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकामध्ये "स्त्रियांना विवाहप्रसंगी दिल्या जाणाऱ्या संपत्तीस हुंडा म्हटले आहे. परंतु हुंड्यासाठी समाजातील मुलींचा अमानुष छळ, जीवे मारणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे. हुंडा या कारणासाठी बळी गेलेल्या निष्पाप मुलींची संख्या फार मोठी आहे. त्यामुळे १९६१ ला हुंडा प्रतिबंधक कायदा करण्यात आला. या कायदयाने हुंडा देणे आणि घेणे या दोन्हीही गोष्टी कायदयाने गुन्हा ठरविण्यात आल्या होत्या. २ ऑक्टोबर १९८५ साली कायदा अमलात आला. हुंडयाच्या संज्ञेची व्याप्ती वाढली. हुंड्यासाठी नुसती मागणी केली तरी तो गुन्हा होऊ शकतो. लग्नाच्या संदर्भात दिलेली रक्कम म्हणजे हुंडा असा व्यापक अर्थ ठेवण्यात आला. यात कमीतकमी ६ महिने ते २ वर्ष शिक्षा आणि १०,००० रुपये दंड अशा शिक्षेची व्यवस्था केली. हुंडा बळी स्वतंत्र गुन्हाची नोंद करण्यात आली.

विवाहानंतर सात वर्षाच्या आत स्त्रीचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास तो दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आला. हा महिला सक्षमीकरणासाठी अतिशय महत्वपूर्ण कायदा आहे.

**५. महिलांचे असभ्य प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६**

महिलांचे चित्र, लेख, आकृत्या, जाहिराती किंवा प्रकाशने व इतर कोणत्याही प्रकारचे महिलांचे असभ्य प्रदर्शन रोखण्यासाठी हा कायदा समंत करण्यात आला आहे. या कायदयानुसार दोन्ही व्यक्तीस पहिल्या वेळेस गुन्हयास कमाल २ वर्ष कारावास व हजार रूपये दंडाची शिक्षा दिली जाते. तर दुस-या व त्यानंतरच्या काळात गुन्हा करणा-या व्यक्तीला किमान ६ महिने व कमाल ५ वर्ष कारावास व किमान १० हजार रूपये व कमाल १ लाख रूपये दंडाची तरतुद केली.

**६. सती प्रथा प्रतिबंध कायदा १९८७**

धर्माचा आधार घेवुन परंपरेने चालत आलेल्या सती प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी, सती प्रथेला प्रतिबंध म्हणून हा कायदा समंत करण्यात आला. सती जाण्याच्या प्रयत्न करणा-या व्यक्तीला एक वर्ष कारावास तर सती जाण्यास प्रोत्साहन देणा-या व्यक्तीस मृत्युदंड किंवा आजन्म कारावास या शिक्षेची तरतुद केली आहे.

**७. गर्भ धारणा पूर्व व जन्मपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीसाठी प्रतिबंध) कायदा १९९४**

१९९४ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केंद्र सरकारने लिंग निवड भेदभाव प्रकाराना आळा घालण्यासाठी हा कायदा समंत करण्यात आला जन्मपूर्वी लिंग निवड करून होणारे गर्भपात टाळण्याकरिता लिंग निवडीच्या तंत्रावर बंदी घालणे हा या कायद्याचा महत्वाचा उददेश आहे. जन्मपूर्व लिंग निवड चाचणी करणे किवा तशा प्रकारची चाचणी करण्यास मदत करणे हा गुन्हा ठरविला आहे तसेच लिंग निवडीच्या कोणत्याही स्वरूपाच्या जाहीरात करणा-या व्यक्तीस ३ वर्षापर्यंत कारावास व १०,००० रू. दंड अशा स्वरूपाच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली.

**८. कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५**

या कायद्यांची प्रत्यक्ष अमंलबजावणी ही २६ आक्टोबर २००६ पासून सुरू झाली. या कायद्यानुसार शारीरिक, मानसिक, लैंगिक, शाब्दिक, भावनिक तसेच आर्थिक छळ, अन्याय अत्याचाराचा समावेश करण्यात आला. विवाहित महीला बरोबर विधवा, बहीण,आई एकटी राहणारी कोणतीही स्त्री असो या कायदयाने तिला संरक्षण दिले जाते. कौटुंबिक छळ, अन्याय- अत्याचार करणा-या दोषी व्यक्तीस एक वर्षा पर्यंत कारावास किवा २०,००० रूपये दंड किवा दोन्ही प्रकारच्या शिक्षेची तरतुद आहे.

**९. कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा होणारा लैंगिक छळ (प्रतिबंध मनाई व तक्रार निवारण) कायदा २०१३**

महिलांना कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक छळापासून तक्रारीचे निवारण व्हावे, याकरिता हा कायदा समंत करण्यात आला आहे. या कायद्याचे विधेयक २ संप्टेंबर २०१२ रोजी लोकसभेने व २६ फेब्रुवारी २०१३ रोजी राज्यसभेने समंत केले. दि. २३ एप्रिल २०१३ रोजी या विधेयकावर राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केली. हा कायदा संघटीत व असंघटीत क्षेत्र तसेच खाजगी क्षेत्रातील, शेतीक्षेत्रात काम करणा-या महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आला आहे. महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी प्रत्येक कार्यालया अंतर्गत एक समिती स्थापन करण्याची तरतुद केली असुन तक्रारीची ९० दिवसात दखल घेतली पाहीजे. अन्यथा ५०,००० रू. दंडाची तरतुद केली आहे. तक्रारीच्या चौकशीचा अहवाल हा जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवावा अशी ही तरतुद आहे.

हे कायदे अतिशय महत्वाचे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने महिलांच्या सक्षमीकरणाचे आणि हक्कांचे रक्षण व्हावे यासाठी अनेक महत्वाचे कायदे संमत केले.

**१०. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५**

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ संमत केला. हा कायदा दिवाणी स्वरुपाचा आहे. या कायदयान्वये ज्या स्त्रियांवर अत्याचार होताय अशा सर्व स्त्रियांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. रक्तसंबंधीय किंवा विवाहबध्द झालेल्या नातेसंबंधातील कोणत्याही व्यक्तीपासून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण मिळविण्याची तरतूद या कायदयामध्ये केली आहे. हा कायदा घरातील लहान मुलींपासून वृध्द महिलांना संरक्षण देणारा ठरला. या कायदयामुळे कुटुंबातील कोणत्याही स्त्रिला घरात राहण्याचा अधिकार मिळाला. तसेच स्त्रिला घरातून बाहेर काढण्यास मनाई करणे. म्हणजे अन्यायपिडीत स्त्रीचे पर्यायी राहण्याची व्यवस्था करणे या स्त्रीला समानतेने, सन्मानाने, शांततेने, प्रतिष्ठेने, हिंसामुक्त जीवन जगण्याचा अधिकार मिळाला.

युनेस्कोच्या घटनेत लिंग, जात, धर्म, आर्थिक, सामाजिक परिस्थितीत असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान शिक्षण मिळायला हवे असे जागतिक पातळीवर महत्वपूर्ण प्रयत्न सुरु झाले. त्याचा परिणाम भारतीय राज्यघटनेने आपल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये

२००२ मध्ये ८६ वी घटना दुरूस्ती करुन ६ ते १४ वयोगटातील मुलांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. यामुळे स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळे स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या. महिला सक्षमीकरणासाठी महिला कायदे महत्वपूर्ण ठरले. महिला सक्षमीकरणासाठी महिला प्रशिक्षण व रोजगार सहाय्यता. स्वंयसिध्द, स्वधार, बालिका समृध्दी योजना १९९७, कुटुंब सल्ला केंद्र १९९४, राष्ट्रीय महिला आयोग १९९२, राज्य महिला आयोग १९९३, जिजामाता महिला आधार योजना १९९९, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, आहिल्या होळकर योजना यामुळे सर्वच महिलांचे सक्षमीकरण झाले. त्याची फलश्रुती म्हणजे आज प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे.

**११. प्रसुती विषयक कायदा (१९६१)**

महिला गर्भ प्रक्रियेतून जाते तेंव्हा या कायद्यान्वये शासनाने या सुविधा दिलेल्या आहेत. गर्भ अवस्थेत प्रसुतीपूर्व व प्रसुतीनंतर ६ आठवडे सुट्टी या कायद्यान्व्ये देण्यात आलेली आहे. त्याच बरोबर ३ महिने सुट्टी देणे अनिवार्य आहे. या कालावधीत तिचे वेतन कपात करता येणार नाही. महिला कामावर गैरहजर असली तरीही तिला कामावरून अथवा नौकारीवरून काढता येणार नाही. शासकीय नौकरी करणाऱ्या महिलांना १३५ दिवस सुट्टी व तिचे वेतन कुठल्याही परिस्थितीत कपात करता येणार नाही. गर्भवती स्त्रीकामगारांना २५०/- रुपये सहाय्यता चिकित्सा केली जाते. गर्भवती स्त्री चा गर्भपात झाल्यास ४५ दिवसाची सुट्टी देणे अनिवार्य आहे. शासकीय आणि अशासकीय काम करणाऱ्या महिलांच्या दीड वर्षाच्या मुलासाठी 'दूध आहार' तीन वेळा देण्याची परवानगी आहे शासकीय सेवेतील महिलांना १८० दिवस सुट्टी देण्यात यावी या कायद्याचे महत्त्व आणि महिलांमध्ये जाणीव जागृती असावी. जेणे करुन कोणत्याही महिलांवर अन्याय होणार नाही. याची दखल घ्यावी. आणि महिलांचा प्रतिसादही हवा. आरोग्य विषयक कागदपत्राचा पाठपुरावा करण्यासाठी दीर्घ कालावधी लागतो त्यामुळे महिलास वेठीस धरले जाते व विलंब ही केला जातो त्याची अंमलबजावणी निपक्षपध्दतीने व्हावी व आरोग्य विषयक समस्या सुटेल आणि त्यांना न्याय मिळेल.

**१२. गर्भलिंग परिक्षण कायदा १९९४ सुधारीत २००२**

लिंगपरिक्षण करणे कायद्यानुसार गुन्हा आहे. तरीही समाजात गर्भलिंग परीक्षण सुशिक्षित लोकांमध्ये जास्त दिसून येते. मुलगा किवा मुलगी होणे हे पुरूषाच्या हातात असून सुध्दा त्याचा दोष स्त्रियांवर लावला जातो. समाजात मुलाचे 'अतिरिक्त महत्त्व' दिसून येते. कारण पुरुषप्रधान संस्कृतीत भविष्यात मृत्यू अग्नीपरीक्षा ही परीक्षाच ठरते म्हणून की काय वंश हा हवा असतो वृध्दांच्या संरक्षणासाठी संपत्तीच्या वारसासाठी एकूणच जीवनाच्या विविध टप्प्यात संरक्षण व सुरक्षिततेसाठी समाजाची मानसिकता झाली आहे. मुलगा हा हवाच १९९४ मध्ये लिंग परिक्षण कायदा संसदेत मांडला आणि १९९६ मध्ये पास करण्यात आला यासाठी सुधारणा हवी. मार्गदर्शन केंद्र, प्रयोगशाळा नर्सिंग होम या विभागात स्त्रीभ्रूण हत्या करण्याचा अधिकार नाही, गर्भस्थ शिष्यूच्या लिंग परिक्षणासाठी कोणत्याही डॉक्टरची सेवा घेणे गुन्हा आहे. कोणताही डॉक्टर प्रसुतीतज्ञ या रजिस्टर मेडिकल प्रक्टीस करण्याची सक्त मनाई आहे, समाजात गर्भलिंग परीक्षण गुन्हा असून शिशूचे लिंग परिक्षण केल्यावर गर्भवती महिला व तीचा पती नातेवाईकांना लिंग ओळखून सांगण्याचा अधिकार नाही. उदा तुम्हाला जावई आहे किवा सून आहे असे म्हणणे गुन्हा आहे, सोनोग्राफीची मशीन ठेवता येणार नाही, लिंग परीक्षणाचा प्रसार करता येणार नाही, कोणत्याही प्रसुतीगृहात लिंग परीक्षण होता कामा नये फक्त शासकीय रुग्णालयातच लिंग परीक्षण कराव. कोणत्याही

परिस्थितीत कुटुंब व आप्तसंबंधाना शब्दाद्वारे, संकेताद्वारे किवा अन्य माध्यमाद्वारे गर्भलिंग परीक्षणाची माहिती सांगता येणार नाही. असे केल्यास ३ वर्षे शिक्षा व १० हजार रु. दंड आकारण्यात येते. स्त्री गर्भ ठेवायचा का नाही अंतिम निर्णय महिलांना देण्यात यावा पतीला नाही. डॉक्टर, पती व इतर नातेवाईक गर्भपात करण्यासाठी बळजबरी केल्यास त्यांची जमानत होता कामा नये यासाठी प्रथमश्रेणीतील न्ययाधिशाची भूमिका ही निपक्षपध्दतीने होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अशा महिला पोलीस स्टेशनला नोंद करत नाहीत. बळी पडलेल्या महिलांना मानसिक सुरक्षितता देण्यात याव्यात. त्यासाठी २०१६ मध्ये महिलांसाठी 'मनोधैर्य योजना' लागू करण्यात आली. मेनका गांधीच्या मतानुसार अधिकृत चाचणी करावी, गर्भलिंग बंदी असावी, स्त्रीने स्त्रीगर्भाला जन्म दिला का नाही हे तपासावे व त्याच्या नोंदी असाव्यात जेणेकरुन महिला सुरक्षित राहतील.

**१४. मनोधैर्य योजना कायदा ऑक्टोबर २०१५**

महाराष्ट्र शासनाने मनोधैर्य योजना ऑक्टोबर २०१५ रोजी लागू केली आणि याची अंमलबजावणी २०१६ पासून सुरु केली. या कायद्यामुळे महिलांना न्याय मिळेल. बलत्कारीत स्त्री आणि लैंगिक अत्याचारीत महिलांना किमान २ लाख मदत व ॲसिड हल्यात जख्मी गेलेल्यांना ५० हजार रु., कायम अपंगत्व आल्यास ३ लाख रु. मदत म्हणून देण्यात येईल ही योजना घडलेल्या घटनेसाठीच लागू आहे. 'महिला बालविकास' विभागातर्फे ही योजना सुरु करण्यात आली. या अंतर्गत पिढीत लाभार्थ्यांना १५ दिवसाच्या आत ८० टक्के रक्कम देण्याची तरतूद करण्यात आली. बाल लैंगिक अत्याचारापासून बालकाचे संरक्षण या कायद्याने १८ वर्षाखालील बालकांचे पुनर्वसन करण्याचे ठरवले हा निर्णय राज्यशासनाने घेतला. यात जिल्हा मंडळ स्थापन करुन ८ जनाची समिती स्थापन करण्यात आली. या कामासाठी पोलीसांनी एका तासाच्या आत जिल्हाधिकाऱ्यांना एसएमएस, ईमेल द्वारे घटना कळवणे बंधनकारक आहे. या मंडळाने सात दिवसात तातडीची बैठक घेऊन पिडीताला अर्थसाह्यतेची मदत अदा करणे बंधनकारक आहे. या कामासाठी पोलीस यंत्रणा अधिक जागरूक झाली आहे. शासनाकडे निधी आल्यानंतर त्यांना आर्थिक सहकार्य मिळेल या कार्यासाठी विलंब होता कामा नये अन्यथा महिलांचा यावरील विश्वास उडेल.

**निष्कर्ष**

स्त्री ही २१ व्या शतकात पुढे आली. शिक्षण, खेळ, व्यवसाय, उद्योगधंदे, समाजकारण ई. ती सांभाळत आहे. असे असुन देखील हया स्त्रियांना कामाच्या ठिकाणी तसेच कुंटुंबात अनेक अन्याय अत्याचारास तोंड द्यावे लागत आहे. स्त्रियांवरील अन्याय अत्याचारास प्रतिबंध घालण्यासाठी अनेक प्रकारचे कायदे भारतात करण्यात आले. परंतु हया कायद्यांद्वारे भारतीय समाजातील स्त्रि ही अजुनही सुरक्षित असल्याचे चित्र दिसुन येत नाही, त्याचे कारण भारतात विविध प्रकारचे महिलाविषयक कायदे अस्तित्वात असले तरी त्यांची अमंलबजावणी करणारी यंत्रणा कुठेतरी अयशस्वी ठरलेली दिसते. महिलावरती अन्याय, अत्याचारावरील नियंत्रण मिळविण्याकरिता अजुनही काही प्रभावी कायदयाची व प्रत्यक्ष अमंलबजावणी करण्याची गरज असल्याचे दिसते. समाजात स्त्रियांची संख्या ही ५० टक्के एवढी आहे स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार हा निम्मा टक्के संख्येचा अपमान आहे. ते होवु न देणे व स्त्रियांच्या सन्मानाचे रक्षण करणे ही समाजाची जबाबदारी व सरकारचे कर्तव्य आहे. घटनेत विविध कलमे असूनही प्रतिबंधात्मक अंमलबजावणी दिसून येत नाही.

अत्याचार पिडीत स्त्रियांना संरक्षण व आर्थिक सुरक्षितता आणि सामंजस्याचा दृष्टिकोन आढळून येत नाही. महिला अत्याचाराचा सोक्षमोक्ष करण्यात तयार असतात असे नाही. अत्याचार करणारा गुन्हेगार हा कुटुंबाचा सदस्य वा जवळचा नातेवाईक असल्याने गुन्ह्याची नोंद होत नाही. सामाजिक प्रतिष्ठेला तडा जाऊन देखील अत्याचारीत महिला गुन्ह्याची तक्रार करीत नाहीत. न्यायालयीन प्रक्रिया जलदगतीने होत नाही. त्यामुळे योग्य न्याय मिळतोच असे नाही. महिला विषयक कायद्याचे प्रशिक्षणाद्वारे जाणीवजागृती, कार्यशाळा, प्रशिक्षण आयोजित करण्यात याव्यात व प्रत्यक्ष अंमलबजावणी राबवण्यास संस्था कमी पडतात.

**समारोप**

अनेक सुधारणावादी कायदे अस्तित्वात असूनही स्त्रियांवरील अत्याचार कमी झाले किंवा संपूर्ण नष्ट झाले असे म्हणता येणार नाही. असे सध्या उपलब्ध असलेल्या महिला अत्याचाऱ्यांच्या संख्येवरुन स्पष्ट होते. यासाठी प्रामुख्याने भारतातील पुरुषप्रधान संस्कृती कारण आहे. भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमधील लोकांच्या मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे. अस्तित्वात असलेल्या काही प्रथा-परंपरा संस्कृतीद्वारे सांस्कृतिक दहशत, महिला अत्याचार यात वाढ होत आहे. त्याचबरोबर कायदे राबविणारी यंत्रणा ही पुरुषांच्या हाती असल्यामुळे महिलांना योग्य न्याय मिळत नाही. त्यामुळे अशा पध्दतीचे कायदे राबविणाऱ्या यंत्रणेमुळे महिलांना ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण असणे गरजेचे आहे. ज्यामुळे स्त्रियां आपल्या अन्याय अत्याचारामुळे संबंधीत स्त्री यंत्रणेशी संपर्क साधू शकते, त्यामुळे महिलांचे प्रश्न सुटू शकतील.

**संदर्भ सूची**

१. संगवई बी.डी., स्त्रिया व कायदे, विधी संशोधन केंद्र.

२. राष्ट्रीय समिती के रिपोर्ट, भारतीय समाज में स्त्रियों की परिस्थिती, अलाईड पब्लिकेशन प्रा.लि.

३. डॉ. अर्चना मेढेकर, महिलांचे कायदे, साकेत प्रकाशन, २००५.

४. डॉ.ज.रा.शिंदे, डॉ.प्रशात अमृतकर, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २००५.

५. प्रा.व्ही.बी. पाटील, मानवी हक्क, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे. २)

६. भारतीय समाज प्रश्न समस्या आणि परिवर्तन - संपादक प्रा. मधुकर देसल व प्रा. गौतम थोरात

७. मानवी हक्क - प्रा.व्हि.बी. पाटील

८. भारतातील सामाजिक चळचळी प्रा. सिध्देश्र्वर कोळे व प्रा. संग्राम आंदे

९. मेधा ताडपत्रीकर, कौटुंबिक हिंसाचार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# १०. भारतातील लैंगिक असमानता

**राणी महादेव कांबळे**
संशोधक विद्यार्थीनी, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताने राजकीय सामाजिक आर्थिक शैक्षणिक अशा सर्वच बाबतीत आपला ठसा उमटवला आहे. सर्वच बाबतीत प्रगती साधत विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे भारताची वाटचाल चालू आहे. यामध्ये शिक्षण,आरोग्य या बाबीकडे शासनाने विशेष लक्ष दिले आहे.पुरुषांबरोबरच स्त्रियांना ही शिक्षणाची द्वारे खुली झाली आहेत. त्यामुळेच अनेक स्त्रिया शिक्षण घेऊन उच्चशिक्षित झाल्या आहेत. सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.सामाजिक राजकीय आर्थिक,शिक्षनिक अशा सर्वच क्षेत्रात सध्या स्त्रिया अग्रेसर आहेत.इतके शिक्षण घेऊन स्त्रिया उच्चशिक्षित झाल्या असल्या तरी आणि कायद्यात स्त्री पुरुष समानतेची तरतूद असली तरी प्रत्यक्षात मात्र आजही स्त्रियांना लैंगिक समानतेचा सामना करावा लागतो. केवळ ती एक स्त्री आहे म्हणून सर्वच क्षेत्रात स्त्रियांना दुय्यम लेखून लैंगिक भेदभावाची जाणीव करून दिली जाते.

**महत्वाचे शब्द :-** लैंगिक असमानता, आर्थिक, राजकीय ,शैक्षणिक

**विषयाची निवड**

अनेक कार्यक्षेत्रामध्ये आपली कामगिरी उत्कृष्ट करून देखील पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांना नेहमीच दुय्यम लेखले जाते. त्यामुळे स्त्रियांना लैंगिक असमानतेचा सामना करावा लागतो लैंगिक असमानतेमुळे स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन हा विषय निवडला आहे.

**विषयाचे महत्व**

सद्यस्थितीत महिलांचे कार्यक्षेत्र अतिशय व्यापक झाले असून महिलांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने. अतिशय उत्तम कामगिरी केलेली आहे तरीसुद्धा स्त्रियांना लैंगिक असमानतेच्या भेदभावाला बळी पडावे लागते. लैंगिक असमानतेच्या समस्येचा अभ्यास झाल्यास एकूणच संशोधक विद्यार्थी शिक्षक आणि समाजास उपयुक्त ठरेल.

**संशोधनाचे उद्देश**

१. भारतात असणाऱ्या स्त्री पुरुष अस्मांतेचा अभ्यास करणे

२. शिक्षण आरोग्य यामध्ये असणाऱ्या लैंगिक अस्मंतेचा अभ्यास करणे.

३. राजकीय सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात असणाऱ्या लैंगिक भेदभावाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधिकेने दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग केला आहे .त्यामध्ये वृत्तपत्रे, पुस्तके, लेख, इंटरनेट इत्यादींचा समावेश आहे.

**विषय विवेचन**

जेव्हा लोकांना त्यांच्या लिंगामुळे भेदभाव , कमी संधी आणि वाढत्या हिंसाचाराचा सामना करावा लागतो तेव्हा लैंगिक असमानता उद्भवते .

**आरोग्य क्षेत्रातील असमानता**

**शिक्षण क्षेत्रातील असमानता**

साक्षरतेचे प्रमाण वाढत असले तरी महिला साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या साक्षरतेच्या तुलनेत मागे आहे.पुरुषांसाठी 82.14% च्या तुलनेत महिलांसाठी साक्षरता 65.46% आहे. अशा कमी साक्षरतेचे मूळ कारण म्हणजे मुलींचे शिक्षण हे संसाधनांचा अपव्यय आहे, कारण त्यांच्या मुली शेवटी त्यांच्या पतीच्या कुटुंबासोबत राहतील असा पालकांचा समज आहे. अशा प्रकारे, गृहिणी म्हणून त्यांच्या पारंपारिक कर्तव्य आणि भूमिकेमुळे, मुलींना शिक्षणाच्या गुंतवणुकीचा थेट फायदा होणार नाही, असा दृढ विश्वास आहे.आदिवासींसाठी आश्रम शाळा, कमी साक्षरता असलेल्या जिल्ह्यांसाठी कार्यक्रम आणि उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी मॅट्रिकपूर्व आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, राजीव गांधी नॅशनल फेलोशिप इत्यादीसारख्या कार्यक्रमांची अलीकडेच स्थापना करण्यात आली आहे. स्त्रियांच्या शिक्षणाबाबत पारंपारिक समजुती, विशेषत: भारतातील ग्रामीण आणि आदिवासी समुदायांमध्ये महिलांना या संसाधनांचा फायदा घेण्यापासून प्रतिबंधित करते.

ग्रामीण किंवा आदिवासी समाजातील महिलांसाठी शैक्षणिक विषमता आणखी मोठी आहे. 2011 मध्ये, झारखंड राज्यासाठी, पुरुष अनुसूचित जमातींचा (STs) साक्षरता दर सुमारे 68% होता तर महिला ST चा साक्षरता दर सुमारे 46% होता. आदिवासी महिलांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळत नाही आणि त्या शहरी समाजापासून अलिप्त आहेत, ज्यामुळे त्यांना आर्थिक संधी आणि गतिशीलता मिळण्यास प्रतिबंध होतो. भारतातील आदिवासी स्त्रिया बऱ्याचदा अकुशल असतात आणि सामान्य समाजाने त्या गोंधळलेल्या आणि लैंगिक संभोग करण्यास इच्छुक म्हणून समजतात. परिणामी, ग्रामीण किंवा शहरी समाजात एकत्र येण्याचा प्रयत्न करणाऱ्या आदिवासी स्त्रिया लैंगिक कामगार म्हणून काम करतात किंवा शारीरिक श्रमिक काम करतात

**आर्थिक क्षेत्रातील असमानता**

आर्थिक क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असून देखील आणि महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम असूनही आर्थिक क्षेत्रांमध्ये लैंगिक असमानता दिसून येते. 2013 मध्ये महिलांचा श्रमशक्ती सहभाग दर 80.7% होता. सोसायटी फॉर ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंटच्या नॅन्सी लॉकवुड , 140 देशांमधील सदस्यांसह जगातील सर्वात मोठी मानव संसाधन संघटना, 2009 च्या अहवालात असे लिहिले आहे की महिला कामगार सहभाग पुरुषांपेक्षा कमी आहे. , परंतु 1990 पासून वेगाने वाढत आहे. 2001 मध्ये भारतातील 397 दशलक्ष कामगारांपैकी 124 दशलक्ष महिला होत्या, असे लॉकवुड सांगतात.

50% पेक्षा जास्त भारतीय मजूर शेतीमध्ये कार्यरत आहेत. बहुसंख्य ग्रामीण पुरुष शेती करतात, तर बहुसंख्य स्त्रिया पशुधन, अंडी आणि दूध उत्पादनात काम करतात. राव [ ३५ ] सांगतात की ६३ टक्के पुरुषांच्या तुलनेत सुमारे ७८ टक्के ग्रामीण महिला शेतीत गुंतलेल्या आहेत. सुमारे 37% स्त्रिया शेती करतात, परंतु त्या शेतीच्या सिंचन, तण काढणे, विनोईंग, पुनर्लावणी आणि कापणी टप्प्यात अधिक सक्रिय असतात. 2004 मध्ये भारतातील सुमारे 70 टक्के शेतीची कामे महिलांनी केली होती. [ ३५ ] भारतातील चहाच्या मळ्यात महिलांचा श्रम सहभाग दर सुमारे ४७%, कापूस लागवडीमध्ये ४६%, तेल बियाणे ४५% आणि फलोत्पादनात ३९% आहे.

भारतात स्त्री-पुरुष वेतनात असमानता आहे. मजुरीतील सर्वात मोठी तफावत 2009 मध्ये हाताने नांगरणी कार्यात होती, जिथे पुरुषांना प्रतिदिन ₹ 103, तर महिलांना ₹ 55, वेतनातील तफावतीचे प्रमाण 1.87 इतके होते. पेरणीसाठी मजुरीचे अंतर 1.38 आणि खुरपणीसाठी 1.18 पर्यंत कमी केले. [ ३७ ] इतर शेतीच्या कामांसाठी जसे की विनोईंग, मळणी आणि रोपण, पुरुष आणि महिला मजुरीचे प्रमाण 1.16 ते 1.28 पर्यंत बदलते. स्वीपिंगसाठी, 2009 चे वेतन भारतातील सर्व राज्यांमध्ये पुरुष आणि स्त्रियांसाठी सांख्यिकीयदृष्ट्या समान होते.

**राजकीय क्षेत्रातील असमानता**

सद्यस्थितीत भारतीय राजकारणात महिलांनी उंच मजल मारले आहे आमदार खासदार मंत्री पंतप्रधान ते राष्ट्रपती पदापर्यंत अनेक स्त्रियानी कार्यभार सांभाळलेला आहे तरीही लैंगिक असमानतेचे माप उच्च पातळीवरील राजकीय निर्णय घेताना स्त्री-पुरुषांमधील अंतर लक्षात घेते. या मोजमापावर, भारताने अनेक वर्षांपासून जगभरातील शीर्ष 20 देशांमध्ये स्थान मिळवले आहे, 2013 मध्ये 9व्या क्रमांकावर आहे – डेन्मार्क, स्वित्झर्लंड, जर्मनी, फ्रान्स आणि युनायटेड किंगडमच्या तुलनेत भारताच्या राजकीय सशक्तीकरणात कमी लैंगिक असमानता दर्शविणारा गुण. पंतप्रधानांपासून ते विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत, भारतीय मतदारांनी अनेक दशकांपासून महिलांना मोठ्या संख्येने राज्यांच्या विधानसभा आणि राष्ट्रीय संसदेत निवडून दिले आहे.

भारताच्या 2014 च्या संसदीय सार्वत्रिक निवडणुकीत महिलांचे मतदान 65.63% होते, तर पुरुषांचे प्रमाण 67.09% होते. भारतातील १६ राज्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिलांनी जास्त मतदान केले. भारताच्या संसदेच्या एप्रिल-मे 2014 निवडणुकीत एकूण 260.6 दशलक्ष महिलांनी मतदानाचा हक्क बजावला.

भारताने 1993 मध्ये 73 वी आणि 74 वी घटनादुरुस्ती केली, ज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या प्रतिनिधित्वासाठी 33 टक्के कोट्याची तरतूद करण्यात आली आहे. या दुरुस्त्या 1993 मध्ये लागू करण्यात आल्या होत्या. हे, घनी आणि इतर सुचविते, भारतातील महिलांच्या सक्षमीकरणावर अनेक क्षेत्रात जोरदार परिणाम झाला आहे.

**लैंगिक असमानतेचे परिणाम**

भारतातील लैंगिक असमानतेचा परिणाम असमान संधींमध्ये होतो, आणि दोन्ही लिंगांच्या जीवनावर त्याचा परिणाम होत असताना, सांख्यिकीयदृष्ट्या मुली सर्वात वंचित आहेत.भारत हा एकमेव मोठा देश आहे जिथे मुलांपेक्षा जास्त मुली मरतात .मुलींची शाळा सोडण्याचीही शक्यता जास्त आहे.

भारतात मुली आणि मुले किशोरावस्थेचा अनुभव वेगळ्या प्रकारे अनुभवतात. मुले अधिक स्वातंत्र्य अनुभवतात, तर मुलींना त्यांच्या मुक्तपणे फिरण्याच्या आणि त्यांचे काम, शिक्षण, विवाह आणि सामाजिक संबंधांवर परिणाम करणारे निर्णय घेण्याच्या क्षमतेवर व्यापक मर्यादांचा सामना करावा लागतो.

जसजसे मुली आणि मुलांचे वय वाढत जाते तसतसे लैंगिक अडथळे वाढतच जातात आणि प्रौढत्वापर्यंत चालू राहतात जिथे औपचारिक कामाच्या ठिकाणी फक्त एक चतुर्थांश स्त्रिया दिसतात.

काही भारतीय स्त्रिया या जागतिक नेत्या आहेत आणि विविध क्षेत्रातील शक्तिशाली आवाज आहेत परंतु भारतातील बहुतेक महिला आणि मुलींना पुरूषसत्ताक दृष्टिकोन, रूढी, परंपरा आणि रचनांमुळे त्यांच्या अनेक अधिकारांचा पूर्णपणे उपभोग घेता येत नाही.

**6. निष्कर्ष**

आज पर्यंतच्या महिला संघर्षावर दृष्टिक्षेप टाकता असे दिसते की ,भारतीय महिलांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये उच्च शिक्षण घेऊन आपला सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक दर्जा सुधारला आहे आज स्त्रिया विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. पुरुषाच्या बरोबरीने आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा त्यांनी सर्व क्षेत्रांमध्ये उमटवला आहे.असे असूनसुद्धा अद्यापही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा दिला जात नाही त्या ज्या कार्यक्षेत्रात काम करतात तेथे त्यांना लैंगिक अस

असमानतेला सामोरे जावे लागते. लिंगभेदामुळे तिला दुय्यम लेखले जाते. हीच आपल्या भारतीय समाजाचे फार मोठी खंत आहे.

**शिफारशी**

१. पुरुषांची पुरुषी मानसिकता कमी झाल्यास लैंगिक समानता प्रस्थापित होईल.

२. मनतेचा कायदा करण्यात आलेला आहे परंतु या कायद्याची नीट अंमलबजावणी होत नाही कायद्याची नीट अंमलबजावणी झाल्यास लैंगिक असमानतेला आळा बसेल.

३. स्त्रियांनी स्वतःला दुय्यम नवलेखता पुरुषांच्या बरोबरीचे समजल्यास लैंगिक असमानता कमी होण्यास मदत होईल.

**संदर्भ**

1. https://www.humanrightscareers.com
2. https:// marathivishwakosh.org/ 44530
3. https://paho.org/en/topic
4. https://en.wikipedia.org
5. Maharashtra times- online daily newspaper, 21,Aug 2018
6. https://www.thinkglobalhealth.org

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)** **CC-02**

# ११. पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांची निर्मिती: महिला विकासासाठी काळाजी गरज

**रूपाली शेखर वाटकर**
अर्थशास्त्र विभाग, कन्या महाविद्यालय, मिरज, सांगली.
**प्रा. क्षितीज मिरासाहेब जाधव**
मार्गदर्शक, कन्या महाविद्यालय, मिरज, सांगली.

**प्रस्तावना**

पारंपारिक कृषी प्रक्रिया उद्योग म्हणजे जे पूर्व काळापासून शेतमालावर आधारित प्रक्रिया ग्रामीण भागातील प्रत्येक घरामध्ये प्रत्येक महीलांच्याद्वरे छोट्या मोठ्या प्रमाणात केली जात होती त्यालाच पारंपारिक कृषी प्रक्रिया उद्योग असे म्हणता येते. उदा.- लोणचे, पापड, ठेचा, चटणी, विविध मसाले असे अनेक पदार्थ जे दीर्घकाळ टिकून राहत व त्याद्वारे आपणाला वर्षभर जेवणाचा स्वादिष्टपणा ही जपायला मदत होत होती. सध्या भारताच्या अर्थव्यवस्थेतील वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना, बेकारी त्याचबरोबर अपुरा भांडवल संचय, वाढती लोकसंख्या, वाढणारे शहरीकरण या गोष्टी प्रामुख्याने जाणवतात. त्याचबरोबर बदलत्या आयात- निर्यात धोरणाचा विचार करता आपला व्यवहार तोल हा सतत प्रतिकुलच राहिला आहे. या सर्वांचा विचार करता आपणाला कृषी प्रक्रिया उद्योगांकडे प्रकर्षाने लक्ष देणे फार गरजेचे आहे. तसेच अश्या उद्योगांच्या माध्यमातून महिलांना समाजात स्वतंत्र स्थान मिळवता येते. कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करण्याच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी मिळते, त्यांच्या जीवनशैलीमध्ये सुधारणा होते, तसेच त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि मानसिक सक्षमीकरणासाठी एक मोठा मार्ग तयार होतो.

आजकाल, महिला सक्षमीकरणासाठी कृषी प्रक्रियेसोबतच आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि शाश्वत विकास या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या आहेत. कृषी प्रक्रिया उद्योगांची निर्मिती फक्त आर्थिकदृष्ट्या फायदेशीर नाही तर ती महिलांच्या नेतृत्व गुणांना प्रगल्भ करण्यासाठी देखील एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकते. तसेच, पर्यावरणावर कमी परिणाम करणारे आणि स्वावलंबी उद्योग बनवण्यासाठी कृषी उत्पादनांवर प्रक्रिया करणे हे ग्रामीण विकासाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचे आहे. या प्रक्रियेमुळे महिलांना स्थानिक उत्पादनातून थेट फायदा होईल, त्यांचा स्वावलंबनावर अधिक नियंत्रण राहील, आणि त्यांच्या सामाजिक सक्षमीकरणाला बळकटी मिळेल.

**आवश्यकता**

भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये व समस्यांचा विचार करता आपल्या आर्थिक धोरणामध्ये कृषी प्रक्रिया उद्योगांचे महत्त्व अथवा आवश्यकता स्पष्ट दिसून येते. भारतातील आर्थिक विकासातील प्रमुख अडथळे हे आपणाला संधी निर्माण करतात जसे की जास्त असणारी लोकसंख्या व वाढते शहरीकरण, या दोन समस्यांचा जरी आपण संधी म्हणून वापर केला तरी कृषी प्रक्रिया उद्योगांमार्फत आपण अर्थव्यवस्थेतील इतर समस्यांवर उपाय शोधू शकतो; जसे की बेरोजगारी, लघुउद्योग व ग्रामीण विकास. पारंपारिक घरगुती कृषी

प्रक्रिया उद्योग हा या समस्यांवरील उपायातील एक पर्याय म्हणून पुढे येऊ शकतो. लोकसंख्येच्या दृष्टीने ही या देशात अनेक आव्हाने आहेत उदा. 55 कोटी लोकसंख्या ही 25 पेक्षा कमी वया गटात मोडणारी असल्याने त्यांना संधीची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे त्यासाठी वर्ग, जात, लिंग, प्रदेश अशा बहुविध अंगाने विषमता वाढीचे आणि विकासाचे आव्हान तर आहेच त्याचबरोबर अत्यंतिक दारिद्र्यात अडकलेल्या कोट्यावधी नागकरीकांना दारिद्र्यरेषेच्या वरती आणणे ही तातडीची गरज आहे. आपली प्रचंड लोकसंख्या लक्षात घेता आपल्या घरगुती उपक्रमाने दुर्मिळ संसाधने काटकसरीनेच वापरली पाहिजे व सर्वांना परवडणारे आणि पर्यावरणदृष्ट्या शाश्वत अशी आपली संशोधन व नवतेची दिशा असावी.

**उद्दिष्ट**

१. पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांचे महत्त्व समजून घेणे.

२. पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांचे फायदे जाणून घेणे.

३. अश्या उद्योगांचा महिला विकासास मिळणारा फायदा अभ्यासणे.

**पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांचे महत्त्व**

**१. कमी भांडवल गुंतवणूक**

भारतातील वाढत्या लोकसंख्येचा परिणाम म्हणून बेरोजगारीची एक जटिल समस्या निर्माण झालेली आहे यामुळेच उत्पन्नाचे मार्गही मर्यादित झाल्याने अल्पबचतीचे प्रमाण वाढले आहे अशाने मोठ मोठ्या उद्योगांसाठी लागणारी भांडवल निर्मिती होणे अशक्य असते पण यावर उपाय म्हणून पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगाकडे पाहिले जाऊ शकते कारण यासाठी लागणारी भांडवल गुंतवणुक अतिशय अल्प असून अगदी अल्पबचतीतूनही वैयक्तिक पातळीवर असे उद्योग सुरू करता येतात.

**२. कच्च्या मालाची सहज उपलब्धता**

अशा प्रकारचे उद्योग तथा व्यवसाय हे प्रामुख्याने ग्रामीण स्तरावर करणे शक्य असता तसेच मुळातच ही कृषी प्रक्रिया उद्योग असल्याने शेतीमधील असलेला कच्चामाल हा सहज उपलब्ध होणे शक्य असते.

**३. शिक्षण/प्रशिक्षणाची आवश्यकता नसते**

आपल्या सामाजिक जणांकडे मध्ये असे पदार्थ आहेत हे पिढ्यानपिढ्या आपल्या सोबत आले आहेत. जसे उदा- विविध लोणची, पापड, फळांचा रस इत्यादी. तसेच हे उद्योग पारंपारिक पद्धतीने करता येणे शक्य असल्याने आधुनिक पद्धतीच्या शिक्षणात व प्रशिक्षणाची आवश्यकता लागत नाही.

**४. वेळेची बचत**

या उद्योगांसाठी वापरण्यात येणारी पद्धत जरी पारंपारिक असली तरी सुद्धा प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी हा अत्यंत कमी असतो त्यामुळे कमी वेळात भरपूर उत्पादन घेता येते.

**५. बाजारपेठेची सहज उपलब्धता**

वाढते शहरीकरण, बदलणारे राहणीमान, बदलणारी आरोग्य व्यवस्था तसेच सततचे होणारे स्थलांतर यामुळे पारंपरिक पद्धतीने बनलेल्या उत्पादनांचे महत्त्व वाढत असल्याने त्यांची मागणी देखील वाढत आहे. त्यामुळे या प्रक्रिया उद्योगातून निर्माण होणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठही सहज उपलब्ध होणे शक्य होते.

**६. वेगवेगळे पदार्थ तयार करता येतात**

व्यक्ती, कुटुंब किंवा संस्था एकाच वस्तू पासून वेगवेगळे पदार्थ एकाच छताखाली तयार करू शकते. उदा.- कैरी पासून लोणचे, कैरीचे पन्ह, इत्यादी.

**पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगाचे फायदे**

**१. स्वयं रोजगारात वाढ**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीची समस्या अधिक तीव्र होत चालली आहे. यामुळे विकासामध्ये अनेक अडचणी निर्माण होत असतात यावर उपाय म्हणून शासनाला रोजगार वाढ तसेच निर्मिती बरोबरच स्वयंरोजगारासारख्या संकल्पना ही राबवाव्या लागतात. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये कृषी मालावर पारंपारिक घरगुती पद्धतीने प्रक्रिया करणारे अनेक छोटे छोटे उद्योग निर्माण करता येऊ शकतात ज्याद्वारे स्वयंरोजगारास चालना देता येते कारण अशा उद्योगांना जास्त खर्च लागत नाही व स्वतः हे उद्योग करता येतात कुठल्याही मोठ्या कंपन्यांची आवश्यकता लागत नाही.

**२. त्याच्या मालाच्या मागणीत वाढ**

भारत देशातील आजची स्थिती पाहिली तर भारतात पारंपरिक पद्धतीने बनलेल्या घरगुती पदार्थांना मागणी वाढत चालले आहे त्यामुळे अशा पदार्थांसाठी लागणारा कच्चामाल हा शेतीतूनच मिळत असतो व त्यामुळे अशा कच्च्या मालाच्या मागणीतही वाढ होऊ लागली आहे ज्यामुळे पारंपरिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांना आपला हवा का वाढवणे शक्य झाले आहे.

**३. ग्रामीण विकासाला हातभार**

असे प्रक्रिया उद्योग हे मुख्यत्वे ग्रामीण भागामध्ये राबवले जात असल्यामुळे तसेच शहरी भागाकडून अशा उद्योगांमध्ये बनलेल्या पदार्थांना मागणीही वाढत असल्यामुळे ग्रामीण भागाचा विकासास अशा उद्योगांमुळे हातभार लागला आहे.

**४. महिला सबलीकरणासाठी महत्त्वाचा मार्ग**

भारतासारख्या देशांमध्ये आजच्या काळात महिला सबलीकरण हा एक ज्वलंत तसेच अत्यंत महत्त्वाचा विषय बनला आहे ग्रामीण भागातील अनेक महिला अशा आहेत ज्यांना बाहेर जाऊन काम करणे किंवा मोठमोठ्या शहरांमध्ये काम करणे शक्य होत नाही कारण अशा महिलांचे शिक्षण इतर शहरी भागातील महिलांच्या मानाने कमी तर आहेच पण त्याचबरोबर त्यांच्यावर असलेली कुटुंबाची जबाबदारी तसेच ग्रामीण भागातील पारंपारिक पुरुषी मानसिकता या सगळ्यांमुळे त्यांना बाहेर जाऊन काम करणे शक्य होत नाही पण अशा महिलांचे देखील सबलीकरण करणे अत्यंत आवश्यक असते त्यामुळे त्यांना बाहेर न जाता अशा घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांमध्ये रोजगार तथा स्वयंरोजगार निर्मिती करून त्यांचे सबलीकरण करणे शासनाला शक्य होते.

**५. भारतीय देशी पदार्थांचा विकास**

भारतामध्ये अनेक बाबतीत विविधता आढळून येते ही विविधता खाद्यपदार्थांमध्ये ही दिसून येते त्यामुळे ग्रामीण भागामध्ये प्रसिद्ध असलेले अनेक देशी खाद्यपदार्थ अशा प्रक्रिया उद्योगामुळे नावारूपाला येऊ शकतात आणि भारतीय देशी पदार्थांचा विकासही या उद्योगामुळे करता येणे शक्य होते.

**६. निर्यात क्षमतेत वाढ**

कुठल्याही देशाची आर्थिक स्थिती ही बऱ्याच अंशी त्याच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील आयात-निर्यातेच्या दिशा व रचनेवर आधारित असते आणि भारताची याबाबतीतील स्थिती एकूणच प्रतिकूल राहिलेली आहे त्यामुळे ही स्थिती सुधारायची असेल तर भारताला निर्यात क्षम उद्योगांचा विकास करणे आवश्यक आहे त्यामुळे विविध उद्योगांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे असते यातूनच पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिले तर त्यांच्यापासून निर्माण होणारे खाद्यपदार्थ उच्च दर्जाचे होऊन निर्यादेस सक्षम असे अनेक पर्याय उपलब्ध होऊ शकतात ज्याद्वारे भारताचा व्यापार तोल तसेच आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होऊ शकते.

**अश्या उद्योगांचा महिला विकासास मिळणारा फायदा**

पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांची निर्मिती ग्रामीण महिलांसाठी केवळ रोजगाराची संधी नाही, तर त्यांचा सामाजिक, आर्थिक आणि मानसिक विकास करण्यासाठी एक महत्त्वाचा उपाय ठरू शकतो. कृषी क्षेत्रामध्ये पारंपारिक पद्धतीने प्रक्रिया केलेल्या उत्पादनांची मागणी सतत वाढत आहे, आणि महिलांना यामध्ये सहभागी करून घेणं त्यांच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. या उद्योगांच्या माध्यमातून महिलांना अनेक दृष्टीने फायदे होऊ शकतात, त्यांचा विकास होऊ शकतो.

**१. आर्थिक सक्षमीकरण**

पारंपारिक कृषी प्रक्रिया उद्योगांनी महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याची संधी दिली आहे. ग्रामीण महिलांना घरगुती उद्योगांत सहभाग देऊन त्यांना थेट उत्पन्न मिळवण्याची संधी मिळते. उदाहरणार्थ, घरगुती स्तरावर मसाले, गहू, तांदूळ, शेंगदाणे, लोणचं,

बर्फ, विविध प्रकारचे खाद्यपदार्थ इत्यादींची प्रक्रिया आणि विक्री करून महिलांना त्यांच्या कामासाठी भरपूर उत्पन्न मिळवता येते. यामुळे महिलांना आर्थिक स्वतंत्रता मिळते आणि त्यांच्या कुटुंबाचा जीवनमान सुधारतो.

**२. रोजगाराच्या संधी**

घरगुती कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करणे महिलांसाठी रोजगार निर्मितीचे एक प्रभावी साधन आहे. महिलांना स्थानिक स्तरावर रोजगाराची संधी मिळते. यामुळे त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांना देखील रोजगार मिळवता येतो. या उद्योगांच्या विकासाने स्थानिक समुदायाचा समृद्धीच्या दिशेने विकास होऊ शकतो.

**३. समाजात सन्मान आणि स्थान**

पारंपारिक कृषी प्रक्रिया उद्योग महिलांना त्यांच्या कुटुंबात आणि समाजात उच्च स्थान मिळवून देतात. महिला उद्योगांमध्ये सक्रिय होऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम होतात, ज्यामुळे त्यांना घरात, समाजात आणि कुटुंबात सन्मान मिळतो. महिलांचा आत्मविश्वास वाढतो, आणि त्यांना निर्णय घेण्याची क्षमता मिळते.

**४. महिलांची सामाजिक सक्षमीकरण**

महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी कृषी प्रक्रिया उद्योग महत्त्वाचे ठरतात. या उद्योगांमध्ये काम करणाऱ्या महिलांना आपल्या हक्कांची जाणीव होते, आणि त्या त्यांच्या समाजाच्या विकासामध्ये सक्रियपणे सहभागी होऊ शकतात. त्यांना अधिक सामाजिक सुरक्षा आणि कायदेशीर अधिकार मिळवण्याची संधी मिळते.

**५. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**

पारंपारिक कृषी प्रक्रिया उद्योगांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादकता वाढवता येते. महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना आधुनिक उपकरणे आणि तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता निर्माण केली जाऊ शकते. यामुळे कार्यक्षमता आणि उत्पादनाची गुणवत्ता सुधारते, आणि महिलांना अधिक नफा मिळवता येतो.

**निष्कर्ष**

या सर्व विवेचनाचा विचार करता पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांची निर्मिती हा एक प्रभावी उपाय आहे जो ग्रामीण महिलांसाठी स्वावलंबन, संधी आणि सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतो. पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांची निर्मिती ही ग्रामीण महिलांसाठी एक अमूल्य संधी आहे. या उद्योगांमुळे महिलांना आर्थिक, सामाजिक, आणि मानसिकदृष्ट्या सशक्त बनवता येते. यामुळे त्या न केवळ स्वतःच्या कुटुंबाचे जीवनमान सुधारू शकतात, तर एक प्रगल्भ आणि समृद्ध समाजाच्या निर्मितीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग देखील होतो. त्यामुळे महिला विकासासाठी कृषी प्रक्रिया उद्योगांची निर्मिती ही काळाची गरज ठरते.

**उपाय**

पारंपारिक घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांची निर्मिती ग्रामीण महिलांसाठी एक महत्त्वाची संधी आहे. या उद्योगांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि मानसिक सक्षमीकरणास मदत होऊ शकते. यासाठी काही उपाययोजना आणि धोरणात्मक पावले

अवलंबणे अत्यंत आवश्यक आहे. खालील उपाययोजना ग्रामीण महिलांसाठी पारंपारिक कृषी प्रक्रिया उद्योगांच्या निर्मितीच्या क्षेत्रात सक्षमीकरण करण्यासाठी प्रभावी ठरू शकतात:

- महिलांना कृषी प्रक्रिया उद्योगांची सुरूवात करण्यासाठी योग्य प्रशिक्षण देणे.
- महिलांसाठी सुलभ कर्ज योजना तयार करणे आणि त्यांना कर्ज घेण्यासाठी मार्गदर्शन करणे.
- महिलांना स्थानिक संसाधनांचा उपयोग करून उत्पादन प्रक्रिया चालवण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि त्यांना एक मजबूत कायदेशीर पायाभूत सुविधा प्रदान करणे.
- महिलांसाठी कृषी प्रक्रिया उद्योगांमध्ये त्यांचे उत्पादन विक्री करण्यासाठी एक प्रभावी विपणन योजना तयार करणे.
- घरगुती कृषी प्रक्रिया उद्योगांना पर्यावरणपूरक आणि शाश्वत पद्धतीने चालवण्यासाठी महिलांना मार्गदर्शन करणे
- महिलांना सहकारी गट आणि नेटवर्किंगच्या माध्यमातून एकत्र आणणे, जेणेकरून त्यांना सामूहिक पद्धतीने काम करण्याची आणि शिक्षणाची संधी मिळेल.
- महिलांच्या नेतृत्वाच्या क्षमता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

**संदर्भ सूची**

- www.fci.gov.in
- Fundamental of agriculture- Kushal Publication 11th Edition.
- Agriculture Science- Arihant Publication 2nd Edition.
- www.esakal.com

# १२. भाषा आणि लिंगभेद

**इनामदार ऋषिकेश किरण**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्रीमती. मीनलबेन महेता महाविद्यालय, पाचगणी.

**गोषवारा**

भाषा ही मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. विचारांचे भावनांचे आदान प्रदान करण्याच्या जाणिवेतून भाषा तयार झाली असावी असे अभ्यासकांचे मत आहे. त्यामुळे भाषा विहीन समाजाची कल्पनाही करता येत नाही सुमारे दोन लाख ते साठ हजार वर्षांपूर्वी मानवी समूहात भाषा अस्तित्वात आली असावी असा अंदाज आहे. व्यक्त होण्याचे साधन म्हणून भाषा तयार झाली व विकसित झाली. भाषा हे संवादाचे आणि सांस्कृतिक प्रसाराचे शक्तिशाली साधन आहे. सामाजिक विश्वास नियमाने वृत्तींना आकार देण्यात भाषेची महत्त्वाची भूमिका आहे. भाषा ही सामाजिक संरचना तयार करण्याचे एक माध्यम म्हणून काम करते ज्यातून लिंगाधारित समज तयार होऊन त्याचा आकलन शक्तीवर परिणाम होत असतो. आता स्त्रियांची भाषा हा विचार करताना समाजात असलेली पुरुष सत्ता व सत्ता संबंध या घटकांकडे डोळसपणे पहावे लागते खरंतर भाषा ही स्त्री आणि पुरुष अशी भेदाची न राहता ती एकच असायला हवी होती, परंतु आपल्या व्यवस्थेत (कुटुंब धर्म जात वर्ग इत्यादी) स्त्रियांच्या जगण्यावर त्यांच्या बोलण्या चालण्या राहणीमानावर जी बंधने आहेत त्यांचा भाषेवर खूप जास्त परिणाम दिसून येतो. यातून स्त्रियांची व स्त्रियांविषयीची भाषा यातून होणारे वर्जन यावर विचार मांडणे गरजेचे ठरते.

**Key Words :** लिंगभाव, लिंगभेद, भाषिक विषमता, भाषिय रचना, लिंगभावात्मक उतरंड

**प्रस्तावना**

न्याय व समतामुलक समाजाच्या प्रस्थापनेसाठी लैंगिक समानता आणि पितृसत्ताक व्यवस्थेचे उच्चाटन अत्यंत गरजेचे आहे. यातूनच भाषा ही एक सांस्कृतिक प्रसाराचे शक्तिशाली साधन म्हणून पुढे येते. सामाजिक नियम परंपरा विश्वास श्रद्धा वृत्ती यांना आकार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भाषेच्या माध्यमातून केले जाते. या शोधनिबंधाच्या माध्यमातून भाषेच्या द्वारे होणारी लिंगभावात्मक विषमता याकडे डोळसपणे पाहण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. भाषेची रचना, तिची व्यवस्था , व्याकरणात्मक बाबी तसेच भाषेवर होणारा ऐतिहासिक सामाजिक सांस्कृतिक राजकीय परिणाम यातून भाषिक उतरंड तयार होऊन ठराविक वर्गाकडे भाषिक सत्तेची मक्तेदारी प्राप्त होते व त्यातून विषमतेला चालना मिळते. समाजात वर्चस्व असणाऱ्या कोणत्याच गटाकडे बारकाईने तपासणीच्या दृष्टिकोनातून पाहिलं जात नाही यातूनच वर्चस्व असणारे गट टिकून राहतात आणि पुन्हा पुन्हा तशाच प्रकारची सामाजिक बांधणी उभी राहते यातूनच सत्ता आणि मक्तेदारी यातले संबंध घट्ट होतात यातूनच पुढे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होतो त्यामुळे वर्चस्व गटातील व्यक्तींच्या निवडीची निर्णयांचे वागण्याचे बोलण्याचे परीक्षण करणे गरजेचे ठरते. समाजात व्यवस्थेत भाषेच्या माध्यमातून पितृसत्ताक व्यवस्थेचे

बळकटीकरण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसून येतो. म्हणूनच या शोधनिबंधातून भाषिक भेदभावाकडे चिकित्सक वृत्तीने पाहण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

- या शोधनिबंधातून भाषेच्या माध्यमातून तयार होणाऱ्या लैंगिक भूमिका व त्यातून तयार होणाऱ्या विषमता यांचा अभ्यास करणे.
- पितृसत्ताक व्यवस्थेची रुजवणूक भाषेच्या माध्यमातून कशा प्रकारे केली जाते याचा शोध घेणे.
- भाषिक रचना व व्यवस्थेचा लिंगभावात्मक वृत्तीशी असणारा संबंध तपासून पाहणे..

**संशोधन साहित्याचा आढावा**

**1. J. Sunderland, Language and Gender: an Advanced Resource Book, Routledge 2006**

हा खंड भाषा आणि लिंगाच्या क्षेत्रातील विविध प्रभावशाली अभ्यासांना एकत्र आणतो आणि सध्याच्या भाषा आणि लिंग अभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप दर्शवण्यासाठी विविध सैद्धांतिक दृष्टिकोनांवर भर देतो. पुस्तकाचे सुरुवातीचे प्रकरण हे परिचयाचे असून त्यामध्ये भाषा आणि लिंग याबाबतची सैद्धांतिक माहिती दिलेली आहे. त्यानंतरच्या प्रकरणांमध्ये लिंगभाव व भाषा याबाबतीत सैद्धांतिक दृष्टिकोन ,कार्यपद्धती निष्कर्ष याबाबत चर्चा केलेली पाहायला मिळते.

**2. Jennifer Coates , Women, Men and Language Routledge Linguistics Classics, 2015**

लिंगभाव आणि भाषा या विषयावरील एक महत्त्वपूर्ण पुस्तक म्हणून हे पुस्तक पुढे आले आहे. या पुस्तकांमध्ये Jennifer Coates यांनी वेगवेगळ्या समाजशास्त्रीय संकल्पनांच्या आधारे भाषेच्या रचनेविषयीची मांडणी केलेली आहे. लिंग हे एक सामाजिक रचित आहे हे सांगून लेखिकेने भाषेच्या आधारे होणारे भेदभाव या पुस्तकातून प्रकट केले आहेत.

**3. Penelope Eckert & Sally McConnell Gine , Language and Gender, Cambridge University Press, 2003 Eckert आणि McConnell-Gine**

यांनी यशस्वीरित्या लिंगभाव आणि भाषिक भेदभाव या समस्यांची रूपरेषा मांडलेली आहे. सामाजिक रित्या लिंग भेदभाव तयार करण्यासाठी भाषेचा कशाप्रकारे वापर केला जातो याबाबतचे विवेचन यामध्ये पाहायला मिळते. विशिष्ट लिंगाप्रती होत जाणारी मानसिकता व यामध्ये भाषेची असणारी भूमिका याविषयीही या पुस्तकांमध्ये वाचायला मिळते

**संशोधन पद्धत आणि तथ्य संकलन**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना गुणात्मक पद्धतीचा व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भग्रंथ, लेख, मासिके, अहवाल, इंटरनेट इ. वापर करण्यात आलेला आहे.

**भाषेची रचना**

भाषा शास्त्रज्ञांच्या संशोधकांनुसार भाषेचे लिंगाधारीत दृष्टिकोरातून तीन प्रकार पडतात.

1. Grammatical gender languages, 2. Natural gender languages & 3. Genderless languages

**1. Grammatical gender languages(German , French)**

यामध्ये प्रत्येक नामाला व्याकरणात्मक लिंगभाव प्राप्त झालेला असतो. व्यक्तीवाचक सर्वनामांमध्ये लिंगानुसार भेदभाव झालेला दिसून येतो. सर्वनामे व इतर व्याकरणात्मक संकल्पनांना लिंगभाव प्राप्त झालेला पाहायला मिळतो.

**2. Natural Gender Language(English, Swedish)**

नाम सर्वनाम यांना व्याकरणात्मक लिंगभाव प्राप्त झालेला पाहायला मिळत नाही. व्यक्तिवाचक सर्वनामे ही लिंगभावाच्या दृष्टिकोनातून तटस्थ पाहायला मिळतात.

**3. Genderless languages(Turkish)**

अशा भाषांमध्ये लिंगभावात्मक भेदभाव व्याकरणाच्या माध्यमातून पाहायला मिळत नाही.

संशोधकांना असे दिसून आले आहे की भाषेच्या लिंगभावात्मक भेदभावामुळे वाचकांच्या किंवा ऐकणाऱ्यांच्या वैचारिक पटलावर पुरुषी प्रतिमा नकळतपणे तयार होत असतात. उदा. वकील किंवा इंजिनियर हा हा शब्द ऐकल्यावर किंवा वाचल्यावर पुरुषाची प्रतिमा डोळ्यासमोर येते. कोणत्याही कथेची सुरुवात ही नेहमी पुरुषवाचक नामातूनच झालेली दिसून येते.

भाषेच्या मर्दानीपणामुळे पारंपारिक लिंग उतरंड मजबूत होऊन पुरुषांना अधिकची सत्ता व सामाजिक मानसन्मान प्राप्त होत असतो. यासाठी Ridgeway आणि Correll (2004) यांनी आठ लाख वेगवेगळ्या भाषांच्या वर्तमानपत्रांच्या मथळ्यांचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की 'हा' हे सर्वनाम 'ही' या सर्वनामापेक्षा अधिक वापरण्यात आले असून ते चांगल्या अर्थाने वापरले गेलेले आहे. याउलट 'ही' हे सर्वनाम कमी वापरण्यात आले असून त्यातून नकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

भाषा आणि लिंग उतरंड यांचा जवळचा संबंध असल्याचे संशोधनातून दिसून आलेले आहे. १९००-२००८ या दरम्यानच्या काळात अमेरिकेतील १.२ मिलियन पुस्तकांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की महिलांचे समाजातील स्थान व पुस्तकांमध्ये वापरण्यात येणारी सर्वनामे (हा, ही) यांचा जवळचा संबंध असल्याचे दिसून आले आहे. ज्या काळात महिलांचे समाजातील स्थान हे वरच्या दर्जाचे असते त्या काळातील पुस्तकांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की ही/She सर्वनामाचा वापर इतर काळाच्या तुलनेत अधिकचा झालेला दिसून येतो.

ली आणि गहरोई यांनी असे प्रतिपादन केले आहे की लिंग विषमतेचे प्रकटीकरण भाषिक लिंगवादामध्ये पाहायला मिळते. भाषिक लिंगवाद म्हणजे जाणते पणी किंवा अजाणते पणे शब्दांची निवड करत असताना स्त्री व तिच्या भावेश वाकडे कानाडोळा केला

जातो. जेव्हा भाषेचा वापर हा लिंगभावात्मक उतरंड प्रस्थापित करण्यासाठी केला जातो तेव्हा त्याचा परिणाम हा आकलनात्मक व भावनात्मक विकासावर होत असतो. बहमन आणि रहीम या संशोधकांनी विविध देशांमधील पाठ्यपुस्तकांचा संख्यात्मक आणि गुणात्मक अभ्यास करून असा निष्कर्ष मांडला की पुरुषवाचक नाम सर्वनाम आणि विशेषणे ही स्त्री वाचक नाम सर्वनाम आणि विशेषणापेक्षा ७९% , ७८% व ७२% पेक्षा जास्त वापर झालेला आहे. त्यासोबतच त्यांनी असे विवेचन केले आहे की पाठ्यपुस्तकात जेव्हा जेव्हा पुरुष व स्त्री संज्ञांचा वापर झालेला आहे तेव्हा तेव्हा स्त्री सज्ञा या पुरुष संज्ञांशी जोडल्या गेलेल्या आहेत. पाठ्यपुस्तकांमधील संवादांमध्ये बऱ्याच वेळा स्त्रिया या कमकुवत पिढीत निष्क्रिय आणि गौण आढळलेल्या असल्याचा निष्कर्ष बहमन आणि रहीम या संस्थांनी काढला आहे. याउलट पुरुष हे साहसी धाडसी शूर असे दाखविले गेल्याचे पाहायला मिळते. भाषेच्या माध्यमातून सामाजिक चालीरीती नियम श्रद्धा यांची जपणूक केली जाते त्याचबरोबर सत्तेची उतरंड मजबूत करून सामाजिक स्तरीकरणाला चालना दिली जाते अशी मांडणी स्त्रीवादी भाषेत दृष्टिकोनाने केलेली आहे.

**सामाजिक व्यवहार व भाषिक लिंगभेद**

बाहेर जाऊ का ? पार्लरला जाऊन येऊ का ? आज स्वयंपाक काय करू ? जेवायला वाढू का ? रोजच्या दैनंदिन जीवनात असे किती आणि काय काय प्रश्न असतात जे स्त्रिया सतत कोणालातरी विचारत असतात. याउलट पुरुषांची भाषा ही " मी बाहेर जाऊन येतो, मला यायला उशीर होईल, वाट बघू नको, मी सिनेमाला जातोय," पुरुषांची भाषा ही सूचना वजा आदेश असलेली दिसून येते याउलट स्त्रियांची भाषा प्रश्नार्थक, संभ्रमाची, परवानगी मागणारी दिसून येते. यातून स्त्रिया या निर्णय प्रक्रियेत नसतात व त्यांना सतत स्वतःबाबतचे निर्णय घेण्यासाठी कोणाची तरी परवानगी घ्यावी लागते हे दिसून येते. दुय्यमत्व व्यवस्थेने स्त्रियांकडे केलेले कायम दुर्लक्ष त्यांचे म्हणणे ऐकून न घेण्याची वृत्ती तिच्याकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन यातून स्त्रियांची आपली एक वेगळी भाषा जन्माला आली आहे असे दिसते. जे वर्तन जी भाषा पुरुषांचे मूल्यमापन करताना ठामपणा आत्मविश्वास अशा मूल्यांची जोपासना करते याउलट स्त्रियांच्या बाबतीत मूल्यमापन करताना याचे रूप बदलते तशाच प्रकारचे आत्मविश्वास ज्ञान असणाऱ्या स्त्रीने तशी पुरुषांसारखीच भाषा वापरल्यास तिला फारच वर चष्मा दाखवणारी इतरांची दखल न घेणारी असे संबोधले जाते.

जेव्हा कुणाचा अपमान करायचा असतो तेव्हा अनेकदा त्या व्यक्तीची आणि विशेषता पुरुषाची तुलना स्त्रियांबरोबर किंवा तृतीयपंथीय व्यक्ती बरोबर केली जाते. भाषेतल्या स्त्रीलिंगी शब्दांकडे खऱ्या स्त्री सारखं दुय्यमत्व आला आहे. पुरुष स्त्री सारखा असणे हा अपमान आहे मात्र स्त्री-पुरुषांच्या सारखी असणे ही काही बाबतीत अपवाद वगळता अभिमानाची बाब मानली जाते. म्हणूनच घर काम करणारा नवरा बायकोच्या ताटाखालचे मांजर असतो तर युद्धभूमी गाजवणारी " खूब लड़ी मर्दानी वह तो झांसी वाली रानी थी' इथे पासून ते पोलीस इन्स्पेक्टर ची भूमिका वटवणारी राणी मुखर्जी पण मर्दानी असावी लागते. सामाजिक भाषाशास्त्र असेही सांगते की बहुतेक भाषांमध्ये अपमान कारक शब्दांची यादी स्त्रियांसाठी भली मोठी असते. वेश्या बाजार बसवी, गावभवाने छिनाल, रांड आणि

असे आणखीन कित्येक शब्द सापडतील . या उलट पुरुषांचा मान हा स्त्रियांशी केलेल्या तुलनेत आहे म्हणजे पुरुष सोडून इतरांना नाकारला गेलेला अवकाश नाही का?

नाव लिहिण्याच्या विविध पद्धतींचा विचार केला असता व्यक्तीच्या नावाचे संबोधन श्री. / सौ. अशी संबोधने देऊन केला जातो. नावाच्या या भागांसंबंधी समाजामध्ये स्त्रियांच्या संदर्भात कमालीची गुंतागुंत आहे बहुतेक सर्व भाषांमध्ये पुरुषांसाठी एकच संबोधन असते. उदा. श्री. Mr. Monsieur तर स्त्रियांच्या बाबतीत उदा. कु / सौ, Miss/ Mrs, Mademoiselle/ Madam या दोन संबोधनांमधला भेद हा स्त्रियांच्या वैवाहिक परिस्थितीचा आहे. स्त्रियांबद्दल यंत्रणेला व्यवस्थेला समाजाला अशी माहिती का माहित करून घ्यायचे असते? स्त्रियांच्या पुरुषांवरील अवलंबितवाद तर आहेच त्याबरोबरच स्त्रियांच्या पुरुषांच्या संदर्भात तपासण्याच्या वृत्तीतही आहे. जर स्त्रीचा घटस्फोट झाला तर तिने काय संबोधन वापरावे ? शिवाय तिची ओळख सतत तिच्या आयुष्यातल्या पुरुषांवर ती गुंतविण्याची उठा ठेवून कशाला भाषीमार्फत केली जाते . बहुतेक सर्व धर्म जातीतील स्त्रियांनी लग्नानंतर आडनाव बदलावे असा प्रघात आहे . लग्नाआधी वडिलांचे आणि नंतर नवऱ्याच्या आडनावलावे अशी पद्धत आहे मुळात दोन स्वतंत्र आडनाव असणाऱ्या व्यक्तीचे लग्न झालेले असू शकते ते जोडीदार असू शकतात हे लक्षात घेणे इतके कठीण आहे ? लग्न हा स्त्रीसाठी जितका महत्त्वाचा टप्पा आहे तितका पुरुषासाठी का नाही ? मुली चि.सौ.का. - चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी सौभाग्याची आकांक्षा करणाऱ्या असतात त्याचप्रमाणे मुलांच्या नावा मागे सौभाग्यकांक्षी असं का लिहिलं जात नाही ? कारण मुलांचे सौभाग्य हे स्वतःच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे या उलट नवरा कसा मिळतो यावर स्त्रीचे भाग्य अवलंबून आहे लग्नाच्या निमंत्रण पत्रिकेतला हा फरक आपल्या सामाजिक सत्ता संबंध वर्जनाच्या स्थितीचे सूचक दर्शवतो.

**न्यूट्रिलायझेशन (Neutralization) आणि फेमिनायझेशन (Feminization)**

भाषेमधील हा लिंगाधारीत भेदभाव दूर करण्यासाठी दोन तत्वे वापरण्यात येतात. न्यूट्रिलायझेशन (Neutralization) आणि फेमिनायझेशन (Feminization).

न्यूट्रलायझेशनच्या माध्यमातून , असे शब्द वापरण्यावर भर दिला जातो ज्यातून कोणताही लिंगाधारित भेदभाव होणार नाही. उदा. पोलीस मॅन ऐवजी पोलीस ऑफिसर .भाषेमध्ये स्त्रियांची दृश्य मानता वाढवणाऱ्या शब्दांवर भर देणे म्हणजेच फेमिनायझेशन ऑफ लँग्वेज. भाषेची रचना, भाषा आधारित धोरण आणि वैयक्तिक वापरात येणारी भाषा या तीन मुद्द्यांच्या आधारे आपण भाषेच्या माध्यमातून होणारा लिंग भेदभाव दूर करू शकतो आणि यातूनच पुढे लिंग निष्पक्ष भाषा याकडे वाटचाल करता येऊ शकते .

**संदर्भ ग्रंथ**

1. Arun K Pujari, Ansh Mittal, Anshuman Padhi, Anshul Jain, Mukesh Jadon, and Vikas Kumar. 2019. Debiasing gender biased hindi words with word embedding. In Proceedings of the 2019 2nd International Conference on Algorithms, Computing and Artificial Intelligence, pages 450–456.
2. Bernard Comrie. 1999. Grammatical gender systems: a linguist's assessment. Journal of Psycholinguistic research, 28(5):457–466.
3. Blaubergs, M.S.(1980).Ananalysis of classic arguments against changing exist language. Womens Stud.Int.Q. 3, 135–147.
4. J.F. Lee, V. Mahmoudi-Gahrouei, Gender representation in instructional material, Sex. Cult. 24 (4) (2020) 1107–1127,
5. J. Sunderland, Gendered Discourses, Palgrave Macmillan, 2004.
6. J. Sunderland, Language and Gender: an Advanced Resource Book, Routledge, 2006.
7. M. Bahman, A. Rahimi, Gender representation in EFL materials: an analysis of English textbooks of Iranian high schools, Procedia-SBS 9 (2010) 273–277.
8. M. Lazar (Ed.), Feminist Critical Discourse Analysis: Gender, Power and Ideology in Discourse, Springer, 2005.
9. Nikhil Garg, Londa Schiebinger, Dan Jurafsky, and James Zou. 2018. Word embeddings quantify 100 years of gender and ethnic stereotypes. Proceedings of the National Academy of Sciences, 115(16):E3635–E3644.
10. 10 . Ridgeway, C.L.,and Correll,S.J.(2004).Unpacking the gender system: a theoretical perspective on gender beliefs and social relations. Gend.Soc. 18,510–531.

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# १३. कोल्हापूर जिल्ह्यातील कोविडशी सामना केलेल्या गृहिणी व नोकरी करणाऱ्या महिलांच्यातील फिअर ऑफ मिसिंग आऊट (FOMO) अभ्यास

**संजना श्रीनिवास सोनटक्के**
संशोधक विद्यार्थिनी, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

**सारांश (Abstract)**

या संशोधनाचा उद्देश कोविड-19 च्या महामारीदरम्यान कोल्हापूर जिल्ह्यातील गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील फिअर ऑफ मिसिंग आऊट (FOMO) च्या पातळीचा अभ्यास करणे हा होता. सामाजिक चिंता म्हणून ओळखले जाणारे FOMO म्हणजे इतर लोक त्यांच्या जीवनात चांगल्या अनुभवांचा आनंद घेत आहेत, आणि आपण त्यात सहभागी नाही, या विचारामुळे होणारी अस्वस्थता.

संशोधनासाठी एकूण 60 महिलांचा (30 गृहिणी आणि 30 नोकरी करणाऱ्या महिला) सहेतुक नमुना निवडण्यात आला. FOMO मोजण्यासाठी प्रझिबिल्स्की, मुरायमा, डेहान आणि ग्लॅडवेल (2013) यांची स्केल वापरण्यात आली. संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करून (माध्यम, प्रमाण विचलन आणि टी-मूल्य) विश्लेषण करण्यात आले. निष्कर्षानुसार, नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये गृहिणींच्या तुलनेत FOMO ची पातळी अधिक असल्याचे दिसून आले.

**मुख्य शब्द (Keywords):** फिअर ऑफ मिसिंग आऊट (FOMO), गृहिणी, नोकरी करणाऱ्या महिला, कोविड-19

**प्रस्तावना (Introduction)**

कोरोनाव्हायरस रोग 2019 (कोविड -19) हा एक अति संसर्गजन्य रोग आहे जो गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम-संबंधित कोरोनाव्हायरस 2 अथवा (एसएआरएस-कोव्ह-2) (SARS-CoV-2) या नावाच्या नवीन विषाणूद्वारे होतो. ज्या सार्स (SARS-CoV-1) या रोगाने आग्नेय आशियामधे थैमान घातले होते. त्या कोरोनाव्हायरस विषाणूच्या प्रजातीतील पण पूर्णपणे नवीन असा हा विषाणू आहे. (Perlman, Stanley. - Feb 2020)

डिसेंबर 2019 मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वुहानमध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख करण्यात आली होती. (तेथेच हा रोग कृत्रिमपणे तयार करण्यात आला.) आणि त्यानंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला व त्याने जागतिक महामारीचे रूप घेतले. (Boseley, Sarah - January 30, 2020). या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये ताप, खोकला आणि श्वास लागणे यांचा समावेश आहे, तर इतर लक्षणांमध्ये थकवा, स्नायू दुखणे, अतिसार, घसा खवखवणे, गंध कमी होणे आणि पोटदुखी या लक्षणांचा समावेश असू शकतो. सामान्यत: लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्यापर्यंतचा कालावधी हा दोन ते चौदा दिवसांचा असू

शकतो. बहुतेक प्रकरणांमध्ये सौम्य लक्षणे आढळतात, तर काही रोग्यांमधे व्हायरल न्युमोनिया आणि बहु-अवयव निकामी होण्याची भीती असते.

कोविड-19 महामारीने जगभरातील दैनंदिन जीवन, कामाचे स्वरूप आणि सामाजिक परस्परसंवादावर मोठा परिणाम केला. सततच्या विलगीकरणामुळे आणि सामाजिक क्रिया-कलापांवरील निर्बंधांमुळे मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम अधिक तीव्र झाला. या स्थितीत फिअर ऑफ मिसिंग आऊट (FOMO) म्हणजेच इतरांच्या अनुभवांपासून वंचित राहण्याची भीती, ही समस्या अधिक प्रखर झाली.

**हरवण्याची भीती : Fear of Missing Out (FOMO)**

फोमो म्हणजे "फिअर ऑफ मिसिंग आऊट". फोमोचा अर्थ असा आहे की, संधी किंवा संधी गमावण्याबाबत उद्भवणाऱ्या भीतीच्या वेळी, काही कृती केल्या जातात. उदाहरणार्थ, चांगल्या इन्व्हेस्टमेंटच्या संधी गमावण्याच्या भीतीमुळे, इन्व्हेस्टर विशिष्ट स्टॉकमध्ये इन्व्हेस्ट करू शकतात. फोमोची संकल्पना अनेक गुंतवणूकदारांना खरोखरच शिफारशीत नसलेल्या मार्गांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी निर्माण केली आहे. फायनान्शियल मार्केटमध्ये, जेव्हा इन्व्हेस्टरला मार्केटमधील मोठ्या रॅली गहाळ झाल्यानंतर अनुभव येतो किंवा त्याबद्दल खेद होतो, तेव्हा फोमो स्पष्टपणे दिसून येतो. कोणत्याही संधीला चुकवू नये म्हणून अनेक गुंतवणूकदार कोणत्याही विचाराशिवाय जलद आणि आकर्षक निर्णय घेतात.

FOMO या शब्दाने FOBO, FOMOMO, MOMO, FOJI, BROMO, NEMO, SLOMO आणि JOMO सारख्या ऑफशूट्सला देखील प्रेरणा दिली आहे.

- हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये विद्यार्थी असताना FOBO - म्हणजे Fear of Better Options - अमेरिकन उद्यम भांडवलदार आणि लेखक पॅट्रिक जेम्स मॅकगिनिस यांनी तयार केले होते. मॅकगिनिस यांनी FOBO चे वर्णन अति-व्यस्त, अति-कनेक्टेड जगाचे उपउत्पादन म्हणून केले आहे ज्यामध्ये सर्वकाही शक्य आहे असे दिसते आणि परिणामी, आपण निवडीसाठी खराब आहात.
- ROMO ही एक संज्ञा आहे जी कोविड-19 महामारीच्या दरम्यान तयार केली गेली आहे जी रिॲलिटी ऑफ मिसिंग आउट आहे. ROMO आपण गोष्टी गमावत आहात हे जाणून घेण्याची भावना वर्णन करते. -(कार्माइकल, सारा ग्रीन -2020).
- FOMOMO म्हणजे मिसिंग आउटच्या रहस्याची भीती. FOMOMO म्हणजे FOMO चे एक अत्यंत टोकाचे प्रकरण जे एखाद्याचे मोबाईल डिव्हाइस निरुपयोगी असताना उद्भवते, परिणामी सोशल मीडियावर काय गमावले आहे हे पाहण्यास असमर्थतेमुळे नाराजी निर्माण होते. मित्रांच्या सोशल मीडिया पोस्ट पाहण्यापासून वंचित राहिल्यास, एखादी व्यक्ती आपोआप असे गृहीत धरू शकते की तुमच्या सोशल मीडिया फीडवर असलेल्यांचा तुमच्यापेक्षा चांगला वेळ आहे.

- MOMO म्हणजे मिस्ट्री ऑफ मिसिंग आऊट, जेव्हा एखाद्याचे मित्र सोशल मीडियावर काहीही पोस्ट करत नाहीत तेव्हा उद्भवणाऱ्या पॅरानोईयाचा संदर्भ देते ज्यामुळे एखाद्याने काय गमावले आहे हे एकत्र करण्याचा प्रयत्न केला जातो. (ज्युपोविच-जिनाल्स्का. (2021).
- FOJI म्हणजे Fear Of Joining In आणि कोणीही तुमच्याशी कनेक्ट, फॉलो किंवा मित्र बनू इच्छित नाही या चिंतेने सोशल मीडियावर पोस्ट करण्याच्या भीतीचा संदर्भ देते. ] FOJI हे अनेकदा MOMO च्या विरुद्ध म्हणून पाहिले जाते.
- ब्रोमो म्हणजे एखाद्याचे मित्र ("ब्रॉस") त्यांना हरवण्यापासून वाचवतात अशा घटनांचा संदर्भ देते. ब्रोमोचे एक उदाहरण म्हणजे एखाद्याच्या मित्रांनी त्यांच्या रात्रीचे फोटो पोस्ट करणे टाळले की कोणीतरी बाहेर पडल्यासारखे वाटेल.
- NEMO म्हणजे Nearly but not fully Missing Out. NEMO ऑनलाइन नेटवर्कवर असलेल्या लोकांचा संदर्भ घेऊ शकतो, परंतु त्यांना वारंवार तपासू नका.
- SLOMO म्हणजे स्लो टू मिसिंग आऊट, आणि हळूहळू जाणवणारी व्यक्ती हरवत आहे.
- JOMO म्हणजे जॉय ऑफ मिसिंग आउट आणि मिस आउट झाल्यावर आनंदाची भावना दर्शवते. JOMO हा एक तुलनेने सकारात्मक विश्वास आहे की सर्व सोशल मीडिया आणि डिजिटल उपकरणे बंद करणे आनंददायक असू शकते. - (भट्ट, शेफाली. 2021)
- FOBIA म्हणजे संपूर्णपणे दुर्लक्षित होण्याची भीती आणि एक माणूस म्हणून प्रमाणित वाटण्यासाठी ऑनलाइन उपस्थिती राखण्याच्या आवश्यकतेचा संदर्भ देते.

**संशोधनाचे महत्त्व (Significance of the Study)**

गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील FOMO समजून घेणे खालील कारणांसाठी महत्त्वाचे आहे:

१. कोविड-19 च्या मानसिक आरोग्यावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२. गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये FOMO ला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा शोध घेणे.

३. FOMO कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना विकसित करणे.

**साहित्याचा आढावा (Review of Literature)**

**१. प्रझिबिल्स्की व सहकारी (2013):** त्यांनी FOMO स्केल विकसित केली आणि भावनिक कल्याणावर त्याचा परिणाम अधोरेखित केला.

**२. बेयन्स व सहकारी (2016):** त्यांनी सोशल मीडियाच्या वापरामुळे FOMO ची तीव्रता कशी वाढते हे सिद्ध केले.

**३. हेट्झ व सहकारी (2015):** त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील FOMO चा अभ्यास केला आणि त्याचे जीवनातील असंतोषाशी असलेले नाते दाखवले.

**४. विडरहोल्ड (2020):** कोविड-19 दरम्यान सोशल मीडिया वापरामुळे FOMO च्या वाढलेल्या प्रभावाचा अभ्यास केला.

**हेतू (Aim)**

कोविड-19 च्या काळात कोल्हापूर जिल्ह्यातील गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील FOMO च्या पातळीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दिष्टे (Objectives)**

१. गृहिणींमधील FOMO च्या पातळीचे मोजमाप करणे.

२. नोकरी करणाऱ्या महिलांमधील FOMO च्या पातळीचे मोजमाप करणे.

३. गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील FOMO च्या पातळीची तुलना करणे.

४. FOMO च्या पातळीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

**सिद्धांत कल्पना (Hypotheses)**

१. गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये FOMO च्या पातळीत लक्षणीय फरक नाही.

२. नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये गृहिणींच्या तुलनेत FOMO जास्त आहे.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

**संशोधन आराखडा (Research Design)**

हे तुलनात्मक संशोधन असून गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील FOMO ची तुलना केली गेली आहे.

**नमुना निवड (Sample Selection)**

कोल्हापूर जिल्ह्यातील 25-40 वयोगटातील 60 महिलांचा (30 गृहिणी आणि 30 नोकरी करणाऱ्या महिला) सहेतुक नमुना निवडण्यात आला.

**मानसशास्त्रीय साधने (Psychological Tools)**

सदर संशोधनासाठी प्रझिबिल्स्की, मुरायम, डेहान आणि ग्लॅडवेल (2013) यांची Fear of Missing Out (FOMO) Scala वापरली आहे. या चाचणीत एकूण 23 विधाने असून प्रत्येक विधानाला 1-not at all true, 2- slightly true, 3 moderately true, 4- very true, and 5 extremely true असे पाच पर्याय आहेत. जो पर्याय लागू पडतो त्या पर्यायास बरोबर (✓)असे चिन्ह करून आपले उत्तर नोंदवायचे आहे. या चाचणीची चाचणी विश्वसनीयता 0.87 आणि यथार्थता 0.90 इतकी आहे.

**संख्याशास्त्रीय साधने (Statistical Tools)**

- माध्य (Mean)
- प्रमाण विचलन (Standard Deviation)

- टी-मूल्य (t-Value)

| FOMO घटक | गृहिणी (30) | | नोकरी करणाऱ्या महिला(30) | | t-Value | Significance |
|---|---|---|---|---|---|---|
| | Mean | SD | Mean | SD | | |
| एकूण FOMO | 42.5 | 5.8 | 50.2 | 6.1 | 4.36 | लक्षणीय )0.01**) |
| सोशल मीडियाचा वापर | 14.3 | 3.2 | 18.7 | 4.5 | 3.25 | लक्षणीय )0.05*) |
| सामाजिक तुलना | 15.1 | 2.9 | 17.5 | 3.4 | 2.67 | लक्षणीय )0.05*) |
| जीवन संतुलनावर परिणाम | 13.1 | 3.5 | 14.0 | 4.2 | 0.89 | लक्षणीय नाही |

**फलित तक्त्याचे विश्लेषण (Table Analysis)**

**१. एकूण FOMO**

नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये FOMO ची पातळी (Mean = 50.2) गृहिणींमध्ये (Mean = 42.5) च्या तुलनेत जास्त आहे. t-मूल्य 4.36 असून ते 0.01 पातळीवर लक्षणीय आहे.

**२. सोशल मीडियाचा वापर**

नोकरी करणाऱ्या महिला (Mean = 18.7) गृहिणींच्या (Mean = 14.3) तुलनेत सोशल मीडियाचा अधिक वापर करतात. t-मूल्य 3.25 आहे आणि हे 0.05 पातळीवर लक्षणीय आहे.

**३. सामाजिक तुलना**

नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये सामाजिक तुलना अधिक (Mean = 17.5) आहे, तर गृहिणींचे माध्यमान 15.1 आहे. t-मूल्य 2.67 असून ते 0.05 पातळीवर लक्षणीय आहे.

**४. जीवन संतुलनावर परिणाम**

या घटकात दोन्ही गटांमध्ये लक्षणीय फरक दिसून आलेला नाही.

**मर्यादा (Limitations)**

१. या अभ्यासाचा मर्यादित नमुना कोल्हापूर जिल्ह्यापुरता आहे.

२. अधिक व्यापक नमुना घेतल्यास विविध निष्कर्ष मिळण्याची शक्यता आहे.

३. स्वयं-अहवालित माहितीवर आधारित असल्याने पक्षपात होऊ शकतो.

**निष्कर्ष (Conclusions)**

१. नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये गृहिणींच्या तुलनेत FOMO ची पातळी अधिक आहे.

२. सोशल मीडिया वापर आणि सामाजिक तुलना हे FOMO वाढविणारे महत्त्वाचे घटक आहेत.

३. दोन्ही गटांमध्ये जीवन संतुलनावर FOMO चा परिणाम सारखा दिसून आला आहे.

**संदर्भसूची (References)**


- Beyens, I., Frison, E., & Eggermont, S. (2016). I don't want to miss a thing: Adolescents' Fear of Missing Out and its relationship to social needs, social media use, and psychological functioning. Computers in Human Behavior, 64, 1–8.
- Boseley, Sarah (January 30, 2020). "WHO declares coronavirus a global health emergency". The Guardian.
- Hetz, P. R., Dawson, C. L., & Cullen, T. A. (2015). Social media use and the Fear of Missing Out (FOMO) while studying abroad. Journal of Research on Technology in Education, 47(4), 259–272.
- Perlman, Stanley.( Feb 2020) "Another Decade, Another Coronavirus". The New England Journal of Medicine. 382(8): 760–762
- Przybylski, A. K., Murayama, K., Dehaan, C. R., & Gladwell, V. (2013). Motivational, emotional, and behavioral correlates of Fear of Missing Out. Computers in Human Behavior, 29(4), 1841–1848.
- Wiederhold, B. K. (2020). The social dilemma: The fear of missing out and social media's impact on mental health. Cyberpsychology, Behavior, and Social Networking, 23(9), 573–574.
- कार्माइकल, सारा. ग्रीन. (2020). "COVID-19 ने आम्हाला FOMO वरून ROMO वर नेले आहे" . जपान टाइम्स 2021-11-04.
- ज्युपोविच-जिनाल्स्का.(2021) "FOMO, MOMO आणि आमच्या काळातील इतर समस्या - ग्राहक माहिती केंद्र" . cik.uke.gov.pl.
- भट्ट, शेफाली. (2021)."NEMO: FOMO आणि JOMO मधील मध्यम मार्ग शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी नवीन कल्पना" . इकॉनॉमिक टाइम्स.

# १४. स्त्री सबलीकरण आणि भारतातील स्त्री साक्षरता, आयुर्मान व माता मृत्यू दर यांचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. संतोष संभाजी शेळके**
कन्या महाविद्यालय, मिरज, सांगली.

**प्रस्तावना**

जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास करत असताना भारत एक नव विकसित देश म्हणून उभा राहत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करत असताना आणि त्याचा गुणात्मक संख्यात्मक अभ्यास करत असताना सर्वांचा विकासातील वाटा मोठ्या प्रमाणात वाढत आहे यामध्ये प्रामुख्याने भारतातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत 48% च्या दरम्यान स्त्रियांचे प्रमाण आहे जर भारताला विकसित व्हायचं असेल तर या 48% महिलांचा विकास करणे एक महत्त्वाचे उद्दिष्ट देशासमोर दिसत होते म्हणून स्वतंत्र्यानंतर देशातील वेगवेगळ्या नियोजन कालावधीमध्ये स्त्री सबलीकरण करण्यासाठी विशेष भर देण्यात आला आणि त्याचा परिणाम म्हणून आज आपणाला स्त्रियांच्या साक्षरता, आयुर्मान आणि माता मृत्यूदारांमध्ये सुधारणा होत असलेला दिसून येते येथे या सर्वांचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील, समाज रचनेतील दोष दूर करण्यासाठी देशातील नागरिकांना विकसित करणे हे कोणत्याही सरकारचं प्रमुख कर्तव्य असतं आतापर्यंत झालेल्या सर्व सरकारने देशाच्या विकासाचे स्तर वाढवण्यासाठी वेगवेगळ्या पंचवार्षिक योजना मधून वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी करून देशातील नागरिकांना सुविधा पुरवून त्यांना प्रमुख अर्थव्यवस्थेच्या प्रक्रियेमध्ये आणण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसंख्येचा विचार करता भारतामध्ये सुमारे 48% च्या दरम्यान स्त्री लोकसंख्येचे प्रमाण आहे परंपरागत भारतीय व्यवस्थेमध्ये स्त्रियांना नेहमी दुय्यम स्थान मिळालेले आहे त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अविकसित राहण्यांमध्ये स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात हिस्सा जाणवतो या सर्वांचा विचार करता भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर साक्षरता, आरोग्य, राहणीमान विषयक योजना तयार करून भारतीय समाजातील स्त्रियांना विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे विशेष करून यामध्ये सुधारणा होत आहे व भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

१. स्त्रियांच्या साक्षरतेचा माता मृत्यू दरावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास.

२. शिक्षणामुळे महिला सक्षमीकरणातील बदलाचा अभ्यास.

**अभ्यासाचे महत्त्व**

समाज सातत्यानेबदलत असतो. त्या बदलाचे पडसाद महिलांच्या जीवनमानावर झालेला दिसतो. त्यातनू त्यांची भूमिका, मित्त्वाकांक्षा आहि दृहिकोन यामध्ये मोठा बदल होतो. महिलांच्या आरोग्याच्या समस्येबाबत विचार करताना स्त्रियांना आरोग्य सेवांची उपलब्धता करून द्यावे, स्त्रियांना आरोग्य गरजा चे प्रकट करता यावेयासाठी स्त्रियांना सक्षम बनवण्याची गरज आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्था, कुटुंब आहि स्वतः हिया सद्धा आपल्या आरोग्याच्या गरजा केवळ पनुरुत्पादक चौकटीतच बघतात. भारतीय पुरुष प्रधान सांस्कृतीत महिलांच्या कडे, त्यांच्या अधिकाराकडे, व्यक्ती स्वातंत्र्याकडे आरोग्याकडे शैक्षणिक कडे लक्ष देणे गरजेचे आहे. राज्यघटनेच्या ३८,३९ व ४१ व्या कलमात भारत सरकारने कल्याणकारी राज्याची सांकल्पना स्वीकारून त्या त्यादृष्टीने उपाययोजना सुचविले आहेत.

**संशोधन पद्धती**

स्त्रियांच्या शैक्षणिक आयुर्मान (Educational Attainment) आणि माता मृत्युदर (Maternal Mortality Rate – MMR) यांचा अभ्यास करण्यासाठी योग्य संशोधन पद्धती निवडणे महत्त्वाचे आहे. यासाठी मिश्र पद्धती (Mixed Methods) चा उपयोग केला जाऊ शकतो, ज्यामध्ये मात्रात्मक (Quantitative) व गुणात्मक (Qualitative) संशोधन समाविष्ट असते.

**संकल्पना**

**१. स्त्रियांची सबलीकरण**

स्त्रियांचे सबलीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि वैयक्तिक स्तरांवर सक्षम करणे, ज्यायोगे त्या स्वतःचे जीवनस्वातंत्र्याने आणि जबाबदारीने जगू शकतील व आपल्या निर्णयांवर स्वतःचा अधिकार गाजवू शकतील.

**२. स्त्रियांचे आयुर्मान**

स्त्रियांचे आयुर्मान म्हणजे स्त्रिया सरासरी किती वर्षे जगतात याचा सांख्यिकीय अंदाज. याला जन्माच्या वेळी अपेक्षित आयुर्मान (Life Expectancy at Birth) असेही म्हणतात.

**३. स्त्रियांची साक्षरता**

स्त्रियांचे साक्षरता म्हणजे एखाद्या विशिष्ट वयोगटातील स्त्रिया (सहसा 7 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या) कोणत्याही भाषेत वाचन, लेखन आणि साधे गणिते करणे शिकलेल्या आहेत का, हे दर्शवणारा मापदंड.

भारतातील स्त्री साक्षरता प्रमाण

भारत स्वतंत्र झाल्यापासून भारतातील साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. मानवाच्या विकासामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक आहे तो शैक्षणिक घटक भारतातील प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये शिक्षणावर भर दिल्यामुळे भारतातील शिक्षण स्तर उंचावल्याच्या दिसून येते.भारतातील पुरुषांच्या साक्षरते बरोबरच स्त्रियांच्या साक्षरतेमध्येही भर पडत आहे हे खालील माहिती वरून समजून येते. सर्व प्रश्नांची सोडवणूक ही जसं की आर्थिक सामाजिक राजकीय प्रामुख्याने शिक्षणाद्वारे सोडवले जाऊ शकते व हे प्रमुख उद्दिष्ट ठेवून भारत सरकारने

स्वतंत्र नंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आधारे शिक्षणात मध्ये केलेली गुंतवणूक सातत्याने 21 व्या शतकामध्ये सुद्धा चालू ठेवली व त्यामुळे महिलांच्या सक्षमकरणांमध्ये भर पडल्याचे आपणास दिसून येते .

| वर्ष | एकूण साक्षरता | स्त्री साक्षरता | पुरुष साक्षरता |
|---|---|---|---|
| 1951 | 27.2 | 8.9 | 18.33 |
| 1961 | 40.40 | 15.35 | 28.30 |
| 1971 | 45.96 | 21.97 | 34.45 |
| 1981 | 56.38 | 29.26 | 43.57 |
| 1991 | 64.13 | 39.29 | 52.21 |
| 2001 | 75.85 | 54.16 | 65.38 |
| 2011 | 82.14 | 65.46 | 74.00 |

भारताची प्रत्येक जनगणना ही दर दहा वर्षांनी केली जाते तर भारत स्वतंत्र्यानंतर 1951 ला स्वातंत्र्यानंतरची पहिली जनगणना झाली त्या जनगणनेमध्ये भारताची एकूण साक्षरता ही 27. 2% होती व त्याचबरोबर पुरुषांची या जनगणनेमध्ये 18.33% व स्त्रि साक्षरतेचे प्रमाण 8.9% आहे त्याचबरोबर सन 2011 मध्ये एकूण साक्षरता ही 80.14% होती त्यामध्ये स्त्रि साक्षरतेचे प्रमाण हे 65. 46% व पुरुष साक्षरतेचे प्रमाण 74 टक्के होतो. यावरून लक्षात येते की भारतामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**भारतातील स्त्रियांचे आयुर्मान**

देशाच्या आर्थिक विकासाबरोबरच देशातील मानवी विकासाचा स्तर मोजायचा असेल तर अर्थिक संपत्ती बरोबर मानवी विकास महत्त्वाचा स्थान विकासामध्ये प्रामुख्याने आयुर्मान महत्त्वाचा घटक आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर देशातील सरकारने केलेल्या वेगवेगळ्या सामाजिक गुंतवणुकीमुळे देशातील आयुर्मान वाढलेले दिसून येते. विशेष करून स्त्रियांचे आयुर्मान हे पुरुषांची पेक्षा जास्त आढळते ही पुढील माहितीवरून स्पष्ट होते.

| वर्ष | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| 1951 | 32.4 | 31.1 | 32.0 |
| 1961 | 41.9 | 40.6 | 41.2 |
| 1971 | 47.1 | 45.6 | 46.4 |
| 1981 | 54.1 | 54.7 | 54.00 |
| 1991 | … | 59.00 | … |
| 2001 | 63.9 | 66.9 | 65.3 |
| 2011 | 68.1 | 69.5 | 70.00 |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की सन1951 मध्ये लोकांच्या आयुर्मान हे 32 होते. तर सन 2001 मध्ये 65.3.या मध्ये स्त्रियांच्या आयुर्मान विचार करता 31.1 दिसून येते तर पुरुषांचा आयुर्मान 32. 4 दिसून येते त्यानंतर सण 2011 मध्ये एकूण आयुर्मान स्तर वर्ष जाणवतं त्यातील पुरुषांच्या आयुर्मान ही 68.1 व स्त्रियांची आरमान आहे 69.5 दिसून येते. हा जो बदल जाणवतो तो हा

प्रामुख्याने शिक्षणामध्ये अवनी साक्षरतेमध्ये झालेल्या बदलामुळे दिसून येतो शिक्षण हा एक विकासाचा महत्त्वाचा घटक आहे हे यातून जाणवते. देशातील शैक्षणिक प्रवाह व शिक्षण मधील गुंतवणूक याचा सर्वात मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते.

**भारतातील माता मृत्यू दर**

आरोग्य आणि विकास यांचा फार जवळचा संबंध आहे म्हणून भारतातील सर्व पंचवार्षिक योजने मध्ये आरोग्यावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली वेगवेगळ्या सोयी सुविधा देण्यात आल्या विशेषतः महिलांच्या आरोग्याच्या संबंधित सरकारने वेगवेगळे योजनांची सुरुवात केली व स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिल्याने स्त्रियांच्या माता मृत्यू दरामध्येही घट झाल्याचे दिसून येते ही घट खालील माहिती दिसून येते

| अ.क्र | वर्ष | माता मृत्युदर |
|---|---|---|
| 1 | 1900 | 437 |
| 2 | 1999-01 | 327 |
| 3 | 2007-09 | 212 |
| 4 | 2011-13 | 167 |
| 5 | 2014-16 | 130 |
| 6 | 2015-17 | 122 |
| 7 | 2016-18 | 113 |
| 8 | 2017-19 | 103 |

वरील माहितीवरून असे दिसून येते की भारतातील माता मृत्युदराचे प्रमाण घटत असल्याचे दिसून येते सन 1999 ते 2001 च्या दरम्यान भारतातील माता मृत्यू दर हे 327 देशात पण जस तसा देशातील शिक्षणातील स्तर बदलत गेला च प्रमाण बदलत गेलं तसतसं भारतातील माता मृत्यू दराचं प्रमाणही कमी होत गेलेले दिसून येते. 2017 2019 दरम्यान भारतातील माता मूर्ती दराचे प्रमाण हे 103 आहे यावरून हे स्पष्ट दिसून येते की सरकारने आरोग्य शिक्षण यामध्ये सुधारणा केल्याने भारतातील मातामूर्तीदाराचे प्रमाणही कमी होत असलेली दिसून येते यांच्या सक्षमीकरणांमध्ये शिक्षण आरोग्य आयुर्मान या सर्वांचा विचार करता महिलांच्या सक्षमकरणांमध्ये वाढ होत्याले दिसून येत आहे.

**निष्कर्ष**

भारतातील महिला सक्षमीकरणांमध्ये भारतातील वेगवेगळ्या योजना त्याचबरोबर भारतातील पंचवार्षिक योजना संदर्भात सरकारने ठेवलेले उद्दिष्ट व त्या उद्दिष्टांची केलेली पूर्तता या सर्वांचा अभ्यास करत असे दिसून येते की भारतातली महिला सबलीकरणांमध्ये भारतातील स्त्री शैक्षणिक स्तर, स्त्रियांचे आयुर्मान व स्त्रियांचे माता मृत्यू दर प्रमाण या सर्वांचा अभ्यास करत असे दिसून येते की भारतामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतोय 1951 ला ज्या पंचवार्षिक योजना भारत सरकारने चालू केल्या व आत्ता सध्या 21 व्या शतकामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये प्रत्येक स्त्रीचे योगदान हे अत्यंत महत्त्वाचे झालेलं आहे हे फक्त सरकारने केलेल्या गुंतवणुकीमुळे

शक्य झालेलं आहे तरीही अजून ज्या प्रमाणात स्त्रियांचे पर्यंत योजना पोचल्या पाहिजे त्यांना पोचल्यामुळे महिला सक्षमीकरणापासून या स्त्रिया वंचित राहतात त्यामुळे यासारखे अनेक योग्य वेगळ्या योजना चा वापर करून महिला सक्षमीकरणाचा दर वाढवणे गरजेचे आहे तरच आपण एक विकसित भारत होण्यामध्ये वेळ लागणार नाही.

**संदर्भ ग्रंथ**


- Censusindia.gov.in
- Data.worldbank.org
- Maternal and Child Health in India''लेखक: A.P. Kulkarni

# १५. कोल्हापूर जिल्ह्यामधील मनरेगा योजनेमधील महिलांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**संयोगिता दिलीप सोरटे**
संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

मनरेगा योजनेमुळे शहरी आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झाली आहे. या योजनेंतर्गत, सरकारकडून प्रौढ व्यक्तीला 100 दिवसांचा रोजगार दिला जातो. यामध्ये विशेषतः महिलांना प्राधान्य दिले जाते. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. पण उन्हाळ्यात तापमान वाढले की रोजगार कमी होतो. अशा परिस्थितीत ग्रामीण महिलांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून, यावेळी त्यांना आर्थिक सहाय्य देण्याच्या उद्देशाने भारतीय कृषी विमा कंपनीने अतिशय चांगले विमा संरक्षण सुरू केले आहे.या विमा पॉलिसी अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक मदत दिली जाणार आहे. परंतु ही मदत ठराविक कालावधीसाठीच दिली जाईल, म्हणजे जेव्हा महिलांना उन्हाळी हंगामामुळे मनरेगामध्ये काम मिळाले नाही, तर या विमा संरक्षणामुळे त्यांना आर्थिक मदत मिळेल. ज्या महिला मनरेगा रोजगाराशी संबंधित आहेत आणि त्यांना या विमा संरक्षणाचा लाभ घ्यायचा आहे, त्यासाठी त्यांनी अर्ज करावा लागतो आणि काही रक्कम देखील जमा करावा लागतो. त्यानंतरही त्यांना रोजगार न मिळाल्यास त्यांना आर्थिक मदत दिली जाते.

मनरेगा मजुरी आणि बेरोजगार मजुरी यातील तफावत विविध राज्यांमध्ये वेगवेगळी आहे. विशेषत: पुरुष कामगारांसाठी ज्यांना खुल्या बाजारात महिला कामगारांपेक्षा खूप जास्त मोबदला दिला जातो त्यामुळे पुरुष कामगारांसाठी मनरेगाचे काम खूपच कमी आकर्षक बनते. मनरेगा अंतर्गत, पुरुष आणि महिलांसाठी समान वेतनाच्या कलमाचे देखील पालन केले गेले आहे. आणि यामुळे भारतातील ग्रामीण महिलांसाठी एक चांगली सामाजिक-आर्थिक परिस्थिती निर्माण झाली आहे.“ PLFS -5 माहिती दर्शवते की MGNREGA ने सार्वजनिक कामांमध्ये पारंपारिक वेतन भेदभाव कमी केला आहे. त्यामुळे मनरेगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन महिलांचा सकारात्मक झालेला दिसून येतो. जिथे किमान वेतन दिले जावे, एक व्यवहार्य पर्याय म्हणून.”

अनेक राज्ये MGNREGA अंतर्गत महिला कामगारांसाठी प्रोत्साहन देखील दिले जाते . (उदा) -: केरळ एक समर्पित कल्याण निधी स्थापन केला आहे. जो कामाच्या दरम्यान कोणत्याही दुखापतीविरूद्ध विमा वाढवतो आणि 60 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिला कामगारांना आर्थिक मदत करतो.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 हा देशातील पहिला कायदा आहे, जो ग्रामीण भागातील लोकांना खेड्यातच रोजगार देतो. ही योजना 2 फेब्रुवारी 2016 रोजी सुरू करण्यात आली आणि देशातील 200 जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली. या

योजनेंतर्गत, ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील किमान एका प्रौढ सदस्याला एका वर्षात 100 दिवसांच्या शारीरिक श्रमाचा रोजगार मिळण्याचा अधिकार आहे.

सन 2007-2008 मध्ये, ही योजना 330 जिल्ह्यांमध्ये विस्तारित करण्यात आली आणि तिची लोकप्रियता लक्षात घेऊन एप्रिल 2008 मध्ये संपूर्ण देशात लागू करण्यात आली. 2 ऑक्टोबर 2009 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त केंद्र सरकारने या योजनेचे नाव नरेगा वरून ‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना असे करण्यात आले. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशात महिलांचा सहभाग वाढावा यासाठी गावागावात महिला जोडीदार नेमण्यात आल्या आहेत.

ग्रामीण भागातील लोकांना नोकरीची संधी उपलब्ध करून देणे हेच फक्त मनरेगा योजनेचे उद्दिष्टे नाही तर ग्रामीण भागातील भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा विविध अंगांनी प्रभाव देखील आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करणे आणि गरीब लोकांची संख्या कमी करणे हा या योजनेचा उद्देश आहे. तसेच ग्रामीण भागातील बचत गटांना भांडवल निर्मितीला चालना देते.

या संस्थेचे पेपर मध्ये मनरेगा मध्ये काम करणाऱ्या महिलांचा अभ्यास करणे आला आहे. तसेच या पेपरमध्ये मनरेगाचे महत्त्वाचे पैलू नमूद करण्यात आले आहेत.

**मनरेगा कायदा**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) हे भारतात लागू केलेली रोजगार हमी योजना आहे. जी ५ सप्टेंबर 2005 रोजी कायद्याद्वारे लागू करण्यात आली आहे. ही योजना कोणत्याही ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना प्रत्यक्ष आर्थिक वर्षात शंभर दिवसांचा रोजगार प्रदान करते, जे सार्वजनिक कामाशी संबंधित व कुशल कामगार दररोज 220 रुपये या किमान वेतनावर काम करण्यास इच्छुक आहेत. अशाच लोकांना हे काम उपलब्ध करून दिले जाते.

हा कायदा ग्रामीण लोकांची क्रियाशक्ती वाढवण्याच्या उद्देशाने आणण्यात आला आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागात अर्धकुशल कामात राहणारे मग ते दारिद्र्यरेषेखालील असो वा नसो नियुक्त केलेल्या कामगारांपैकी एक तृतीयांश महिलांसाठी राखीव जागा आहेत.

**कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये**

हा कायदा मागणी -आधारित वेतन रोजगार कार्यक्रम आहे. आणि केंद्र सरकारकडून साधनांचे हस्तांतरण प्रत्येक राज्यातील रोजगाराच्या मागणीवर आधारित आहे. ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्य त्यांची नाव, वय आणि पत्ता फोटो सही ग्रामपंचायतला जॉब कार्ड साठी सादर करतात. नोंदणीकृत व्यक्ती कामासाठी देखील स्वरूपात अर्ज सादर करू शकतो. (किमान 14 दिवस सतत कामासाठी ) एक तर पंचायत किंवा कार्यक्रम अधिकारी यांना अर्ज केल्याच्या 15 दिवसाच्या आत काम न दिल्यास, रोजगारांना बेरोजगारी भत्ता मिळण्याचा हक्क आहे. पाच कि. मी. अंतरावर रोजगार उपलब्ध करून दिला जाईल आणि जर ते पाच कि. मी. पुढे असतील तर अतिरिक्त मजुरी दिली जाईल. मनरेगा अंतर्गत उपलब्ध केलेल्या रोजगार एक तृतीयांश रोजगार हा महिलांसाठी उपलब्ध आहे. स्थानिक प्रशिक्षणाच्या समन्वयाने लोक सामाजिक लेखापरीक्षण करतात.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांचा मनरेगा योजनेमधील सहभाग.

२. ग्रामीण भागातील महिलांना मनरेगा योजनेचा झालेला लाभ.

**संशोधनाचा स्रोत**

या संशोधनाचा स्रोत दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे. पुस्तके, प्रकाशित लेख, मासिके , वर्तमानपत्र,इंटरनेट वेबसाईट इत्यादींचा वापर.

**सशोधन पद्धती**

संशोधकांनी वर्णनात्मक अभ्यास केला आणि या अभ्यासासाठी दुय्यम डेटा वापरला गेला. मूलभूतपणे, आवश्यक साहित्य विविध जर्नल्स, वर्तमानपत्र, मासिके, आणि समस्या आव्हानांशी संबंधित विषयांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हाताळणाऱ्या वेब-साइट्समधील लेख या अभ्यासात समाविष्ट केले गेले आहेत. महत्त्वाची वृत्तपत्रे आणि वेबसाईट्स शोधल्यानंतर, संबंधित माहिती लोड करण्यात आली आणि वर्तमान अभ्यासाची उिद्दष्टे पूर्ण करण्यासाठी तपासली गेली. या अभ्यासासाठी कोणताही प्राथमिक डेटा वापरला गेला नाही.

**सिद्धांतिक दृष्टिकोन**

प्रस्तुत निबंध शोध निबंध लेखनासाठी मनरेगा, अंतर्गत काम करणाऱ्या महिलांचा अभ्यास केला आहे यासाठी ''महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना'' या कायदा मध्ये महिलांसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये महिला सक्षमीकरण हा महत्त्वाचा उद्देश आह.

**माहितीचे विश्लेषण**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातील महिलांचा मनरेगा या योजनेमध्ये 44.94% इतका सहभाग दिसून आला आहे. हा सभा 2023 व 2024 या कालावधी मधील आहे.तसेच ग्रामीण भागातील मनरेगा या योजनेमुळे महिलांमध्ये सक्षमीकरण, तसेच आर्थिक व सामाजिक दर्जा वाढलेला दिसून येत आहे. तसेच या योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांना ग्रामपंचायत अंतर्गत काम मिळू लागले . त्यामुळे त्यांचे कामासाठीची स्थलांतरचे प्रमाण कमी झालेले दिसून येते.

**महिला सक्षमीकरणावर सकारात्मक परिणाम**

मनरेगाच्या कार्यामुळे मी महिलांना आर्थिक संसाधने प्रवेश मिळवून दिला आहेत. तसेच सशुल्क काम केले आहे. त्यामुळे ग्रामीण महिलांचा सामाजिक-आर्थिक दर्जा वाढला आहे आर्थिक स्वातंत्र्य: ग्रामीण भागात 100 दिवसांचा मजुरीचा रोजगार उपलब्ध करून देऊन, मनरेगाने महिलांना आर्थिक सुरक्षा प्रदान करून त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढवले आहे.कमी केलेले लिंग वेतन अंतर: हे समान कामासाठी पुरुष आणि महिलांना समान वेतन अनिवार्य करते ज्यामुळे उत्पन्न वितरणात समानतेला चालना मिळते.

**महिला सक्षमीकरण**

महिलांना त्यांच्या समाजात दृश्यमानता आणि मान्यता प्राप्त झाली आहे ज्यामुळे महिलांच्या भूमिका आणि क्षमतांबद्दलच्या सामाजिक दृष्टिकोनात सकारात्मक बनला आहे.

नोबेल पारितोषिक विजेते एस्थर डुफ्लो यांच्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, ग्रामीण मजुरीचे काम पितृसत्ताक नियमांना लक्षणीयरीत्या खंडित करू शकते. तसेच ग्रामीण महिलांना राजकीय निर्णय देखील प्रदान करते.MGNREGA द्वारे मिळणारे उत्पन्न देखील महिलांचे आरोग्य आणि शिक्षण सुधारण्यासाठी तसेच त्यांच्या कुटुंबियांना गुंतवले जाऊ शकते. त्याच वेळी, मनरेगा कार्यामुळे ग्रामीण भागात संधींच्या अभावामुळे होणारे त्रासदायक स्थलांतर कमी होण्यास मदत होते आणि शहरी शहरांची गर्दी टाळता येते.

**अभ्यासाचा निष्कर्ष**

हा अभ्यास महिला सक्षमीकरण, आव्हाने आणि मनरेगाच्या माध्यमातून होणारे परिणाम यावरील साहित्य पुनरावलोकनांद्वारे केलेल्या निरीक्षणाद्वारे निष्कर्ष काढतो, हा कायदा खरोखरच या योजनेत महिलांच्या सक्रिय सहभागाद्वारे महिला सक्षमीकरणाकडे नेणारा आहे. MGNREGS ची कल्पना महिला सक्षमीकरण कार्यक्रम म्हणून करण्यात आली नव्हती, तरीही, यामुळे महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण झाले आहे. MGNREGS ने महिला कामगारांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या नक्कीच सक्षम केले आहे, "लिंग – तटस्थ उपाय" जसे की मनरेगा अंमलबजावणीच्या नियोजन आणि सामाजिक ऑडिटमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे, चांगल्या कार्यस्थळाच्या सुविधा, मजुरी योग्य अदा, टप्प्याटप्प्याने कामांचे नियोजन आणि जलद तक्रारींचे निवारण. या योजनेअंतर्गत महिलांना अधिक कामाची मागणी करण्यास प्रोत्साहित करेल.

**शिफारशी**

मजुरी विलंबाने महिलांना आर्थिक अडचणींना जास्तीत जास्त सामोरे जावे लागते. आरोग्य समस्या आरोग्याशी संबंधित आदरांचा देखील महिलांच्या मनरेगा अंतर्गत दिल्या जाणाऱ्या श्रम केंद्री काम गुंतण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितींना तोंड देण्यासाठी योजनेअंतर्गत कामाचे आम्ही दिवस 100 वरून 200 दिवसापर्यंत वाढवण्याची शिफारस केली आहे. ग्रामीण विकास मंत्राने समान वेतन दर संरचना अधिसूचित करून राज्यातील वेतन समानता दूर करणे आवश्यक आहे.

समितीने सुचवलेले आहे की सरकारने या योजनेअंतर्गत विद्यमान उपजीविका प्रकल्पांच्या निर्मिती द्वारे किंवा जोडल्या जाणाऱ्या "महिलांना केंद्रित कामाच्या" चांगल्या प्रोत्सानासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.MANREGAS मध्ये महिलांच्या उच्च सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सुचवलेले उपाय ग्रामीण विकास आणि पंचायती राज्य विषयक संसदीय स्थायी समितीने दिलेल्या शिफारशी मजुरी वाढवण्याची दीर्घळाची मागणी महागाई निर्देशका शी सुयोग्य जोडणी द्वारे सोडवली जावी.

**संदर्भ ग्रंथ**

- Dr. Ritty Francis Nayanashree K.P. "Role of MGNREGA in Empowering the Women of Mandya District.
- Khera, R: Nayak, N. ( 2009. ) "Women woerkers perceptions of the National Rural Employment Guarantee Act", in Economic and Political Weekly, 44(43), pp. 49-57.

- Khera, R: Nayak, N. (2009), "Women workers, perceptions of the National Rural Employment Guarantee Act", in Economic and Political Weekly, 44(43), pp. 49-57.
- P. Arunachalam, (2011), "Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Programme and Poverty in India" serials pub ISBN: 978- 8387-439-
- John Joseph Puthenkalam & M.K. George (2012) "Human Development Strategy of MGNREGA" Rawat pub IBSN 978-81-316-0524-0
- Barrett, C. (2013), Guaranteed employment and the poor. The Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme (Washington, DC, International Food Policy Research Institute (IFPRI)).
- Barrett, C. (2013), Guaranteed employment and the poor. The Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme (Washington, DC, International Food Policy Research Institute (IFPRI)).
- "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना – वार्षिक अहवाल. २०१३-१४ नवीन प्रशासकीय भवन, १६वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२
- Minati S. (2014), "Impact of MGNREGA on women empowerment: A case study of Cuttack district in Odisha", in Journal of Organisation and Human Behaviour, 3(1), pp. 44
- Gnyaneswar, D. (2016) "Women empowerment through MGNREGS", in Anveshana's International Journal of Research in Regional Staties, Law, Social Sciences, Journalism and Management Practices, 1(7), pp. 68-75.
- Gnyaneswar, D. (2016), "Women empowerment through MGNREGS", in Anveshana's International Journal of Research in Regional Staties, Law, Social Sciences, Journalism and Management Practices, 1(7), pp. 68-75.
- Keerthi, K. Kamala, S.(2016), "Socio economic empowerment of women under MGNREGA: A review", in Paripes Indian Journal of Research, 5(10), pp. 281-283.

# १६. भारतीय समाजातील लिंगभावात्मक रुढीवादी भूमिकाः स्वरूप, आव्हाने व बदल

**प्रा. डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ.

**प्रस्तावना**

'महिलांना वस्तुनिष्ठ ठरवणारे प्रचंड पोर्नोग्राफी आणि सौंदर्यप्रसाधने उद्योग, तसेच लोकप्रिय माध्यमे आणि धोकादायक लिंग भूमिका आणि स्टिरियोटाइप यांना प्रोत्साहन देणारे इतर पुरुष-केंद्रित उद्योग आदी "भांडवलवादी पितृसत्ता" होय.' (प्रसिद्ध स्त्रीवादी अभ्यासक-कमलाजी भसीन)

'स्त्री ही जन्मत नाही, ती घडवली जाते.' सिमोन द बाव्हूआर (The Second Sex - Book)

निसर्गतः जन्माला आलेल्या मानवी नवजात अर्भकाला 'मुलगा की मुलगी' या कोटीक्रमाखाली 'सामाजिक अर्थ' दिल्या जातो. मुलगा झाला! किंवा पोरगीच झाली हो... या दोन वाक्यातही लिंगभेद आढळतो. भारतीय समाजात पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचे प्रचलन असल्यामुळे पुत्रप्राप्तीला असलेले महत्त्व अधिक आहे. त्यामुळे मुलगा जन्माला यावा अशी 'आस' मूल पोटात असल्यापासून कुटुंबीय धरतात. नव्हे त्या होऊ घातलेल्या आई-बाबांना मुलगाच होणार हे गृहीत धरून बोलले जाते. तशी अनेक लोकगीतेही आढळतात जसे: बाळा जो जो, रे मनरमणा, निद्रा करी बाळा....

अशी विविधांगी लिंगभेदात्मक स्थिती समाजात निदर्शनास येते. बाळाची जडणघडण देखील लिंग आधारित केली जाते. मुलगा की मुलगी याबाबतचा आचार-विचार पद्धतीची रुजवणूक लिंगभावात्मक दृष्टीने केली जाते. नवं पिढ्यांना शिकवले जाते. तसेच त्यांचे सामाजिकरणही केले जाते.

अशा जडणघडणीतून स्त्री व पुरुष म्हणून रूढ झालेल्या भूमिका ह्या स्त्री-पुरुषांवर लादल्या जातात. त्याला छेद देणे वा त्यात बदल घडवून आणणे आव्हानात्मक असते. सामाजिक दृष्ट्या ह्या भूमिका मोडून काढणे व व्यक्ती विशेषीकरणांनुसार त्यास स्वरूप देणे आव्हानात्मक असते. तेव्हा समाजामध्ये लिंगभावात्मक रुढीवादी भूमिका त्यांचे स्वरूप व त्यातील बदल कोणती आहेत? बदलातील आव्हाने कोणती आहेत? त्या आव्हानांना बाजूला सारण्यासाठी कोणते पर्याय असू शकतात? याबाबतचा उहापोह करण्याच्या हेतूने प्रस्तुत विवेचन करण्यात आले आहे.

**बीज सज्ञा:** लिंग, लिंगभाव, लिंगभेद, स्त्रीत्व व पुरुषत्त्व, लिंगभाव समानता, रुढी, रुढीवादी भूमिका, आव्हाने, सामाजिक परिवर्तन.

**अध्ययनाचे उद्देश**

- भारतीय समाजातील लिंगभावात्मक रुढीवादी भूमिकांचे स्वरूप समजून घेणे.
- स्त्रीत्व व पुरुषत्त्व संकल्पना स्पष्ट करणे.
- लिंगभावात्मक रुढीवादी भूमिकांच्या बदलातील आव्हाने अभ्यासणे.
- लिंगसमभाव भूमिका किंवा व्यक्ती विशेषीकरणात्मक भूमिका रूढ होण्यासाठी उपायात्मक पर्याय सुचविणे.

**अध्ययन पद्धती**

समाजामध्ये लिंगभावात्मक रूढ झालेल्या भूमिकांना छेद देतांना कोणकोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागते. याबाबत त्या घटकांशी केलेल्या चर्चेच्या माध्यमातून सदर मांडणीला प्राथमिक तथ्याची जोड देण्यात आली आहे. तर द्वितीय तथ्य संकलन करिता ग्रंथ, चित्रपट, मुलाखतींचा संदर्भ म्हणून आधार घेण्यात आला आहे.

**भारतीय समाजातील लिंगभावात्मक रूढ झालेल्या भूमिकांचे स्वरूप**

व्यक्ती, समूहाने वा समाजात राहतांना 'सामाजिक जीवन' प्रणालीनुसार त्यांना आचार-विचार अंगिकारावे लागतात. ज्यामुळे सामाजिक संरचनेच्या घटकांची निर्मिती होऊन त्यास एक प्रारूप द्यावे लागते. तेव्हा मानवी जीवनातील गोंधळ किंवा अराजगता उद्भवत नाही. परंतु समाजामध्ये जात, वर्ग, लिंग अशा विविध घटकाच्या आधारे भेदात्मक प्रणाली रूढ झाली. त्याचा विपरीत परिणाम समाजावर होतो. समाजातील लिंगभेद हा मानवी विकासातील अडथळा होय. त्याच्या स्वरूपाचा एक धांडोळा पुढील प्रमाणे......

**कुटुंब**

कुटुंबामध्ये प्रत्येकाचा दर्जा व भूमिका भिन्नभिन्न असतो. त्याचा आधार लिंग हा घटक आहे. कुटुंबामध्ये मुलगा व मुलगी अथवा पुरुष किंवा स्त्री यांना मिळणारे स्वातंत्र्य, आचरण पद्धती, स्थान हे भिन्नच. पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया दुय्यम, स्वातंत्र्य बाबतीत स्त्रिया बंदिस्त किंवा मर्यादित कार्यक्षेत्र, चूल आणि मूल या चौकटीत बंदिस्त, कौटुंबिक व्यवहार, नातेसंबंध यामध्ये श्रेष्ठत्व/मान हा प्रामुख्याने पुरुषांनाच. स्त्रीमात्र दुय्यम.

कुटुंबामध्ये अर्थाजन किंवा पैसा कमावून आणण्याची प्रमुख जबाबदारी पुरुषांची तर कुटुंबाचे खानपान, सेवा-सुश्रुषा, बालकांचे संगोपन या बाबी स्त्रियाकडे दिले जातात. मुलांच्या बाह्य गरजा जसे शाळेचे शुल्क, शालेय साहित्य व इतर वस्तू वडील घेऊन देतील तर आई त्यांच्या वैयक्तिक गरजा साफ-स्वच्छता, आजारपण याबाबी पार पाडेल. या भूमिकांची अदलाबदली झाली. तर ग्रामीण, निमशहरी भागात आजही 'हसा उडतो', चर्चेचा विषय बनतो, पुरुष खरा पुरुष नाही. तो बायकोच्या जीवावर खातो. त्यापेक्षा बांगड्या भर! असाही टोमणा मारला जातो. ही सामाजिक बंधने अथवा दबावच होय. या बाबींमुळे पुरुषांमध्ये न्यूनगंड आणि स्त्रियांमध्ये अहंभाव उद्भवू शकतो. तेव्हा आर्थिकतेच्या व कौटुंबिकतेच्या लिंगभावात्मक रूढ झालेल्या भूमिकांना छेद देणे व या भूमिकांमध्ये लवचिकतेच्या दृष्टिकोन येणे गरजेचे वाटते.

कुटुंब, व्यवसाय या स्तरावर बदलाचा आदर्श मापदंड घालून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या 'द ग्रेट किचन' या चित्रपटांमध्ये पारंपरिक दृष्ट्या रूढ झालेल्या कौटुंबिक भूमिकांना छेद देण्याचा प्रयत्न केला आहे. एक मनोरंजनात्मक बाब म्हणून चित्रपटातील लिंगभावात्मक भूमिकातील बदल छानच वाटतात. परंतु प्रत्यक्ष जीवनात मात्र अशा बदलांचा अंगीकार हे मोठे आव्हानच असते.

**पेहराव**

स्त्री-पुरुषाचे पेहराव समाजामध्ये जात, धर्म, वर्ग, प्रदेश निहाय भिन्नभिन्न आहेत. या पेहरावांची अदलाबदली ही सुद्धा स्वीकारली जात नाही. स्त्रियांचे कपडे, ड्रेस, पुरुषांनी परिधान केले तर 'तृतीयपंथी आहात का! असा अर्थ काढून त्याबाबतची परिष्कारणे दिली जातात. तर स्त्रियांनी पुरुषांचा पेहराव घातला तर तिला Bold आहे, मॉडर्न आहे. असा शिका लावला जातो किंवा त्याबाबतही निंदा होते. कुणी सहजतेने सुचवू शकते की पॅन्ट-शर्ट मध्ये महिलांचे पॅटर्न आहेत तो घ्यावा.

तसेच स्त्रियांचे केस लांबसडक असावेत. पुरुषांचे केस छोटे असावेत असेही बंधन आहेच. काही शाळांमध्ये तर मुलग्यांचे लांब केस शाळेत चालणार नाहीत. अशा अटी व शर्तीच असतात. यावरून लिंगभावात्मक भूमिका किती सूक्ष्मरित्या लोकजीवनात रुजल्या असल्याचे लक्षात येते. शालेय मुलं मुलींच्या वस्तूंचे रंग, चित्र ठरलेले असतात, त्यात बदल केलात तर torturing होतेच.

**शिक्षण**

'शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.' शिक्षणाने मानवी जीवनातील सामाजिक परिवर्तन घडवून आणणे शक्य होते परंतु शिक्षण क्षेत्रामध्येही लिंगभावात्मक भूमिकांची भिन्नता आढळते. जसे: प्राथमिक शिक्षक म्हणून प्रामुख्याने स्त्रियांवरच ही भूमिका लादली जाते. तर D. Ed. B.Ed. या शिक्षणाला मुलींची संख्या अधिक दिसते. तुलनेने इंजिनिअर, डॉक्टर्स,... अशा खर्चिक आणि तांत्रिक शिक्षणाकडे मुलांचा ओघ अधिकार आढळतो. वेगवेगळ्या उच्च पदांवर पुरुष तर सामान्य पदांवर स्त्रिया अशीही रचना आढळते. यामागील पार्श्वभूमी लिंगभावात्मक असते. शिक्षण क्षेत्रातील 'कुलगुरू' या सर्वोच्च पदावर अधिक अधिक पुरुषांचीच वर्णी आहे. तुलनेने स्त्रिया फारच कमी कुलगुरू आहेत. ही देखील लिंगभाव लिंगभाव भिन्नतेची बाब होय. कारण महिलांना मोठ्या जबाबदारीची, अधिक वेळ द्यावी लागणारी पदे सांभाळणे अनेकदा मानसिक व सामाजिक दृष्ट्या शक्य होत नाही. त्यामुळे या मानसिकतेतही बदल होणे गरजेचे वाटते.

**आर्थिक**

मानवी जीवन सुखकर करण्यासाठी आर्थिक घटक अधिक महत्त्वपूर्ण असते. अर्थाजन, उत्पादनाची साधने, आर्थिक व्यवहार याबाबी खूप महत्त्वाच्या असतात. परंतु भारतीय समाजात उत्पादनाच्या साधनांची मालकी प्रामुख्याने पुरुषकेंद्री असल्याचे निदर्शनास येते. शेती, घर व इतर बाबी या पुरुषांच्या मालकीची असतात. त्यामुळे स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या आधार मिळत नाही. त्या उत्पादनाच्या प्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीने राबतात. परंतु शेतमाल खरेदी-विक्री, प्रत्यक्ष पैशांचा व्यवहार हा पुरुषच हाताळतो. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या परावलंबी असलेली स्त्री पुरुष व त्याच्या कुटुंबावर अवलंबून असते. माहेर-सासर या संकल्पनेत ती निराधार असते. तेव्हा तिच्या जगण्याचे प्रश्न अधिकच तीव्र असतात.

समाजामध्ये स्त्रियांवर सामाजिक रूढी प्रथा परंपरांचा जाच अधिक आहे. जसे: हुंडाप्रथा व खर्चिक लग्न पद्धती.. वगैरे ज्यामुळे स्त्रियांच्या जडणघडण व विकासावर होणारा खर्च हा सामाजिक प्रथांच्या प्राबल्यामुळे, पारंपारिक सामाजिक रूढत्वावरच करावा लागतो. त्यामुळे सामाजिक प्रथांचा विपरीत परिणाम स्त्री जीवनावर पडतो म्हणून यात बदल होणे गरजेचे आहे.

**राजकीय क्षेत्र**

राजकीय क्षेत्रामध्ये सत्तासंबंध आढळतात. राजकीयक्षेत्र पुरुष केंद्रीय असल्याची प्रचिती अनेकदा येते. अद्यापही देशाच्या संसदेत ५० टक्के स्त्रिया नाहीत. १८ व्या लोकसभेच्या निवडणुकीत केवळ १३.८% इतकेच प्रमाण निवडून आलेल्या पुरुषांच्या तुलनेत महिला खासदारांचे आहे.

शेती व्यवसायात प्रामुख्याने कामाची विभागणी लिंग आधारित दिसते. जसे: नांगरणे, औत हाकणे पुरुष तर निंदन, कचरा, कापूस वेचणी स्त्रिया. पण अलीकडे काळात शेतीची सर्वच कामे स्त्रिया करू लागल्या आहेत. हा बदल स्वागतार्ह. परंतु सर्वच शेती कसणाऱ्या स्त्रियांच्या नावे शेती आहे का? किंवा शेतीतील उत्पादन बाजारपेठेत विक्रीसाठी नेता येतो का? नियमित मेहनतीचा आर्थिक व्यवहार प्रत्यक्ष हाताळता येतो का? याबाबीं मध्ये बदल झालेला नाही. शेती क्षेत्रात, बांधकाम क्षेत्रात स्त्री व पुरुषांना मिळणारी मजुरी ही सुद्धा असमान आहे.

अलीकडील काळात आई-वडिलांच्या संपत्तीत मुलाप्रमाणे मुलींना समान वाटा मिळण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किंवा लाभ घेणे दुर्लभ आहे. कारण मुलीचा विवाह झाल्यानंतर ती 'माहेरची पाहुणीन' असते असेच रूढ झाले. तिने माहेरी जास्त काळ राहू नये व संपत्तीत वाटा मागू नये. ज्या स्त्रिया वाटा मागत आहेत. त्यांना अपराधीपण वाटते. 'माहेर तुटतंय' या भावनिक ताटातुटीमुळे स्त्रिया आपला हक्क मागत नाहीत.ह्या बाबी संशोधनातूनही स्पष्ट झाल्या आहेत.

**स्त्रीत्व व पुरुषत्व**

समाजात व्यक्तीला पुरुषत्व किंवा स्त्रीत्व सिद्ध करावे लागते. जसे: स्त्री नाजूक असते. सुंदर, सुशील, लोभस असते. तिला मासिक पाळी आलीच पाहिजे. लग्नाची सक्ती आणि तिने संसार नीट केलाच पाहिजे. मुल जन्माला घातलेच पाहिजे. अशीही सक्ती असते. तर पुरुषांबाबत तो कमावता असलाच पाहिजे. कुटुंबाची जबाबदारी त्यांने पेललीच पाहिजे. लग्नाची अनिवार्यता आणि मूल होण्यास तो सिद्ध झालाच पाहिजे. पुरुष हा निर्भीड, धष्टपुष्ट, रुबाबदार असावा. अशीही सक्ती समाजाकडून पुरुषांवर केली जाते. पुरुषांना मर्दानगी सिद्ध करावी लागते. अन्यथा त्याची अवहेलना केली जाते. याही बाबी लिंगभावात्मक दृष्ट्या समाजमनाने लादलेल्याच असतात. म्हणून अनेकदा पुरुष सावधगिरीने वागतात.

काम अथवा व्यवसायाच्या क्षेत्राचे अवलोकन करता असे लक्षात येते, की काही क्षेत्रात पुरुषांसाठीच आहेत. अशी मनोवृत्ती दिसून येते. जसे: लष्कर-सैन्य, बांधकाम, अभियांत्रिकी क्षेत्र... वगैरे तर कुटुंब, शाळा, घरकामे कामे ही क्षेत्रे स्त्रियांसाठी राखीव ठेवली जातात.

**लिंगभावात्मक रूढीवादी भूमिकांच्या बदलातील आव्हाने**

कोणत्याही मुलाचा बाप/वडील कसा असावा याचा पायंडा म्हणजे 'धाक ठेवणारा' असाच होता. अनेक घरांमध्ये 'बाबा/वडील' घरी आले, की घरामध्ये अत्यंत शांतता पसरायची. एक भीतीयुक्त आदर निर्माण व्हायचा. याबाबत जेव्हा जाणीव व्हायला लागली, तेव्हा अनेक पालकांनी उद्देशपूर्ण प्रयत्नशील 'मित्रत्वाप्रमाणे वडील' यास प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न केला. याबाबतची चर्चा घडवून आणली. अमीर खान प्रणित 'सत्यमेव जयते' या सिरीज मध्येही हा विषय हाताळण्यात आला. लिंगसमभावावर कृतीशील वैचारिक मांडणी करणारे 'सम्यक'-पुणे संस्थेचे संचालक श्री. आनंद पवार हे देखील पितृसत्ताक व्यवस्थेत बाप नावाच्या व्यक्तीला ही व्यवस्था कशी तटस्थ, धाक ठेवणारा या भूमिकेत राहण्यास भाग पाडते. याबाबतचे विवेचन करतात. म्हणूनच अलीकडे 'ओ बाबा ऐवजी ये बाबा' असा एकेरी प्रेमाचा संवाद वडिलांशी होऊ लागला. याबाबी सामाजिक बदलाच्याच आहेत. परंतु याचे सर्वत्र प्रचलन आढळत नाही.

अलीकडील काळात महिला लष्कर, वैमानिक, डॉक्टर, इंजिनियर, संशोधक, शेतकरी, ट्रॅक्टर चालक, ऑटो चालक, बस चालक, कंडक्टर, मेकॅनिकल अशा अनेक आव्हानात्मक क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करीत आहेत, हा बदलाचा प्रवास मुलींसाठी निश्चितच सोपा नव्हता आणि नाही परंतु सुरुवात होते आहे ही जमेची बाजू आहे इतकेच.

**स्त्रीत्व व पुरुषोत्त्वातील बदल**

'KE & KA' चित्रपटात दर्शविल्याप्रमाणे स्त्री व पुरुषांच्या भूमिकांची अदलाबदली समाज सहजतेने स्वीकारत नाही. ग्रामीण भागात तर नाहीच. परंतु नव पिढ्यांची जबाबदारी आहे की लिंगभेदात्मक परंपरांना त्यांनी छेद द्यावा. चूल आणि मुल हेच म्हणजे स्त्रीचे जीवन नाही तर तिचेही स्वप्न आहेत. तिलाही व्यावसायिक जीवन, स्वातंत्र्याचा अवकाश आहे. तिचेही आयुष्याचे काही नियोजन आहे. तिलाही आत्मसन्मान आहे. आणि तिची एक पोझिशन म्हणजे जागा आहे. याबाबी जोडीदार, कुटुंब, समाजमनाने स्वीकृत कराव्यात. करिअर ओरिएंटेड स्त्रीला मूल दत्तक घ्यायचे असेल किंवा 'सरोगसी मदरची' सेवा घ्यायची असल्यास तिला सर्वांचा पाठिंबा व सहाय्य मिळणे गरजेचे आहे. तेव्हाच ती व्यक्ती म्हणून स्वतःला सिद्ध करू शकेल. अन्यथा पितृसत्ताकतेची बळी ठरेल.

तर प्रत्येकच पुरुष धारिष्ट्यवान असेल असे नाही. प्रत्येकच पुरुषाला नोकरी, व्यवसाय करता येईल असेही नाही. तेव्हा ज्या पुरुषांना घर आणि मुले सांभाळायचे आहेत त्यास ती संधी असावी. त्याबाबतची स्वीकृती असावी. पुरुषही मवाळ, प्रेमळ, हळवे असू शकतात. त्याचाही व्यक्ती म्हणून स्वीकार व्हावा. काही कारणांनी मूल होऊ शकत नसल्यास वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मार्ग अवलंबण्याची संधी असावी. पण इतकी प्रगल्भता आप्तेष्टांमध्ये आढळत नाही. म्हणूनच इतरांच्या कळीच्या मुद्द्याचीच विचारणा नेमकेपणाने अनेकदा आप्तेष्ट करीत असतात. ही लिंगभेद मानसिकताच होय.

**विवाह**

ज्या मुलांची जितकी कमाई किंवा पॅकेज असेल, त्यानुसार त्यास लग्नासाठी वधू मिळते. ज्यांना कायमस्वरूपी नोकरी नाही किंवा ज्यांच्याकडे संपत्ती, उत्पादनाचे स्त्रोत नाहीत त्यांचे लग्न जुळणे कठीण होत आहे. आजमितीस ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न जुळणे तर मोठे आव्हानच बनले आहे.

**तात्पर्य**

समाजामध्ये श्रमाची विभागणी ही जात, लिंग, वर्ग या आधाराने न होता, 'व्यक्ती विशेषीकरणाला' वाव देऊन व्हावी. त्यानुसार नोकरी, व्यवसाय, काम निवडण्याची संधी व्यक्तीला मिळावी व त्यानुसार त्या त्या व्यक्तीला स्वतःला सिद्ध करण्याचा आणि समाज उपयुक्त भूमिका पार पाडण्याचा अवकाश उपलब्ध व्हावा. जेणेकरून कुठल्याही सामाजिक भेदभावाला व्यक्ती, कुटुंब, आणि समाज बळी पडणार नाही. व कुणी श्रेष्ठ, मध्यम अथवा कनिष्ठ अशी श्रेणीरचना राहणार नाही. ज्याच्यामध्ये जी क्षमता आहे आणि त्याची आवड आहे अशा बाबी व्यक्ती अगदी सहजपणे पुढे नेऊ शकतील.

निसर्गाचे हे वास्तव आहे, की स्त्रीच्या शरीर रचनेनुसार तिला पुनरुत्पादनाची जबाबदारी दिलेली आहे आणि त्यास जोड हवी ती पुरुषांची. समाजाचे व कुटुंबाचे सातत्य पुढे नेण्याच्या अनुषंगाने स्त्री-पुरुषांनी समाजाचे महत्त्वपूर्ण घटक म्हणून आपली भूमिका पार पाडावी व समाज उपयुक्त असे वर्तन करून मानवहिताची व समाजहिताची वाटचाल करावी. त्यातच तथ्य दडले आहे.

**सोबतच**

- पुरुषप्रधान व पितृसत्ताक मानसिकता बाजूला सारण्याची देखील गरज आहे. लिंग समभाव रुजवावा.
- स्त्रियांना व्यक्ती म्हणून पुरुषा समान दर्जा मिळण्याची ही गरज आहे.
- स्त्रियांच्या आवडीनिवडीप्रमाणे त्यांना व्यवसायिक क्षेत्र निवडण्याची मुभा मिळणे व त्यास पोषक वातावरण निर्माण होणे हेही गरजेचे आहे.
- अलीकडील काळात नोकरी व्यवसायामध्ये महिला मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. तेव्हा कुटुंबातील व्यक्तींनी काम करणाऱ्या स्त्रियांना सहाय्य करणे. कुटुंबातील जबाबदारी वाटून घेणे अत्यंत गरजेचे आहे.
- भारतीय समाजातील स्त्रियांबद्दल असलेली दुय्यम स्थिती व सामाजिक समस्या, स्त्री हिंसाचार या बाबींना आळा घालण्यासाठी व बाजूला करण्यासाठी घटनात्मक तरतूद व कायद्यात्मक संरक्षणाची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची**


- आगलावे प्रदीप, (२००१), 'समाजशास्त्रीय संकल्पना आणि सिद्धांत', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
- बोधनकर , अलोणी, (२००७), 'सामाजिक संशोधन पद्धती', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
- पुरुष स्पंदन, माणूसपणाच्या वाटेवरची, (दिवाळी अंक), २०२३, मुंबई

- Simone, de Beauvoir, (1949), ‘The Second Sex,
- शिंदे ताराबाई, Edi. महेंद्र मुंजाळ, ‘स्त्री-पुरुष तुलना’शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर
- यशदा, (२००४), ‘समता, सामाजिक न्याय, आणि लिंगभेद’, यशदा पुणे.
- https://www.amazon.in/What-Patriarchy-primaries-Kamla-Bhasin/dp/8185107734
- https://www.youtube.com/watch?v=svJaA8NhjCg
- https://www.youtube.com/watch?v=aOLYIzJnKT4
- https://genderlenswscsgbau.blogspot.com/2023/09/

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# १७. स्त्री हत्या करणाऱ्या सामाजिक कुप्रथा

**प्रा. डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील**
इतिहास विभाग प्रमुख, मिरज महाविद्यालय, मिरज, सांगली.

**प्रस्तावना**

प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांना उच्च स्थान होते. गृहलक्ष्मी, देवता, माता, भगिनी, कन्या, पत्नी अशा अनेक नाते संबंधाने तिचे महत्त्व अधोरेखित केले पण केव्हा ? तर ती जन्माला आल्यानंतर ! मुलगी जन्माला आल्यानंतर तिचे स्वागत केले जात होते का ? याविषयी परस्परविरोधी मतप्रवाह आणि पुरावे पाहायला मिळतात. तसेच तिच्या जन्मानंतर सुद्धा ती अस्तित्वात राहिलीच तर तिची अनेक प्रकारे छळवणूक होते. अन्याय, अत्याचार केले जातात व जीवांशी मारले जाते किंवा आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जाते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत पुरुषप्रधान व्यवस्थेमधून स्त्रियांवर अत्याचार केले जातात त्यामुळेच अनेक अशा कुप्रथा अथवा रूढी परंपरा आहेत की त्यामधून स्त्रियांच्या हत्या होत होत्या आणि होत आहेत.

**उद्दिष्टे**

१. स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारासंदर्भात ज्या कुप्रथा आहेत त्यांचा अभ्यास करणे.

२. स्त्रियांच्या हत्त्येला जबाबदार असणाऱ्या अनेक रूढी परंपरांची चिकित्सा करून वर्तमान परिस्थितीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

सदर शोध निबंधासाठी प्राथमिक, समकालीन संदर्भ साधने वापरली आहेत. त्यामध्ये वृत्तपत्रे, विविध अहवाल, दुय्यम संदर्भ ग्रंथ यांचाही अभ्यास व चिकित्सा करून विश्लेषणात्मक पद्धतीने शोधनिबंधाची मांडणी केली आहे

**विषय विवेचन**

स्त्रियांच्या हत्त्ये संदर्भात ज्या अनेक कुप्रथा होत्या आणि आहेत त्यामध्ये स्त्रीभ्रूणहत्या, बालविवाह, विवाहानंतर तिच्यावर होणारे कौटुंबिक हिंसाचार, अन्याय,अत्याचार त्यातून घेतले जाणारे बळी तसेच अन्याय अत्याचार करत असताना केलेल्या मारझोडीतून अत्याचारातून झालेल्या हत्या, स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, पती निधनानंतर सती जाण्याची प्रथा अशा अनेक कुप्रथा आहेत. त्यामुळे पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रिया अनेक वर्षे अत्याचाराला बळी पडून मारल्या जात होत्या आणि वर्तमानकाळातसुद्धा मारल्या जात आहेत.

**स्त्रीभ्रूणहत्या**

पितृसत्ताक समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम दर्जा देण्यात येऊन त्यांना शूद्र मानले जात होते. भारतामध्ये मुलाला वंशाचा दिवा, घराण्याचा वारसदार, मृत्यूनंतर अग्नी देऊन मुक्ती देणारा मुक्तीदाता,म्हातारपणाची काठी अशा विविध दृष्टीकोनातून पाहिले जात होते.

त्यामुळे मुलाला असाधारण महत्व होते. या दृष्टिकोनातून व तुलनात्मक पाहता मुली या दुय्यम समजल्या जात होत्या. "स्त्री गरोदर राहिल्यानंतर तिच्या गर्भाशयामध्ये 'स्त्री' अभ्रक असल्याची आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तपासणी करून तो भ्रूण विविध उपायाद्वारे नष्ट करणे याला स्त्रीभ्रूणहत्या म्हटली जाते". प्राचीन काळी स्त्री भ्रूण जन्माला आल्यानंतर लगेचच अल्पावधीत नष्ट केले जात होते. काही अंशी स्त्रीला जरी महत्त्व दिले गेले असले, लक्ष्मी, देवी, सरस्वती, दुर्गा, असे अनेक संबोधने देऊन पवित्र मानले जात असले तरीसुद्धा प्रत्यक्षात या पद्धतीने महत्त्व फार कमी प्रमाणामध्ये दिसून येते. 'पहिली बेटी धनाची बेटी' अशी म्हण होती पण त्याचबरोबर 'मुलगी हे परक्याचे धन' असेही मानले जाऊन कन्यादान श्रेष्ठ दान असा समजसुद्धा त्यावेळेला समाजामध्ये होता. या सर्व गोष्टींमधून हेच लक्षात येते की स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्वच मान्य केलेले नव्हते. स्त्रीचे कन्यादान करावयाचे व त्याबरोबर वरदक्षिणा स्वरूपात मोठ्या प्रमाणामध्ये आर्थिक व्यवहार होत असत. ही वरदक्षिणा देण्याची पद्धत निर्माण होण्याची विविध कारणे आहेत पण ही प्रथा वधु पित्याची शोषण करणारी व त्यानंतर स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचारास कारणीभूत ठरणारी होती. त्यामुळे मुलगा असेल तर हुंडा अथवा वरदक्षिणा रूपाने धनप्राप्तीची लालसा वरपित्यांना होती. या दृष्टिकोनातून 'मुलगी नको' अशी मानसिकता होत असे. विरोधाभासाचा भाग म्हणजे मुलाच्या हव्यासापोटी अनेक मुली ही जन्माला घालण्याची उदाहरणे पाहावयास मिळतात. मुलगी नको मुलगा हवा म्हणून मुलगा होईपर्यंत सात, आठ, नऊ इतक्या मुली जन्माला घातल्या जात होत्या पण जन्माच्या वेळी तिचे उत्साहाने स्वागत केले जात नसेल तर नको असणारी मुलगी जन्माला आली म्हणून तिचे नाव 'नकुसा'(नकोशी)असे ठेवले जात होते. काही वेळा तर मुलीची जन्मल्याबरोबरच हत्या केली जात असे ज्या स्त्रीने 'मुली पासून स्त्री'पर्यंत जीवन प्रवास केला व दुसऱ्या मुलीला जन्म दिला आणि ती आई झाली पण तीच आई या स्त्रीभ्रूणहत्येला जबाबदार असल्याचे दिसून येते. एकोणीसाव्या शतकात महाराष्ट्रापेक्षा माळवा प्रांतात ही प्रथा जास्त प्रचलित होती. 'दर्पण' या वृत्तपत्रात बाळशास्त्री जांभेकर यांनी याविषयी मते मांडली आहेत.१ महाराष्ट्रामध्ये याविषयी प्रबोधन करण्यासाठी इंग्रज सरकारने सन १८४४ मध्ये निबंध स्पर्धा ठेवली होती त्यामध्ये डॉ. भाऊ दाजी लाड यांनी 'फीमेल इन्फंट्रीसाईड' हा बक्षीसपात्र निबंध लिहून स्त्रीभ्रूणहत्येची निर्भत्सना व निषेध केल्याचे दिसून येते.२ स्त्रीभ्रूणहत्येसारखी समाजात खोलवर रुजलेली अनिष्ट पद्धत नष्ट करण्यासाठी माऊंट स्तुअर्त एल्फिन्स्टन यांनी सन १८२५ मध्ये 'बालहत्या फंड' निर्माण केला व सरकारने गोळा केलेल्या दंड वसुलीच्या पैशातून मुलीच्या बापाने मुलीला मारून टाकू नये म्हणून पैसे द्यावेत अशी व्यवस्था केल्याचे पहावयास मिळते.३

अलीकडील आधुनिक काळात तंत्रज्ञानाच्या व विज्ञानाच्या शोधामुळे मुलीचा जन्म होईपर्यंत वाट न पाहता गर्भाशयातच लिंग परीक्षण करून तो गर्भ नष्ट करणे सोपे झाले आहे. त्यामुळे विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्त्रीभ्रूणहत्या मोठ्या प्रमाणात होऊ लागल्या आहेत. NITI आयोगाच्या २०१८ च्या अहवालानुसार भारतात सन २००१ ते २०११ दरम्यान एक कोटीहून जास्त मुलींचा जन्म टाळला. स्त्रीभ्रूणहत्या हा महाराष्ट्रातीलसुद्धा एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे, ज्यामुळे लिंग गुणोत्तरात असंतुलन निर्माण होत आहे. अलीकडील आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर १००० मुलांमागे ९२४ मुली असे आहे, जे राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी

आहे. विशेषतः, बीड, जळगाव, जालना, उस्मानाबाद आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये स्त्रीभ्रूणहत्येच्या घटना अधिक प्रमाणात आढळतात.

स्त्रीभ्रूणहत्येच्या प्रतिबंधासाठी, महाराष्ट्र शासनाने 'प्रिकॉनसेप्शन अँड प्री-नॅटल डायग्नोस्टिक टेक्निक्स (PCPNDT) कायदा' कठोरपणे लागू केला आहे. या अंतर्गत, २०२३-२४ या वर्षात १५० पेक्षा अधिक सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यात आली, ज्यापैकी ३० केंद्रांवर अनियमितता आढळून आली आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

**सती प्रथा**

सती प्रथा हे पुरुषप्रधान व्यवस्थेचेच उदाहरण आहे. स्त्रियांची पुरुषप्रधान व्यवस्थेत समाज मान्य हत्या करण्याची प्रथा म्हणजे सती प्रथा अथवा सतीची चाल होय. सती प्रथा जगातील अनेक देशात होती तशी ती भारतात ही होती. भारतात ती प्राचीन काळापासून असलेली दिसून येते याचे दाखले वास्त्यायानीच्या ‘कामसूत्र’ व पद्मपुराणात पहावयास मिळतात. बाणभट्टाच्या ‘हर्षचरिता’ व ‘कादंबरी’ या ग्रंथात या प्रथेचा निषेध केला आहे. बाणभट्ट हा ‘सती प्रथेचा पहिला विरोधक’ मानावा लागेल. प्रथा प्राचीन आहे व विरोधही प्राचीन आहे, तरीदेखील ही प्रथा भारतामध्ये आधुनिक कालखंडापर्यंत चालू होती. मध्ययुगात शिवकाळात शिवाजी महाराजांनी जिजाऊंना सती जाण्यापासून प्रवृत्त केले होते हे उदाहरण सोडले तर ब्रिटिश आमदानी पर्यंत सतीची चाल होतीच. राजा राममोहन रॉय यांनी या प्रथेला अभ्यासपूर्ण प्रचंड विरोध करून सती प्रतिबंधक कायदा करण्यास तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड बेटिंग यास भाग पाडले. लॉर्ड बेटिंगने चार डिसेंबर १८२९ रोजी हा कायदा पास केला. वधू-वरांनी अग्निसाक्ष ठेवून आमरण जगण्याची शपथ घेतलेली असते या श्रद्धेतून पतीच्या निधनानंतर पती बरोबर सहगमनाची प्रथा रूढ झाली असावी असे मानले जाते. पण असे असेल तर पत्नी निधनानंतर पतीने सहगमन करण्याची प्रथा नव्हती म्हणजेच पतीनिधनानंतर ही स्त्रीवर पतीचा हक्क आहे ही सुचित करणारी ही प्रथा होती. स्त्री सती गेली नाही तर विधवांना होणारा त्रास, संपत्तीतील हिस्सा जाऊ नये, तिचे शील भ्रष्ट होऊ नये यातूनही ही प्रथा निर्माण केली होती. सती गेल्यानंतर मोक्ष व स्वर्ग प्राप्ती होते. पतीवरची निष्ठा सिद्ध होते, प्रेम सिद्ध होते, या विचाराने स्त्रीला सती जाण्यासाठी प्रभावित केले जात असे.६ स्त्री सती गेल्यानंतर तिच्या नावे सतीचे मंदिर बांधले जात असे. त्यामध्ये तिच्या स्मृती प्रीत्यर्थ ‘वीरगळशीला’ स्थापन केली जात असे. अशी शिला सांगली शासकीय वस्तू संग्रहालयामध्ये पहावयास मिळते. महाराष्ट्रामध्ये माऊंट स्तुअर्त एल्फिन्स्टन यांनी सती विरोधात कारवाई करण्याचा प्रयत्न केल्याची दिसून येते.

**हुंडाबळी**

पुरुषप्रधान व्यवस्थेत हुंडा देण्याची प्रथा पूर्वीपासून अस्तित्वात होती. विवाहानंतर मुलीला तिच्या वडिलांच्या संपत्तीतील वारसा मिळत नसे. त्या ऐवजी लग्नात वरदक्षिणा म्हणून वडिलांना परवडेल इतकी मालमत्ता स्त्रीधन म्हणून मुलीला दिली जात असे हे स्त्रीधन स्त्रीला तिच्या संसारिक संकटात उपयोगी पडत असे. तसेच सालंकृत कन्यादान हे मोक्षप्राप्तीसाठी दहा दानापैकी एक महत्त्वाचे ‘महादान’ मानले होते. या पद्धतीमुळे समाजातील गरीब घरातील मुली आत्महत्या करतात अथवा हुंडा द्यावा लागतो म्हणून आई वडीलच स्त्रीभ्रूणहत्या करतात. विवाहप्रसंगी हुंडा हा वर पक्षासाठी प्रतिष्ठेचे लक्षण मानला जातो. त्यामुळे वर पक्षाकडून मानपान झाला

नाही म्हणून स्त्रीचा हुंडाबळी घेतला जातो. महाराष्ट्रात दर बारातासाला एक हुंडाबळीची घटना घडते तर दर सोळा तासाला एक हुंडासंबंधी गुन्हा घडतो. भारतामध्ये सन१९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा केला. त्यानंतर सन २०१८ पर्यंत त्यामध्ये अनेक बदल केल्याचे दिसून येते. यानुसार जास्तीत जास्त सहा महिने कारावास व पाच हजार रुपये दंड अशी शिक्षेची तरतूद आहे.४ भारतात सन २०१७ ते २१ दरम्यान ३५४९३ हुंडाबळीची नोंद झाली आहे.५

**कौटुंबिक हिंसाचार**

महिलांवरील कौटुंबिक अत्याचार, ज्याला आपण घरगुती हिंसा म्हणतो, ही भारतातील एक गंभीर आणि व्यापक समस्या आहे. कौटुंबिक हिंसाचार म्हणजे कौटुंबिक नात्यांमध्ये होणारी कोणतीही शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक अथवा भावनिक छळवणूक वृत्ती होय. यातूनच महिलांची हत्या व मृत्यू सारख्या घटना घडून येतात. पुरुष सत्ताक कुटुंब व्यवस्थामुळे स्त्रियांना कमी लेखणारी सामाजिक प्रथा, परंपरा, आर्थिक विषमता, ज्ञानाचा अभाव, यातूनही प्रकार होत असत. ७

महाराष्ट्रामध्ये शाहू महाराजांनी 'दोन ऑगस्ट १९१९ रोजी स्त्रियांना क्रूरपणे वागविणे नाहीसे करावे किंवा त्यास प्रतिबंध करावा म्हणून केलेले नियम', अशा नावाचा 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा' केला होता. सन २००५ मध्ये भारत सरकारच्या महिला व बालकल्याण विकास मंत्रालयाने महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्यासाठी 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा' करण्यात आला. दि. २६ ऑक्टोबर २००६ पासून तो अंमलात आला. पण वर्तमान परिस्थितीत महिलांवरील अत्याचार वाढतच आहेत बलात्काराच्या घटना अत्यंत क्रूरपणे घडल्याचे निदर्शनास येते.८ निर्भया, कोपर्डी, कलकत्ता, बदलापूर, पुणे, अशा देशभरात व महाराष्ट्रात असंख्य घटना घडत आहेत. कौटुंबिक हिंसाचारामुळे भारतात दर ६०मिनिटांनी एका महिलेचा मृत्यू होतो. महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या अहवालानुसार, सन २०१६ ते २०२१ या कालावधीत महिलांविरुद्ध २२.८ लाख गुन्हे नोंदवले गेले, ज्यापैकी ७ लाख प्रकरणे घरगुती हिंसेशी संबंधित होती. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे (NFHS-5) च्या अहवालानुसार, १८ ते ४९ वयोगटातील सुमारे ३०% महिलांना १५ वर्षांच्या वयानंतर शारीरिक हिंसेचा सामना करावा लागला आहे. यापैकी फक्त १४% महिलांनी त्यांच्याविरुद्ध झालेल्या शारीरिक किंवा लैंगिक हिंसेबद्दल इतरांना सांगितले. शिक्षणाच्या अभावामुळे घरगुती हिंसेची शक्यता वाढते, असेही या सर्व्हेमध्ये नमूद केले आहे. कधीही शाळेत न गेलेल्या ४०% महिलांना शारीरिक हिंसेचा सामना करावा लागतो, तर शालेय शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये हा आकडा १८% आहे. शिक्षणाच्या अभावामुळे महिलांवरील हिंसेची शक्यता वाढते, असेही या सर्व्हेमध्ये नमूद केले आहे. कर्नाटक राज्यात घरगुती हिंसेचे प्रमाण सर्वाधिक आहे, जिथे ४८% महिलांना अशा प्रकारच्या हिंसेचा सामना करावा लागतो. बिहार (३९.६%), मणिपूर (३८%), तेलंगणा आणि तामिळनाडू या राज्यांमध्येही हे प्रमाण जास्त आहे. लक्षद्वीपमध्ये हे प्रमाण सर्वात कमी (२.१%) आहे.

घटनेच्या अनुच्छेद १५ (३) अंतर्गत, महिलांच्या संरक्षणासाठी विशेष कायदे तयार करण्यात आले आहेत. घरेलू हिंसा प्रतिबंधक अधिनियम, २००५ हा त्यातील एक महत्त्वाचा कायदा आहे, ज्याद्वारे महिलांना त्यांच्या कुटुंबातील हिंसेपासून संरक्षण मिळते. या समस्येच्या तीव्रतेमुळे, महिलांच्या सुरक्षेसाठी सरकारने विविध उपाययोजना केल्या आहेत. गृह मंत्रालयाच्या महिला सुरक्षा

विभागाद्वारे, माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढवून आणि फॉरेन्सिक विज्ञानाच्या मदतीने गुन्हेगारी न्याय प्रणाली अधिक सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**निष्कर्ष**

महिलांच्या सर्वांगीण विकासातील अडथळा असणाऱ्या या कुप्रथांबद्दल स्त्रियांमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे. तसेच स्त्रियांनी सुद्धा आत्मसन्मान मिळवण्यासाठी कोणत्याही अंधश्रद्धेला बळी न पडता विज्ञानवादी दृष्टिकोनातून चौकस बुद्धीने जगण्याचा निर्धार केला पाहिजे. महिलांवरील कौटुंबिक अत्याचार ही सामाजिक आणि वैयक्तिक पातळीवर गंभीर समस्या आहे. आकडेवारीतून स्पष्ट होते की, भारतात अनेक महिला आजही घरगुती हिंसा, मानसिक त्रास, आर्थिक शोषण आणि अन्यायाचा सामना करत आहेत. शिक्षणाचा अभाव, सामाजिक मानसिकता, आणि न्याय प्रणालीतील अडथळे यामुळे ही समस्या अधिक तीव्र होते.

कौटुंबिक हिंसाविरोधी कायदे जसे घरेलू हिंसा प्रतिबंधक अधिनियम, २००५ महिलांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करतात, पण याची अंमलबजावणी अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे. यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा सक्रिय सहभाग, महिलांचे सशक्तीकरण, शिक्षणाचा प्रसार, आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने या समस्येवर तोडगा शोधणे अत्यावश्यक आहे. उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि महिलांच्या सुरक्षेसाठी समाजातील सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक आहे. महिलांनी त्यांच्या अधिकारांची जाणीव ठेवून, अशा घटनांच्या विरोधात आवाज उठवणे आणि आवश्यकतेनुसार कायदेशीर मदत घेणे गरजेचे आहे.

महिलांनी आपल्या अधिकारांची जाणीव ठेवून हिंसेविरोधात आवाज उठवला पाहिजे. सरकारच्या उपाययोजना आणि सामाजिक जाणीवेच्या माध्यमातूनच महिलांवरील अत्याचार कमी करण्यास मदत होऊ शकते. महिलांच्या सन्मान आणि सुरक्षिततेसाठी ही लढाई व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर सुरू ठेवण्याची गरज आहे.

**संदर्भ व तळटीपा**

१. मेमॉयर्स अँड रायटिंग्ज ऑफ बाळशास्त्री जांभेकर: संपादक जांभेकर १९५० भाग दोन पृष्ठ १२०.

२. रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा, पद्मगंधा प्रकाशन पुणे, २००५ पृष्ठ ३१६.

३. इंडियन इन्फंट्साईड: जॉन केव्हा ब्राऊन, प्र. आ. १८५१ पृष्ठ ४७,४८.

४. मराठी विश्वकोश, हुंडा पद्धती गजेंद्र कडव online, ०७/०४/ २०२१

५. इंडिया न्यूज प्रेस ऑफ इंडिया online,१४/१२/२०२२

६. गजेंद्रगड व्ही. एन. मराठी विश्वकोश,साळगावकर,जोतीभास्कर जयंतराव, संपा. भारतीय इतिहास आणि संस्कृती,एप्रिल,जून,२००८ मुंबई.

७. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा,२००५,Govt.Wed.delhi.govt.in

८. सोलापूर ग्रामीण पोलीस, http:solapurpolice.gov.in

# १८. मुस्लीम पथ विक्रेते स्त्री आणि पुरुष यांच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास

**तैय्यबा अप्पासाहेब मुलाणी**
समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**घोषवारा**

सदर लेख हा मुस्लीम पथ विक्रेते स्त्री आणि पुरुष यांचा तुलनात्मक अभ्यास ह्याच्याशी संबंधीत आहे . मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष यांच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे हे ह्या संशोधणाचे उद्दिष्ट आहे. ह्या उद्देशाने प्रश्नावली तंत्र घेऊन प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून सहेतुक नमुना पद्धतीने ३० उत्तरदात्यांची निवड करून मुलाखत अनुसुचीद्वारे तथ्य संकलन करून तथ्य विश्लेषण करण्यात आले. या अभ्यासातून मुस्लीम पथविक्रेत्यांची शैक्षणिक पातळीकमी असल्याचे दिसून आले. मुस्लीम समाजामध्ये पारंपारिक व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. मुस्लीम पुरुष पथविक्रेत्यांपेक्षा मुस्लीम स्त्री पथ विक्रेत्यांचे उत्पन्न तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याचे दिसून आले.

**प्रस्तावना**

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहत असून साधारणतः प्रत्येक धर्मानुसार, जातीनुसार त्यांचे व्यवसाय ठरलेले दिसून येतात. मुस्लीम ,सिख ,पारसी इत्यादी मधून मुस्लीम समाज हा सर्वात मोठा अल्पसंख्याक समाज म्हणून ओळखला जातो. २०११ च्या जणगणनेनुसार इतरांशी तुलना करता १४.२% इतकी भारतातील मुस्लीम लोकसंख्या असून हा मुस्लीम समाज आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेला दिसून येतो. मुस्लीम समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे कारण इतर धर्मातील लोकांशी तुलना करता मुस्लीम धर्मातील लोकामध्ये साक्षरतेचे प्रमाणकमी आहे. मुस्लीम समुदायातील बेरोजगारी,अशिक्षितपणा ह्या अश्या कारणामुळे मुस्लीम स्त्री आणि पुरुष यांना रोजगारासाठी व्यवसाय करणे गरजेचे आहे. त्यामुळे मुस्लीम समाजातील लोक हे साधारणपणे हातगाडी,पठरीवाले,पथविक्रेते इत्यादी व्यवसाय करताना दिसतात .

ग्रामीण भागातील मुस्लीम समाजकडे शेती नसल्यामुळे स्वयंरोजगार करण्याकडे मुस्लीम समुदायाचा कल असल्याचा दिसून येतो. ७०.७०% मुस्लीम असंघटीत क्षेत्रात काम करणारे आहेत. असंघटीत क्षेत्रात काम करताना हेच पथविक्रेते अधिक प्रमाणात गुंतलेले दिसून येतात.२०११ साली राज्यपातळीवर अल्पसंख्यानकांचा जो सर्वेनुसार, त्यामध्ये ४२.५%मुस्लीम लोक संख्येतील ३२.४% मुस्लिमांनी कामगार असल्याची नोंद केली. स्त्री -पुरुष कामगार अशी तुलना केली तर १२.६७%स्त्री कामगार व ४९.९७% पुरुष कामगार अशी विभागणी आहे. ग्रामीण भागात १ चतुर्थांश मुस्लीम स्त्रिया कामगार आहेत. शहरात हे प्रमाण ६.३ %आहे.

रफिक सुरज हे मुस्लीम समाजाच्या व्यवसायाविषयी मत मांडताना म्हणतात कि, ‘बहुसंख्य मुस्लीम लोक हे हातगाडी व्यवसाय कडे वळलेले आहेत.’ ‘रह्बर’ मधील सलीम यांनी मुस्लीम समाज हा कोणताही धंदा करायला लाजत नाही, कमावत्या पोराला विचारलं,बाबारं तू पोटापाण्याच काय धंदा करतोस? त्यावर त्याच त्याचं उत्तर असते, “मै धूपकाले में गारेगार बेचतू, निवकाले में छत्र्या दुरुस्तीका धंदा कर्तु हौर थंडी में थंडी मै थियेटर के सामने अंडा आम्लेट का गाडा लगातु...” असे मुलगा उत्तर देतो. अश्याप्रकारे मुस्लीम समाजातील लोक हे पथविक्रेते व्यवसाय करत असल्याचे सलीम यांच्या अभ्यासातून दिसून येते.

मुस्लीम पथविक्रेते समुदायात पुरुष व स्त्री दोन्हीही पथविक्रेते व्यवसाय करत असून पुरुषापेक्षा महिलांना अनेक समस्या आणि अडचणींना सामोरे लागते. मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष यांची आर्थिक-सामाजिक स्थिती जाणून घ्यायची असेल तर त्यांच्या स्थितीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामुळे संशोधन लेखात मुस्लीम पथ विक्रेते स्त्री आणि पुरुष यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला दिसून येतो .

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष यांच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे हे ह्या संशोधणाचे उद्दिष्ट आहे.

**गृहीतक**

मुस्लीम स्त्री- पुरुष पथविक्रेत्यांपेक्षा मुस्लीम स्त्री पथ विक्रेत्यांचे उत्पन्न तुलनात्मक दृष्ट्या कमी आहे.

**संशोधन विषयाचे महत्व**

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून मुस्लीम धर्मातील असंघटीत क्षेत्रातील काम करणाऱ्या म्हणजेच मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा म्हणजेच त्यांचे आर्थिक जीवन, शैक्षणिक स्थिती,कामाच्या ठिकाणी असणारी परिस्थिती आणि त्यांना जाणवणाऱ्या समस्यांची मांडणी करण्यात आली आहे. सदर संशोधनाच्या माध्यामातून मुस्लीम धर्मातील असंघटीत क्षेत्रातील काम करणाऱ्या स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोनात सकारात्मक बदल होईल. तसेच असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या मुस्लीम पथविक्रेते स्त्री- पुरुष यांच्या सामाजिक- आर्थिक स्थिती तुलनात्मक परीक्षण करून विविध समस्याचे विश्लेषण करण्यासाठी हा विषय महत्वपूर्ण आहे.

**संशोधन पद्धती**

सदर लेख संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. सदर संशोधनासाठी संशोधन पद्धतीसाठी प्राथमिक व दुय्यम अश्याप्रकारे मिश्र सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. संशोधन करत असताना संशोधकाने सहेतुक नमुना निवड पद्धतीने ३० उत्तरदाते यांची निवड करून पथविक्रेत्यांना प्रत्यक्ष भेट घेऊन मुलाखत अनुसूचीद्वारे प्राथमिक साधनांचा वापर करून तथ्य संकलन केले आहे.तसेच अनेक ग्रंथ,मासिके, संशोधन पेपर,इंटरनेट या दुय्यम सामग्रीचा वापर संशोधकाने केला आहे.

**तथ्य विश्लेषण**

| अ.क्र. | घटक | घटक वर्गीकरण | एकूण | स्त्री | पुरुष |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुस्लीम पथविक्रेते वय | १. १८-२१<br>२. २२-३०<br>३. ३१-४०<br>४. ४१-५०<br>५. ५१-६०<br>६. ६१ पेक्षा अधिक | ०२<br>०४<br>१३<br>०९<br>००<br>०२ | ० ०<br>०१<br>०७<br>०४<br>००<br>०१ | ०२<br>०३<br>०६<br>०५<br>००<br>०१ |
| २ | मुस्लीम पथविक्रेते लिंग | १. पुरुष<br>२. महिला | ३०<br>- | -<br>१३ | १७<br>- |
| ३ | मुस्लीम पथविक्रेते शिक्षण स्तर | १. अशिक्षित<br>२. प्राथमिक<br>३. माध्यमिक<br>४. उच्चशिक्षित<br>५. ग्रज्युएशन | ०७<br>०६<br>०३<br>१२<br>०२ | ०३<br>०३<br>०२<br>०४<br>०० | ०४<br>०३<br>०१<br>०८<br>०२ |
| ४ | मुस्लीम पथविक्रेते व्यवसायातील पिढी | १. पहिली पिढी ते पाचवी पिढी<br>२. पारंपारिक पिढी | २०<br>१० | १० ०३ | १०<br>०७ |
| ५ | मुस्लीम पथविक्रेते विकणारे वस्तू | १. भाजी<br>२. फळे<br>३. खाद्यपदार्थ<br>४. आणखी काही | ०९<br>०८<br>०४<br>०९ | ०४<br>०२<br>०१<br>०६ | ०५<br>०६<br>०३<br>०३ |
| ६ | मुस्लीम पथविक्रेते विकण्याचे क्षेत्र | १. कायम स्थान<br>२. भटके स्थान | १७<br>१३ | ०६<br>०७ | ११<br>०६ |
| ७ | मुस्लीम पथविक्रेते कामाचे तास | १. १- ३<br>२. ३- ५<br>३. ५-७<br>४. ७-९<br>५. ९-११<br>६. ११ पेक्षा अधिक | ००<br>०३<br>०२<br>०६<br>०४<br>१५ | ००<br>०२<br>०२<br>०४<br>०१<br>०४ | ००<br>०१<br>००<br>०२<br>०३<br>११ |
| ८ | मुस्लीम पथविक्रेते यांचे उत्पन्न | १. १००-५००<br>२. ५०१-१००० | २०<br>१० | ११<br>०२ | ०९<br>०८ |
| ९ | मुस्लीम पथविक्रेते व्यापारी परवाना | १. हो<br>२. नाही | १०<br>२० | ०४<br>०९ | ०६<br>११ |

**मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष संख्या**

मुस्लीम पथविक्रेते स्त्री -पुरुष यांचा तुलनात्मक अभ्यास करताना ५७%पुरुष व ४३% महिला मुस्लीम पथ विक्रेत्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.संशोधकास असे आढळून आले कि, महिलांच्या तुलनेत अधिक पुरुष पथविक्रेते विक्रीमध्ये गुंतलेले आहेत.

**मुस्लीम पथ विक्रेते शिक्षण**

मुस्लीम पथविक्रेते यांच्या शिक्षणाचा स्तर संशोधकाने अभ्यासला असता असे निदर्शनास आले कि, अशिक्षित पथविक्रेते २३ %, प्राथमिक २० % ,माध्यमिक १०%, उच्चमाध्यमिक ४०%, उच्चशिक्षित ७ % असे मुस्लीम पथविक्रेते यांचे शिक्षण दर्शविते. वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते कि, मुस्लीम पथविक्रेते व्यवसाय करणारे लोक हे उच्चमाध्यमिक वर्गातील म्हणजेच ९ वी-१२ वी च्या वर्गातील आहेत. त्याच्याखालोकाल अशिक्षित वर्गाचा समावेश होतो. म्हणजेच उच्चमाध्यमिक मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पु रुष हे अधिक दिसत असले तरीही स्त्रियांचे शिक्षण कमी असल्याचे निदर्शनास येते.

**मुस्लीम पथविक्रेत्यांची वयोमर्यादा**

मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष यांच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करत असताना उत्तरदाते यांचे वय अभ्यासताना मुस्लीम पथविक्रेते ३१ते ४० वयोगटातील मुस्लीम पथविक्रेते हे ४३% आहेत. ४१ ते ५० वयोगटातील 30 %दिसून येते.२२-३० वयोगटातील १३% आहेत. १८ते २१ वयोगटातील ७% आहेत.६१ पेक्षा अधिक ७% आहेत. हि संख्या मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष यांची आहे तरीही मुस्लीम पथ विक्रेते जास्त स्त्रियांची संख्या हि ३१-४० वयोगटातील आहे.म्हणजेच ३१ ते ४० वयोगटातील यांची संख्या जास्त असून मुस्लीम स्त्री -पुरुष पथविक्रेते व्यवसायाकडे वळताना दिसतो. तरुण वर्गाचा ह्या व्यवसायाकडे कल दिसून येतो.मुस्लीम पुरुषाबरोबरच तरुण स्त्रिया हि ह्या पथविक्रेते व्यवसाय मध्ये गुंतलेली दिसून येते.

**मुस्लीम पथविक्रेते क्षेत्र**

मुस्लीम पथ विक्रेते त्यांच्या उत्पादने विकण्याचे कायम स्थान आणि भटकेस्थान अश्या दोन क्षेत्रात विभागले आहे. संशोधन अभ्यास करत असताना ६५%कायम स्थान मधून व ३५ % भटके स्थान अश्या २ स्थानातून मुस्लीम पथविक्रेते यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**मुस्लीमपथविक्रेते स्त्री पुरुष कामाचे कालावधी**

मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष यांच्या कामाचे कालावधीचा अभ्यास करत असताना मुस्लीम पथविक्रेते स्त्रिया ह्या ७-९ तास काम करतात व कमीत कमी ३-५ तास काम करतात . मुस्लीम पथविक्रेते पुरुषांचा कामाचे तास जास्तीत जास्त ११ तासापेक्षा अधिक काम करताना दिसतात. कामाच्या तासाच्या बाबतीत विचार केला तर दररोज काम करण्याचे तास हे पुरुषांच्या तुलनेत मुस्लीम पथविक्रेते स्त्रिया कमी वेळ काम करतात.

**मुस्लीम पथविक्री व्यवसायातील पिढी**

सदर संशोधन करीत असताना वरील तक्त्यावरून असे दर्शविते कि , पहिली ते पाचवी पिढी स्त्री -पुरुष यांच्या मध्ये समानता दर्शिवते. तसेच पारंपारिक पिढी प्रमाणे पथविक्री व्यवसाय मुस्लीम धर्मातील पुरुष व्यवसाय हाताळत असल्याचे दिसून येते. त्यांच्या तुलनेत मुस्लीम स्त्रियाचे गरिबी चे प्रमाण अधिक व अशिक्षितपणा या कारणामुळे ह्या पथविक्री व्यवसाय मध्ये काम करताना निदर्शनास येतात.

**मुस्लीम पथ विक्रेते स्त्री-पुरुष यांचे उत्पन्न**

पुढील तक्त्यामध्ये पुरुष हे कमीत- कमी ३०० जास्तीत जास्त १००० उत्पन्न कमवत असल्याचे दिसून येते. मुस्लीम पथविक्रेते १००० रु. चे उत्पन्नाचे आहेत. स्त्रिया असो किंवा पुरुष ह्यांचे उत्पन्न १००० वरती दिसतच नाही. मुस्लीम पथविक्रेते स्त्रिया कमीत कमी १५०व ७००-८०० जास्तीत जास्त एवढे उत्पन्न दररोज कमवत असल्याचे आढळून आले . १०० रु.-५०० रु. मध्ये ८५ % मुस्लीम स्त्रिया पथ विक्रेता कमवितात, तर ५०१ रु.-१०००रु. मध्ये १५% मुस्लीम स्त्रिया पथ विक्रेते कमवितात.१००रु. -५००रु.५३ % मुस्लीम पुरुष पथविक्रेते कमवितात.५०१रु.-१०००रु.४७%

मुस्लीम पथविक्रेते पुरुष कमवितात. वरील तक्त्यावरून संशोधकास असे आढळून आले कि, १००रु. -५००रु. मुस्लीम पथविक्रेते स्त्रिया यांचे उत्पन्न अधिक असले तरीही मुस्लीम पथविक्रेते स्त्रीयापेक्षा मुस्लीम पथविक्रेते पुरुषांचे उत्पन्न हे जास्त असल्याचे दिसत आहे . मुस्लीम पुरुष पथविक्रेत्यांपेक्षा मुस्लीम स्त्री पथ विक्रेत्यांचे उत्पन्न तुलनात्मक दृष्ट्या कमी आहे.

**निष्कर्ष**

असंघटीत क्षेत्रातील मुस्लीम पथविक्रेते रोजगाराच्या पाठीमागे दैनंदिन जीवनातील उत्पादनाचे वापर करून लोकांच्या गरजा भागविण्यासाठी तत्पर असतात. २००४ च्या राष्ट्रीय सर्वेनुसार मुस्लीम धर्मातील लोकांचे बेकारीचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे मुस्लीम लोकांना शिक्षणातील कमी पातळी, गरिबी ह्या कारणामुळे नोकरीची संधी मिळत नाही.त्यामुळेच मुस्लीम समाजामधील लोकांचा स्वताचा व्यवसाय करण्याकडे त्यांचा कल दिसून येतो. मुस्लीम पथविक्रेते स्त्री -पुरुष यांच्या सामाजिक- आर्थिक स्थितीचा अभ्यास करत असताना संशोधकास असे आढळून येते कि, कुटुंब सांभाळताना आर्थिक गरज लागते . अर्थाजन असल्याशिवाय मनुष्य दैनदिन गरजा पूर्ण करूच शकत नाही. तरुण पिढीला रोजगार,नोकऱ्या नसल्यामुळे तरुणाई वर्गाचे आकर्षण पथविक्री कडे वाढत चालल्याचे दिसते. मुस्लीम समाजातील पुरुषाबरोबर स्त्रिया हि स्वतःहा कौटुंबिक संस्था सुरळीत चालण्यासाठी पथविक्री व्यवसाय करू लागल्या.परंतु मुस्लीम पथविक्री व्यवसाय करताना महिलांच्या तुलनेत अधिक पुरुष पथविक्रेते विक्रीमध्ये गुंतलेले आहेत. मुस्लीम पथविक्री व्यवसायाकडे ३१ -४० वयोगटातील ४३ % लोकांचे प्रमाण दिसते. ह्या वयातील पुरुषापेक्षा स्त्रिया अधिक दिसतात.मुस्लीम धर्मात मदरसा चे शिक्षण दिले जाते.परतू मुस्लीम समजातील हे उच्च माध्यमिक वर्गातील म्हणजेच ९ वी-१२ वी च्या वर्गातील४० % आहेत. त्याच्या नंतर सर्वाधिक संख्या अशिक्षित वर्गाची संख्या हि २३ % आहे .म्हणजेच उच्चमाध्यमिक मुस्लीम पथविक्रेते स्त्री-पुरुष हे अधिक दिसत असले तरीही स्त्रियांचे शिक्षण कमी असल्याचे निदर्शनास येते. मुस्लीम पथविक्रेते पुरुष पिढ्यांनी पिढ्या हाच

व्यवसाय करताना दिसतात. हा पथविक्री व्यवसाय करत असल्यामुळे पगारी नोकरी करण्याकडे मुस्लिमांचा कल कमी आहे.हा व्यवसाय करणाऱ्या मुस्लीम स्त्रिया ह्यांच्या उत्तरातून असे दिसून आले कि , बहुतेक स्त्रिया ह्या कोरोना च्या काळापासून हा पथविक्री व्यवसाय करू लागल्या. कामाच्या तासाच्या बाबतीत विचार केला तर दररोज काम करण्याचे तास हे पुरुषांच्या तुलनेने मुस्लीम पथविक्रेते स्त्रिया कमी वेळ काम करतात. मुस्लीम पथ विक्रेत्या स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.मुस्लीम पथ विक्रेता पुरुष लवकर येऊन जागा पकडून त्या जागेवर पथ विक्री व्यवसाय करतो परंतु महिलांना घरातील कामे करून यावे लागते. तेव्हा पथविक्री करण्यास जागेचा अभाव जाणवतो. रात्रीच्या वेळेस महिलांना जाण्यायेण्यास समस्या येत असल्यामुळे कमी वेळ काम केल्यामुळे, जागेचा अभाव असल्यामुळे उत्पन्नामध्ये तफावत दिसते. पुरुष अधिक उत्पन्न महिलांच्या तुलनेत कमवत असल्याचे दिसते. प्रत्यक्ष मुलाखत द्वारे असे आढळून आले कि, एकूण मुस्लीम पथ विक्रेत्यांपैकी ३३ % पथविक्रीत्यांकडे व्यापारी परवाना असून ६७ % पथविक्रेत्यांकडे व्यापार परवाना नसल्याचे आढळले. म्हणजेच परवाना नसल्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांच्या कार्यवाहीस सामना करावा लागतो. हे मुस्लीम पथविक्रेत्या समोर मोठे आव्हान आहे.अश्याप्रकारे मुस्लीम पथ विक्रेते स्त्री – पुरुष यांचा तुलनात्मक अभ्यास करताना मुस्लीम स्त्री-पुरुष यांची आर्थिक स्थिती अभ्यासत असताना असे निष्कर्ष निघाला कि,मुस्लीम पथविक्रेते पुरुषांपेक्षा मुस्लीम स्त्रियांचे उत्पन्न कमी असून मुस्लीम पथविक्रेते स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण झालेले नाही. असे अभ्यासातून दिसून आले.

**संदर्भ**


- प्रा.डॉ. राजेखान शानेदीवान (२००८ ); भारतीय मुसलमान; निर्मिती प्रकाशन ,कोल्हापूर.
- विभूती पटेल (२०१५); मुस्लिमांची आर्थिक-सामाजिक स्थिती ;परिवर्तनाचा वाटसरू,
- जैन राजू व अब्दुल शबन (१९९९);मुंबईतील मुस्लिमांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दर्जा.
- सच्चर समिती (२००५)

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# १९. स्त्री चळवळीतील महत्त्पूर्ण अध्याय-सतीप्रथा निर्मुलन

**प्रा. उषादेवी अंकुश कांबळे**
राज्यशास्त्र विभाग, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली.

**प्रस्तावना**

स्त्रियांच्या इतिहासातील अमानवीय निर्मम प्रथा म्हणजे सती किंवा सुत्ती प्रथा. ही प्रथा जगामध्ये काही ठिकाणी इतर भारतात सर्वत्र अस्तित्वात होती. वेदोत्तरे हिंदू ग्रंथामध्ये सती प्रथा ही पूर्णपणे ऐच्छिक जरी मानली गेली असली तरी त्याचे नंतरचे बदललेले स्वरूप आणि कारणामुळे अनेक निरपराध विधवा स्त्रीया बळी गेल्या. या बळीचा आकडा शतकांमध्ये होता. अशा या अमानुष प्रथेचे स्वरूप आणि निर्मूलन याचा या शोध निबंधात अभ्यास करण्यात आला आहे.

**सतीप्रथा**

पतीच्या निधनानंतर अथवा झाला पती स्वरूप मानले आहे त्याचा निधनानंतर त्याचा मृतदेहा सोबत सहगमन करणे अथवा पतीच्या मृतदेहा सोबत अग्नी कास्ट गमन करणे याला सती प्रथा असे म्हणतात. या प्रथेनुसार स्त्रीला तिच्या इच्छेनुसार अथवा इच्छेविरुद्ध पतीचा मृतदेहा सोबत जिवंत जाळण्यात येईल अथवा पुरण्यात येई. देवांचा राजा दक्ष याने महादेवाचा अवमान केल्यामुळे देवी सतीने रागाने होमकुंडात उडी घेतली होती या घटनेपासून सतीची प्रथा सुरू झाल्याचे मानण्यात येते.

**सतीप्रथेचे स्वरुप**

स्त्रियांच्या इतिहासातील अत्यंत भयंकर निर्घ्रून अशा प्रथेचे स्वरूप अत्यंत विदारक स्थितीचे आहे. पूर्वीच्या काळी भारतीय समाजात बालविवाहाची प्रथा होती. काहींचे विवाह हे पाळण्यात पार पाडले जात होते. अंधविश्वास, अशिक्षितपणा, गरीबी समाजात जास्त प्रमाणात होते म्हणूनच वैदिक कालनंतरचा ते इंग्रजांच्या राजवटीपर्यंतचा काळ स्त्रियांसाठी ‘डार्क पिरियड’ समजला जातो. त्यावेळी समाजात स्त्रियांचे काम 'रांधा वाढा उष्टी काढा' या पद्धतीचेच होते. त्यांना घरात किंवा समाजात कोणत्याही पद्धतीचा मान दिला जात नसे. ज्याप्रमाणे वडील, पती, सासरचे लोक तिला ठेवतील त्या पद्धतीने स्त्री आपला कालक्रम व्यतित करत असे.

भारतीय समाजात त्याकाळी राजे, महाराजे, सरदार, जमीनदार यांचे वर्चस्व मोठ्या प्रमाणात होते. या घराण्यातील पुरुषांकडे बहुविवाहासोबत अंगवस्त्रे ठेवण्याची प्रथा होती. यामध्ये लग्नाच्या पत्नीसोबत इतर स्त्रीया लग्नाशिवाय ठेवला जात होत्या. सोबत दासी, बटीक यांचाही समावेश असे. या स्त्रियांमध्ये उच्च कुलीन स्त्रिया सोबत इतर कनिष्ठ वर्गाच्या जातीच्या आणि इतर धर्मातील स्त्रियांचा समावेश होतो. ज्यावेळी उच्च खोलीत घराण्यातील पुरुष मरण पावत असे तेव्हा त्याच्यासोबत त्याच्या सर्व पत्नी, अंगवस्त्रे, दासी,बटीक या सर्वदेखील सती जात असत.

**सतीप्रथेची कारणे**

**सामान्यत**

सतीप्रथा का, कशासाठी सुरू झाली याची काही सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक कारणे पुढील प्रमाणे सांगता येईल-

१. पूर्वीच्या वेदोक्त ग्रंथानुसार सुत्ती प्रथा ही ऐच्छिक होती.

२. पती निधनानंतर त्या पत्नीकडे सासरी कोणी काळजी घेणार नाही जबाबदारी घेणार नाही याची सर्वांना भीती असे.

३. पती निधनानंतर सासरचे लोक अथवा अन्य समाज वाईट नजरेने बघत असे, तिच्या एकटेपणाचा गैरफायदा घेत होते त्यामुळे असे गैरप्रकार घडू नयेत म्हणून घरच्यांना जास्ती वाटत असे.

४. पतीच्या निधनानंतर घरातील जबाबदार व्यक्ती गेल्यामुळे त्या घरावर आर्थिक संकट येत असे. अशावेळी विध्वस्त्रीची जबाबदारी कोणी घेण्यात धजत नसे.

५. स्त्रीच्या सासरचे माहेरच्या लोकांना पती निधनानंतर विधवा स्त्रीने परगमन केले तर घराची इज्जत जाईल अशी भीती असे.

६. सती गेल्यावर पतीसह पत्नीस स्वर्ग प्राप्त होतो असे मानण्यात येत असे.

७. त्या कळी परकीयांचा परचक्राचा धोका कायम होता. भारतीय स्त्रिया आपली इज्जत, अब्रू परकीयाकडून, शत्रूकडून लुटली जाऊ नये यासाठी सती जात होत्या किंवा जोहार करत होत्या.

**सतीप्रथा विधि**

ज्यावेळी भारतीय समाजातील एखाद्या पुरुषाचे निधन होत असे, त्यावेळी त्याचे विवाहित पत्नी जर अंग वस्त्र असेल तर ती दासी भट्टी या सर्व स्नान करून सौभाग्य लेणी परिधान करत असत. हातात सौभाग्य लेण्यांनी भरलेले सूप असे गळयात इतर दागिन्यांसोबत कापुराची माळही असे. अंत्ययात्रेदरम्यान सती आपल्या सुखातील सौभाग्य लेणी दान करत असे ज्या ठिकाणी दहन केले जाईल त्या जागेला 'सतीचा वाडा' म्हणत. ही जागा थोडी उंचावर बांधण्यात येत असे. या ठिकाणी लाकडे रचून त्यावर भरपूर तूप तेल कापूर वड्या इत्यादी ज्वलनशील सामग्री तयार ठेवली जात असे. दहनाच्या वेळी स्त्री आपल्या पतीचे डोके मांडेवर घेऊन बसत असे. यानंतर अंत्यविधी होत असे. यादरम्यान काही लोक काठ्या घेऊन सतीच्या वाड्याभोवती थांबत असतात जेणेकरून तिने पलायनाचा प्रयत्न केला तर तिला परत चितेमध्ये ढकलून देण्यात येत असे. यासोबतच तिचा आक्रोश कोणाला ऐकू जाऊ नये यासाठी मोठमोठ्याने वाद्ये वाजवली जात होती. काही ठिकाणी याला सती प्रथा, सुत्तीप्रथा किंवा जोहार असेही म्हटले जाते.

सती प्रथा ही संपूर्ण जगामध्ये वेगवेगळया संस्कृतीत थोडाफार फरकाने आढळून येते. यामध्ये ग्रीक, फ्रान्स, युनान यासोबत हर्षचरित आणि संगम साहित्यात देखील सती प्रथेचा उल्लेख आला आहे. देवी सती नंतर राणी पद्मिनीचा इतर स्त्रियासोबतचा जोहार प्रसिद्ध आहे. महाराणी पुतळाबाई या सुद्धा छ. शिवाजी महाराज यांच्या निधनानंतर त्यांच्या पादुका सोबत सती गेल्या होत्या. शहाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजमाता जिजाबाई यासुद्धा सती जाणार होत्या परंतु छ. शिवाजी महाराजांनी त्यांना परावृत्त केले. अकबर आणि १५८२ मध्ये ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला होता. छ. शिवाजी महाराजांचे ध्येय स्वकीयांसाठी स्वराज्य निर्माण करणे हे होते. धार्मिक

कार्यात जास्त ढवळाढवळ केली असती तर स्वकीयच त्यांच्याविरुद्ध उभे राहिले असते. इंग्रजांसोबत औरंगजेब, पोर्तुगीज, डच आणि फ्रेंचांनी हे आपपल्या प्रांतात सती प्रथा बंदी केली होती. इंग्रजांनी सती प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सतीबंदीचा कायदा केला परंतु याचे पडसाद म्हणून १८५७चा उठाव झाला.

**राजा राम मोहन रॉय यांचे योगदान**

बंगाल प्रांतातील राधानगरी येथे १७७२मध्ये राम मोहन रॉय यांचा जन्म झाला. राम मोहन रॉय हे संस्कृत, फारशी, इंग्रजी, अरबी, लॅटिन, ग्रीक, इत्यादी भाषा मध्ये पारंगत होते. राजनीति लोकप्रशासन शिक्षण धर्म या सर्व बाबतीत ते जाणकार होते. त्यांनी ब्राह्मो समाजाची तसेच कलकत्ता युनिटेरियन सोसायटीची स्थापना केली. या दोन्ही संघटनेने भारतामध्ये सुधारणा आणि आधुनिकीकरणाला चालना देण्याचे कार्य केले. त्यांनी हिंदू धर्मामध्ये नैतिक तर्कसंगत विचारांची जागृती आणली. राजा राम मोहन रॉय हे प्रामुख्याने बालविवाह पडदा प्रथा आणि सती प्रथा बंदी यासाठी ओळखले जातात. तसेच बहुविवाह जातीप्रथा यासारखे हिंदू धर्मातील अनेक धार्मिक सुधारणावादी आंदोलने केली होती. इतर सुधारकाप्रमाणे त्यांना धार्मिक सुधारण्यासाठी समाजामध्ये शिक्षण प्रसार आवश्यक वाटत होता. यासाठी त्यांनी अंग्लो-हिंदू स्कूल आणि वेदांत कॉलेजची स्थापना केली. त्यानंतर निरंतर प्रयत्न मुळे सतीबंदी कायदा भारतात प्रथम अस्तित्वात आला. या त्यांच्या योगदानामुळेच त्यांना 'भारताचे आद्य समाज सुधारक' आणि 'बंगाल पुनर्जागरणाचे जनक' असेही म्हटले जाते. त्यांच्या या सुधारक कार्यामुळे त्यांना 'राजा' ही पदवी प्रदान करण्यात आली होती.

**ईस्ट इंडिया कंपनीचे योगदान**

इसवी सन सोळाव्या शतकाच्या सुरुवातीस आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने १८ व्या शतकापर्यंत संपूर्ण भारतावर वर्चस्व प्राप्त केले होते. ब्रिटिशाकडून गव्हर्नर जनरल यांच्यातर्फे भारतात राज्य कारभार केला जात होता. प्रारंभीच्या काळात ईस्ट इंडिया कंपनीसोबत जे ख्रिश्चन धर्मप्रचारक आले होते, त्यांच्या निदर्शनात हिंदू धर्मातील या अमानवीय घटना आल्या होत्या. त्यांनी सुरुवातीस निर्दोष यांची हत्या रोखण्यासाठी म्हणून ब्रिटिश गव्हर्नर जनरलकडे या घटनांची माहिती दिली. त्याकाळी वर्षाकाठी ३०० ते ४०० स्त्रिया सती जात होत्या. त्यावेळी बंगाल प्रांताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक होते. राममोहन रॉय यांच्या सततच्या मागणीमुळे आणि कैरी या धर्मप्रचारकामुळे लॉर्ड बेंटिंकने १८२९ मध्ये 'बंगाल सती विनीयमन १८२९' चा कायदा पास केला.

१८२९ च्या या सतीबंदी कायदा नुसार हिंदू विधवांना जिवंत जाळणे किंवा दफन करणे गंभीर अपराध समजून न्यायालयीन दंडाची तरतूद केली होती. या सतीबंदी कायद्याबरोबर ब्रिटिशांनी 'हिंदू विधवा पुनर्विवाह अधिनियम १८५६', 'कन्या भ्रूणहत्या रोकथाम अधिनियम १८७०' आणि 'संमती वय अधिनियम १८९१' हे कायदे सुद्धा केले गेले. परंतु या सुधारणामुळे ब्रिटिशांना भारतीयांच्या असंतोष यास सामोरे जावे लागले, ज्याची परिणीती १८५७ च्या उठावात झाली.

**भारत सरकारचे योगदान**

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला आणि सर्वांसोबत स्त्रियांसाठी अनेक सुधारित कायदे करण्यात आले. परंतु सतीबंदीचा कायदा असतानाही १९८७ मध्ये राजस्थान येथे केवळ २४ वर्षाची रूपकंवर ही सती गेली. या घटनेचे भारत सरकारने दखल घेतली आणि

'सती रोखथाम अधिनियम १९८७' या नवीन सुधारित कायद्याची निर्मिती केली.या कायद्यानुसार कोणत्याही विधवा स्त्रीला स्वच्छने अथवा जबरदस्तीने जिवंत जाळणे, किंवा दफन करणे, कोणत्याही पद्धतीचा समारंभ करणे, विधवेची अंतिम यात्रा काढणे, वित्तीय ट्रस्ट स्थापन करणे, सतीचे मंदिर बनवणे, किंवा सतीचा स्मृतीदिन साजरा करणे या सर्वावर बंदी घातलेली आहे. या कायद्याचे स्वरूप १८२९ च्या कायद्यासारखेच आहे.

आज भारतात २०१९ पर्यंत सती प्रथेची अत्यंत तुरळक प्रकरणे आढळून आली, ज्यामध्ये स्त्रिया ऐच्छिकपणे पती निधनानंतर दुखातिरेकाने सती गेल्या. काही स्त्रियांना पोलिसांच्या मदतीने वाचवण्यात आले. आजपावतो भारतात ३०० च्या वर सतीची मंदिरे आहेत ज्यांना राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करावे असे आवाहन 'ऐतिहासिक सती मंदिर संरक्षण समिती'ने केले आहे.

**सारांश**

स्त्रियांना पूर्वपार जन्माचा अधिकार काढून घेण्यात आला होता. तिने प्रथम वडिलांच्या इच्छेनुसार नंतर पतीच्या इच्छेनुसार राहावे अशी भारतीय संस्कृती होती. पतीनिधनानंतर सतीप्रथा तिला ऐच्छिक किंवा अनैच्छिकरित्या पाळावी लागत होती. ज्याचे निर्मूलन सतीबंदी कायद्याने झाले. या सतीबंदी निर्मूलन कायद्याने अनेक स्त्रियांना जगण्याचे बळ दिले जगण्याचा जिवंत राहण्याचा अधिकार मिळाला. समाजात प्रथमच किमान माणूस म्हणून तरी जिवंत राहण्याचा अधिकार अधिकृतरित्या प्राप्त झाला. एकंदरीत हिंदू धर्मातील अशा प्रकारच्या अमानुष प्रथेचे निर्मूलन करणे, कालानुरूप धार्मिक सुधारणा करणे, गरजेचे आहे ज्यामुळे समाजात प्रत्येक स्त्री-पुरुषाला समान संधी मिळून आपापला विकास साधू शकतील.

**संदर्भ**

१. श्रीमान योगी - रणजीत देसाई

२. स्वामी - रणजीत देसाई

३. लोकराज्ञी अहिल्याबाई होळकर - मुक्ता केणेकर

४. भारतातील सामाजिक चळवळी - प्रा. डॉ. विजय मारुलकर, प्रा. डॉ. दयावती पाडळकर

५. www.wikipedia.com

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# २०. परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. विनायक तुकाराम पवार**
कन्या महाविद्यालय, मिरज, सांगली.

**1.1 प्रस्तावना**

पृथ्वीची निर्मिती 4.5 अब्ज वर्षापूर्वी झाली असावी असा अंदाज असून ती सूक्ष्म जीवाच्या रूपात झाली असावी. जीवनाच्या अस्तित्वाची सुरुवात ही सुमारे 4.1 अब्ज वर्षापूर्वी झाली आहे. मानव हा सामाजिक प्राणी आहे आणि त्यातूनच त्याच्या उत्क्रांतीची यात्रा सुरू झाली, आपल्या वंशजानी आगीचा शोध लावला, गट तयार करणे आणि एकत्र राहणे अशा प्रकारे हजारो वर्षाच्या प्रगती नंतर समाजाची संकल्पना जन्माला आली आणि समाज वाढू लागला. एकोप्यामुळे दीर्घकाळ जगू लागले जगाची लोकसंख्या हळूहळू वाढू लागली.

लोकसंख्या म्हणजे एखाद्या भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या लोकांची संख्या होय. प्रत्येक देश आपल्या लोकसंख्येची ठराविक कालखंडानुसार गणना करतो. दर दहा वर्षांनी लोकसंख्येची जनगणना केली जाते. लोकसंख्या म्हणजे एखाद्या देशातील राज्यातील किंवा राज्याचा जिल्ह्यातील लोकांची संख्या होय.

**1.2 अभ्यास क्षेत्र**

परभणी जिल्हा हा महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. परभणी जिल्हा 18° 45' उत्तर ते 20° 1' उत्तर अक्षांश आणि 76° 13' पूर्व 77° 26' पूर्व रेखांश या भौगोलिक पट्ट्यामध्ये वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा व हिंगोली, पश्चिमेस जालना, दक्षिणेस बीड आणि लातूर व पूर्वेस नांदेड हे जिल्हे आहेत. जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 6511 चौ. कि.मी. आहे. परभणी व हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवरून पूर्णा नदी वाहते तर गोदावरी नदी परभणी आणि बीड जिल्ह्याच्या सीमेवरून वाहते. गोदावरी नदी पाथरी, गंगाखेड व पालम या तालुक्यामधून वाहते.

**1.3 उद्दिष्टे**

परभणी जिल्ह्यातील लोकसंख्येचा तालुकानिहाय लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे.

**1.4 अभ्यासपद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधात परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा भौगोलिक तालुकानिहाय वितरण अभ्यासण्याकरिता प्राथमिक आणि द्वितीय स्वरूपाची माहिती मिळवली आहे. यासाठी संदर्भ ग्रंथ, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना अहवाल इत्यादीच्या माध्यमातून लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर अभ्यासले आहे. तालुकानिहाय लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर दर काढण्यासाठी सूत्राचा वापर केला आहे.

**1.5 विश्लेषण**

परभणी जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर सन 1981, सन 1991 सन 2001 आणि सन 2011 खालील तक्त्याचा अभ्यास केला आहे.

**परभणी जिल्ह्याचे तालुका निहाय लिंग गुणोत्तर**

| अ. क्र. | तालुके | दर हजार लोकसंख्येमागे स्त्रियांचे प्रमाण | | | | बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सन 1981 | सन 1991 | सन 2001 | सन 2011 | सन 1981- सन 2011 |
| 1 | सेलू | 967 | 971 | 969 | 953 | -14 |
| 2 | जिंतूर | 965 | 964 | 968 | 952 | -13 |
| 3 | परभणी | 937 | 942 | 946 | 954 | 17 |
| 4 | मानवत | 977 | 973 | 982 | 955 | -22 |
| 5 | पाथरी | 966 | 964 | 965 | 945 | -21 |
| 6 | सोनपेठ | 972 | 956 | 975 | 937 | -35 |
| 7 | गंगाखेड | 958 | 948 | 950 | 935 | -23 |
| 8 | पालम | 959 | 943 | 957 | 931 | -28 |
| 9 | पूर्णा | 941 | 948 | 952 | 943 | 2 |
| एकूण जिल्हे | | 960 | 956 | 962 | 947 | -15 |

**स्त्रोत**-परभणी जिल्हा आर्थिक आणि सामाजिक समावलोचन (सन 1981- सन 2011)

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की. सन 1981 मध्ये परभणी जिल्ह्याचे एकूण लिंग गुणोत्तर दर हजारी 960 स्त्रिया होते तर सन 1991 मध्ये लिंग गुणोत्तर 956, सन 2001 मध्ये 962 लिंग गुणोत्तर तर सद्यस्थितीत म्हणजे सन 2011 मध्ये दर हजार पुरुषांमागे 947 स्त्रिया इतके लिंग गुणोत्तर होते. सन 1981 ते सन 2011 पर्यंत 40 वर्षाचा लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता असे दिसून येते की एकूण लिंग गुणोत्तर कमी झाले आहे.

परभणी जिल्ह्यात परभणी तालुका व पूर्णा तालुकामध्ये लिंग गुणोत्तरात अनुक्रमे 17 व 2 ने वाढ झाली आहे. कारण या तालुक्यांचे शहरीकरण, नद्यांची खोरी, सुपीक जमीन, उच्चतम राहणीमान असल्यामुळे लिंग गुणोत्तरात वाढ झाली आहे. सोनपेठ तालुका (-35) पालम तालुका

(-28) आणि मानवत तालुका (-22) हे तालुके दुष्काळी, कमी पर्जन्य, डोंगराळ जमीन, पाण्याचा अभाव, कमी साक्षरता असल्यामुळे लिंग गुणोत्तरात स्त्रियांचे प्रमाण कमी झाले आहे.

**1. 6 निष्कर्ष**

१. जनगणना अहवालातील सन 1981, सन 1991, सन 2001 आणि सन 2011 वर्षाचा अभ्यास केल्यास एकूण लिंग गुणोत्तर दर कमी झाला आहे.

२. परभणी आणि पूर्णा तालुक्यातील लिंग गुणोत्तरात धनात्मक वाढ झाली आहे.

३. सेलू, जिंतूर, मानवत, पाथरी, सोनपेठ, गंगाखेड आणि पालम तालुक्यात लिंग गुणोत्तरात ऋणात्मक वाढ झाली आहे.

४. परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यात (-35) ऋणात्मक व परभणी तालुक्यात (+१७) धनात्मक वाढ झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. घोलप सी. एस. लोकसंख्या भूगोल निशिकांत प्रकाशन, पुणे.

२. डॉ. वसंत व इतर लोकसंख्या भूगोल मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३. परभणी जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन

४. (सन 1981, सन 1991, सन 2001, सन 2011)

५. भारतीय जनगणना अहवाल

# २१. आदिवासी संस्कृतीमधील स्त्रीचे प्रतिबिंब (मराठी कादंबरीच्या अनुषंगाने)

**डॉ. विनायक शरदचंद्र राऊत**
मराठी विभाग, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण.

संस्कृतीचा विचार करताना आपणासमोर एक व्यापक आणि सर्वसमावेशक व्यवस्था उभी राहते. ज्यामध्ये समाजाच्या जीवनसरणीला पोषक आणि मार्गदर्शक अशी एक प्रणाली समाजाकडूनच स्वतःच्या आचरणासाठी निर्माण केलेली असते. ती प्रणाली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने संक्रमित व संवर्धित होते. या संस्कृतीमुळेच मानवी जीवन सुरळीत पार पडत असते. जगातील सर्व मानव समाजाकडून आपापल्या समाजासाठी हे संचित जाणीवपूर्वक निर्माण केले गेलेले असते.

**संस्कृती ही संकल्पना**

संस्कृती ही संकल्पना स्पष्ट करत असताना हरस्कोव्हिटस् म्हणतात - "संस्कृती हा पर्यावरणाचा मानवनिर्मित भाग होय." तर डॉ. इरावती कर्वे यांच्या मते " संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकालविशिष्ट रिती (जीवनपद्धती व जीवनमूल्य) म्हणजे संस्कृती." तर टीशलेर, व्हायटन आणि हंटर संस्कृतीची व्याख्या करताना म्हणतात "मानवी व्यक्ती ज्या समूहाच्या सभासद असतात त्यात त्या जे जे करावयास, वापरण्यास, उत्पादित करण्यास, माहीत करून घेण्यास आणि श्रद्धा ठेवण्यास शिकतात त्या सर्व गोष्टींना संस्कृती म्हणतात." १

आदिवासी संस्कृतीचा विचार करता ही श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारीत असणारी संस्कृती आहे. ही संस्कृती धर्मपूर्व संस्कृती आहे. या पृथ्वीवरचा पहिला माणूस म्हणून आदिवासिंची ओळख आहे. जल, जंगल आणि जमीन यावर जन्मसिद्ध प्रथम अधिकार असलेला हा मानव समूह आहे. श्रम करणे, परस्परांना सहकार्य करणे हेच आदिवासींचे प्रमुख जीवनमूल्य होते आणि तोच त्यांच्या संस्कृतीचा मूलाधार होता. " संस्कृती म्हणजे धर्म असा काहीतरी समज आहे कारण आदिवासींना कोणताही तथाकथित धर्म नाही.... भारत देशातील आदिवासी जमाती या विविध आदिवासी जमातीच आहेत. त्यांना स्वत:ची अशी स्वतंत्र वेगळी संस्कृती आहे. या आदिवासी समूहाचे निसर्गाशी स्वतंत्र असे नाते आहे, आदिवासी समूह अंतर्गत माणसा माणसाचे संबंध या समूह संस्कृतीच्या ऐतिहासिक प्रक्रियेतून निर्माण झालेले आहेत. आदिवासी समूह संस्कृतीतील स्त्री-पुरुष संबंध हे देखील वेगळे दाखविता येतील असे आहेत. या आदिवासींच्या श्रद्धा ज्या दैवतांशी जोडल्या आहेत, त्या निसर्गाभिमुख मुख्यतः आहेत."२

जगातील सर्व प्रजातींमध्ये निसर्गाने केलेला मुलभूत भेद म्हणजे नर आणि मादी मानवामध्ये स्त्री-पुरुष या नावाने हा भेद केला जातो. स्त्री ही मुळातच सोशिक, कष्टाळू, समर्पण भाव व्यक्त करणारी तर पुरुष हा नेहमीच आक्रमक, शक्तीप्रदर्शनास उतावळा असणारा आणि स्त्रीसमर्पणाचा पुरेपूर फायदा घेणारा अशा प्रवृत्तीचा. त्यात पुन्हा सामान्य समाजातील स्त्रीपेक्षा आदिवासी स्त्री ही कष्टाळू, सोशिक,

प्रसंगी स्वतःच्या कुटुंबासाठी कोणताही त्याग करण्यास तयार असणारी अशी आहे. या स्त्री पुरुषांच्या विविध गुणधर्माचे प्रतिबिंब त्यांच्या आदिवासी संस्कृतीमध्ये पाहावयास मिळते.

बाबा भांड यांच्या 'तंट्या' कादंबरीतील भाऊसिंगांची बायको व तंट्याची आई जिवनी आणि भिलाटीतील सर्वच बायकांचा असा समज होता की, 'दारू पिऊन आलेल्या नवऱ्यांन बायकोला बदडलं, की नवऱ्याच्या पुरुषार्थाची सगळीकडेच चर्चा व्हायची.' त्यामुळे भिलाटीत दारू पिऊन नवऱ्यांना मारझोड करणं नेहमीचच होत. पण त्या दिवशी जीवनीला भाऊसिंगाने खूप मारलं होतं तेव्हा तात्याने (तंट्याने ) तिला विचारले, " किती दीस असा मार खायचा, माय ? त्यो मारनारा हात का पकडला नहीं ?" तेव्हा मरणप्राय यातनांनी कणणारी जीवनी त्याला म्हणाली,

"तुले नहीं उमजायचं, बापा नवरा माजेल असतुया, माजेल नवऱ्यांना बायीला मारायचं नहीं तर काय पूजा बांदायची व्हय तिची?" या वाक्यातून आदिवासी स्त्रीची सोशिकता व समर्पणभाव अभिव्यक्त होतो. त्या मारामुळे पुढे जीवनीचा अंत होतो. पण आपल्या पतीविषयी कोणतीही तक्रार करताना ती दिसत नाही. परंतु ज्या बायकोचा आपल्याप्रति इतका समर्पण भाव आहे त्याची कवडीचीही किंमत नसणारे नवरे अस्तित्वात असल्यामुळेच हा स्त्रीवादाचा मुद्दा ऐरणीवर येताना दिसतो. उलट दारू पिऊन आल्यानंतर आपल्या पत्नीला मारणे हा पतीचा अधिकारच आहे असा समज पती-पत्नी दोघांचाही झालेला दिसतो.

शरद दळवी यांच्या 'एकलव्य' कादंबरीतील कृपी अथवा गौतमी आणि द्रोणाचार्य यांच्यातील मार्मिक संवादातून स्त्रीसुलभभाव अभिव्यक्त होतात. कृपी द्रोणाचार्यांना म्हणते, "आपली साधना, तपस्या आणि निष्ठांची अनुगामीनी होण्याचं महाभाग्य मला लाभलं......जीवन सार्थ कृतार्थ करणारा हा योग. आपलं सानिध्य हे स्वर्ग तुच्छ बनवतंय." स्त्रीसुलभ भावासोबतच कृपीची द्रोणाचार्यांच्या प्रति असणारा समर्पण भावही या संवादातून दिसून येते. अगदी प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला समर्पणाची मूर्ती अशाच पद्धतीने अभिव्यक्त केल्याचे दिसून येते.

दिनानाथ मनोहर यांच्या 'आंदोलन' कादंबरीतील स्त्रिया मात्र तुलनेने धीट व स्पष्टवक्त्या आहेत. हवालदार जकातदाराला बघून कादंबरीतील जैनीबाई म्हणते, "वो देख हाडग्या येई राहना सं." त्यावर गॅलरीतील बायांच्या चेहऱ्यावर हास्य फुललं. हीच जैनीबाई कलेक्टर समोरही सडेतोड संवाद साधते. ती म्हणते, " हाव सायब, आय खुद काम करीरहणी सं. दर हप्त्याला स्वतः साहेब येतो पगार करायला."

नजुबाई गावित यांच्या 'तृष्णा' कादंबरीतील इसरी आपल्या हलाखीच्या जीवनातील सोशिकता अभिव्यक्त करताना म्हणते, "मरून गेला तो वनवास ! घराचं दांडक पाहात जावं आन् घाट्याचं पाणी पीत जावं. केव्हा चांगले दिवस येतील कोण जाने. आख्ख जीवन चाललं, पन चार महिनेसुद्धा रोज भाकर खायला मिळाली नाय."

गो. ना. मुनघाटे यांच्या 'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीतील रिपा पाटलीन गुरुजींना म्हणते, "गुरुजी पाटलास तुम्ही ओळखत नाही. त्यांच्या मनावेगळे काही घडले तर ते सदैव चिंता करीत बसतात. त्यामुळे माझे मनाला समाधान वाटणार नाही. शाळा बांधकामात रिपा पाटलीनमुळे आडकाठी आली असे व्हायला नको. शाळेला किती रक्कम लागते ते सांगा. माझ्या माहेरून मिळालेला

सोन्याचा दागिना मी तुमच्या शाळेच्या बांधकामासाठी शाळेला देण्यास तयार आहे. असे म्हणून तिने हसत हसत आपल्या गळ्यातील सोन्याचा गोफ काढून आमच्या समोर ठेवलाही." (पृष्ठ १२५) आपल्या अलंकारापेक्षाही आपल्या पतीचे समाधान श्रेष्ठ मानणाऱ्या भारतीय स्त्रीचे दर्शन उपरोक्त विधानातून होते.

सुरेश द्वादशीवार यांच्या 'हाकुमी' कादंबरीतील चुक्कोला पवरीने लग्नानंतर चोळी घालण्यासंदर्भात विचारले असता ती म्हणते, " माझा कशाचं आलं म्हणणं ? आणि माझं म्हणणं विचारतो कोण? माड्या बाईला कधी आल मन ? आपल्या बाईनं विना बोलांना जागायचं माणसांना ठेवलं तसं राहायचं अन् तल्लोईच्या मर्जीनं वागायचं." (पृष्ठ १९) या विधानातून आदिवासी विवाहित स्त्रीचे परावलंबित्व, पुरुषशरणता आणि तल्लोईशरणता (आदिवासी देवता) दिसून येते. तिला स्वतःचं मन व मत नाही. तिने स्वतःच्या पतीच्या, समाजाच्या आणि परमेश्वराच्या इच्छेच्या आधीन राहावे. जगातील कोणत्याही संस्कृतीमध्ये स्त्रियांवर बंधने घालण्यासाठी समाजाने कधी श्रद्धा, अंधश्रद्धा तसेच संस्कृतीचाही वापर केल्याचा दिसून येतो.

पण याच कादंबरीतील पवरी ही आजच्या पिढीची, स्वतःच मत असणारी स्त्री व्यक्तिरेखा तल्लोईचा दंडक मोडून संपूर्ण कांदोडी गावासोबत वैर पत्करून लग्नानंतर अंगाचा झंपर काढण्यासाठी नकार देताना दिसते आणि झाकल्या अंगांन राहण्याचं ठरवते. (पृष्ठ क्रमांक १९) तल्लोई कोपली तर घर बुडणार, वावर बुडणार, कांदोडी बुडणार हे माहिती असूनही पवरी संपूर्ण गावाच्या विरोधात उभी राहते व आजपर्यंतचा गावाचा दंडक, प्रथा मोडीत काढते. एखाद्या स्त्रीने जर ठरवले तर तिच्या इच्छाशक्तीला कोणीही आवर घालू शकत नाही. स्त्री कोणत्याही बाबतीत पुरुषापेक्षा कमी नाही आणि तिने जर ठरवले तर ती कोणाचाही विरोध पत्करून प्रसंगी स्वतःचे म्हणणे सार्थ करून दाखवण्यास समर्थ असल्याचे या ठिकाणी अधोरेखित होते.

वासुदेव ब. कर्णिक यांच्या 'वाडगीण' कादंबरीतील माया मायाचीला म्हणतो, "एक पोरगं झालं तंय तू असं काम टाकून बसून रहस, अजून तर तुला पकी पोरं होती, मग तू काम कराचीच नाय काय? आजगा जलम पोरंच घेऊन बसायची तूं ! मग काम कोण कराच? सावकाराची म्हातारी (बायको) पोरांना धरून बसून रहं पण त्यासी पका पैसा रहं. तू अशी बसून रहशी तर काम कोण कराचा?"

पण ती (मायाची) त्याला दाद देत नसे. तिचा आपला क्रम चालू असे त्याने फारच गडबड केली तर ती म्हणे, " तुला एकच काम, मला सत्रा. अथशी (इथून) घरा जाऊन तू ठाकून (झोपून) रहंस. मला रांधाया पडं पोराचं दुख तुला थोडं पड ? ते अजग (सर्व) माझ्यावरच. पोटात भार माझ्या रंह तू तर सुटा..." (पृष्ठ क्रमांक२) या संवादावरून मायाचीची मुलांची काळजी घेण्याची सवय दिसून येते. तर दुसऱ्या बाजूला आपल्या लहान मुलांपेक्षाही कामाला जास्त महत्त्व देणारा पुरुष मायाच्या रूपाने दिसतो. दिवसभर शेतामध्ये राबल्यानंतरही घरी गेल्यानंतर स्त्रीला विश्रांती मिळत नसे. तिला संध्याकाळचं जेवण करण्याचे, मुलांचे सगळे काम करायचे असते. तुलनेने पुरुष निवांत पडून राहात असे किंवा झोपी जात असे. म्हणजेच आदिवासी स्त्रियांमध्ये पुरुषांच्या तुलनेने जास्त काम करण्याची क्षमता व सवय असल्याचे दिसते. माया गायब झाल्यानंतर मायाची लोकांचे प्रश्न चुकवण्यासाठी म्हणत असे की, "घोल्या (पुरुष) माणसांचं काम म्हाताऱ्यांना (बायकांना) थोडीच सांगत." (पृष्ठ क्रमांक ३४) या विधानातून आदिवासी समाजातही स्त्रियांना काही प्रमाणात दुय्यम स्थान असल्याचे दिसते व पुरुष मनमानी वागत असल्याचेही जाणवते. या संपूर्ण कादंबरीत मायाची बायको म्हणून

मायाची असे तिचे नामकरण केल्याचे दिसून येते. वारली समाजामध्ये स्वतःच्या नवऱ्याच्या नावामुळे त्याची बायको अशा अर्थाचे नामकरण या कादंबरीत मायाचीचे दिसते वास्तविक पाहता ही या कादंबरीची नायिका असतानाही तिचे दुय्यमत्व या ठिकाणी अधोरेखित होते.

'मन्वंतर' कादंबरीतील अनिता गौतमशी लग्नाविषयी चर्चा करत असताना स्पष्ट म्हणते, "लग्न हे आपल्या दोघांना करायचे आहे. त्यात इतर कुणाचाही संबंध येत नाही." इथे अनिताचे विचार प्रगल्भ, स्वतंत्र व आधुनिक असल्याचे दिसतात. आपल्या लग्नासंबंधी इतरांची ढवळाढवळ ती मान्य करण्यास तयार नाही.

'आचार्य शंकर रामचंद्र भिसे' यांच्या 'जंगलातील छाया' या कादंबरीतील कुरसन बेंडेची सून असणाऱ्या रतनला सुभानशेठ पळवितो तेव्हा ती त्याला म्हणते, " मेल्या पांढरपेशांच्या बायकांना तेवढीच अब्रूची चाड असते आणि आम्हा जंगली बायकांना नाही काय? पण तुला माहीत आहेच की माझा जोर; म्हणून तर आतापर्यंत छळ केला, पण अंगाला हात लावायची हिंमत झाली नाही तुझी." असा कणखर आवेश प्रकट करून ती पुन्हा म्हणते की, "चल नीघ काळतोंड्या, मसणात जाऊन पड तिकडे. मला तुझी मुळीच भीती वाटत नाही माकडा ! तू मला बाटवण्याच्याऐवजी आज मीच तुझं नरड फोडणार बघ!" ( पृष्ठ क्रमांक २५८) या संवादातील 'पण तुला माहीत आहेच की माझा जोर' आणि 'तू मला बाटवण्याच्या ऐवजी आज मीच तुझं नरड फोडणार बघ!' या दोन विधानातून रतनची करारी वृत्ती आणि विद्रोह दिसतो. आदिवासी स्त्रिया या आपल्या उपभोगासाठीच आहेत ही वृत्ती असणारा कुरसन बेंडे त्याच स्त्रीला या ठिकाणी घाबरताना दिसतो. तो तिच्यावर जोर जबरदस्ती करत नाही कारण तिचा करारीपणा, आत्मविश्वास आणि तिचे शौर्य त्याला तिच्यापासून दूर रोखून धरते. ही खरोखरच आपल्या नरडीचा घोट घेण्यास सक्षम आहे याची जाणीव त्याला होताना दिसते.

'विनोद कुमरे' यांच्या 'कोयतूर' कादंबरीमधे राजकीय विरोधाचा पहिला प्रहार डॉ. निशावर घडविण्यात आला. तिच्यावर जेव्हा हल्ला झाला तेव्हा तिने (निशाने) जवळच्या गाफील तरुणाच्या हातून तलवार हिसकावली आणि त्यांना उद्देशून बोलू लागली, "खबरदार कुणी जवळ आला तर ?"

सारे आवाक् होऊन निशाकडे बघत राहिले. मग तिचा पुन्हा दमदार आवाज घुमला, "अरे किती अत्याचार करणार रे आदिवासींवर; आदिवासी म्हणजे तुमच्या बापाची मालमत्ता आहे काय रे भडव्यांनो ? शेकडो वर्षांपासून तुम्ही माजलेल्या सांडासारखे या आदिवासींना पायदळी तुडवत आला आहेत. कुठे फेडणार ही पापं ? तुम्ही सुधारलेल्या जगातले नां ? हेच शिकवलं का या सुधारलेल्या जातीनं. दुसऱ्याच्या रक्तावर पोसणारी गिधाडाची हारामखोर जात आहे तुमची. तुमची जात, इमान धर्म म्हणजे केवळ दंडेलशाहीचा अत्याचार आहे ! कुणाची हिंमत असली तर या पुढे ! मी कोयतूर गोंडाची बच्ची आहे ! बाईमाणसांना धमकावण्याइतकी मर्दानगी तुमची." (पृष्ठ क्रमांक१३५, १३६) एका उच्चविद्याविभूषित आदिवासी स्त्रीच्या सहनशीलतेची परिसीमा वरील विधानातून प्रतिबिंबित होते. वेळप्रसंगी शस्त्र उचलून अनेक पुरुषांचा सामना करण्यासही स्त्री कुठेच कमी नाही याची जाणीवही या ठिकाणी होताना दिसते.

**निष्कर्ष**

- आदिवासी स्त्री कष्टाळू, सोशिक, त्यागी तरीही कणखर आहे.
- आदिवासी स्त्रीसाठी अलंकारापेक्षाही आपल्या पतीचे समाधान श्रेष्ठ आहे.
- स्त्री कोणत्याही बाबतीत पुरुषापेक्षा कमी नाही आणि तिने जर ठरवले तर ती कोणाचाही विरोध पत्करून प्रसंगी स्वतःचे म्हणणे सार्थ करून दाखवण्यास समर्थ आहे.

**संदर्भ**

१. साळुंखे, (डॉ.) सर्जेराव : १९९६ समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, प्रॉफिशन्ट पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्रमांक १६३, १६४

२. सोनवणे वाहरू : २०२० आदिवासी साहित्य संस्कृती आणि चळवळ, मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक २१८

# २२. महिलांवरील अत्याचार: स्वरूप, कारणे व उपाय

**प्रो. डॉ. मधुरा बाबासाहेब देसाई**
राजश्री छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.
**कु. विश्रांती जांबीवंत चव्हाण**
संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**गोषवारा**

आज भारतीय स्वातंत्र्याला ७६ वर्षे उलटून गेली तरी देखील समाजात स्त्री बाबत समानतेचा दृष्टिकोन अपेक्षेप्रमाणे विकसित होऊ शकला नाही ही खेदाची बाब आहे. स्त्रीच्या पूर्वीच्या परिस्थितीत आज बदल झालेले असले तरीही स्त्री अजूनही खऱ्या अर्थाने पुरुषाच्या बरोबरीला आलेली नाही. आधुनिक स्त्रीला सर्व प्रकारच्या संघर्षातूनच वाट काढावी लागते. स्त्री म्हणजे सृजनशीलता,सामर्थ्य आणि करुणाजन्य शक्ती होय पण या शक्तीचा २१ व्या शतकात देखील छळ होताना दिसत आहे. घराची आर्थिक बाजू सांभाळताना. तिला घर सांभाळून नोकरी करताना तारेवरची कसरत करावी लागते. आजही स्त्रीचा जन्म आनंदाने स्वीकारला जात नाही. आईच्या गर्भात ही ती सुरक्षित नाही निर्णय प्रक्रियेत स्त्रीला फारसे महत्त्वाचे स्थान दिले जात नाही.तिच्या श्रमाची गणना उत्पादक श्रमांमध्ये होत नाही.देशातील विविध वृत्तपत्रे व चित्रवाहिन्या पाहिल्यास स्त्री भूषण हत्या प्रकरणे, स्त्रिया वरील अत्याचाराची उदाहरणे मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात.अजून हुंडाबळी सारखे गुन्हे दिसून येतात. कायद्याने जरी स्त्री पुरुष समानता असली तरी त्याची अंमलबजावणी होत नाही किंवा अजूनही स्त्रीच्या मनावर रुढी, प्रथा, परंपरा धर्माचा पगडा असल्यामुळे स्त्रीच्या हक्कासाठी व संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा वापर करून घेत नाही .आज तर भांडवलशाहीमध्ये स्त्रीयांच्या सौंदर्याचाही बाजार मांडला जात आहे शोषण चालूच आहे फक्त शोषणाचे संदर्भ, शोषणाची साधने बदलली आहेत. शोषण करण्याची प्रक्रिया बदलली आहे.बाकी सारे तेच आहे.प्रसार माध्यमातून प्रसारित होणाऱ्या बातम्यांमधून देखील स्त्रीची विकृत प्रतिमा सतत रंगवली जाते एकूणच काय तर स्त्री, स्त्रियांचे प्रश्न स्त्रियांच्या भावना ,स्त्रीचे माणूस म्हणून जगणं आज धोक्यात आल्याचं पावला पावला गणित आपणास जाणवते आहे. स्त्रीला करावा लागणार संघर्ष, स्वतःच्या कुटुंबाबरोबर करावा लागणार संघर्ष ,सभोवतालच्या समाजाशी करावा लागणार संघर्ष,देशाशी करावा लागणार संघर्ष एकूणच काय जन्मापासून मरेपर्यंत स्वतःला सिद्ध करण्यासाठी करावा लागणार संघर्ष ही भारतातील स्त्रीची सत्य अशी कैफियत आहे .या परिस्थितीचा विचार करता महिलांचे सक्षमीकरण व स्त्रिया विषयी समाजाची मानसिकता बदलणे ही एक काळाची गरज आहे. देशाच्या जडणघडणीमध्ये व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडवण्यात स्त्रियांचा वाटा महत्त्वाचा आहे.आजच्या स्त्रीने जुनाट खुळचट प्रतिमा पुसून टाकून नवीन स्वातंत्र्य समतेचा पुरस्कार करणारी नवीन प्रक्रिया उभा केली पाहिजे. समाजाने स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनात बदल केला तर निश्चितच स्त्रियांना योग्य प्रकारे न्याय मिळेल व एक स्वाभिमानी स्त्री म्हणून या जगात वावरता येईल. जोपर्यंत स्त्री-पुरुषांमध्ये समानतेच्या

पातळीवर व्यवहार होत नाहीत तोपर्यंत समाजवादी समाज जीवन निर्माण होणार नाही. जनमाणसात स्त्री-पुरुष समानतेची जाणीव निर्माण करण्यासाठी खास प्रयत्न करावे लागतील. साऱ्या समाजातील माणसाचे जाणीवतेच्या पातळीवर नव्याने सामाजीकरण करावे लागेल तरच खऱ्या अर्थानं स्त्री स्वातंत्र्याची पहाट उगवेल.

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृती पुरुष प्रधान संस्कृती आहे. असं म्हटलं जातं याचा अर्थ भारताच्या संस्कृतीमध्ये महिलांपेक्षा पुरुषांना जास्त महत्त्व दिलं गेलं आहे. हे अनाधिकालापासूनच चालत आलेलं आहे. आणि अजूनही तेच चित्र दिसत आहे. वंश सातत्य व वंश विस्ताराच्या दृष्टीने निसर्गाने स्त्री व पुरुष असे भेद निर्माण केले आहेत. वास्तविक पाहता लिंग असमानते शिवाय या दोन्हीमध्ये काहीच फरक नाही. मात्र काळाच्या ओघात स्त्रीकडे दुय्यमत्व येत गेले आणि पुढे या ना त्या नात्याने सतत पुरुषावर अवलंबून राहणारी स्त्री असे भासऊन पुरुषसत्ताक समाजाने तिला अबला ठरविले व तिच्यावर अत्याचार सुरू झाले. खरंतर प्रत्येक पुरुषाचे जीवन हे स्त्रीशिवाय अपूर्ण आहे हे प्रत्येक पुरुष जातीला माहिती असूनही जणू हे सत्य ते स्वीकारायला तयारच नाहीत.

आज २१ व्या शतकात ही स्त्री जीवनाची होणारी शोकांतिका उघड्या डोळ्यांनी पहावी लागत आहे. त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. बेकारी, महागाई, शिक्षण, सामाजिक अन्याय, अत्याचार,आर्थिक दुर्बलता, तसेच श्रमिक वर्गातल्या कामगार, आदिवासी शेतकरी,शेतमजूर, मध्यमवर्गीय नोकरदार, दलित अपेक्षित मागासवर्गीय घरेलू कामगार, गिरणी कामगार, अशा संघटित व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या सगळया स्त्रियांना आजही पैशापासून आरोग्यापर्यंत आणि मारझोडीपासून हुंडाबळी पर्यंत अनेक अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. मुलगा जर वंशाचा दिवा मानला जात असेल तर,मुलगी ही त्या दिव्याची ज्योत आहे. दोन्ही घरे प्रकाशमय करण्याची ताकद या स्त्री ज्योतीमध्येच आहे हे जाणीवपूर्वक विसरले जाते.

आपण जर पुरुषप्रधान संस्कृतीच्या उतरंडीचा विचार केला तर या उतरंडीत सर्वात खालचे स्थान स्त्रीच्या वाट्याला जाते. महात्मा फुले यांनी स्त्रियाना ज्ञानाचा प्रकाश दाखवला व तो प्रकाश कायमस्वरूपी तेवत राहावा यासाठी सावित्रीबाईंनी आयुष्याची ५० वर्षे खर्च केली तरी सुद्धा स्त्रीचं अस्तित्व आज २१ व्या शतकातही कमीच वाटते.एक आदर्श पत्नी, एक आदर्श माता, एक आदर्श सून, एक आदर्श सासू,अशा नानाविध भूमिका पार पाडताना स्त्री जीवनाचे हे नाटक कारुण्मय होते. ज्या स्वराज्यात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीचे स्थान नाही.ते स्वराज्यच नव्हे आज देशामध्ये कोणतीही घटना घडो त्याचा सर्वात वाईट परिणाम पहिल्यांदा स्त्री वर्गात वरती होतो. आज स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात वाढला आहे.ग्रामीण व दलित महिलांना तर मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. इथल्या लोकशाही देशात सर्वांना समान मत राज्यघटनेमुळे मिळाले आहे.पण सर्वांना समान 'पत' मात्र या लोकशाही देशाने दिलेली नाही. प्रत्येकाच्या मनामध्ये स्त्री-पुरुषांमधील भिन्नता, स्त्री कमजोर आहे, ही ती दुबळी आहे. अशा प्रकारची मते मोठ्या प्रमाणात भिणवली आहेत. खुद्द स्त्रीया देखील आज या खोट्या विचाराच्या बळी पडल्या आहेत.

आज या विषमतेच्या चौकटीत साखळदंडाने बांधलेल्या स्त्रीला मुक्त करण्याची गरज आहे. आणि हे करण्याची ताकद केवळ स्त्रीमध्येच आहे .जोपर्यंत महिला पुढे येत नाही तोपर्यंत समाजाचे राष्ट्राचे कल्याण होणार नाही हे महात्मा गांधीजीचे उदगार योग्यच

आहेत. डॉ. वसंत गोवारीकर म्हणतात, "स्त्रीच्या हाती सत्ता दिली, सगळा कारभार सोपवला तर देश महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही".

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

प्रस्तुत शोधनिबंध पुढील उद्दिष्टानी लिहिण्यात आला आहे.

१. महिलांवरील अत्याचाराचे स्वरूप समजून घेणे.

२. २०२२ सालापासून भारतामध्ये होणाऱ्या स्त्रियांवरील अत्याचाराची आकडेवारी अभ्यासणे.

३. महिलांवरील अत्याचाराची कारणे शोधणे.

४. महिलांवरील अत्याचार थांबवण्यासाठी उपाय सुचविणे.

**शोधनिबंधाची विभागणी**

या शोधनिबंधाची विभागणी चार विभागात करण्यात आली आहे. पहिल्या विभागात महिला वरील अत्याचाराचे सुरू स्पष्ट केले आहे. दुसऱ्या विभागात भारतामध्ये होणाऱ्या स्त्रियांवरील अत्याचाराची आकडेवारी अभ्यासण्यात आली आहे. तिसऱ्या विभागामध्ये महिलांवरील अत्याचाराची कारणे विशद केली आहेत. व चौथ्या विभागात महिलांवरील अत्याचार कमी करण्यासाठी उपाय सुचविले आहेत.

**अभ्यासपद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध करण्यासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे ही सामग्री स्त्रियांच्या संदर्भातील विविध पुस्तके, मासिके,वृत्तपत्रामधील लेख, इंटरनेट, इत्यादीचा वापर करून माहिती गोळा केली आहे.

**महिलांवरील अत्याचाराचे स्वरूप**

स्त्रियांना समान व सन्मानाचे स्थान देणाऱ्या देशांमध्ये पहिला क्रमांकाचा देश नॉर्वे हा असून त्या पाठोपाठ फिनलंड व डेन्मार्क या स्कॅंडेनेव्हीयन देशाचा समावेश आहे. स्त्रियांचे आरोग्य व जीवित रक्षण याबाबत भारताचा १२८ वा क्रमांक असून बालमृत्यूच्या वाढत्य प्रमाणाने भारताला थेट अपराध्याच्या पातळीवर नेऊन बसवले आहे. भारतात होणाऱ्या दर एक लक्ष जन्मामागे मृत्यू पावणाऱ्या मुलींची संख्या ४५० एवढी असून तो या संदर्भातील जगातला सर्वात मोठा आकडा आहे.

भारतासारख्या प्रगत राष्ट्रात ही स्त्री भूषण हत्याचे प्रकार राजरोसपणे सुरू असल्यामुळे दर हजारी स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे. महाराष्ट्र राज्य स्त्रीविरोधी गुन्हात पहिल्या क्रमांकावर आहे. १४.३% गुन्हे दर ३३ मिनिटांनी महाराष्ट्रात घडत आहेत बालिकावर होणारे ११.३ % बलात्कार व ७७.३% वेशा व्यवसायासाठी लहान मुलींची विक्री महाराष्ट्रात होत आहे हे केवळ नोंदवलेले गुन्हे आहेत.कितीतरी गुन्हे नोंदविले जात नाहीत बालविवाहाला बंदी घालणारे कायदे देशात असताना राज्यभरात दरवर्षीला लाखोंनी असे विवाह होत असल्याचे चित्र आहे शिक्षणात मुलीचे यशस्वी होण्याचे प्रमाण अधिक असूनही त्यांच्यातला अन्याय अत्याचार व हुंडाबळीचे प्रमाण कमी झालेले नाही. महिलांवरील गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊनच राज्यभरातील पोलीस आयुक्तलयांना महिला

सहाय्य कक्षाची स्वातंत्रपणे स्थापना करावी लागते. ही काही अभिमानास्पद बाब नाही संस्कृतिक व समाजसेवेच्या क्षेत्रात महिलांनी उच्च स्थान मिळवले असले तरी धार्मिक क्षेत्रात त्यांना सर्वोच्च स्थानापासून अजून दूरच ठेवण्यात आले आहे. महिलांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात अद्याप व्हावातसा बदल झाला नाही. एवढाच याचा अर्थ आहे. आपण आपल्या स्त्रियांना फारसे चांगले वागत नाही. त्यांची पुरेशी काळजी घेत नाही. आणि त्यांचा योग्य तो सन्मानही राखत नाही हेच यावरून सिद्ध होते.

कायद्याने बदलता येईल असे हे चित्र नाही. त्यासाठी खऱ्याखुऱ्या मानसिक परिवर्तनाची ही गरज आहे. आर्थिक सुबत्ता आली की तिच्यासोबत संस्कृतीक संपन्नता येते हे ही आपल्यातीलच एक चुकीचे समीकरण आहे. ओरिसा आणि बिहार राज्यात स्त्री भूषण हत्येचे प्रमाण तेथील दारिद्र्यामुळे मोठे आहे. असे मानले तर पंजाब व हरियाणा ही देशातील सर्वाधिक संपन्न राज्य असूनही जन्माला येऊ घातलेल्या मुलीला ठार मारणारी सर्वाधिक गुन्हेगार राज्य असाही त्यांच नावलौकिक आहे. संपन्नता आणि संस्कृती याचा संबंध पार संशयास्पद करून टाकणारे हे दुर्दैवी वास्तव आहे. आज सध्याची परिस्थिती पाहिली असता भारतामध्ये स्त्रियांवरील हिंसाचाराचे तब्बल ४,४५,२५६ गुन्हे नोंदवले गेले आहेत. दररोज १२२० गुन्हे या नोंदी झालेल्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संस्थेने संकलित केलेल्या गुन्ह्याची आकडेवारी आहे. स्त्रियांवर होणारी हिंसा त्यांच्या रोजच्या आयुष्याच्या प्रत्येक पैलूशी जोडलेली आहे. कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ, स्त्रियांची खरेदी-विक्री, लैंगिक शोषण, कौटुंबिक हिंसा , कल आणि भाषेमध्ये डोकावणारा लिंगभेद या सगळ्या दृष्टिकोनातून त्याचा परिणाम म्हणजे स्त्रियांची सुरक्षितता धोक्यात येणे होय.

त्याचबरोबर या सगळ्या कारणामुळे मुली व महिला त्यांच्यावर होणारे हिंसेबाबत पाऊल उचलू शकत नाहीत. बॅरियर्स इन एक्सेसिंग जस्टिस ऑफ १४ रेप सर्वायवर्स इन उत्तर प्रदेश या २०२० साली प्रकाशित झालेल्या अहवालामध्ये सांगितले आहे. त्याचबरोबर स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेचं निवारण करण्यासाठी शासनाने जी काही यंत्रणा उभी केली आहे.ती स्त्रियांच्या आवाक्याबाहेर राहण्यासाठी अनेक घटक जबाबदार आहेत. जात, वर्ग, शारीरिक अक्षमता आणि वयाचा मोठा प्रभाव होत असल्याचं आपल्याला दिसून येतं. दलित ह्यूमन राइट्स डिफेंडर्स नेटवर्क या संघटनेने आपल्या अहवालामध्ये दलित स्त्रियांवर होत असलेल्या लैंगिक अत्याचारांचा अभ्यास करून ५० केस स्टडी प्रकाशित केले. हा अहवाल सांगतो की यातल्या ६२ टक्के मुली १८ वर्षाखालील होत्या. क्राइम इन इंडियाः २०२२ या अहवालानुसार देखील १८ते ३० या वयोगटात बलात्काराचे सर्वात जास्त गुन्हे नोंदवले गेले आहेत.अशा सगळ्या परिस्थितीत ही स्त्रिया काम करतात, पैसे कमवतात, मात्र कामाच्या ठिकाणी होणार छळ त्यांच्या मार्गातला मोठा अडथळा ठरतो.बंगळूर आणि दिल्ली राजधानी परिसरातील कपड्याच्या कारखान्यात काम करणाऱ्या महिलांच्या एका सर्वेक्षणानुसार १७% महिला कामगारांनी कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ होत असल्याचा सांगितलेला आहे.

**२०२२ सालापासून भारतामध्ये स्त्रियांवरील होणाऱ्या हिंसाचाराची आकडेवारी**

**राष्ट्रीय कुटुंब आरोग्य पाहणी**

अहवाल - ५ (२०१९-२१) नुसार १८ते ४९ या वयोगटातील २९% महिला आपण १५ वर्षे वयानंतर घरी शारीरिक हिंसा सहन केली असल्याचं सांगतात.

**स्त्रियांवरील अत्याचाराची कारणे**

आजपर्यंत स्त्रीच्या वेदना केवळ स्त्रीच्या  राहिलेल्या नाहीत स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

या सर्व समस्याचे मूळ कारण शोधण्याचा प्रयत्न केला तर त्याचे उत्तर आजची समाजव्यवस्था हेच सापडेल आणि त्यातही खोलवर जाऊन विचार केला तर या समाज व्यवस्थेतील कुटुंब व्यवस्था हेच कारण सापडेल.

**स्त्रियांवरील अत्याचाराची पुढील कारणे सांगता येतील**

**१. लिंग आधारित श्रमविभागणी**

कुटुंबातील मुख्य कर्ता पुरुष किंवा इतर पुरुष सभासदाचे श्रम हे आर्थिक कुटुंबाबाहेर जोडले जाऊन कुटुंबातील आई-बहीण पत्नी एकूण मुलाचे संगोपन स्वयंपाक घरगुती कामाशी तिला जोडले जाते पुरुषप्रधान व्यवस्थेत कुटुंबातील कामाचे मोल नसल्याने आर्थिकदृष्ट्या ती दुसऱ्यावर अवलंबून राहते कुटुंबातील चार भिंतीतच तिचे विश्व दडपले आहे .तिच्या अधिकाराची जाणीव तिला होत नाही .बऱ्याचदा स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असल्या तरीही पुरुषप्रधान व्यवस्थेत तिच्या श्रमावर, वेतनावर पुरुषांचाच अधिकार असतो. घटनेने दिलेले हक्क रुढीने बनवलेली प्रवृत्ती आणि प्रत्यक्ष भोवती असणारी परिस्थिती या सर्वांचा आपसात विरोध असल्याने स्त्री-पुरुषांमधील बेदीली  बोलकी होऊ लागली आहे.

**२. कुटुंबातील सत्तासंबंध**

पुरुषप्रधान कुटुंब रचना मुळातच असमान तत्वावर आधारित असल्याने कुटुंबात स्त्रीला समान संधी समान दर्जा नसतो. कुटुंबात पुरुष उच्च स्थानी असतो. तो अधिकाराने मोठा असतो व आपले निर्णय दुय्यम स्थान दिलेल्या घरातील स्त्रीवर लादतो.

**३. कुटुंबाची पारंपारिक चौकट**

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांभोवती होते अनेक पारंपरिक चौकटी निर्माण केल्या गेल्या आहेत. 'पतिव्रता स्त्री', 'आदर्श माता', 'आदर्श गृहिणी', याचे जाळे निर्माण करून सासुरवास सहन करावा नवऱ्याच्या जाचापुढे अधिक सहनशीलतेने वागावे हे गृहीत धरले जाते व तिला आदर्श स्त्री असे संबोधले जाते. यातूनच प्रत्येक स्त्रीने नवऱ्याप्रती स्त्री धर्म पाळावा अशा पारंपारिक चौकटी निर्माण केल्या आहेत.

**४. पतीची व्यसनाधिनता**

पतीच्या व्यसनाधिनतेमुळे विशेषतः दारूमुळे किंवा स्त्रीने कष्टाने मिळवलेले पैसे नवऱ्याला दारू व जुगारसाठी न दिल्याने स्त्रीवर अत्याचार होत राहतो.

**५. मुलगा- मुलगी भेद**

अजूनही कुटुंबात आणि समाजात मुलगा- मुलगी असा भेद केला जातो. मुलांसाठी वेगळे व मुलींसाठी वेगळे नियम बंधने दिसून येतात. मुलगी झाल्यास स्त्रीलाच दोषी ठरवून तिला त्रास दिला जातो. मुलगा होईपर्यंत मुलीची संख्या वाढवून तसेच अलीकडे स्त्रीभ्रूण हत्या करून स्त्रीच्या शरीरावर अत्याचाराच केला जातो.कळी उमलण्याआधीच तिचा जगण्याचा हक्क नाकारला जातो.

**६. हुंड्यांची प्रथा**

समाजात अजूनही हुंडा देणे व हुंडा घेणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते हुंडा देणे व हुंडा घेणे यावर कायद्याने बंदी आहे. तरी देखील कोणत्याही स्वरूपात ही प्रथा सुरू आहे. यातूनच आज हुंडाबळीसारखे गुन्हे दिसून येतात. वर्तमानपत्रात रोज किमान एक तरी घटना स्त्री अत्याचाराची असते.तिला कधी हुंड्यासाठी छळले जाते तर तिला कधी रॉकेल टाकून जळले जाते. शिवाय लग्नात आहेर कमी आले तर तिला आयुष्यभर टोचून बोलले जाते.तिचा शारीरिक मानसिक छळ केला जातो.

**७. असुरक्षित समाजव्यवस्था**

घरात स्त्री सुरक्षित नसतेच तसेच समाजात वावरतानाही ती असुरक्षित असते. नोकरी व्यवसायात, शेतावर, बांधकामावर ही ती सुरक्षित नसते. अशा ठिकाणीही तिच्यावर विविध प्रकारे अत्याचार केला जातो.

थोडक्यात स्त्रीवरील अत्याचाराची अशी विविध कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, कारणे दिसून येतात.

**स्त्रियांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी सुचविलेले उपाय**

स्त्रिया वरील अत्याचाराची वरील विविध कारणे पाहिल्यास ती कमी होण्यासाठी स्त्रिया विषयी समाजाची मानसिकता बदलणे ही काळाची अत्यावश्यक गरज आहे. यासाठी पुढील उपाय सुचविता येतील.

**१. स्त्री सुरक्षिततेच्या नियोजनाची तरतूद व अंमलबजावणी**

स्त्रियांवर शाळेत, कॉलेजमध्ये,नोकरीवर जाताना, व नोकरीच्या ठिकाणी अत्याचार होतात त्यामुळे त्यांच्यात भीतीची असुरक्षिततेची भावना निर्माण होते. शासनाने स्त्रियावर होणाऱ्या अत्याचारांची दखल घेऊन त्यांच्या सुरक्षिततेसाठी कठोर नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे याशिवाय विधवा कायदा (१९५५), हिंदू वारसा कायदा(१९५५), घटस्फोट प्रतिबंधक कायदा (१९६१), या कायद्यात सुधारणा झाल्या पाहिजेत.

**२. पालक व समाज यांच्यात जागरूकता निर्माण करणे**

आपल्या पुरुषप्रधान समाजात मुलीच्या शिक्षणाचा उपयोग माहेराच्या कुटुंबाला होत नाही पालकांचा म्हातारपणी सांभाळ करण्याची क्षमता जबाबदारी फक्त मुलाची असते या मानसिकतेला वैचारिक व भावनिक क्रांतीतून तडा देऊन स्त्री- शिक्षणाचा म्हणजेच महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे केला गेला पाहिजे.

**३. स्त्री- शिक्षणात आधुनिक शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी**

स्त्रियांच्या शिक्षणात जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण,यांना सामोरे जाण्याची क्षमता कौशल्य देणारे शिक्षण असणे गरजेचे आहे. या आधुनिक शिक्षणामुळे स्त्रियांना नोकरीच्या निरनिराळया संधी उपलब्ध होतील.

**४. स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकास कार्यावर भर**

स्त्रियांच्या सर्वांगीण विकासात स्त्रियांच्चे व्यक्तिमत्व हा एक महत्त्वाचा घटक आहे. स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्राथमिक माध्यमिक स्तरापासूनच औपचारिक शिक्षणाबरोबर अनौपचारिक शिक्षण मिळणे गरजेचे आहे. स्त्रियांची उदासीनता हे त्यांच्या

अपयशाचे गमक आहे .यासाठी स्त्री संघटनाची संख्या वाढली पाहिजे. स्त्रियांसाठी व्याख्याने,चर्चासत्रे, कृती सत्रे यांचे आयोजन कार्यक्षमरित्या झाले पाहिजे.यामुळे स्त्रिया स्वयंपूर्ण होऊन शिक्षणातील व जीवनातील समस्यांना त्या समर्थपणे तोंड देऊन शकतील.

**निष्कर्ष**

सध्या स्त्रियावर होणारे गुन्हे व लैंगिक अत्याचार यांची संख्या फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे.त्या हिंसेची मूळ ज्या पितृसत्तेत आहेत ती आपल्या समाजात फार खोल रुजलेली आहेत.यावरून असे सुचित करण्यात येते की, स्त्रीचा सन्मान आणि संरक्षण हे तिचेच नाही तर संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे.भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीने या कर्तव्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.यामुळेच एक सशक्त समृद्ध आणि प्रगल्भ समाजाची निर्मिती होईल.

थोडक्यात स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून नियोजन, स्त्री सक्षमीकरणासाठी निधी, स्वयंसहायता गटामार्फत आर्थिक विकास व सक्षमीकरण सुरक्षा व संरक्षण विषयक तरतूद,महिलांच्या मालमत्ता हक्काची जोपासना, अपघातग्रस्त महिलांचे पुनर्वसन, स्वयंसेवी संघटनेचे प्रयत्न, एकात्मिक बालविकास सेवा योजनेचा यंत्रणेचा महिला सबलीकरणासाठी वापर व्यक्ती समाज शासन यांचा स्त्री शिक्षणाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन, समाजाच्या मानसिकतेत बदल इत्यादीमुळे स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण निदान काही अंशी तरी कमी होईल.

**संदर्भ ग्रंथ**

**१. पुस्तके**

I. Desai Neera and Thakkar Usha, “Women in Indian Society”, National Book Trust India,(2001).

II. चाळके शोभा (संपादक), ‘भारतीय स्त्रियांचे स्वातंत्र्य’? निर्मिती विचारमंच, कोल्हापूर (२०१०)

III. Mahatpatra Subahshini, ‘Development of Woman Challenges and Response, Rajat publications, New Delhi( 2006)

IV. Sen Bimla, “Role of Women in Nation Building”, Abhishek Publication,Chandigarh ( 2007)

V. Soni Balhir, “Empowerment of Women workers, the Unorganised Sector” A.S.Saini for dominant publisher, Delhi (2007)

**२. मासिके**

१. सांबर दिपाली, ‘स्त्रिया वरील कौटुंबिक हिंसाचार व कायदा’, मुक्तीवेध स्त्री विशेषांक, पुणे (डिसेंबर २००६)

२. संकपाळ दत्तात्रेय, “महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण” शिक्षण संक्रमण, अंक १० (मार्च २०१२)

**३. Website**

१. https://ruralindiaonline.org/en/articles /violence-against-women-in-india-mr/

# २३. भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्री-पुरुष असमानता - एक अभ्यास

**प्रा. डॉ. सुनील संभाजी साठे**
कला, वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज, मायनी, ता. खटाव, जि. सातारा.

**प्रस्तावना**

भारतीय समाज हा वर्ण, वर्ग, चातुवर्ण्य, जातिभेद आणि अठरापगड जातीमध्ये विभागला गेला असून जातीव्यवस्था व स्त्री-पुरुष असमानता हे भारतीय समाजाचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील दलित, अस्पृश्य आणि मागासवर्गीय या जाती वरिष्ठ वर्णियांच्या अन्याय अत्याचाराला नेहमीच बळी पडल्या व त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर अन्याय-अत्याचार झाला तशाच प्रकारच्या किंबहुना त्याहीपेक्षा जास्त अन्याय भारतीय समाज-व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा व जबाबदार घटक असलेल्या स्त्री वर्गावर झाला. भारतातील धार्मिक अनिष्ट चालीरीती ,रुढी, प्रथा परंपरा आणि पुरुषी वर्चस्वामुळे त्या आपल्या हक्क अधिकारापासून शोषित व उपेक्षित राहिल्या घरातील शोभेची वस्तू पुरुषाच्या करमणुकीचे साधन या पलीकडे स्त्री जातीची वेगळी अशी ओळख भारतीय समाजामध्ये नव्हती व नाही. त्यांच्या वाट्याला निखळ स्वातंत्र्य कधी या व्यवस्थेने येऊच दिले नाही. त्या स्वातंत्र्यापासून कोसो दूर राहिल्याचे चित्र सबंध भारतामध्ये दिसून येत आहे.

मानव जातीच्या इतिहासा इतकाच स्त्री जातीवरील अत्याचार सनातन आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीला जीवनात मुलगी, पत्नी, आई, सून, सासू अशा वेगवेगळया भूमिका पार पाडाव्या लागतात. स्त्रीला लहानपणी वडिलांच्या छायेत, तरुणपणी पतीच्या छायेत आणि म्हातारपणी मुलांच्या छायेत आपले आयुष्य घालवावे लागते. पुरुषसत्ताक समाजाने स्त्रीला कुठल्याही प्रकारचे निर्णय स्वातंत्र्य दिलेले नाही.स्त्रीने कुटुंबासाठी स्वताचे अस्तित्व विसरून दुसऱ्याची सेवा, शुश्रुषा करणे ,त्याग करणे,यात आपले आयुष्य खर्च केले. जगातील जवळजवळ अर्धी लोकसंख्या स्त्रियांची आहे. त्यामुळे अर्ध्या लोकसंख्येचे प्रश्न डोळसपणे जाणून घेणे आवश्यक ठरते.भारतीय स्त्री हि नेहमीच उपेक्षित व दुर्लक्षित राहिली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय समाजातील तिची दशा, दिशा व पुरुषी वर्चस्वामुळे पशु पेक्षाही हिन, दिन जीवन जगण्यास भाग पाडणाऱ्या या व्यवस्थेतील स्त्रियांच्या समान हक्क यांचा अभ्यास होणे अत्यंत महत्त्वाचे व गरजेचे आहे. त्याचा थोडक्यात आढावा या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे या शोधनिबंधात पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

१. भारतीय समाज व्यवस्थेचा आढावा घेणे

२. स्त्रियांच्या भारतीय समाजव्यवस्थेतील स्थानाचा अभ्यास करणे

३. भारतीय स्त्री पुरुष असमानतेचा चिकित्सक अभ्यास करणे

**अभ्यासाची गृहीतके**

१. भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांना पूर्वी पशुपेक्षाही हिन वागणूक दिली जात होती.

२. स्त्रियांना भारतीय समाजामध्ये दुय्यम स्थान दिले गेल्याचे दिसते.

३. भारतामधील स्त्रिया आज पुरुषाच्या बरोबरीने काम करताना दिसत आहेत परंतु त्यांच्यावरील अन्यायाचे प्रमाण वाढले आहे.

**संशोधन पद्धती**

संबंधित संशोधन कार्यात तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम स्त्रोत तसेच ऐतिहासिक पद्धतीचा आधार घेण्यात आला आहे.

**दुय्यम स्त्रोत**

प्रस्तुत शोधनिबंधाला उपयुक्त ठरेल असे विविध संशोधन साहित्य, संदर्भ ग्रंथ पाक्षीके, मासिके वर्तमानपत्रे तसेच विविध तज्ञांचे लेख याचा आधार घेऊन संशोधनाची मांडणी केली आहे.[१]

**शोधनिबंधाचे स्पष्टीकरण**

स्त्री व पुरुष ही संसाराची दोन चाकं हि चाकं एकसारखी एक साथ चालत राहिली तर आयुष्यात सुख, समाधान आणि समृद्धी मिळते. पण भारतात शतकानुशतके पुरुषच पुढे असल्याचे दिसते. प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांचेच वर्चस्व आहे. त्यामुळे भारताची संस्कृती पुरुषप्रधान संस्कृती म्हणून ओळखली जाऊ लागली. पुरुषांनी घराबाहेर ख्यालीखुशाली करावी. आणि स्त्रीने घरामध्ये चूल आणि मूल सांभाळावं. स्त्रीला भावना, बुद्धी, हृदय, मन आहे याचा या पुरुषप्रधान संस्कृतीला विसरच पडला होता. स्त्री ही एक भोग वस्तू आहे असेच पुरुषांना वाटत होते पेशवाईत व मोगलाईत तर स्त्रीचे जीवन किळसवाणे होते. अमीर उमरावांचे तर जनानखानेच असायचे. तत्कालीन कालखंडामध्ये सरांस मुस्लिम व श्रीमंत घराण्यामध्ये गोशा पध्दत होती. स्त्रीचे नख सुद्धा दिसू नये याची व्यवस्था या संस्कृतीने केली होती. एका एका पुरुषाच्या १०-१० लग्नाच्या बायका असायच्या. पुरुषाचा जर स्त्रीच्या आधी मृत्यू झाला तर तिला पतीचं प्रेत मांडीवर घेऊन सरणावर बसावं लागे आणि धगधगत्या ज्वालेत भस्म व्हावं लागे. या दुष्कृत्याला 'सती'या नावाने संबोधले जात होते. [२]

**स्त्रियांचे स्वातंत्र्यपूर्वकाळातील सामाजिक स्थान**

स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे स्थान अत्यंत हिन दिन स्वरूपाचे होते. त्यांना कसलेही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. ब्रिटिशपूर्व भारतामध्ये एकत्र कुटुंब व्यवस्था होती. कुटुंबप्रमुखाचा आज्ञापालन हा कुटुंब व्यवस्थेचा पाया होता, बालजरठविवाह, विधवा विवाहस बंदी, सतीची चाल, बहुपत्नीत्वाची चाल इत्यादी अनिष्ट चालीरीतीमध्ये भारतीय स्त्रिया भरडल्या जात होत्या. त्यांच्यावर अमानुष अन्याय अत्याचार होत होते. अशातच १६००व्या शतकामध्ये ब्रिटिशांचे भारतात आगमन झाले. व्यापारी म्हणून आलेल्या ब्रिटिशांनी येथील संस्थानकामधील राजकीय अस्थिरतेचा फायदा उठवत भारतातील राजकीय सत्तेची सूत्रे हातात घेतली आणि या देशात प्रथमच सर्वांना शिक्षणाची सुरुवात केली परिणामी देशातील शिक्षित लोकांचा एक वर्ग शिक्षण घेऊन बाहेर पडला

पाश्चात्य शिक्षणातून भारतीयांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही मूल्यांची ओळख झाली. सर्व माणसे समान असून सर्वांना समान संधी, हक्क व अधिकार मिळाले पाहिजेत या आणि अशा अनेक मानवी मूल्यांची भारतीयांना ओळख झाली आणि यातूनच राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, रानडे, गोखले, लो. टिळक आगरकर इत्यादी समाजसुधारकांचा उदय झाला. त्यांनी आर्य समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज स्थापन करून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध जोरदार आवाज उठविला त्यामध्ये राजाराम मोहन रॉय यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल.

राजा राम मोहन रॉय हे स्त्रियांच्या हक्काचे पहिले पुरस्कर्ते होते. रॉय यांनी सतीच्या चालीला विरोध करून स्त्रीला व्यक्ती म्हणून स्वतंत्र अस्तित्व असते याची जाणीव करून दिली पतीचे अस्तित्व संपले म्हणजे स्त्रीने स्वतःचेही अस्तित्व आत्मदहण्यासारख्या क्रूर पाशवी मार्गाने मिटवण्याची गरज नाही. पती निधनानंतरही ती जगू शकते. समाजाचा ती एक घटक आहे. तिच्यावर सती जाण्याची सक्ती करण्याचा त्या समाजाला काहीच अधिकार नाही. जिवंत राहण्याचा हक्क मग तो पुरुषाचा असो किंवा स्त्रीचा तो सारखाच महत्त्वाचा आहे असा विचार रॉय यांनी मांडला. त्यांनी विधवा विवाहाचा पुरस्कार केला नवरा मेल्यावर त्यांच्या पत्नीला व मुलांना त्यांचा मालमत्तेचा निम्मा वाटा मिळावा आणि मुलाच्या वाट्याला येणाऱ्या मालमत्तेचा१/४ भाग मुलीला देण्यात यावा अशी मालमत्तेची विभागणी त्यांना अभिप्रेत होती.[३]

स्त्री दासमुक्तीसाठी ज्यांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले व स्त्री पुरुष समानतेची शिकवण देऊन स्त्री उद्धारासाठी देशातील पहिली शाळा सुरू करून स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीला आणले ते महाराष्ट्रातील महान समाज सुधारक म्हणून ज्यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागतो ते म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले आधुनिक भारतातील प्रबोधनाच्या चळवळीतील एक महान समाज सुधारक म्हणून फुल्यांना ओळखले जाते. विद्रोही विचार मांडणारे आद्य सुधारक अशीही त्यांची ओळख आहे. सुरुवातीपासूनच त्यांचे लक्ष स्त्रियांच्या प्रश्नांकडे होते सर्व स्तरातील स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव त्यांना होती. म्हणूनच त्यांनी स्त्रियांसाठी प्रथम शाळा सुरू केली. स्त्री ही भविष्यकाळाची भाग्यविधाती आहे हे लक्षात घेऊन त्यांनी स्त्री शिक्षणाचा हिरीरीने पुरस्कार केला. महात्मा फुले यांनी पुण्यात बुधवार पेठेतील भिडे वाड्यात १८४८ मध्ये सर्व जातीय मुलींची पहिली शाळा काढली. त्यानंतर त्यांनी पुण्यामध्ये नाना पेठ, भवानी पेठ, मंगळवार पेठ, वेताळ पेठ, जुना कसब्याचा पूर्व भाग इत्यादी ठिकाणी मुलींच्या शाळा सुरू करून भारतीय स्त्रीला गुलामगिरीतून मुक्त केले.

भारतीय स्त्रीला पुरुषी गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी फुल्यांनी क्रांतिकारक कार्य केले. एकीकडे स्त्रियांवर पुरुषांनी गुलामगिरी लादली होती तर दुसरीकडे धर्मसत्तेने गुलामगिरी लादलेली होती यातून तिला स्वातंत्र्य मिळवून इच्छेप्रमाणे जगता यावे केशवपण, पुनर्विवाहस बंधी, बालविवाह अदी अनिष्ट प्रथेतून त्यांची सुटका करण्यासाठी फुल्यांनी यशस्वी प्रयत्न केले आणि स्त्रियांच्या सर्वांगीण सुधारण्याचा विचार मांडला. [४]

**स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये स्त्रियांचे स्थान स्त्री पुरुष समानतेसाठी केलेले प्रयत्न**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये स्त्री जीवनाच्या परिवर्तनाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. स्त्रियांचे हक्क, कर्तव्य, त्यांचे शोषण, अन्याय, गुणवत्ता, क्षमता इत्यादी विषयी विचार होऊ लागला भारतामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्यासाठी व आपला समानतेचा हक्क बजाविण्यासाठी राजकीय अधिकार हा सत्तेच्या बाबतीमध्ये खूप महत्त्वाचा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेमध्ये महिलांना आरक्षणाच्या माध्यमातून आपला सर्वांगीण विकास घडवून आणून पुरुषाच्या बरोबरीत आणून समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचे फार फार मोठे कार्य केले महिलांना 50% आरक्षण देणे हे समतेच्या अधिकाराच्या दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे बनले आहे त्यामुळे भारतामध्ये केवळ स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत राज व्यवस्थामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देणे पुरेसे नाही तर संसद, घटक राज्याची विधिमंडळी, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय अशा सर्व क्षेत्रात भारतातील महिलांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्यासाठी समतेचा हक्क बजावण्यासाठी आरक्षण देणे गरजेचे आहे. स्त्री पुरुष भेदभाव न करता समानतेचा आग्रह धरून पुरुषाच्या बरोबरीने स्त्रियांना सर्व बाबतीत समान अधिकार मिळवून देणे ही केवळ तडजोड नाही तर तो त्यांचा मूलभूत अधिकार आहे.

भारतीय घटनेने दिलेला मूलभूत हक्क हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. परंतु स्त्रियांकडे पाहण्याचा शासनाचा आणि समाजाचा दृष्टिकोन प्रामुख्याने कल्याणकारी उपक्रमांच्या लाभार्थी असाच राहिला. स्त्रिया विकास प्रक्रियेच्या अविभाज्य घटक होऊ शकल्या नाहीत स्वातंत्र्य लढ्याची चळवळ तसेच दुर्बल घटकांच्या हक्काच्या चळवळीत जातीप्रथा, विषमता निर्मूलन, कामगार शेतकऱ्यांच्या चळवळी, सामाजिक सुधारणा उत्पादन प्रक्रिया यात स्त्रियांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी एकूण सामाजिक आर्थिक राजकीय जीवनात स्त्रियांचा ज्या प्रमाणात सहभाग वाढायला पाहिजे होता त्या प्रमाणात वाढलेला दिसून येत नाही 1948 साली संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्काचे सनद तयार केली त्यामध्ये स्त्रियांचे काही वेगळे प्रश्न आहेत आणि त्याचा मानवी हक्काचा विचार झाला पाहिजे. स्त्रीयामागे राहिल्या तर समाज मागे राहील याची जाणीव होऊन संयुक्त राष्ट्र संघाने 1975 हे वर्ष प्रथमच 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले आणि त्याचेच पुढे महिला दशकात रूपांतर केले. त्याचे औचित्य साधून भारत सरकारने एक समिती नेमून 'समतेकडे वाटचाल' हा स्त्रियांच्या परिस्थिती विषयक अहवाल तयार केला.

स्त्रियांसाठी वेगळी नीतिमूल्य आणि पुरुषांसाठी वेगळी नितीमूल्ये या विचारसरणीचा पगडा सर्व शासकीय संस्थांवर असल्याचे दिसते न्याय यंत्रणा, दंड यंत्रणा, नोकरशाही, राज्य यंत्रणा, राजकीय संस्था, प्रसारमाध्यमे, शिक्षण संस्था तसेच राजकीय पक्ष, खाजगी आस्थापना, कृषी उत्पादना संबंधात सर्व क्षेत्रे त्यापासून मुक्त नाहीत. त्यामुळे स्त्रियांवर धर्म , वर्ग,जात आणि लिंगभाव अशा सर्व बाजूने अन्याय होत असतो स्त्रियांबाबत होणारे सर्व प्रकारचे भेदभाव दूर करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने 1979 मध्ये ठराव संमत केला होता त्यांच्यावरील भेदभाव दूर करणे आणि न्यायव्यवस्थेत समानतेचे तत्व समाविष्ट करणे हे या ठरावावर सही केलेल्या सर्व देशांना बंधनकारक आहे. ५ आज निसर्ग दत्त अधिकारासाठी जगातील सुमारे 275 कोटी स्त्रियांना जीवनाच्या स्तरावर संघर्ष करावा लागत आहे. 1970 साली स्त्री-मुक्ती चळवळ सुरू झाली. 1950 ते 1970 हा स्त्री चळवळीचा संक्रमणाचा काळ मानावा लागेल.8 मार्च

1975 हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने 'स्त्रीमुक्ती दिन' म्हणून जाहीर केला. जगातील बहुतेक सर्व राष्ट्रात स्त्रियांवर अन्याय होताना दिसतात. स्त्री मुक्ती चळवळीला 40 ते 50 वर्षे झाली असली तरी सर्व क्षेत्रात अजूनही पुरुषांचे वर्चस्व असलेले दिसते. गावपातळीपासून ते शहर, राज्य राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्षेत्र अशा सर्व पातळीवर स्त्रियांना दुय्यम कनिष्ठ दर्जा दिलेला दिसतो. स्त्रियांना सर्व क्षेत्रात असुरक्षित वाटू लागले आहे कारण सर्वसामाजिक संस्था निष्प्रभ ठरू लागले आहेत.

**समारोप**

अशाप्रकारे भारतीय समाज व्यवस्थेमधील स्त्री- पुरुष असमानतेचे स्वरूप राहिले असून स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये भारतीय स्त्री जीवनाचे स्वरूप अत्यंत कीळसवाने असे राहिल्याचे दिसून येते. धर्मसत्तेच्या अनिष्ट चालीरीती आणि पुरुषी सत्तेने अमानुष अन्याय अत्याचार केला. त्यांना जनावरापेक्षाही वाईट वागणूक दिली. माणसासारखा माणूस असलेल्या स्त्रियांना भारतीय समाज व्यवस्थेने दासी, भोगवस्तू, करमणुकीचे साधन, मोलकरीण, बटीक म्हणूनच वागणूक देऊन पुरुषांनी त्यांचा फक्त वापरच केला आणि कोणत्याही क्षेत्रामध्ये समान संधी न देता शिक्षण वारसा हक्क, समानता, आर्थिक व्यवहार या मूलभूत हक्कापासून नेहमीच वंचित ठेवले. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारतीय राज्यघटनेच्या आरक्षणाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनेद्वारे भारतीय स्त्रियांना वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये समान संधी देऊन त्यांचा राहणीमानाचा व सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला. परिणामी आज प्रत्येक क्षेत्रामध्ये भारतीय स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत असल्याचे दिसते. असे असले तरी स्त्री व पुरुष ही असमानतेची दरी आजही संपलेली दिसत नाही. आजही स्त्रियांवर अमानुष अन्याय अत्याचार होताना दिसतात. आजही मोठ्या प्रमाणावर स्त्रियांना बलात्कार, खून, फसवणूक यासारखे महाभयंकर प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. वाघ्या, मुरळी, देवदासी यासारख्या भयंकर प्रथांचा भारतीय स्त्रिया बळी पडल्याची दिसून येते. आरक्षणाच्या माध्यमातून स्त्रिया सरपंच नगरसेवक, आमदार, खासदार मंत्री या प्रमुख पदी विराजमान झाले असल्या तरी बहुतेक ठिकाणी त्यांच्या जागेवर त्यांचे पतीच मिटींगला येताना दिसतात निर्णय निर्धारण व धोरण निश्चिती यामध्ये अनेक क्षेत्रात स्त्रियांना सहभागी करून घेतले जात नसल्याचे चित्र संबंध देशांमध्ये पहावयास मिळते.

**निष्कर्ष**

१. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये भारतीय स्त्री रूढी प्रथा परंपरेच्या बळी ठरल्या असल्याचे दिसते.

२. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्यासाठी विविध योजना व कायद्याच्या माध्यमातून प्रयत्न केले. परंतु स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढल्याचे दिसते. ते पूर्णतः थांबविण्यास भारत सरकारला अपयश आल्याचे दिसून येते.

३. भारतामध्ये स्त्री- पुरुष समानता झाली नाही.

४. आजही भारतीय स्त्रिया देवदासी वाघ्या मुरळी या रूढीच्या बळी ठरलेल्या आहेत.

**संदर्भसूची ग्रंथ**

१. भांडारकर पू .ल," सामाजिक संशोधन पद्धती ", श्री मंगेश प्रकाशन नागपूर 1978 पृ.क्र.२५

२. प्रा. कडवे रघुनाथ, "सामाजिक क्रांतीचे अग्रदूत सावित्रीबाई फुले"राज प्रकाशन, यवतमाळ २०१८पृ.क्र .६

३. डॉ. भोळे. भा.ल."आधुनिक भारतातील राजकीय विचार"पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर २०१६ पृ.क्र ७०

४. प्रा. डॉ. सुनील संभाजी साठे, 'स्त्रीमुक्तीचे आद्यप्रवर्तक महात्मा ज्योतिबा फुले,- महात्मा फुले-व्यक्ती आणि कार्य एस. आर. पी पब्लिकेशन, २०२१ पृ.क्र - २

५. Dr. Gade. Arun, Pr Kamble Vishal " Sanskruti international multisciplinary research Journal March -2022 P.No.23

६. डॉ. साठे सुनील संभाजी,"स्त्री मुक्ती चळवळीचा इतिहास साप्ताहिक - स्वाभिमान वर्ष१२अंक १५-१६ दिवाळी अंक ५-११-२०१८ पृ.क्र-१

VOLUME - XIV, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2025
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com) CC-02**

# २४. भारतातील स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरण

**प्रा. डॉ. स्वाती अशोक माळकर**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, कन्या महाविद्यालय, मिरज, सांगली.

**प्रस्तावना**

स्त्री पुरुष समानता हा कोणत्याही देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचा मुद्दा मानला जातो.आज ही भारतामध्ये सर्वच क्षेत्रामध्ये स्त्री पुरुष असमानता दिसून येते.भारतातील राज्यघटनेने स्त्री पुरुषांना समान हक्क अधिकार दिले आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे झाली तरी देखील भारतात लैंगिक असमानता दिसून येते. आहे. २०४७ चा विकसित भारत बनवायचा असेल तर त्यासाठी महिलांचे योगदान महत्वाचे ठरणार आहे. स्त्री सक्षम झाली तर त्याचा अनुकूल परिणाम सर्व क्षेत्रावरती दिसून येणार आहे. महिलांचा आर्थिक विकास, राजकीय विकास, शैक्षणिक विकास होणे गरजेचे आहे. लिंगसमभाव, समानता, महिलांच्या हक्क्चे रक्षण व त्यांचा सहभाग याशिवाय सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करणे अशक्य आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे काय. त्याचा अर्थव्यवस्थेला होणारा फायदा. स्त्री पुरुष यांचे असलेले प्रमाण आणि साक्षरता, राजकरणातील महिलांचा सहभाग या सर्व गोष्टीचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**संशोधन पद्धती**

सबंधित विषयाच्या अनुषंगाने माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. यामध्ये साप्ताहिक,शासकीय सांख्यिकी माहिती ,इंटरनेट,तसेच या विषयाच्या सबंधित पुस्तके यांचा वापर केलेला आहे.

**उदिष्ट्ये**

१. महिला सक्षमीकरण म्हणजे काय याचा अभ्यास करणे.

२. भारतातील स्त्री- पुरुष प्रमाण, साक्षरता आणि राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.

स्त्री पुरुष समानता म्हणजे स्त्रीया आणि पुरुष यांना समान हक्क आणि जबाबदारी. पुरुष आणि स्त्रीयासाठी हक्क, जबाबदारी आणि संधी त्यांच्या लिंगावर अवलंबून नसतील अशी अट घालून लिंग असमानता दूर करण्याचा प्रयत्न करणे. महिला सक्षमीकरण आणि लैंगिक समानता या संकल्पना एकमेकांशी निगडित आहे. महिला सक्षमीकरणची पहिली अट म्हणजे स्त्री पुरुष समानतेला प्रोत्साहन देणे. बचत, उपभोग प्रवृत्ती आणि त्याचा पुनर्वापर प्रवृत्ती याबाबत भारताची अर्थव्यवस्था महिला केंद्रित आहे. खोलवर रुजलेले सामाजिक नियम ,आर्थिक विषमता, राजकीय आव्हाने यामुळे लैंगिक विषमता कायम आहे.Global Gender Gap Report २०२३ नुसार लिंग समानतेच्या बाबतीत भारत १४६ देशापेकी १२७ व्या क्रमांकावर आहे. अलीकडच्या काळात सरकारने लिंग समानता

आणि महिला सक्षमीकरण यांना चालना देण्यासाठी सरकारने नवीन कार्यक्रम सुरु केले आहेत. २०४७ चा विकसित भारत आणि शाश्वत विकासासाठी महिलांचा सहभाग महत्वाचा आहे.

European Institute for Gender Equality ने महिला सक्षमीकरणामध्ये पाच घटकांचा समावेश केला आहे.

१. महिलांची आत्ममूल्यांची भावना

२. निवड ठरवण्याचा त्यांचा अधिकार

३. संधी आणि संसाधने मध्ये प्रवेश मिळवण्याचा अधिकार

४. घरामध्ये आणि घराबाहेर त्यांच्या स्वताच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार

५. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सामाजिक आणि आर्थिक न्याय व्यवस्था निर्माण करण्यासठी सामाजिक बदलाच्या दृष्टीने प्रभाव टाकण्याची क्षमता.

**भारतामधील स्त्री पुरुषांचा राज्यानुसार साक्षरता दर**

युनायटेड नेशन्सच्या मते, लिहता वाचता येण्याच्या क्षमतेला साक्षरता म्हणतात भारतामध्ये वय वर्षे ६पेक्षा मोठ्या व्यक्तींना किमान त्यांच्या मातृभाषेत लिहता वाचता येते.अशा व्यक्तींचा समावेश साक्षरतेमध्ये केला जातो.लोकसंख्येची सामाजिक आर्थिक गतिशीलता अजमावण्यासाठी स्त्री आणि पुरुष साक्षरता प्रमाण अभ्यासणे महत्वाचे ठरते.

**भारतातील स्त्री पुरुषांचा राज्यनिहाय साक्षरता दर**

| राज्य | पुरुष साक्षरता दर % | महिला साक्षरता दर % | सरासरी साक्षरता दर % |
|---|---|---|---|
| केरळ | ९७ ४. | ९५ ४. | ९६ २. |
| दिल्ली | ९३ ७. | ८२ ४. | ८८ ४. |
| गोवा | ९२ ८१. | ८१ ८४. | ८७ ४. |
| महाराष्ट्र | ९० ७. | ७८ ४. | ८४ ८. |
| आसाम | ९० १. | ८१ २. | ८५ २. |
| गुजरात | ८९ ५. | ७४ ४. | ८२ ४. |
| छत्तीसगड | ८५ ४. | ६८ ७. | ७७ ३. |
| कर्नाटक | ८३ ४. | ७० ५. | ७७ २. |
| राजस्थान | ८० ८. | ५७ ६. | ६९ ७. |
| बिहार | ७९ ७. | ६० ५. | ७० ९. |

**संदर्भ-राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय( NSO)२०२३**

वरील तक्ता मध्ये वेगवेगळ्या राज्यातील स्त्री- पुरुष साक्षरता प्रमाण दर्शवले आहे.यामध्ये असे दिसून येते की,पुरुषांच्या तुलनेत महिला साक्षरता कमी आहे. केरळ मध्ये स्त्री पुरुष साक्षरता प्रमाण ९६.२% आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता ९७.४% व स्त्री साक्षरता

९५.४% आहे. मात्र यामध्ये स्त्रियांचे साक्षरता प्रमाण कमी आहे.दिल्ली मध्ये स्त्री साक्षरता प्रमाण ८२.४% आहे, महाराष्ट्र मध्ये ७८.४% स्त्री साक्षरता प्रमाण आहे. तर बिहार मध्ये ६०.५% स्त्री साक्षरता प्रमाण आहे .याचा अर्थ प्रत्येक राज्यात पुरुषांच्या तुलनेने स्त्री कमी साक्षर आहे. याचे कारण असे असू शकते की, घरची काळजी घेणे .गरिबी, पाणी, स्वच्छतेच्या सुविधांचाअभाव ,घरापासून शाळेचे अंतर लांब, खोलवर रुजलेला स्त्री आणि पुरुषः हा भेदभाव या कारणामुळे स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. याचा परिणाम भविष्यात महिलांच्या श्रम शक्तीवरील योगदानामध्ये होतो.

**भारतातील स्त्री -पुरुष प्रमाण**

स्त्री पुरुष प्रमाण हे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्वाचे असते. दर एक हजार पुरुषांमागे स्त्रियांचे असणारे प्रमाण म्हणजे स्त्री –पुरुष प्रमाण होय. यावरून स्त्री पुरुषांचे समाजात असलेले स्थान व स्त्री पुरुष समानता दिसून येते.

**भारतातील राज्यानुसार स्त्री पुरुष प्रमाण (लिंग गुणोत्तर )**

| राज्य | | लिंग गुणोत्तर |
|---|---|---|
| भारत (देश) | | ९४० |
| १. | उत्तर प्रदेश | ९१२ |
| २ | गुजरात. | ९११ |
| ३ | महाराष्ट्र | ९२९ |
| ४ | बिहार | ९१८ |
| ५. | केरळ | १०८४ |
| ६. | कर्नाटक | ९७३ |

**संदर्भ -जनगणना अहवाल 2011**

वरील तक्त्यामध्ये भारतातील ठराविक राज्यामधील स्त्री पुरुष प्रमाण (लिंग गुणोत्तर) दर्शवले आहे.भारतात २०११ च्या जणगणेनुसार ९४० लिंग गुणोत्तर आहे. तर केरळ च्या कोझीकोड येथे १००० पुरुषामागे १०९३ स्त्रिया असलेले सर्वाधिक लिंग गुणोत्तर दिसून आले. महाराष्ट्र मध्ये लिंग गुणोत्तर हे ९२९ आहे.तर सर्वात कमी लिंग गुणोत्तर ९११ हे गुजरात राज्यात दिसून आले. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी असण्याचे कारण म्हणजे स्त्री भृण हत्या, महिलांना समाजात असणारा दुय्यम दर्जा,सामाजिक रूढी परंपरा, वंशाला दिवा म्हणून मुलगा हवा असा हट्ट असणे. या सर्व कारणामुळे स्त्रीयांचे प्रमाण कमी आहे.

**महिलांचा राजकरणातील सहभाग**

भारतात सर्वात मोठी सशक्त लोकशाही आहे. भारतीय राज्य घटनेने स्त्री पुरुष यांना समान हक्क दिले आहे .तरी देखील महिलांचा इतर देशाच्या तुलनेत राजकारणात कमी सहभाग आहे.

**महिलांचा राजकारणातील सहभाग**

| देश | संसदेतील महिलाचा वाटा % |
|---|---|
| नॉर्डिक देश (Nordic Countries) | ४२ ३. |
| अमेरिका | २९ ५. |
| युरोप | २६ ४. |
| sub saharan africa | २३ ७. |
| आशिया | १९ ८. |
| अरब देश | १८ ६. |
| पासिफिक | १५ ६. |
| भारत | ११ ८. |

**संदर्भ – http://archive.ipu.org/wmn-e/world .htm**

वरील तक्त्यामध्ये १ ऑक्टोबर २०१८ च्या अनुसार जगातील वेगवेगळ्या भागातील राष्ट्रीय संसदमध्ये निवडून दिलेल्या महिलांची टक्केवारी दर्शवलेली आहे.भारत जगातील असा एक देश आहे.जिथे राजकरणात महिलांचे प्रतिनिधित्व कमी आहे.भारतीय निवडणूक आयोगाच्या मते २०२१ मध्ये संसद मधील वाटा फक्त १०.५% होता. महिलांचा राजकारणातील सहभाग कमी आहे. कारण निवडणूक लढवणाऱ्या महिलांना असंख्य आव्हानाचा सामना करावा लागतो. त्यांना खाजगी कौटुंबिक आणि राजकीय जीवनात समतोल राखावा लागतो. त्यांना हिंसाचार छळवणूक आणि धमकीचा सामना करावा लागू शकतो.काही स्त्रियांना पदासाठी उभे राहण्यास्ठी परावृत्त केले जावू शकते.म्हणून स्त्रियांचा राजकारणातील वाटा कमी आहे.

**महिला सक्षमीकरणाचे फायदे**

1. १.महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या तर, गरिबी कमी होवू शकते. स्त्रियांना रोजगार आणि आर्थिक स्त्रोत उपलब्ध होतात, तेंव्हा त्या कुटुंबाला गरिबीतून बाहेर काढू शकतात.
2. २030 पर्यंत शाश्वत विकास साध्य करायचा असेल तर महिला सक्षमीकरण यावरती भर देणे आवश्यक आहे.
3. सामाजिक कल्याण –महिला सक्षम झाल्या तर त्या सामाजिक रूढी परंपरा नियम यांना आव्हान देवून समाजाच्या प्रगतीला प्रोत्साहन देवू शकतात, चांगला समाज घडवू शकतात.
4. महिला सक्षम झाल्या तर त्यांना आरोग्यविषयक माहिती उपलब्ध होवू शकते.त्या स्वतःची आणि कुटुंबाची आरोग्यविषयक काळजी घेवू शकतात. तसेच बाल मृत्यू आणि माता मृत्यू दर कमी होतो. आणि निरोगी समाज बनवण्यास मदत होते.
5. स्थानिक प्रशासन मध्ये महिलांचा सहभाग असतो. तेंव्हा त्या समुदायाच्या नेत्या म्हणून चांगली कामगिरी पार पडू शकतात.
6. महिला शैक्षणिकदृष्ट्या सक्षम झाल्या तर,त्यांना सामाजिक आणि आर्थिक दर्जा मिळतो.स्त्री संपूर्ण कुटुंबाला सक्षम बनवते. सुशिक्षित स्त्रियांकडे सन्मानाने पहिले जाते. त्या इतर मुलींसाठी प्रेरणा स्त्रोत बनू शकतात.

७. सुशिक्षित महिलांना त्यांच्या हक्काबद्दल व न्याया बद्दल माहिती असल्याकारणामुळे बालविवाह,स्त्री भृण हत्या,हुंडा, जबरदस्ती वेश्या व्यवसाय, स्त्रियांवरील होणारे इतर अन्याय,यासारख्या अन्यायामध्ये घट होवून सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**निष्कर्ष**

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक साक्षर करणे गरजेचे आहे. व्यवसायिक प्रशिक्षण देणे ,ज्यायोगे त्या स्वताचा व्यवसाय करू शकतील.आणि त्यांना आर्थिक स्थिरता लाभू शकते.राजकरणामध्ये महिलांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे.मुलीना दर्जेदार शिक्षण देणे. शिक्षण घेण्यास प्रवृत्त किंवा प्रोत्साहन देणे. गरजेचे आहे. चांगल्या आरोग्य सेवा देणे गरजेचे आहे.स्त्री पुरुष यांचे प्रमाण वाढवण्यासाठी स्त्री भृण हत्या थांबवणे. तसेच सामाजिक बदल घडवून आणावे लागतील. महिला साक्षरता चे प्रमाण वाढले तर भविष्यात अर्थव्यवस्थेमधील श्रम वाढण्यास हातभार लागेल.

**संदर्भ**

- प्रा. के. एम. भोसले. डॉ. एस. एम. भोसले. डॉ. पी. एच. कदम –भारतीय अर्थव्यवस्था
- https://www.census2011.
- http;//www.isdm.org

# २५. २१व्या शतकातील पुरुष आणि महिलांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. तबस्सूम हारूनबाशा शेख**
संशोधक विद्यार्थीनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**सारांश (Abstract)**

भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) हा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा पैलू आहे, जो स्वतःच्या आणि इतरांच्या भावना ओळखणे, त्या समजून घेणे, व्यवस्थापन करणे आणि योग्य निर्णय घेण्यासाठी त्यांचा वापर करण्याची क्षमता प्रदान करतो. 21 व्या शतकातील बदलत्या सामाजिक, तांत्रिक आणि आर्थिक परिस्थितीत, भावनिक बुद्धिमत्ता वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी अनिवार्य मानली जाते. पुरुष आणि महिलांच्या भावनिक बुद्धिमत्तेच्या विविध घटकांतील समानता व फरक समजून घेणे, हे या संशोधनाचे प्राथमिक उद्दिष्ट होते.

सदर संशोधनासाठी 20 ते 40 वयोगटातील 200 व्यक्तींचा (100 पुरुष आणि 100 महिला) नमुना घेण्यात आला. नमुना निवडीसाठी सहेतूक नमुना निवड पद्धती (Purposive Sampling Method) वापरण्यात आली. संशोधनातील माहिती गोळा करण्यासाठी डॉ. एस.के. मंगल आणि शुभ्रा मंगल यांची भावनिक बुद्धिमत्ता चाचणी (Emotional Intelligence Test) वापरण्यात आली. या चाचणीमध्ये एकूण 100 विधाने असून पाच प्रमुख घटकांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले आहे: व्यक्ती अंतर्गत जाणीव (Intrapersonal Awareness), आंतर-वैयक्तिक जाणीव (Interpersonal Awareness), व्यक्ती अंतर्गत व्यवस्थापन (Intrapersonal Management), आंतर-वैयक्तिक व्यवस्थापन (Interpersonal Management), एकूण भावनिक बुद्धिमत्ता (Overall Emotional Intelligence).

चाचणीची विश्वसनीयता (Reliability) 0.92 असून यथार्थता (Validity) 0.61 इतकी आहे. प्राप्त माहितीसाठी सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात आला, ज्यामध्ये माध्यमान (Mean), प्रमाण विचलन (Standard Deviation), आणि t-मूल्य (t-test) यांचा समावेश होता.

**मुख्य शब्द (Keywords):** भावनिक बुद्धिमत्ता, पुरुष, महिला, तुलनात्मक अभ्यास, सामाजिक बदल.

प्रस्तावना (Introduction):

21 व्या शतकातील तंत्रज्ञान, सामाजिक मूल्ये आणि जीवनशैलीतील बदलांमुळे व्यक्तींच्या भावनिक बुद्धिमत्तेवर व्यापक परिणाम होत आहे. भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे स्वतःच्या आणि इतरांच्या भावना ओळखणे, त्यांचे नियमन करणे आणि त्यांचा योग्य

प्रकारे उपयोग करणे. हा तुलनात्मक अभ्यास पुरुष आणि महिलांच्या भावनिक बुद्धिमत्तेतील संभाव्य फरक समजून घेण्यावर लक्ष केंद्रित करतो.

**भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence)**

एकूणच कोणत्याही व्यक्तीची भावनांचा वापर करून संवाद साधण्याची, घडलेल्या व केलेल्या सर्व घडामोडी स्मरणात ठेवण्याची, एखाद्या प्रसंगाचे वर्णन करण्याची, एखाद्या घटनेतून बोध घेण्याची, इतरांचे मत समजून घेण्याची, व्यक्तींना पारखण्याची, भावना समजून सांगण्याची आंतरिक क्षमता म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता होय.

**भावनिक बुद्धिमत्तेचा प्रवास**

बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात अल्फ्रेड बिने यांनी 1905 मध्ये पहिली बुद्धिमत्ता मापन चाचणी विकसित केली तसेच 1908 मध्ये 'मानसिक वय' ही संकल्पना जगासमोर आणली. एडवर्ड थॉर्नडाईक (1920) यांनी सर्वप्रथम 'सामाजिक बुद्धिमत्ता' अशी संकल्पना मांडली जी फार कोणास माहीत नाही तर डेव्हिड वेश्लर हे प्रौढ बुद्धिमतेचे जनक, यांनी हुशारी केवळ बुद्धिमत्तेवर अवलंबून नसल्याचे मत मांडले. ल्यूनर (1966) यांनी 'भावनिक बुद्धिमत्ता, यावर आधारित एक शोधनिबंध प्रसिद्ध केला त्याचप्रमाणे क्लॉड स्टायनर (1974) यांनी 'भावनिक साक्षरता' या विषयावरील लेख प्रसिद्ध केलेला आहे.

बुद्धिमत्ता क्षेत्रात खळबळ निर्माण करणारे हॉवर्ड गार्डनर यांनी 'मल्टिपल इंटेलिजन्स' वरील लिखाण प्रसिद्ध केले. भावनिक बुद्धिमत्तेच्या घटकाची मांडणी पीटर सॅलोव्हे व जॅक मेयर (1990) यांनी केली त्यानंतर 1995 मध्ये डॅनियल गोलमन यांनी भावनिक बुद्धिमत्तेविषयी पुस्तक प्रसिद्ध केले. या ठळक नोंदी म्हणजे भावनिक बुद्धिमत्तेवरील संशोधनाचा इतिहास म्हणता येईल. यामधील काही सैद्धांतिक चौकटी या काळाच्या कसोटीवर खऱ्या उतरल्या आहेत. जसे की, हॉवर्ड गार्डनर यांचे Frames of Mind : The theory of multiple intelligence हे पुस्तक. यामध्ये त्यांनी मनुष्याकडे एकापेक्षा अधिक प्रकारच्या 'बुद्धिमत्ता' असल्याची संकल्पना मांडलेली आहे. एकूण नऊ विविध प्रकारच्या बुद्धिमत्तेपैकी प्रामुख्याने व्यक्तिअंतर्गत (Intrapersonal) म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता आणि आंतरवैयक्तिक (Interpersonal) म्हणजे सामाजिक बुद्धिमत्ता असे ठळकपणे मांडलेले आढळते. तसेच डॅनियल गोलमन यांच्या Emotional Intelligence : Why it can matter more than IQ या सुप्रसिद्ध पुस्तकानंतर भावनिक बुद्धिमत्ता ही संज्ञा अधिक प्रचलित झाली.

**संशोधनाचे महत्त्व (Significance of the Study)**

या अभ्यासामुळे पुढील बाबतीत योगदान होईल

1. शैक्षणिक: विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेच्या विकासासाठी उपयुक्त.
2. व्यावसायिक: कार्यक्षेत्रातील कर्मचारी आणि व्यवस्थापकांसाठी कार्यक्षमता वाढवण्यासाठी मार्गदर्शन.
3. सामाजिक: लैंगिक समानतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे निष्कर्ष.

**संशोधन साहित्याचा आढावा (Review of Literature)**

1. **गोलमन, डॅनियल (1995):** भावनिक बुद्धिमत्ता ही व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा घटक असल्याचे मांडले.
2. **गार्डनर, हॉवर्ड (1983):** मल्टिपल इंटेलिजन्स थिअरीमध्ये भावनिक बुद्धिमत्ता अंतर्गत आणि आंतर-वैयक्तिक बुद्धिमत्तेचा भाग असल्याचे मांडले.
3. Vinu. H. (2020) यांनी "Relation of mental health with emotional intelligence among college going girls" या शीर्षकावर संशोधन केले आहे. त्यांनी या संशोधनात There would be significant difference between emotional intelligence and mental health among the girls living in rural and urban area. ही सिद्धांत कल्पना मांडलेली आहे. तसेच या संशोधनासाठी त्यांनी ग्रामीण 50 व शहरी 50 असे एकूण 100 विद्यार्थ्यांच्या वर संशोधन करण्यासाठी डॉ. अरुण कुमार आणि सुरक्षा पाल यांची भावनिक बुद्धिमत्ता चाचणी वापरली आहे. तसेच प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान प्रमाण विचलन व सहसंबंध या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला आहे व माहितीचे विश्लेषण केले असता ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या मध्ये आलेला गुणांक  हा लक्षनीयतेच्या 0.05 पातळीवर सार्थ असल्याचे दिसून येते म्हणजेच त्यांनी सुरुवातीला मांडलेली सिद्धांत कल्पना या फलित आणि स्वीकारलेली नाही.
4. **सॅलोवे आणि मेयर (1990):** भावनिक बुद्धिमत्तेच्या परिभाषेत स्वतःची जाणीव, स्वतःचे नियमन, प्रेरणा, सहानुभूती, आणि सामाजिक कौशल्य यांचा समावेश केला.

**हेतू (Aim)**

पुरुष आणि महिलांच्या भावनिक बुद्धिमत्तेतील फरकांचा शोध घेणे.

**उद्दिष्टे (Objectives)**

1. भावनिक बुद्धिमत्तेच्या घटकांचा अभ्यास करणे.
2. पुरुष आणि महिलांमधील भावनिक बुद्धिमत्तेतील समानता व फरकांचा शोध घेणे.
3. भावनिक बुद्धिमत्ता आणि सामाजिक-व्यावसायिक जीवनातील यश यांचा संबंध तपासणे.

**सिद्धांत कल्पना (Hypotheses)**

1. पुरुष आणि महिलांमधील भावनिक बुद्धिमत्तेतील घटकांमध्ये महत्त्वपूर्ण फरक असतील.
2. महिलांमध्ये सहानुभूतीचा स्तर जास्त असेल.
3. पुरुषांमध्ये तणाव व्यवस्थापन कौशल्य अधिक प्रभावी असेल.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

**नमुना निवड (Sample Selection)**

- 100 पुरुष आणि 100 महिलांचा समावेश;
- वयोगट 20-40 वर्षे.
- सहेतूक नमुना निवड पद्धत.

**मानसशास्त्रीय साधने (Psychological Tools)**

- **चाचणीचे नाव:** भावनिक बुद्धिमत्ता चाचणी (डॉ. एस. के. मंगल आणि शुभ्रा मंगल).
- **चाचणीची रचना**
    - पाच भागांमध्ये विभागणी.
    - प्रत्येक भागात 25 विधाने.
    - एकूण 100 प्रश्न.
    - विश्वसनीयता: 0.92, यथार्थता: 0.61.

**संख्याशास्त्रीय साधने (Statistical Tools)**

1. माध्यमान (Mean).
2. प्रमाण विचलन (Standard Deviation).
3. t-मूल्य (t-test).

**संशोधन आराखडा (Research Design)**

तुलनात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर. सांख्यिकीय विश्लेषणाद्वारे निष्कर्ष काढण्यात आले.

**परिवर्तके (Variables)**

- स्वतंत्र परिवर्तक: पुरुष आणि महिला.
- अवलंबून परिवर्तक: भावनिक बुद्धिमत्ता

**फलित तक्ता (Research Table)**

तक्ता खालीलप्रमाणे विस्तारित स्वरूपात सादर केला आहे, ज्यामध्ये नमुना (Sample), माध्यमान (Mean), प्रमाण विचलन (Standard Deviation - SD), t-मूल्य (t-value), आणि सार्थता पातळी (Significance Level) यांचा समावेश आहे

| घटक | पुरुष 100 | | महिला 100 | | t-मूल्य )t-value) | सार्थता पातळी )Significance Level) |
|---|---|---|---|---|---|---|
| | माध्यमान )Mean) | SD | माध्यमान )Mean) | SD | | |
| व्यक्ती अंतर्गत जाणीव | 16.5 | 3.1 | 18.2 | 3.2 | 2.8 | 0.01** |
| आंतरवैयक्तिक जाणीव- | 15.3 | 3.4 | 17.8 | 3.0 | 3.1 | 0.01** |
| व्यक्ती अंतर्गत व्यवस्थापन | 17.2 | 3.3 | 16.5 | 3.6 | 1.6 | सार्थ नाही |
| आंतरवैयक्तिक - व्यवस्थापन | 15.8 | 3.5 | 18.0 | 3.3 | 2.5 | 0.05* |
| एकूण भावनिक बुद्धिमत्ता | 65.2 | 11.5 | 70.5 | 10.4 | 3.2 | 0.01** |

**घटक 1: व्यक्ती अंतर्गत जाणीव (Intrapersonal Awareness)**

व्यक्ती अंतर्गत जाणीव म्हणजे स्वतःच्या भावना ओळखण्याची आणि समजून घेण्याची क्षमता. या घटकात महिलांचे गुण पुरुषांपेक्षा अधिक असल्याचे दिसते (महिलांचे माध्यमान: 18.2, पुरुषांचे माध्यमान: 16.5). t-मूल्य 2.8 असल्याने आणि 0.01 सार्थता पातळीवर हे लक्षणीय असल्याने, हे सिद्ध होते की महिलांमध्ये व्यक्ती अंतर्गत जाणीवेचा स्तर जास्त आहे. महिलांमध्ये स्वतःच्या भावनांचा सखोल विचार करण्याची प्रवृत्ती असल्याने ही क्षमता अधिक विकसित असल्याचे दिसते.

**घटक 2: आंतर-वैयक्तिक जाणीव (Interpersonal Awareness)**

आंतर-वैयक्तिक जाणीव म्हणजे इतरांच्या भावना समजण्याची आणि त्यांना प्रतिसाद देण्याची क्षमता. महिलांचे गुण या घटकात पुरुषांपेक्षा अधिक आहेत (महिलांचे माध्यमान: 17.8, पुरुषांचे माध्यमान: 15.3).

t-मूल्य 3.1 असून, 0.01 सार्थता पातळीवर हे महत्त्वपूर्ण आहे. याचा अर्थ महिलांमध्ये आंतर-वैयक्तिक जाणीव लक्षणीयरीत्या अधिक आहे. महिलांमध्ये संवाद कौशल्ये आणि सहानुभूतीचा स्तर अधिक असल्याने त्यांना इतरांच्या भावना समजण्यास मदत होते.

**घटक 3: व्यक्ती अंतर्गत व्यवस्थापन (Intrapersonal Management)**

व्यक्ती अंतर्गत व्यवस्थापन म्हणजे स्वतःच्या भावनांचे नियमन आणि तणाव व्यवस्थापन. या घटकात पुरुष आणि महिलांमध्ये फारसा फरक आढळलेला नाही. पुरुषांचे गुण थोडेसे जास्त आहेत, परंतु t-मूल्य 1.6 असल्याने, तो लक्षणीय नाही. पुरुष तणाव व्यवस्थापनात थोडेसे चांगले असल्याचे दिसते, परंतु हा फरक सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वाचा नाही.

**घटक 4: आंतर-वैयक्तिक व्यवस्थापन (Interpersonal Management)**

आंतर-वैयक्तिक व्यवस्थापन म्हणजे इतरांशी संबंध टिकवणे आणि चांगले संवाद साधणे. महिलांचे गुण पुरुषांपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहेत (महिलांचे माध्यमान: 18.0, पुरुषांचे माध्यमान: 15.8). t-मूल्य 2.5 असून, 0.05 सार्थता पातळीवर हे

महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते. महिलांमध्ये सहकार्य आणि सामाजिक कौशल्ये अधिक असल्याने, आंतर-वैयक्तिक व्यवस्थापनात त्यांचा सरासरी उच्च स्तर दिसून येतो.

**घटक 5: एकूण भावनिक बुद्धिमत्ता (Overall Emotional Intelligence)**

एकूण भावनिक बुद्धिमत्तेमध्ये महिलांचे गुण लक्षणीयरीत्या जास्त आहेत (महिलांचे माध्यमान: 70.5, पुरुषांचे माध्यमान: 65.2). t-मूल्य 3.2 असल्याने, 0.01 सार्थता पातळीवर हे महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते. महिलांच्या भावनिक जाणीव आणि व्यवस्थापन कौशल्यांमुळे त्यांची एकूण भावनिक बुद्धिमत्ता जास्त असल्याचे दिसते.

**निष्कर्ष**

**मर्यादा (Limitations)**

1. नमुना केवळ 200 व्यक्तींपुरता मर्यादित.
2. सदर संशोधनासाठी मर्यादित संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला आहे.
3. यापेक्षा मोठा नमुना घेतल्यास वेगळे निष्कर्ष येण्याची शक्यता आहे.

**निष्कर्ष (Conclusions)**

1. महिलांमध्ये व्यक्ती अंतर्गत आणि आंतर-वैयक्तिक जाणीवेच्या पातळीवर उच्च भावनिक बुद्धिमत्ता आहे.
2. पुरुष तणाव व्यवस्थापनात अधिक प्रभावी आहेत.
3. सामाजिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता दोन्ही गटांसाठी महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भसूची (References)**


- Gardner, H. (1983). Frames of Mind: The Theory of Multiple Intelligences.
- Goleman, D. (1995). Emotional Intelligence: Why It Can Matter More Than IQ.
- Mangal S. K. (1971), “Mangal Emotional Intelligence Inventory manual” Agra: National psychological corporation Karachi.
- Mangal, S.K. & Mangal, S. (1971). Mangal Emotional Intelligence Inventory Manual.
- Salovey, P., & Mayer, J.D. (1990). Emotional Intelligence.
- Vinu (2020). Relation of mental health with emotional intelligence among college going girls. International Journal of Indian Psychology, 8(4), 1386-1390. DIP:18.01.151/20200804, DOI:10.25215/0804.151
- गोलेमॅन, डी. (1998). भावनिक बुद्धिमत्ता सह कार्यरत न्यूयॉर्क: बॅन्टाम

# २६. भारतातील महिला विषयक वाढती गुन्हेगारी: एक चिंतन

**प्रा. उमेश वांगदरे**
कॅप्टन (एन.सी.सी.), समाजशास्त्र विभाग, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त).


**प्रस्तावना**

भारतात प्राचीन काळापासून काही भाग वगळता पुरुषसत्ताक पद्धती अस्तित्वात असल्याने स्त्रियांना कायमच दुय्यम स्थान देण्यात आले आहे.१९ व्या शतकात शिक्षण आणि समाजसुधारणा चळवळीने स्त्रियांना काही प्रमाणात समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला आणि महिलांची परिस्तिथी बदलून त्याचा विकास होण्यास सुरुवात झाली.२१ व्या शतकात महिला विकासाची गती वाढली. २१ व्या शतकात अनेक सामाजीक,सांस्कृतिक, नैतिक व भौतिक बदल जलद व प्रभावी पणे झाले आहेत याचा परिणाम समाजातील सर्व घटकावर झाला. अनेक सामाजीक, आर्थिक,पर्यावरण विषयक समस्या निर्माण झाल्या.यातील एक महत्वाची समस्या म्हणजे समाजातील वाढती गुन्हेगारी. आधुनिक काळात गुन्हेगारी मध्ये अनेक नवीन पद्धती येत आहेत खून, मारामारी, जबरी दरोडा, याच बरोबर आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हे आणी महिला विषयक गुन्हे तसेच सर्व गुन्हात वाढलेली गुंतागुंतीच्या पद्धत व वाढते प्रमाण. महिला विषयक गुन्हेगारी मध्ये अल्पवयीन मुल -मुली,तरुण वर्ग तसेच महिलाच वाढता सहभाग,पोलीस व न्याय प्रशासनावरील वाढता ताण यातून होणारी दिरंगाई हि एक चिंतनीय बाब बनत आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये समाजातील महिला विषयक वाढत्या गुन्हेगारीची सध्यस्थिती, कारणे अभ्यास करून काही उपाय योजना सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सदर संशोधन पेपर साठी दुय्यम संदर्भ साधनाचा वापर करण्यात आला आहे.

**महिला विषयक गुन्हेगारीची सध्यस्तिथी**


एप्रिल २०२४ मध्ये झारखंडमध्ये २८ वर्षीय स्पॅनिश-ब्राझिलियन व्लॉगर महिलेवर सामूहिक बलात्काराची घटना घडली तेव्हा यूएस पत्रकार डेव्हिड जोसेफ वोलोड्झको यांनी सोशल मीडियावर भारत महिलांसाठी असुरक्षित देश असल्याची पोस्ट केली. या घटनेवर राष्ट्रीय महिला आयोगाच्या (NCW) अध्यक्षा रेखा शर्मा यांनी प्रतिक्रिया दिली यानुसार "दरवर्षी ६ दशलक्षाहून अधिक पर्यटक भारतात येतात, त्यापैकी अनेक एकल महिला असतात आणि ते सुरक्षितपणे आपले पर्यटन करून मायदेशी परततात" या विधानावार भारत व जगभरातून उलट सुलट प्रतिक्रिया आल्या आणि जॉर्जटाउन इन्स्टिट्यूट फॉर वुमन, पीस अँड सिक्युरिटी या संस्थेने जाहीर केलेल्या महिला शांतता आणि सुरक्षा निर्देशांक २०२३ नुसार, महिलांचा समावेश, न्याय आणि सुरक्षिततेच्या बाबतीत भारत १७७ देशांपैकी १२८ व्या क्रमांकावर असल्याचे समोर आले आणि भारतातील महिला विषयक गुन्हेगारीचा अनेक अभ्यासकांनी आढावा घेतला.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या ताज्या आकडेवारीनुसार भारतातील महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण प्रति १,००,००० महिला लोकसंख्येवर २०१८ ते २०२२ या काळात १२.९ % वाढले आहे. भारतात, २०१८ मध्ये ५८.८ इतके नोंदवले गेले.पुढे २०२२ मध्ये ६६.४ इतके महिला विषयक गुन्हे नोंदवले गेले.ही वाढ अधिक चिंतनीय आहे.




नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (NCRB ) वार्षिक अहवाल २०२२ मध्ये भारतातील गुन्हेगारीची आकडेवारी दर्शवते की एकूण १३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये गुन्हेगारी दर राष्ट्रीय सरासरी ६६.४ पेक्षा जास्त वाढला आहे. दिल्ली १४४.४ वर अव्वल आहे, त्यानंतर हरियाणा (११८.७), तेलंगणा (११७ ), राजस्थान (११५.१ ), ओडिशा (१०३.3), आंध्र प्रदेश (९६.2), अंदमान आणि निकोबार बेटे (९३.७ ), केरळ (८२), आसाम (८२ ) मध्य प्रदेश (७८.८), उत्तराखंड (७७), महाराष्ट्र (७५.१ ), आणि पश्चिम बंगाल (7१.८ ). तर उत्तर प्रदेशातील गुन्ह्यांचा दर भारतातील एकूण गुन्हेगारीच्या सुमारे १५ % आहे.


**महिला विषयक गुन्हेगारी चे राज्यनिहाय प्रमाण आकडेवारी**




" भारत महिलांच्या सुरक्षेला खूप गांभीर्याने घेतो, महिला सुरक्षेसाठी अनेक कायदे तयार केले आहेत असे सांगितले जाते पण तरीही, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा (२००५) लागू असूनही, भारतीय दंड संहितेअंतर्गत महिलांवरील बहुतेक

गुन्हे पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून (३१.४ % ) होतात, यानंतर महिलांचे अपहरण (१९.2 %), महिलांवरील विनयभंग (१८.७%) आणि बलात्कार (७.१ %), असल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (NCRB ) यांनी नोंदवले आहे.

**भारतीय दंड संहिता २०२२ नुसार महिला विषयक गुन्हेगारीचे प्रमाण**




कोरोना महामारीच्या काळात, प्रति १००,००० महिला लोकसंख्येमागे गुन्हेगारीचा दर २०२० मध्ये ५६.५ वरून २०२१ मध्ये ६४.४ वर पोहोचला. समाजिक अस्थिरता,आर्थिक व मानसिक अस्थिरता या काळात महिलाच्या विषयक गुन्हेगारी मध्ये वाढ झाल्याचे दिसते. आर्थिक स्वावलंबनाच्या अभावी स्त्रियांच्या शोषण आणि छळापासून स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता कमी होते. कायदेशीर चौकट असूनही, प्रस्थापित सामाजिक नियमांमुळे बहुतेक महिलांना मालमत्तेत वाटा मिळत नाही. तसेच, श्रमशक्तीमध्ये महिलांचा सहभाग हा बहुधा अनौपचारिक अर्थव्यवस्थेत असतो, ज्यामुळे त्यांना सामाजिक संरक्षणात फारसा प्रवेश मिळत नाही.कामाच्या ठिकाणीही महिलांना लैंगिक हिंसाचाराचा धोका जास्त असतो. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा, २०१३ अस्तित्वात असूनही. NCRB नुसार, कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळाच्या बळींची संख्या २०१८ मधील ४०२ वरून २०२२ मध्ये ४२२ पर्यंत वाढली आहे. हे चिंतेचे कारण आहे, याशिवाय अनेक स्त्रिया प्रतिष्ठा व भीतीमुळे गुन्ह्यांची नोंद करत नाहीत. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशननुसार, जगभरातील तीनपैकी किमान एका महिलेने त्यांच्या आयुष्यात शारीरिक किंवा लैंगिक हिंसाचाराचा अनुभव घेतला आहे आणि सुमारे पैकी एका मुलीने जबरदस्ती संभोग किंवा इतर लैंगिक कृत्यांचा अनुभव घेतला आहे. भारतात, लैंगिक पूर्वाग्रह आणि पितृसत्ताक सामाजिक नियमांमुळे हे प्रमाण वाढले आहे. जे महिलांना अधिक बंदिस्त करतात. थोडक्यात सर्वच प्रकारचे महिला विषयक गुन्हे वाढत आहेत.

**नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (NCRB ) आकडेवारीतील काही महत्त्वाचे निष्कर्ष**

१. २०२१ ते २०२२ या कालावधीत बलात्काराच्या घटनांमध्ये १५.४ % वाढ झाली आहे.

२. हुंडाबळीच्या घटनांमध्ये २०२१ ते २०२२ या कालावधीत ७.९% वाढ झाली आहे.

३. २०२१ ते २०२२ या कालावधीत अपहरण आणि अपहरणाच्या घटनांमध्ये ७.१ % वाढ झाली आहे.

४. २०२१ ते २०२२ या कालावधीत पती किंवा नातेवाईकांकडून होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये ५,७ % वाढ झाली आहे.

५. २०२१ ते २०२२ या कालावधीत घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये ५.४ % वाढ झाली आहे.

६. २०२१ ते २०२२ या कालावधीत ॲसिड हल्ल्याच्या घटनांमध्ये १६.२ % वाढ झाली आहे.

एन. सी. आर. बी. च्या आकडेवारीनुसार उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि बिहार या राज्यांमध्ये महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. भिती,प्रतिष्ठा आणि प्रतिशोधाच्या भीतीने अनेक महिला गुन्ह्यांची नोंद करत नसल्याने गुन्ह्यांची प्रत्यक्ष संख्या अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. महिलांवरील गुन्ह्यांचे वाढते प्रमाण ही गंभीर चिंतेची बाब आहे.

**वाढत्या महिला विषयक गुन्हेगारीची कारणे**

वाढत्या महिला विषयक गुन्हेगारीसाठी अनेक विविध घटक जबाबदार आहेत पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. ही मानसिकताच महिलांविरुद्धच्या हिंसाचाराचे मूळ कारण आहे. तसेच शिक्षण ही सशक्तीकरणाचे महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणाचा अभाव असलेल्या महिलांना स्वतःचे संरक्षण करणे कठीण जाते. आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून असलेल्या महिलांना गुन्हेगारीचा सामना करावा लागतो.आणि महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांविरुद्ध कठोर कायदे असूनही, त्याची प्रभावी अंमलबजावणी न होणे हि बाब पण प्रामुख्याने जबाबदार राहते. समाजात महिलांच्या कपड्यांचा प्रकार, रात्री बाहेर पडणे इत्यादी कारणांमुळे महिलांवरच दोषारोप केला जातो आणि आणि काही वेळा गुन्ह्याचे समर्थन केले जाते.काही गुन्हेगारांना महिला विषयक गुन्हेगारीचा मानसिक आजार असल्या सारखे त्याच्याकडून गुन्हे घडतात.

**महिला विषयक वाढत्या गुन्हेगारी वरील उपाय योजना**

महिला विषयक गुन्हेगारीची संख्या कमी होण्यासाठी समाजात सामाजिक सकारात्मक बदल होणे आवश्यक आहे. लहानपणापासून मुला-मुलींमध्ये समानता शिकवणे आवश्यक महिलांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करून आणि त्यांना सर्व बाबतीत स्वावलंबी बनवणे आवश्यक आहे.याचा बरोबर महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांविरुद्ध कठोर कायदे बनवून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असून पीडितांना कायदेशीर आणि मानसिक मदत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे थोडक्यात महिलाना त्याच्या प्रगतीसाठी आवश्यक अशी सामाजिक परिस्तिथी निर्माण होणे गरजेचे आहे.

महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांचे निराकरण करण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. उपरोक्त बाबीची प्रत्यक्ष्य अंमलबजावणी करण्यासाठी एक सक्षम यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे, अन्यथा महिला सक्षमीकरण आणि महिला सन्मान केवळ एक आदर्शवादी कल्पना बनून राहील.

**संदर्भ साधने**

1. आहुजा, राम क्रिमिनोलॉजी, रावत, जयपूर, 2000.
2. बाजपेयी, आणि बाजपेयी, भारतातील स्त्री गुन्हेगारी, रावत, जयपूर, 2000.
3. भोसले, स्मृती एस., फिमेल क्राइम इन इंडिया, कल्पज, दिल्ली, 2009.
4. गुन्हेगारी आणि दंडविज्ञान (पीडित शास्त्रासह) प्रो. एन व्ही परांजपे
5. लॅरी द्वारे क्रिमिनोलॉजी जे. सिगेल.
6. अहमद सिद्दीकची क्रिमिनोलॉजी पेनॉलॉजी आणि एसएन अफझल कादरी, 2016 द्वारे पीडिता.
7. कॅथरीन एस. विल्यम्स यांचे क्रिमिनोलॉजी,
8. घोष, सुभ्रा, भारतातील महिला गुन्हेगार, उप्पल, नवी दिल्ली, 1986.

- https://www.ojp.gov/ncjrs/virtual-library/abstracts/international-perspectives-female-crime-and-its-correction-women
- https://www.journalijar.com/uploads/61165742dfad0_IJAR-36673.pdf
- https://ylcube.com/c/blogs/female-criminality-india/
- https://blog.ipleaders.in/female-crimes-related-theories-and-postulations/
- https://www.ijhsss.com/files/3.-Prof.-Sunishtha-Moghe-05-11-19.pdf
- https://www.sncwgs.ac.in/wp-content/uploads/2015/01/2-WOMEN-CRIMINALS.pdf
- https://www.isdm.org.in/)

# २७. लैंगिक हिंसाचार आणि स्वायत्तता: भारतीय महिला चळवळीचा सहभाग

**डॉ. व्ही. एन. जगताप**
श्री शिव शाहू महाविद्यालय, सरूड.

**गोषवारा**

महिलांवरील हिंसाचाराच्या समस्येचे स्वरूप आणि तीव्रता याकडे लक्ष वेधण्यासाठी महिला चळवळी बजावत असलेल्या भूमिकेचे स्वागत करणे गरजेचे आहे. स्त्रियांना समाजात कायदेशीर, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समानता प्राप्त करण्याच्या संधी मर्यादित आहेत. इतर गोष्टीं बरोबरच सततच्या आणि स्थानिक हिंसाचाराने, वरील बाबींच्या प्रकाशात महिलांवरील हिंसाचाराची स्पष्ट आणि सर्वसमावेशक व्याख्या करणे आवश्यक आहे. महिलांवरील हिंसाचाराचे सर्व स्वरूपातील उच्चाटन सुनिश्चित करण्यासाठी लागू करावयाच्या अधिकारांचे स्पष्ट विधान आवश्यक आहे, अशी राज्यांची वचनबद्धता आहे. त्यांच्या जबाबदाऱ्यांचा आदर करणे आणि महिलांवरील हिंसाचाराचे उच्चाटन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर महिला चळवळीच्यात सामुदाईक बांधिलकी निर्माण करून महिलांवरील हिंसाचाराच्या निर्मूलनावर गंभीरपणे उपायोजना करणे गरजेचे आहे .

महिलांवरील लैंगिक हिंसाचार रोखण्याच्या सामाजिक चळवळीच्या प्राथमिक मागण्या फौजदारी कायद्यातील तरतुदींमध्ये अधिकार-आधारित सुधारणांच्या सामूहिक बलात्कारामुळे निर्माण झालेल्या निषेधाच परिणाम हे स्वातंत्र्ोत्तर भारतातील व्यापक महिला चळवळीचे पुरातन स्वरूप होते. महिलांवरील लैंगिक हिंसाचार रोखण्यासाठी सामाजिक चळवळीच्या प्राथमिक मागण्या फौजदारी कायद्यातील तरतुदींमध्ये सुधारणांच्या भाषेत गुंडाळल्या गेल्या. स्त्रीवादी गटांच्या महत्ाच्या शिफारशींना आळा घालताना राज्याने गुन्हेगारी कायद्यातील सुधारणांच्या रूपात सामाजिक एकत्रीकरणाला प्रतिसाद दिला. महिलांवरील लैंगिक हिंसाचाराच्या संरचनात्मक अन्यायाचे निराकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या जबाबदारीच्या अधिक दूरदर्शी संबंधात्मक संकल्पना आणि लैंगिक हिंसाचार या बाबत भारतीय महिला चळवळी यांची पार्श्वभूमी आणि सहभाग प्रस्तुत शोधनिबंधात अभ्यासला आहे.

**उद्दिष्ट**

भारतातील महिला चळवळी देशाच्या प्रबळ सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रवृत्तींना कसे आव्हान देतात, हे मॉड्यूल महिलांच्या जवळजवळ 150 वर्षांच्या प्रवासात महिलांचे सर्व स्तरावरील हक्क संधी यांचे संरक्षण करणे तसेच महिला चळवळीची सामुहिक उद्दिष्टे आणि भिन्न अनुभव , प्रेरणा,अडथळे, निषेध आणि तडजोड,यांचे यश अपयश यांचा अभ्यास करणे .

**प्रस्तावना**

महिला चळवळ म्हणजे स्त्री-पुरुषांमधील असमानतेमुळे निर्माण झालेल्या स्त्रियांच्या समस्यांवर मूलगामी सुधारणांसाठी केल्या जाणाऱ्या सामाजिक चळवळी आणि राजकीय मोहिमांच्या संदर्भात स्त्रीवादी चळवळ असेही याला म्हणतात. महिला चळवळीचे उद्देश

महिलांचे समान राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्क आणि संधी परिभाषित करणे महिलांचे हक्क आणि संधी स्थापन करणे आणि त्याचे रक्षण करणे. लैंगिक हिंसा - ही एक प्रमुख समाजिक समस्या आहे. यामुळे महिलांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होते. लिंग हे महिला व पुरुष यांच्या असमानतेचे मूळ कारण आहे .सन २०१२ पासून भारतातील महिला अत्याचाराचे प्रमाण वाढत असून ते आता ४% पर्यंत वाढले आहे. म्हणजे ३ मिनिटाला १ महिला लैंगिक हिंसाचाराची बळी पडते. जागतिक स्तरावरचा विचार करता ३ पैकी १ महिला त्यांच्या आयुष्यात शारीरिक, मानसिक आणि लैंगिक हिंसा अनुभवते. महिलांवरील हिंसेची व्याख्या हि "लिंग-आधारित हिंसाचाराची कोणतीही कृतीवर आधारित केलेली आहे. ज्यामुळे शस्त्र रहित किंवा शस्त्रधारी कृत्यांच्या धमक्या, बळजबरी यानी महिलांना शारीरिक, लैंगिक, मानसिक हानी किंवा त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे महिला चळवळीचा मागोवा घेणे गरजेचे मानले आहे.

**भारतातील महिला चळवळी**

भारतातील महिला चळवळीचा उगम शोधणे आव्हानात्मक आहे, कारण बहुतेक संदर्भांचा अभ्यास केला असता प्रामुख्याने एकोणिसाव्या शतकात महिला चळवळींचा सुरुवात झालेली दिसते. सोळाव्या आणि सतराव्या शतकातील भक्ती आणि सुफी चळवळींमध्ये स्त्री चळवळी दिसून येतात. महिलांची स्थिती पुरुष अधिकाराद्वारे निर्धारित केली जाते होती. बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवा पुनर्विवाह बंदी, सती, पर्दा पद्धती यासारख्या सामाजिक चालीरीतींमध्ये ही जाचक रूढी प्रथा दिसून येत होत्या. त्यानंतर एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांनी विविध सामाजिक चळवळींद्वारे त्यांचा विरोध करेपर्यत या प्रथा परंपरा कायम होत्या. यासाठी भारतातील महिला चळवळीतील महत्त्वाचे टप्पे अभ्यासने गरजेचे आहे.

**अ. स्त्रीवादी चळवळीच्या पहिल्या लाटेत, सेन लिहितात,** "...महिला संघटनांना आधुनिकतेचे फायदे आणि राष्ट्रवादी प्रवचनात निर्माण झालेल्या "भारतीयत्व" या मुहावरेतून दोन्हीकडे आकर्षित करता आले". (सेन 2000: 57). - सतीच्या सामाजिक दृष्ट प्रवृत्तीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी, विधवा पुनर्विवाह कायदा मंजूर करणे, बालविवाहास प्रतिबंधित करणे, निरक्षरता कमी करणे, विवाहासाठी संमतीचे वय प्रमाणित करणे आणि कायदेशीर हस्तक्षेपांद्वारे मालमत्तेच्या हक्कांची हमी देणे. महिलांच्या नागरी आणि राजकीय हक्कांची मागणी करणाऱ्या सुधारणा चळवळींमध्ये महिलांच्या सहभागाने, मुख्यत्वे राष्ट्रवादीच्या नेतृत्वाखाली, 'स्त्रीवाद आणि राष्ट्रवादाचे अनोखे मिश्रण' निर्माण केले (फोर्ब्स 1998 आणि 2005, सेन 2000, चौधरी 2010). एकोणीसाव्या शतकात देशभरात काही महिला संघटना स्थापन झाल्या.राजा राम मोहन रॉय आणि ईश्वरचंद्र विद्यासागर यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी स्त्री मुक्ती साठी कार्य केले. केशवचंद्र सेन यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात नारायण गणेश चंदावरकर, माधव गोविंद रानडे आणि आरजी भांडारकर आणि अहमदाबादमधील महिपतराम रूपराम नीळकंठ आणि त्यांचे सहकारी यांनी बालविवाह, विधवा पुनर्विवाह आणि स्त्री शिक्षणावर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्यांच्याविरोधात संघटना स्थापन केल्या होत्या. (सेन 2000, कुमार 1993, मुझुमदार 2001). एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुधारित उच्चभ्रू कुटुंबांतील स्त्रियांचा एक गट अनेक महिला संघटना स्थापन करण्यासाठी आला.देवेंद्रनाथ टागोर यांच्या कन्या स्वर्णकुमारी देवी यांनी वंचित महिलांच्या सक्षमीकरणासाठी लेडीज सोसायटी (1882 कोलकाता)

ची स्थापना केली. रमाबाई सरस्वती यांनी पुण्यात आर्य महिला समाज (1882 मध्ये) आणि मुंबईत शारदा सदनची स्थापना केली. सरला देबी चौधरी (स्वर्णकुमारी देवी यांची कन्या), या स्त्रीया भारतातील महिला चळवळीच्या पहिल्या टप्प्याचा आदर्श होत्या.

**ब. मताधिकार चळवळ -** i) मतदानाचा हक्क (1917-1926), आणि ii) वैयक्तिक कायद्यातील सुधारणा (1927-29). एडविन मॉन्टेग्यू यांनी सरोजिनी नायडू (महिलांच्या अखिल भारतीय शिष्टमंडळासह) आणि सरला देवी चौधरी (भारत स्त्री महामंडळाच्या प्रतिनिधींसह) माँटेग्यू आणि चेम्सफोर्ड यांना भेटल्या त्यांच्याकडे त्यांनी महिलांच्या मताधिकारासाठी आवाहन केले . त्यांनी महिलांच्या मताधिकारासाठी काँग्रेसचा पाठिंबा देखील मिळवला (फोर्ब्स 1998). सोबत, ॲनी बेझंट, मागरिट कजिन्स आणि डोरोथी जिनाराजदासा (आयरिश थिऑसॉफिस्ट) यांनी संयुक्तपणे वुमेन्स इंडियन असोसिएशन (1917) ची स्थापना केली: मतदानाचा हक्क मिळवणारी पहिली अखिल भारतीय महिला संघटनाम्हणून टी उदयाला आली. त्रावणकोर-कोचीन,येथील एक संस्थानिक हे , 1920 मध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देणारे पहिले राज्य होते. त्यानंतर अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना 1927 मध्ये मागरिट कजिन्सच्या पुढाकाराने स्त्री शिक्षणाच्या प्रश्नावर उपस्थित राहण्यासाठी करण्यात आली (बासू आणि रे 2003). पर्दा पद्धती, बालविवाह आणि इतर सामाजिक चालीरीतींसह सामान्य सामाजिक समस्यांशी शिक्षणाचा मुद्दा जोडला गेला . याचा परिणाम 1929 मध्ये सारडा कायदा मंजूर करण्यात आला. समान नागरी कायद्याच्या विरोधाला तोंड देत, बहुपत्नीत्वास प्रतिबंध करणाऱ्या हिंदू कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची, स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा आणि मालमत्तेचा वारसा मिळण्याची मागणी करण्यात आली. या सुधारणांच्या अथक मोहिमेमुळे अखेरीस 1950 च्या दशकात हिंदू कोड बिले पास झाले. समिता सेन (2000) यांनी चळवळीचा हा टप्पा 'सामाजिक स्त्रीवाद' म्हणून उच्चवर्णीय/वर्गीय महिलांनी प्रतिनिधित्व केलेल्या व्यापक राष्ट्रवादी चळवळीला टॅग केला आहे.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महिलांनी सक्रिय सहभाग घेतला होता. सरोजिनी नायडू आणि ॲनी बेझंट सारख्या नेत्यांनी महिलांच्या हक्कांसाठी वकिली केली. महिलांचा राजकीय स्वातंत्र्यासाठी सहभागाचा मार्ग मोकळा केला. यानंतर स्त्रिया काँग्रेसच्या अधिवेशनात सामील झाल्या होत्या, त्यांनी स्वदेशी (1905-11) आणि त्यापूर्वी होमरूल चळवळीत भाग घेतला होता. तरीही असहकार चळवळ, ग्रामीण सत्याग्रह , मीठ सत्याग्रह , सविनय कायदेभंग चळवळ आणि भारत छोडो आंदोलनाच्या गांधीवाद्यांच्या आवाहनापूर्वी त्यांचा मोठा सहभाग कधीच झाला नाही. महिलांनी सभा, रॅली, विदेशी कापड आणि दारूची दुकाने काढली आणि त्यांना तुरुंगात टाकले गेले (कुमार 1993). या संपूर्ण काळात देश सेविका संघ, नारी सत्याग्रह समिती, महिला राष्ट्रीय संघ, लेडीज पिकेटिंग बोर्ड, स्त्री स्वराज्य संघ आणि स्वयं सेविका संघ या झपाट्याने वाढणाऱ्या महिला संघटनांनी विदेशी कापड आणि दारूवर मोठ्या प्रमाणात बहिष्कार टाकला (कुमार 1993). आता अहिंसा ही निषेधाची प्रमुख पद्धत बनली आहे. गांधींच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून हजारो स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत सामील झाल्या, तर इतरही काही सुभाषचंद्र बोस यांनीही आझाद हिंद फौजेच्या महिला रेजिमेंटमध्ये सहभागी झाल्या .

**क. स्वातंत्र्योत्तर कालखंड :**1931 च्या मूलभूत हक्कांच्या ठरावात स्वीकारण्यात आलेले लिंग समानतेचे तत्त्व, नंतर "लिंगांमधली समानता" (अनुच्छेद 14 आणि 16) हमी देणारा घटनात्मक उपाय म्हणून सुरक्षित करण्यात आला. महिलांना संधी निर्माण करण्यासाठी विविध प्रशासकीय संस्थाही स्थापन करण्यात आल्या. त्याचबरोबर महिलांच्या हक्कांच्या चळवळी विकसित झाल्या.

संपूर्ण भारतातील विविध राजकीय पक्षांमधील महिला हळूहळू त्यांच्या संघटनांच्या पितृसत्ताक प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत होत्या.1973-74 मध्ये माओवादी महिलांनी महिलांच्या प्रगतीशील संघटनेची स्थापना केली, ज्याने कट्टर डाव्या राजकारणावर स्त्रीवादी टीका केली (कुमार 1995, सेन 2000). तसेच चिपको आंदोलनाने भारतातील महिला चळवळीसाठी एक मैलाचा दगड घातला. अशा प्रकारच्या प्रतिसादांच्या मालिकेने, गुप्तपणे किंवा उघडपणे पितृसत्ताविरोधी, हळूहळू सत्तरच्या दशकातील उत्तरार्धात स्वायत्त महिला चळवळीचा मार्ग मोकळा केला. देशातील 'स्त्रियांची स्थिती' पाहण्यासाठी भारतात महिलांच्या स्थितीवर राष्ट्रीय समितीची स्थापना करण्यात आली. समितीने संसदेत समानता अहवाल (1974) सादर केला. या अहवालात समकालीन भारतातील स्त्रियांची अत्यंत वाईट स्थिती समोर आली आहे: घटते लिंग गुणोत्तर, स्त्रीमृत्यूचे वाढते प्रमाण आणि विकृती, स्त्रियांचे आर्थिक दुर्लक्ष आणि भेदभाव करणाऱ्या वैयक्तिक कायद्यांचे दुष्कृत्य. कायदेशीर, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि माध्यम क्षेत्रात 'लिंग समानता' साध्य करण्यासाठी सरकारच्या भूमिकेचे समर्थन करणाऱ्या अनेक शिफारशी केल्या 1977 मध्ये 'आणीबाणी' मागे घेईपर्यंत, महिलांचे अनेक गट मोठे होऊन स्वायत्त महिला चळवळीचा मार्ग मोकळा झाला. या सर्व काळात महिलांवर झालेल्या हिंसाचाराचे समर्थन करण्यात आले (पटेल 1985).. 1970 आणि 1980 च्या दशकात हुंडा, कौटुंबिक हिंसाचार आणि कामाच्या ठिकाणी भेदभाव यांसारख्या समस्यांना संबोधित करण्यासाठी तळागाळातील चळवळींचा उदय झाला. की1980 च्या दशकात, महिलांवरील हिंसाचाराच्या विरोधात जवळजवळ सर्व मोहिमांचा , परिणाम महिला समर्थक कायदे यांचा परिणाम (Agnes 1992) झाला. महिला चळवळीचा दुसरा टप्पा त्यांच्या 'वास्तविक' कामगिरीसाठी चेतना वाढवणे आणि कायदेशीर अंमलबजावणी करणारा ठरला

भारतातील काही महिला चळवळींनी राजकीय पक्षांशी युती करण्यापासून परावृत्त केले आहे, तर काहींनी त्यांच्यासोबत जवळून काम केले.. 1981 मध्ये सीपीआय (एम) ने ऑल इंडिया डेमोक्रॅटिक वुमेन्स असोसिएशन (एआयडीडब्ल्यूए) ची स्थापना केली. 1970 च्या दशकात सीपीआय (एम) कडे संघटित महिला शाखा नव्हती. 1943 मध्ये भूमिगत कम्युनिस्ट पक्षातील महिलांचे वर्चस्व असलेल्या महिला आत्मरक्षा समिती (MARS) ने "समानता, लोकशाही आणि महिला मुक्ती" या घोषणेसह सुरू झालेल्या , स्वायत्त महिला गटांशी सक्रियपणे सहकार्य केले आणि महिलांवरील हिंसाचाराचा प्रश्न हाती घेतला.

संपूर्ण 1970-80 च्या दशकात अखिल भारतीय चळवळींनी निषेधाच्या दिशेने, स्वायत्त गटांना प्रामुख्याने संबोधित केले स्त्रियांवरील हिंसाचार (सेन 2000) आणि समाजाचे उघडपणे पितृसत्ताक स्वरूप त्यांनी हुंडाबळी,मृत्यू, वधू जाळणे, बलात्कार, सती, ऑनर किलिंग इत्यादी स्वरूपातील महिलांवरील लैंगिक अत्याचार आणि हिंसाचाराचे प्रश्न मांडले. हे लक्षात घेणे महत्त्वपूर्ण आहे.

मथुरा या अल्पवयीन आदिवासी मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप असलेल्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयाने दोषी ठरवूनही सर्वोच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता दिल्याने देशभरात बलात्कारविरोधी आंदोलन छेडले गेले. चार प्रतिष्ठित वकिलांनी भारताच्या सरन्यायाधीशांना खुले पत्र लिहून अन्यायकारक निर्णयाचा निषेध केला. नारी निर्णय प्रतिरोध मंच (कोलकाता), पुरोगामी महिला संघटना (हैदराबाद), महिला अत्याचार विरुद्ध मंच (मुंबई), स्त्री संघर्ष, समता आणि सहेली (दिल्ली) या स्वायत्त महिला संघटनांनी देशव्यापी निदर्शनांची मालिका ही भडकवली. ), स्त्री शक्ती संघटना (हैदराबाद), विमोचना (बंगलोर). इतर अनेक बलात्कार प्रकरणे या मोहिमेचा भाग बनली आहेत जिथे बलात्काराच्या खटल्यात 'संमती' पुन्हा परिभाषित करणे हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. महिला गटांशी

दीर्घ चर्चा केल्यानंतर, भारत सरकारने 1983 मध्ये बलात्कार कायद्यात सुधारणा केली. 1970 च्या दशकाच्या उत्तरार्धात वैवाहिक घरात हुंडा आणि स्त्रियांवरील हिंसाचाराच्या विरोधात चळवळ वाढली. 1961 च्या हुंडा बंदी कायद्यात 'हुंडा' ची व्याख्या खूपच संकुचित आणि अस्पष्ट होती. 1984 आणि नंतर पुन्हा 1986 मध्ये हुंडाबंदी कायद्यात सुधारणा करण्यात महिला संघटनांच्या सततच्या आंदोलनाला यश आले. मधुश्री दत्ता या महिला चळवळीच्या कार्यकर्त्यावर रात्री उशिरा रेल्वे स्टेशनवर काही पुरुषांनी हल्ला केला. तिला पाठिंबा न देता, पोलिसांनी तिला सार्वजनिक ठिकाणी विनंति करणारी 'वेश्या' म्हणून लेबल लावलं. यानंतर महिला आणि मुलींमध्ये अनैतिक वाहतूक दडपशाही (SIT) कायदा, 1956 च्या विरोधात निदर्शनांची झाली जी पीडितेला तिच्या अनैतिक स्वभावाच्या कारणास्तव दंड करते. अखेरीस या कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि त्याला नवीन नाव देण्यात आले: अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) कायदा, 1988. रूप कंवर या 18 वर्षीय राजस्थानी मुलीच्या सार्वजनिक हत्येचा व्यापक निषेध करण्यात आला. त्यानंतर सती (प्रतिबंध) कायदा. 1971 च्या मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी (MTP) कायद्याने महिलांना सुरक्षित, वैज्ञानिक आणि कायदेशीर गर्भपात करण्याचा अधिकार प्रदान केला आहे. मात्र, हा अधिकार स्त्री भ्रूणहत्येशी जोडला गेला. याविरुद्धच्या मोहिमेचा परिणाम स्त्री भ्रूणहत्येला मदत करणाऱ्या प्रसवपूर्व लिंग निवड तंत्रांवर बंदी घालणाऱ्या केंद्रीय कायद्यात झाला. शाह बानो प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला झुगारून 1986 मध्ये मुस्लिम महिला (घटस्फोटावरील अधिकारांचे संरक्षण) कायदा मंजूर होण्यासाठी महिला संघटनांनी अनेक वर्षे एकत्र लढा दिला.

दुसरीकडे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांच्या संरक्षणाच्या मागणीसाठी चाललेल्या तीस वर्षांच्या चळवळीचा परिणाम 2005 मध्ये एक कायदा झाला. स्त्री भ्रूणहत्येविरुद्ध सततच्या निषेधाचा परिणाम गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र कायदा (2002) मध्ये झाला. स्वयंसेवी संस्थांद्वारे नोंदणीकृत कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाचे निराकरण करण्यासाठी जनहित याचिकांचा परिणाम 1997 च्या सर्वोच्च न्यायालयाच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक निर्देशांनुसार झाला. विशाखा मार्गदर्शक तत्त्वे, ज्याप्रमाणे ती लोकप्रिय होती, नंतर कायद्याचे रूप धारण केले: कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, प्रतिबंध आणि निवारण) कायदा 2013 कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ या शिवाय हि २०२३ मध्ये जी.२० परिषदेत हि लिंग समानता महिला सक्षमीकरणा चा ठराव या सारखी लक्षणीय प्रगती असूनही, भारतातील महिला चळवळीला सतत आव्हानांचा सामना करावा लागतो.

१. **महिलांवरील हिंसाचार:** कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ आणि हुंडा-संबंधित गुन्हे यासारख्या समस्या कायम आहेत. कायद्यांची कठोर अंमलबजावणी आणि सामाजिक दृष्टीकोन बदलण्यासाठी कार्यकर्ते काम करत आहेत.

२. **लैंगिक पगारातील तफावत आणि कामाच्या ठिकाणी भेदभाव:** महिलांना अजूनही कामाच्या ठिकाणी असमानतेचा सामना करावा लागतो, ज्यात समान कामासाठी असमान वेतन आणि नेतृत्वाच्या पदांवर यांसारख्या समस्यांना संबोधित करण्यासाठी तळागाळातील चळवळींचा उदय झाला.

३. **कायदेशीर सुधारणा:** हुंडा प्रतिबंध कायदा (१%1), मातृत्व लाभ कायदा (1961), आणि कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा (200५) यांसारखे ऐतिहासिक कायदे महिलांचे हक्क आणि सुरक्षितता संबोधित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

**सारांश**

महिलांवरील बहिष्कार आणि हिंसाचाराच्या पद्धतींच्या समांतर, भारताने चळवळी आणि निषेध निर्माण केला आहे. स्त्रियांचा प्रतिकार, औपचारिक आणि अनौपचारिक यंत्रणा आत्मसात करून, अनेक प्रकारे विरोध होत असतो स्त्रियांचे कार्य,विचारात घेऊन शिक्षण, लैंगिकता, कौटुंबिक भूमिका आणि मातृत्व यासंबंधी स्पष्टपणे समज हा नियमांचे उल्लंघन करतो महिला चळवळी नी लैंगिक अभिमुखता ओलांडून अनेक संदर्भ आणि समस्यां संदर्भात वादग्रस्त आवाज उठवले आहेत. ही भारतातील महिला चळवळीच्या टप्प्याचे काही अंशी यश मानता येईल.

**निष्कर्ष**

सामाजिक चळवळींनी ऐतिहासिकदृष्ट्या भारतातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थितीचे सक्षमीकरण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. रस्त्यावरील आंदोलने आणि मोर्चे हे मुद्दाम लोकशाहीत अजेंडा ठरवण्याचे सर्वात महत्त्वाचे डावपेच आहेत. अनेकदा महिला हक्क गटांसोबत हातमिळवणी करून काम करत असताना, कधीकधी त्यांच्या मागण्यांमधील फरक लैंगिक हिंसाचारापासून महिलांच्या संरक्षणाच्या कारणासाठी हानिकारक ठरू शकतो.या वरून असे निष्कर्षास येते की, भारतीय महिला चळवळी- सामाजिक चळवळी तसेच महिला हक्क गटांनी-आपण फौजदारी कायद्यावर त्यांचे संकुचित लक्ष केंद्रित करणे आणि नवीन गुन्ह्यांची निर्मिती आणि अधिक अधिकारांची घोषणा हा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे या कल्पनेवरील चुकीचा विश्वास सोडणे अत्यावश्यक आहे. महिलांवरील लैंगिक हिंसाचाराला शाश्वतपणे थांबवण्यासाठी जीवन आणि शरीराशी संबंधित मूलभूत अधिकारांच्या उल्लंघनासाठी न्याय मिळवून देण्यासाठी गुन्हेगारी दायित्व भूमिका बजावते. तथापि, या शोध प्रबंधात गुन्हेगारी कायद्याच्या चौकटीत राज्यासोबत स्त्रीवादी सहभागाचे हेतू आणि अनपेक्षित परिणाम लक्षात घेतला आहे. संरचनात्मक न्यायासाठी शाश्वत सामाजिक सुधारणांची कोणतीही मागणी महिलांवरील अन्याय कायम करणाऱ्या आणि त्यांना सक्षम करणाऱ्या सामाजिक संरचनेच्या सामूहिक परिवर्तनाच्या उद्देशाने जबाबदारीच्या दूरगामी मॉडेल् तयार करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**

1. https://www.wcdcommpune.com
2. https://birectorate.marathi.gov.in
3. https://www.jetir.org.in
4. https://www.coe.int
5. https://unacademy.com